# सातपुडा

वार्षिक नियतकालिक
२०२१-२२



आज़ादी का अमृत महोत्सव

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

हम सबका साथ हो,
जन-जन का प्रयास हो
मन में यही विश्वास हो,
देश का विकास हो !

**स्वातंत्र्य दिन अमृत महोत्सवास समर्पित**


रावेर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे

**श्री. विठ्ठलराव शंकरराव नाईक कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,रावेर**

ता.रावेर, जि.जळगाव - ४२५५०८

Ph. No./Fax. 02584-250447, Mob: 7987819272, Email : principalvsn_rvr@yahoo.in, Webe : htpp//www.svsncollegeraver.org

(कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव संलग्नीत)

प्रकाशक : प्राचार्य डॉ.पी.व्ही.दलाल


Created by Universal Document Converter

# आशीर्वाद

|| आमचे प्रेरणास्थान ||



## स्व.विठ्ठलराव शंकरराव नाईक

संस्थापक,चेअरमन, रावेर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ,रावेर

" इवलेंसे रोप, लावियले द्वारी
तयाचा वेलू, गेला गगनावरी "

Created by Universal Document Converter

''रामराज्य नांदो विद्याधन वाढो''

रावेर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे

# श्री.विठ्ठलराव शंकरराव नाईक
# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, रावेर

# सातपुडा

• वार्षिक नियतकालिक •

सन २०२१-२०२२

....*प्राचार्य*....

डॉ. पी.व्ही.दलाल

..........................प्रमुख संपादक..........................

डॉ.जी.आर.ढेंबरे

..........................विभागीय संपादक..........................

डॉ.एल.सी.नेमाडे

डॉ.बी.जी.मुख्यदल



Created by Universal Document Converter

# भावपुर्ण श्रध्दांजली

*शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक,*
*सहकार व क्रिडा, क्षेत्रातील त्याचप्रमाणे देशातील विविध शहरात*
*झालेल्या बॉम्बस्फोटात, दहशतवादी हल्ल्यात*
*शहीद झालेले पोलीस अधिकारी, सर्वसामान्य जनता*
*आणि रावेर परिसरातील मान्यवर व्यक्ती*
*तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकतेर वृंदाचे परिवारातील*
*व वेगवगळया आपत्तीत दिवंगत झालेल्या व्यक्तींना*

**भावपूर्वक श्रध्दांजली !**



Created by Universal Document Converter

# जाहिर प्रकटन

या नियतकालीकात प्रकाशित साहित्यातील मते, विचार, कल्पना,
संबंधित लेखकाची आहेत. संपादक मंडळ, प्राचार्य,महाविद्यालय आणि संस्था
त्या मताशी सहमत असतीलच असे नाही.
(दि. फ्रेम ॲण्ड रजिस्ट्रेशन ॲक्ट नियम ८ फॉर्म ४ प्रमाणे)

........................✻ प्रकाशक ✻........................

**प्राचार्य डॉ.पी.व्ही.दलाल**

श्री.व्ही.एस.नाईक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,रावेर

........................✻ मालकी ✻........................

**श्री.व्ही.एस.नाईक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,रावेर**

प्रकाशनाचा कालावधी : वार्षिक

........................✻ मुखपृष्ठ संकल्पना ✻........................

**कु.युगंधरा राजू पाटील**
(प्रथम वर्ष विज्ञान)

........................✻ मुखपृष्ठ सजावट ✻........................

प्रमोद प्रभाकर महाजन

........................✻ अंतर्गत सजावट व मुद्रक ✻........................

महालक्ष्मी ऑफसेट,छोरिया मार्केट,रावेर



Created by Universal Document Converter

# महाविद्यालयीन गीत

खान्देशाच्या पूर्व दिशेला ज्ञान सुर्य उगवला ।
शेतकऱ्यांचा कामकऱ्यांचा गाव गाव उजळला ।।धृ।।

भटक्याजाती स्थिरावल्या या सरस्वती मंदिरी ।।
गावरान सुंदरता त्यांची पदवीने खुलविली ।
सातपुड्याचा डोंगर सुध्दा स्वप्न पाहु लागला ।।१।।

मध्यप्रदेश, महाराष्ट्र सिमेवर उद्योगाचे घर ।
शिकवून रावेरच्या समृध्दीत टाकू आम्ही भर ।
माळावरचा दगड ज्ञानाने तळपला ।।२।।

महाविद्यालया सज्ज झाले ज्ञानदान करण्या ।
अनेक रायव उत्सुक झाले आकाशी उडण्या ।
ध्येयाने मृत झालेल्या शिष्य आम्ही जगवला ।।३।।

भव्य दिव्यता लाभो शिष्या, ज्ञानसंपदा मिळो ।
उन्नत होवो सकळ जन हिच सद्िच्छा प्रभो ।
श्रम, सेवा अन् ज्ञान हा मंत्र आम्ही शिकवला ।।४।।

रचना - प्रा.सौ.व्ही.आर.चौधरी



Created by Universal Document Converter

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| संपादकीय | ६ |
| प्राचार्यांचे मनोगत | ७ |
| कार्यकारी मंडळ | ८ |
| महाविद्यालय विकास समिती | ९ |
| प्राध्यापक वृंद | १० |
| कार्यालयीन सेवक वृंद | ११ |
| मराठी कथा | १३-२२ |
| मराठी-हिंदी कविता | २३-२८ |
| मराठी वैचारिक लेख | २९-५० |
| हिंदी वैचारिक लेख | ५१-५२ |
| मराठी संशोधन लेख | ५३-७१ |
| अहवाल विभाग | ७१-९४ |
| वृत्तांकन | ९५-९६ |




Created by Universal Document Converter

# संपादकाच्या लेखणीतून...

*प्रिय विद्यार्थी मित्र हो,*

*शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या वर्षाचा सातपुडा वार्षिक नियतकालिकाचा अंक आपल्या हाती सोपवितांना आनंद होत आहे. विद्यार्थ्यांच्या सृजनशक्तीचा आविष्कार म्हणजे सातपुडा वार्षिक नियतकालिक होय. विद्यार्थ्यांच्या साहित्यरूपी अंकुराला जोपासण्याचे काम सातपुडाच्या माध्यमातुन आम्ही करत आहोत. समाजातील वेगवेगळे प्रश्न समस्या, स्थिती यांचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. आपला विद्यार्थी या सर्व प्रश्न, समस्या यांना साहित्यातून चित्रित करतो. त्याच्या या सृजनाला, नवनिर्मितीला प्रकाशत आणण्याचे कार्य सातपुडाच्या माध्यमातुन केले जाते. महाविद्यालयाच्या वेगवेगळ्या उपक्रमांचे प्रतिबिंब वार्षिक नियतकालिकातून पुढे येते. आपण वर्षभर महाविद्यालयात वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन करतो. या उपक्रमांना आपल्यापर्यंत पोहचविण्याचे एक साधन म्हणजे सातपुडा हे वार्षिक नियतकालिक होय. महाविद्यालयातील विविध विभाग विद्यार्थी विकासासाठी नवनवीन कार्यक्रम घेत असतात. या विविध विभागांच्या कार्यक्रमांची नोंद वार्षिक नियतकालिकात आपण करत असतो.*

*महाविद्यालयाचे विद्यार्थी क्रीडा, विद्यापीठ परीक्षा, कला, साहित्य या वेगवेगळे क्षेत्रात यश मिळवत आहेत. या विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबसकीची थाप आपण सातपुडा या नियतकालिकाच्या माध्यमातुन देत असतो. या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक, विद्यार्थ्यानी विविध क्षेत्रात यश प्राप्त केले आहे. त्यांचे आम्ही मन:पूर्वक अभिनंदन करतो. सर्वांना पुढील कार्यासाठी मन:पुर्वक शुभेच्छा देतो. धन्यवाद !*

*संपादक................*
***प्रा. डॉ. जी. आर. ढेंबरे***



Created by Universal Document Converter

# प्राचार्यांच्या लेखणीतून........

प्रिय विद्यार्थी/विद्यार्थीनीनो,

शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ या वर्षाचा सातपुडा नियतकालिकाचा अंक आपल्या हाती सोपवितांना मनस्वी आनंद होत आहे. विद्यार्थी विद्यार्थीनिच्या साहित्याला, त्यांच्या ललितकृतींना अधिकृत व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा नियतकालिकाचा प्रमुख हेतू असतो. त्याबरोबरच महाविद्यालयातील विविध विभागाद्वारे राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा, शिक्षण विषयक आणि अभ्यासेत्तर घडामोडींचा तसेच विस्तारकार्याशी संबंधित उपक्रमांचा परिचय संबंधितांना करून देण्याचा प्रयत्न आम्ही नियतकालिकाच्या माध्यमांतून करत आहोत. सातपुड्याच्या कुशीत वसलेला रावेर हा महाराष्ट्रातील शेवटचा तालुका. सातपुडाचे विशालता हा आमचा प्रेरणास्त्रोत आहे. निसर्ग माणसाला अनेक गोष्टीशिकवत असतो. सातपुडा पर्वतरंगाचे महत्त्व सर्वज्ञात आहे. आमच्या विद्यार्थ्यांमध्ये सृजनामकतेचे सातपुड्यासारखे विशाल कर्तृत्व निर्माण व्हावो ही अपेक्षा हा छोटासा प्रयत्न !

महाविद्यालयाचा प्रशासक म्हणून महाविद्यालयाच विविधांगी विकास करण्यासाठी आम्ही नेहमीच प्रयत्नशील आहोत. महाविद्यालयाचा विकास घडवत असतांना आमचा नेहमी विद्यार्थी केंद्रीत प्रशासन चालविण्याचा प्रयत्न असतो. महाविद्यालयाचे विद्यार्थी क्रीडा, विद्यापीठ परीक्षा, कला, साहित्य या वेगवेगळ्या क्षेत्रात यश मिळवत आहेत. विद्यार्थ्यांच्या यशापाठीमागे माझ्या सर्व सहकाऱ्यांचे परिश्रम आहेत याची मला जाणीव आहे. आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये यश मिळवत आहेत ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे.

आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हे आमचे प्रमुख ध्येय आहे. महाविद्यालयात गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण निर्माण करणारा शिक्षकवृंद हा संशोधनप्रवण  अभ्यासू आहे. या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील अनेक प्राध्यापकांनी संशोधन क्षेत्रात यश प्राप्त केले त्यांचे आम्हीअभिनंदन करतो. सर्वांना मी पुढील काळासाठी मन:पुर्वक शुभेच्छा देतो

धन्यवाद !

प्राचार्य,
डॉ. पी. व्ही. दलाल



Created by Universal Document Converter

॥ कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ॥

# रावेर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ रावेर,

## ता. रावेर जि. जळगांव

## ..............* कार्यकारी मंडळ *..............

| अ.नं. | नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १. | मा.श्री. सतिष रामचंद्र पाटील | अध्यक्ष |
| २. | मा.श्री.श्रीरामशेठ कन्हैयालाल अग्रवाल | उपाध्यक्ष |
| ३. | मा.श्री. हेमंत देविदास नाईक | चेअरमन |
| ४. | मा.श्री. लक्ष्मणराव बाबुराव मोपारी | व्हा. चेअरमन |
| ५. | मा.श्री. तेजराव शामराव पाटील | सचिव |
| ६. | मा.श्री. मुरलीधर चेंडू कानडे | सहसचिव |
| ७. | मा.श्री. प्रमोद भास्कर नाईक | सदस्य |
| ८. | मा.श्री. अनिल बबनलाल अग्रवाल | सदस्य |
| ९. | मा.श्री. महेश सुरेश अत्रे | सदस्य |
| १०. | मा.श्री.प्राचार्य डॉ. पी.व्ही.दलाल | पदासिध्द सचिव |





Created by Universal Document Converter

रावेर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे

# श्री. विठ्ठलराव शंकरराव नाईक कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,रावेर

ता.रावेर, जि.जळगाव - ४२५५०८

## सन्माननीय संचालक मंडळ



मा.श्री.सतिष रामचंद्र पाटील
अध्यक्ष



मा.श्री.श्रीरामशेठ कन्हैय्यालाल अग्रवाल
उपाध्यक्ष



मा.श्री.हेमंतशेठ देविदास नाईक
चेअरमन



मा.श्री.लक्ष्मणराव बाबुराव मोपारी
व्हा.चेअरमन



मा.श्री.तेजराव शामराव पाटील
सेक्रेटरी



मा.श्री.प्रा.मुरलीधर चेंडू कानडे
जॉ.सेक्रेटरी



मा.श्री.प्रमोदशेठ भास्कर नाईक
सदस्य



मा.श्री.अनिल बबनलाल अग्रवाल
सदस्य



मा.श्री.महेश सुरेश अत्रे
सदस्य



मा.श्री.प्राचार्य डॉ.पी.व्ही.दलाल
पदसिध्द सचिव

Created by Universal Document Converter

रावेर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे

# श्री. विठ्ठलराव शंकरराव नाईक कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,रावेर

ता.रावेर, जि.जळगाव - ४२५५०८

## कल्पक नेतृत्व



## प्राचार्य डॉ.पी.व्ही.दलाल

" To Follow Knowledge like sinking Star,
Beyond the utmost bounds of human thoughts"

Created by Universal Document Converter

रावेर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे

# श्री. विठ्ठलराव शंकरराव नाईक
# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,रावेर

ता. रावेर जि. जळगांव

## ..............* महाविद्यालय विकास समिती *..............

[Maharashtra Public University Act.2016 Section 97(1)]

| अ.नं. | नाव | हुद्दा |
|---|---|---|
| 1. | श्री.हेमंत देविदास नाईक<br>(संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे चेअरमन) | चेअरमन |
| 2. | प्रा.एम.सी.कानडे<br>(संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सहसचिव) | सदस्य |
| 3. | रिक्त (विभाग प्रमुख) | सदस्य |
| 4. | प्रा.मधुकर सिताराम पाटील (विभाग प्रमुख) | सदस्य |
| 5. | डॉ.अविनाश नथ्थु सोनार (प्राध्यापक) | सदस्य |
| 6. | रिक्त (महिला प्राध्यापक) | सदस्य |
| 7. | श्री.युवराज रुपा बिरपन (शिक्षकेतर कर्मचारी) | सदस्य |
| 8. | श्री.भास्कर डिगंबर निळे (शैक्षणिक क्षेत्र) | सदस्य |
| 9. | रिक्त (औद्योगिक क्षेत्र) | सदस्य |
| 10. | श्री.विजय शांताराम महाजन (समाजकार्य क्षेत्र) | सदस्य |
| 11. | प्रा.संजय रेवा चौधरी (Co-ordinator IQAC) | सदस्य |
| 12. | रिक्त (अध्यक्ष,विद्यार्थी परिषद) | सदस्य |
| 10. | रिक्त (सचिव,विद्यार्थी परिषद) | सदस्य |
| 11. | प्रा.डॉ.पी.व्ही.दलाल (प्राचार्य) | सदस्य,सचिव |



Created by Universal Document Converter

# श्री. विठ्ठलराव शंकरराव नाईक
# कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,रावेर

## * प्राध्यापक वृंद *

### शैक्षणीक वर्ष २०२१-२०२२

| अ.नं. | प्राध्यापकांची नांवे | शैक्षणिक पात्रता | विषय |
|---|---|---|---|
| १ | प्राचार्य डॉ.पी.व्ही.दलाल | एम.एस्सी.एम.फिल,पीएच.डी. | भौतिकशास्त्र |
| २ | प्रा.एम.एस.पाटील | एम.ए.,बी.एड. | भुगोल |
| ३ | प्रा.पी.व्ही.पाटील | एम.एस्सी.,एम.फिल.,बी.एड. | गणित |
| ४ | प्रा.व्ही.डी.पाटील | एम.एस्सी.,एम.फिल. | गणित |
| ५ | प्रा.डॉ.जे.एम.पाटील | एम.एस्सी.,पीएच.डी | रसायनशास्त्र |
| ६ | प्रा.डॉ.ए.एन.सोनार | एम.एस्सी.,बी.एड.,एम.फिल.,पीएच.डी | रसायनशास्त्र |
| ७ | प्रा.डॉ.एस.आर.चौधरी | एम.एस्सी.(सेट),एम.फिल.,पीएच.डी. | रसायनशास्त्र |
| ८ | प्रा.डॉ.एम.एम.पाटील | एम.एस्सी.एम.फिल,पीएच.डी. | भौतिकशास्त्र |
| ९ | प्रा.डॉ.व्ही.बी.सुर्यवंशी | एम.एस्सी.एम.फिल,पीएच.डी | भौतिकशास्त्र |
| १० | प्रा.एस.यु.पाटील | एम.एस्सी.एम.फिल | भौतिकशास्त्र |
| ११ | प्रा.डॉ.एल.सी.नेमाडे | एम.एस्सी.,पीएच.डी. | वनस्पतीशास्त्र |
| १२ | प्रा.डॉ.ए.जी.पाटील | एम.एस्सी.पीएच. डी. | प्राणीशास्त्र |
| १३ | प्रा.डॉ.एस.जी.चिंचोरे | एम.एस्सी.,एम.फिल,पीएच. डी. | प्राणीशास्त्र |
| १४ | प्रा.एस.डी.धापसे | एम.ए.(सेट) | राज्यशास्त्र |
| १५ | प्रा.सी.पी.गाढे | एम.ए.(नेट) | भूगोल |
| १६ | प्रा.डॉ.जी.आर.ढेंबरे | एम.ए.,बी.एड.,एम.फिल,(नेट,सेट), पीएच.डी | मराठी |
| १७ | प्रा.एन.ए.घुले | एम.एस्सी.,एम.फिल. | रसायनशास्त्र |
| १८ | प्रा.एस.बी.धनले | एम.ए.(नेट) | अर्थशास्त्र |
| १९ | प्रा.डॉ.बी.जी.मुख्यदल | एम.ए.,एम.एल.आय.एस.सी.,एम.फिल,पीएच.डी. | ग्रंथपाल |
| २० | प्रा.यु.एन.पाटील | एम.ए.,एम.पी.एड.,सेट | शारिरीक शिक्षण |
| २१ | प्रा.डॉ.एस.बी.गव्हाड | एम.ए.(सेट),पीएच.डी | मानसशास्त्र |



Created by Universal Document Converter

# श्री. विठ्ठलराव शंकरराव नाईक
# कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,रावेर

## * कार्यालयीन सेवक वृंद *

| अ.नं. | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री. युवराज आर. बिरपन | वरीष्ठ लिपीक |
| २. | श्री. संतोष के. महाजन | ग्रंथालय परिचर |
| ३. | श्री. महेंद्र टी. महाजन | प्रयोगशाळा परिचर |
| ४. | श्री. निवृत्ती ए. कोळी | प्रयोगशाळा परिचर |
| ५. | श्री. युवराज एस. धनगर | ग्रंथालय परिचर |
| ६. | श्री. पंडित जी. पाटील | ग्रंथालय परिचर |
| ७. | श्री. प्रकाश के. महाजन | प्रयोगशाळा परिचर |
| ८. | श्री. रविंद्र एस. पाटील | प्रयोगशाळा परिचर |
| ९. | श्री. ईश्वर एम. बारी | प्रयोगशाळा परिचर |
| १०. | श्री. सुनिल डी. मेढे | शिपाई |
| ११. | श्रीमती. माया एस. अग्रवाल | शिपाई |
| १२. | आशिष राजेंद्र घुगे | शिपाई |
| १३. | प्रितम सतिष मेढे | प्रयोगशाळा परिचर |



Created by Universal Document Converter

Created by Universal Document Converter

# मराठी
# कथा

"मराठी असे आमुची मायबोली
जरी पारतंत्र्यात ही खंगली ।
हिची थोर संपत्ती गेली
उपेक्षेमुळे खोल कालावर्णवाच्या तळी ।
तरी सिंधू मंथूनी काढुनि रत्ने,
नियोजू तयांना हिच्या मंडनी ।
नको रीण देवोत देतील तेव्हा
जगातील भाषा हिला खंडणी"



......................कवी : माधव ज्युलियन



Created by Universal Document Converter

Created by Universal Document Converter

# मला पडलेलं सुंदर आणि भयानक स्वप्न

सानिका मोहन पाटील
प्रथम वर्ष कला

थंडीचे दिवसात जेवढ जेवढ सकाळ होते तेवढं तेवढं झोपावस वाटत ;पण काय करावे ती घराची सुपरवायझर असते न ती झोपू कुठं देत असते; सुपरवायझर म्हणजे आपली जन्मदाती आई. मला एक वेळा उठवुन गेली होती आता परत आवाज देत होती ''ये अनघा उठ लवकर किती वेळ झोपशील सूर्य डोक्यावर आला, आता तू जर नाही उठली ना तर माझ्यापेक्षा वाईट कोणीच नाही बघ.'' मी हळबळीने उठली, मोबाईलमद्ये वेळ बघितला तर खूपच उशीर झाला होता. मी ब्रश केला, आंघोळ वगैरे आटोपली आणि चहा बनवण्यास ठेवला आणि कपची शोधाशोध करत होती. जस मी कप वर उचलू तसा तो माझ्या हातून सुटला आणि फुटला. अरे देवा! हे काय झालं. हे उद्गार माझ्या तोंडून निघालं माझा आवाज ऐकून आई माझ्याजवळ आली आणि बघते तर काय की हिने कप फोडला.मी उशीरा उठल्याने आई आधीच संतपात होती आणि आता मी हे काम वाढऊन ठेवलं आहे. आई मला रागवू लागली ''केलंस नुकसान काम नका सांगू तिला आणि तोडफोड करायला पाहिजे रोज काही न काही फोडतच असतेस भांडी ठेवशील की नाही घरात.'' मी खाली बसून त्या फुटलेल्या कपाला बघत होती. माझ्या डोळ्यात पाणीच आलं. ''बस रडू नको आता फुटला तर फुटला त्यात रडण्या सारखी काय गोष्ट आहे उचल तो कप आणि सांभाळून उचल नाहीतर लागून ठेवशील हाताला आणि घेऊन बसशील हात महिनाभर.'' मला तर समजत नव्हतं की मी आईने रागवल म्हणून रडत होती का कप फुटल्यामुळे,खरंतर मला कप फुटला म्हणूनच रडायला येत होतं; कारण तो कप माझ्या खूप जवळचा होता. माझ्या वाढदिवसाला पप्पानी मला तो कप दिला होता आणि आता मात्र तो फुटला.

मला आठवत होत की ह्या कपामुळे माझं आणि दादाच नेहमी भांडण व्हायचं तो मला म्हणायचं की ''तू मला हा कप देत नाहीस ना तर एक दिवस हा कप तुझ्याच हातून फुटेल बघच तू.'' मी त्याला हसत म्हणली होती की कावळ्याच्या शापाणे गाय कधी मरत असते का.'' हे सर्व आठवुन मला अजूनच रडायल येत होते. त्याच्या मुळेच फुटला हा कप तोच बोलला होता मी त्यालाच दोष देत होते. जाऊ दे जे झालं ते झालं मग आता काय मी माझं मलाच समजावत होती. मी माझ्या डोळ्यांतल पाणी पुसलं आणि तो फुटलेल्या कपाला उचलून कचरा पेटीत टाकला आणि घरातील कामे करायला लागली. कामे करता करता कधी शाळेचा वेळ झाला कळलच नाही आता माझी कामेही झाली होती जेवण केलं, डब्बा भरला आणि बॅग घेऊन घराच्या बाहेर निघाली सँडल घातली आणि दोन पावलं चालू तोवर ती तुटली. अरे देवा! हिला ही आताच तुटायच होत, काय करू आता. मला इतका राग आला की ती सँडल जेवढी चांगली होती तेवढीही मी तोडून टाकली. हे सर्व आई बघत होती. माझं तिच्याकडे लक्ष गेलं आता माझं काही खर नाही आधी कप मग उरली सुरली ही सँडल; पण आई शांतपणे म्हणाली की ''तिला राहू दे ती दुसरी सँडल घालून जा .''मी घाईघाईने सँडल घातली आणि बसस्टॉपवर गेली. तेथे माझ्या दोन मैत्रिणी माझी वाट बघत होत्या. अरे यार! मी माझं आणि माझ्या त्या दोन ची ओळखच सांगितले नाही. मी अनघा मराठे आता पर्यंत जे काही घडत होतं ते सर्व माझ्याच बद्दल होत आणि राहिल्या माझ्या दोन मैत्रिणी त्यातली एक अवंतिका शर्मा, ही नेहमी बडबड करत असते नॉन स्टॉप बोलतच असते म्हणून आम्ही तिला बडबडी म्हणतो आणि दुसरी रुपाली जोशी ही तर एनी टाईम खातच असते म्हणून आम्ही हिला बुक्कळ म्हणतो.आम्ही तिघं लहानपणापासूनच्या मैत्रीणी आहेत आमचा एकमेकांवर खूप जीव आहे. आम्ही तीन तिगडे आहेत आणि काम बिघडवत असतात. मी बसस्टॉपवर पोहोचल्या पोहचल्या त्यांनी माझ्यावर प्रश्नचा वर्षाव केला. ''केव्हची वाट बघताय ग तुझी जरा लवकर नाही येता येत का?''अवंतिका म्हणाली. ''आता जर बस आली असती तर तू घरीच राहिली असती न''रुपाली म्हणाली. ''ओ शहाण्यानो मी एक दिवस उशिरा काय आली तुम्ही तर मला इतक्या बोलताय आणि तुम्ही रोज उशिरा येत त्याच काय ? आणि मी जर बस येईपर्यंत नाही आली असती तर तुम्ही तरी गेल्या असत्या का शाळेत'' मी त्यांना म्हणाली. ''नाही ग तुझ्या शिवाय कश्या जाणार आम्ही'' दोघंही एक साथ म्हणाल्या. आम्ही बोलतच होतो की तेवढ्यात बस आली.

सर्वजण बसमध्ये चढण्यासाठी गर्दी करू लागले. सर्वे गर्दी असल्या कारणामुळे धक्काबुक्की होत होती त्यात माझा चुकून एका मुलीला धक्का लागला आणि ती लोटली गेली. ती चिडून मला म्हणली की ''! लोटतेस कशाला मी पडली असती तर मला लागल असत तर'' ''हे बघ मी तुला नाही लोटलं चुकून धक्का लागला असेल'' मी तिला शांतपणे म्हणाली. पण ती ऐकायलाच तयार नव्हती. ''मला माहिती आहे की तू मला चुकून नही तर जाणून बुजून लोटलं आहे'' ती मला आवाज वाढवत म्हणाली. आता मला तीचा खूप राग आला होता. ''हे बघ मला तुला जर लोटायच असत ना तर मी अस तुझ्या समोर येऊन तुला अशी आडवी पाडली असती असे कारण नाही शिधलं असते.'' माझा आवाज ऐकून बसमध्ये बसलेल्या माझ्या मैत्रिणी बसमधून उतरून माझ्याजवळ आल्या आणि त्या डायरेक्ट आमच्या भांडणात उतरल्या. ''ये काय लावलंय ग तू केव्हाच, आम्ही केव्हाच बघतोय तुझी पटरपटर ती म्हणतेय ना की चुकून लागला धक्का मग चुकूनच लागला विषय संपला'' अवंतिका म्हणाली. ती मुलगी काही बोलणार तितक्यात रुपाली बोलायला लागली. आणि काय म्हणालीस ग तू हेच ना की मी पडली असती तर मला लागलं असत तर,पडली तर नाही न तुला लागलं तर नाही न मग कश्याला टरटर करतेस ग केव्हची''. रुपलीचा खुप पारा चढला होता. भांडणात मी शेर तर माझ्या ह्या दोन सव्वा शेर होत्या तिघंही एक्सपर्ट आहेत भांडणात. आम्ही भांडतच होतो की आमच्या भांडणाला केव्हची बघत असलेले कंडक्टर काका आम्हाला म्हणाले.''ये मुलींनो भांडायचे असेल तर घरी जाऊन भांडा नाहीतर जाऊन बसा बसमध्ये बापाचा राज समजून ठेवला आहे बसला केव्हाही या कितीही वेळा थांबवा तुमच्या घरची गडी समजता की काय तुम्ही.'' ते खूप रागात बोलत होते आम्हाला. आम्ही त्यांचं बोलणं ऐकून पटापट बस मध्ये चढलो फक्त शेवटची शीट रिकामी



Created by Universal Document Converter

होती त्याच्यावर जाऊन आम्ही बसलो बस हळूहळू पुढे जाऊ लागली. ''काग एकटी तिच्याशी भांडत होती तर आम्हाला बोलवलं असतं ना, आम्ही कुठं गेलो होतो का.''अवि मला म्हणाली. हो ग अवे मी तुम्हाला बोलवलं असत पण म्हटलं की मी तिला निपटऊन घेईन पण तुम्ही आल्याच'' मी तिला म्हणाली. ''हो ग आम्ही बघतच होतो की तू किती निपटवत होती तिला'' रुपी दात काढत म्हणाली. जा ग तुम्ही नाही आल्या असत्या तर मी तिला आडवच पाडलं असत पण जाऊ दे आता ते खड्ड्यात तुम्हाला सांगू यार सकाळ पासून काय होतेय काय माहीत आधीतर मी लेट उठली म्हणून आईने रागवला आणि नंतर माझा आवडता कप फुटलं मग सँडल तुटली आणि आता हे भांडण अजून तर पूर्ण दिवस घ्यायचा आहे. काय काय होणार कुणास ठावूक.'' मी सकाळपासून घडलेलं सगळं सांगत होती.बसस्टॉप येईपर्यंत आमच्या ह्या विषयावर चर्चा चालू होत्या.अवंतिका आणि रुपाली मला म्हणाली की ''तू कश्याला टेन्शन घेतेय चांगला जाईन तुझा हा दिवस पण नाहीतर आम्ही आहोत न आम्ही चांगला करुन घेऊ'' आमची बडबड चालूच होती की बसस्टॉप आलं बस थांबली आम्ही बसमधून लवकर लवकर खाली उतरले आणि शाळेकडे जाण्यास निघाले. गप्पा मारता मारता आम्ही केव्हा शाळेत पोहचलो समजलं नाही.

आजून तरी शाळा भरली नव्हती आज बस लवकर आली म्हणून आम्ही शाळेत लवकर पोहचलो. शाळा हे एक अस ठिकाण असत की जरी आपलं मूड कितीही खराब असो, काहीही झालेलं असो शाळेत आल्यावर आपलं पूर्ण मूड चेंज होऊन जाते. आम्ही वर्गात पोहचलो तेवढयात शाळेचा घंटा वाजला वर्गातच प्रार्थना झाली आणि जे ते आप आपल्या जागेवर बसले. आमचा पहिला तास व्यवस्थित गेला. हजेरी लागली, शिकवण झालं आणि काय झालं काय माहीत की पुढच्या तासाचे शिक्षक आलेच नाही. वर्गावर शिक्षक आले नाही म्हणून विद्यार्थ्यांची मजाच असते. मस्ती आणि गोंधळ करायला जे मिळते. आमच्या वर्गात कसा मच्छीबाजार भरला होता. कोणी कस बसलं होत, कोणी फिरत होत कोणी बेंचवर कुदत होत तर कोणी बेंचवर बसले होते पूर्ण वर्गात गोंधळ गोंधळ चालू होता. तेवढयात आमच्या वर्गात शिक्षक एकामागून एक येऊन उभे राहिले. त्यांच्या हाताची घडी घातलेली होती त्यांच्या कपाळावर आढ्या पडलेल्या होत्या ते आम्हाला असे बघत होते की कितीक रागवतील आणि ते स्वाभाविकच होत आम्ही गोंधळच इतका घालत होतो. जो तो ज्याच्या त्याच्या जागेवर जाण्यासाठी धडपडू लागले शिक्षक एकदम समोरच असल्यामुळे जो जिथे होता तिथेच बसला. आता एकदम शांतता झाली होती. टाचणी पडली तरी आवाज येईल अशी शांतता झाली होती. आमचे वर्ग शिक्षक आम्हाला रागवू लागले. ''मूर्खांना काही अक्कल आहे की नाही किती गोंधळ घालता तुम्ही, थोडा वेळही शिक्षक वर्गात नसले की तुमचा गोंधळ चालू त्या गाढवाला पण इतकं वारंवार सांगावं लागत नाही आणि तुम्ही त्या त्या गाढवापेक्षाही गेले का रोजचंच झालं आहे तुमचं, एक वेळा अस पनिश्मेंट देईल ना की बघाच तुम्ही परत गोंधळ करण्याचं नाव घेनार नाही''. सर्वजण मान खाली घालून हे सर्व फक्त ऐकत होते. आता आमचं काही खर नाही. शिक्षक बोलतच होये की तेवढ्यात शिपाईकाका वर्गात आले. त्यांच्या हातात कसलातरी कागद होता तो शिक्षकांनी त्यांच्या हातात घेतला. आम्हाला त्या कागडाची भीती वाटत होती सरांनी म्हणाल्या प्रमाणे त्यात पनिश्मेंट असेन का त्यात, की उद्या येतांना तुमच्या पालकांना सोबत घेऊन यावं किंवा तुम्हाला यापुढे शिकवलं जाणार नाही असं काहीतरी वगैरे असेल त्यात असे आम्हाला वाटत होते. वर्गात शांतता असली तरी आमच्या सर्वांच्या मनात विचारांचा गोंधळ चालू होता. सर्व विद्यार्थी त्या कागदाकडे भीतीने बघत होते सर्वांच्या चेहऱ्यावर बारा वाजले होते आता फक्त रडायचं बाकी होत सर्वांचं. शिक्षकांनी त्या कागदात लिहलेलं वाचण्यास सुरवात केली. ''सर्व विद्यार्थ्यांना कळवण्यात येते की आपल्या शाळेची सहल नाशिक, पुणे आणि मुंबई येथे जाणार आहे तरी सर्वांनी पालकांची सहमती घेऊन आपली नवे उद्या पर्यंत दयावी, याची फी आणि तारीख येणारया शेवटच्या तासाला तुम्हाला कळवण्यात येईल तरी याची सर्वांनी नोंद घ्यावी.'' हे ऐकून सर्वांच्या चेहऱ्यावरचे हावभाव बदलले सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद पसरले. शिक्षक सुचना सांगून दुसऱ्या वर्गात गेले.

इकडे परत गोंधळ चालू झाला. ''अवे आपण सहलीला जाणार'' मी आनंदात उडी मारत म्हणाली. ''हो ग अणे आपण जाणार सहलीला जे कधी घडलं नव्हतं ते आज होणार फिरायला आणि मजा करायला मिळेल '' अवंतिका माझ्याजवळ येत म्हणाली. आम्ही ह्या टोकाला तर रुपी शिक्षक आले म्हणून त्या टोकावर बसली होती. ''ये रूपे आपली सहल जातेय बे'' आम्ही दोघे इतक्या जोरात ओरडल्या की वर्गातील सर्व आमच्याकडे बघायला लागले परत गोंधळ चालू होता. शिक्षक येत आहेत हे बघून सर्व शांत बसले वर्ग शिक्षक वर्गात आले. परत इतका गोंधळ बघून त्यांनी आमच्या कडे एक कटाक्ष टाकला आणि त्यांनी एक हलकी स्माईल दिली आणि ते बोलले '' गाढवा पुढे वाचली गीता आणि कालचा गोंधळ बराच होता. तुमचं काहीही होऊ शकत नाही. हा विषय संपवत त्यांनी शिकवायला सुरवात केली. शिकवत शिकवत त्यांनी त्यांच्या कालच्या सहलीच्या काही आठवणी सांगितल्या आणि या पुढचे तास व्यवस्तीत झाले. आता आतुरता फक्त शेवटच्या तासाची आणि आता तो तासही चालू झाला होता. शिक्षकानी सांगितलं की ''येत्या दोन दिवसात म्हणजे उद्या आणि परवा सोडलं तर त्याच्या पुढचा दिवशी आपली सहल जाणार आहे आणि फी ही एक हजार पन्नास रुपये असतील तरी उदया येताना आपली कन्फम नावे सांगावी नाही तर नंतर घेतली जाणार नाहीत. शिक्षकाची सूचना देऊन झाली तोवर शाळाही सुटली आणि आम्ही बसस्टॉपवर आले जो मच्छीबाजार वर्गात भरून अर्धवट राहिला होता तो आता बसस्टॉपवर भरला होता आणि त्या विकण्यात येत होते ते म्हणजे आमची सहल जात आहे आम्ही तिघ सर्वांना सांगत सुटलो होतो की आमची सहल जात आहे हा विषय आम्ही खूप लांबवला होता.

थंडीचे दिवस आहेत म्हणून जर लवकरच अंधार पडतो आता हळूहळू अंधार पडत चालला होता, बसस्टॉप रिकामं होत चालले होते थोडी थोडी शांतता होऊ लागली होती. फक्त आम्ही आमच्या गावातील दहा बारा मुलं मुली होते. तेथे आमची बस खूप उशीर लागते फक्त आमचाच आवाज तेथे येत होता आता आमची बस लागली. आम्ही बसमध्ये चढलो . बस चालण्यास सुरवात झाली थोडी थंडी वाजत होती. जी बडबड चालू होती,ती आता शांततेत रूपांतर झाली. मी खिडकीजवळ बसली असल्या कारणाने खिडकीतून गारगार हवा आत येत होती. मी खिडकीतून बाहेर बघत होती. माझ्या मनात एक विचार डोकावला. एवढाही वाईट नव्हता आजचा दिवस, सुरुवात जरी खडतर झाली असली तरी शेवट मात्र चांगलीच झाली.एक मात्र चांगली गोष्ट घडली ती म्हणजे सहलीला जायला मिळणार; घरचे जाऊ देतील का ? बघू जाऊ दिल तर चांगलंच आहे नाहीतर माझं नशीब मग आता



Created by Universal Document Converter

काय. मी माझं मान हलवत स्वतःशीच बोलत होती, तर कंडक्टरकाका मला म्हणाले की ''ओ अक्काबाई स्वतःशी मान हलवत बोलणं नंतर करा आधी पास दाखवा'' मी बॅगेतून पास काढली त्यांना दाखवली आणि परत माझ्या विचारात गुंतली. विचार करता करता कधी गाव आलं कळलंच नाही. घरी पोहचता पोहचता पूर्णपणे अंधार होऊन जाते. मी घरी पोहचले सँडल काढली आणि घरात शिरले. घरात शिरल्यानंतर पूर्णघरभर भाजीचा घमघमाट सुटला होता माझी भूक अजूनच वाढली.मी माझी बॅग बेडवर ठेवले मी बघितलं तर आई किचनमध्ये पोळ्या बनवत होती.मी किचनमध्ये आईजवळ गेली आणि उत्सुकतेणे सांगू लागली. आई तुला माहिती आहे आमची सहल आहे वगैरे वगैरे जे काही शाळेत घडले ते मी सर्व आईजवळ सांगितले म्हणजे सकाळचा जो काही राग होता तो गेला खड्ड्यात पण मला नेहमीची सवय आहे की शाळेत असो किंवा कुठलेही ठिकाणचं असो मी घरी येऊन आईजवळ सर्व सांगते. मी आईशी गोड गोड बोलून आईला विचारत होती ''आई मी पण जाऊ का सहलीला,मी आजपर्यंत कधीच गेले नाही.''मी एवढस तोंड करून विचारत होती. आई माझ्याकडे बघत मला म्हणाली. '' हा जा आधी फ्रेश हो मग जा सहलीला'' म्हणजे आई नकळत हो म्हणाली. मी आनंदाच्या भरात लहानमुलासारखं उड्या मारत होती. मी फ्रेश होऊन आली गरम गरम जेवण तयारच होतं. मी लगेच जेवायला बसले. मी जेवत असतानाच पप्पा आणि दादू पण आले. त्यांना आश्चर्य वाटत होतं की नेहमी सर्वांच्या सोबत जेवायला बसणारी आज एकटीच जेवतेय. माझं जेवण झालं आणि तेही जेवायला बसले. आज माझ्या चेहऱ्यावर वेगळीच चमक दिसत होती. माझा दादू आईला म्हणाला की ''आई आपल्या घुबडला काय झालय सकाळी तर खूप गंगा जमून एकत्र होत होत्या रडून रडून आणि आता काय झालंय इतकी आनंदी का आहे''. ''गपरे तू काहीही काय बोलतोय तू होता तरी का सकाळी घरात बोलतोय तर म्हाने गंगा जमुना वाहत होत्या आणि काय रे मी घुबड तर तू काय माकड हो न''. मी त्याला तोंड वाकड करत म्हणाली. ये घुबड मी नसला न तरी मला सर्व खबर लागते की काय घडले आणि काय नाही.तो मला चिडवत म्हणाला. मी काही बोलणार तेवढ्यात आई म्हानाली. ''गप्प बसारे दोघ किती भांडता जेव्हा बघा तेव्हा भांडतच असतात.'' आई आम्हाला रागवत म्हणाली. ''पप्पा आमची सहल जातेय नाशिक, पुणे आणि मुंबईला मग मी पण जाऊ का रुपाली आणि अवंतिका पण जात आहे''. मी दादूकडे दुर्लक्ष करत म्हणाली. ''नाही पप्पा हिला आजिबात जाऊ द्यायचं नाही काही एक गरज नाही. जाण्याची'' दादू मला बघत पप्पांना म्हणाला. ''पप्पा मला जायचं आहे आणि मी जाणारच.''मी दादाकडे तोंड वाकड करत म्हणाली. ''हो जा बाळ तू सहलीला काहीएक हरकत नाही. '' पप्पा मला म्हणाले.पप्पानी हो म्हटल्या बरोबरच मी जोरात आरोळी मारली. ''ये मी सहलीला जाणार'' आणि मी पूर्ण घर भर डांस करत फिरत होती. आज बहूतेक झोपही लागणार नव्हती. घराची कामे करून मी माझ्या रूम मध्ये गेले. बेडवर पडल्या पडल्या माझी माझी बडबडत होती ''रुपी आणि अविला पण मिळाली असेल का परवानगी जाण्याची विचार करता करता कधी झोप लागली कळलच नाही.

आज मला लवकर जग आली होती रोजचा जसा दिवस असतो तसाच आजचा पण दिवस होता पण फरक इतकाच होता की मी एक वेगळ्याच विश्वात जगत होती. आज जर लवकरच घरातील कामे संपली होती. माझ्या शाळेची तयारी केली आणि बसस्टॉपवर आली. मी तेथे पोहचली तर अवंतिका येऊन उभी होती आणि रुपाली आजून तरी आली नव्हती. मी अवि जवळ गेली आणि तिला सांगू लागली ''ये अवे मी जाणार आहे ग सहलीला, पप्पानी परवानगी दिली मला.'' मी अविला म्हणाली. ''अने मी पण जाणार आहे ग'' आवि इतक्या जोरात म्हणाली की आजू बाजूचे सर्व आमच्याकडे बघू लागले. ''ये अवे हळू ग जरा आजू बाजूला तर बघात जा'' मी तिला म्हणाली. ''मी भीत नाही कोणाला'' अवि म्हणाली. ''हो का मला तर माहितीच नव्हतं तू भीत नाही कोणाला, ते जाऊ देत रुपी दिसत नाही आहे कोठ आहे ती अजून आली नाही'' मी अविला म्हणाली. ''नाही ग आली नाही ती अजून नेहमीसारखी सारखी आजही उशिरा येणार ती बघ'' अवि बोलतच होती कि येवढ्यात रुपी आली. ''आल्या महाराणी तुम्ही, हुकूम सोडला असता आम्ही बस तुमच्या घरीच आणली असती'' मी रुपाला म्हणाली. ''का ग जाणार आहेस का नाही तू काकांनी परवानगी दिली का'' मी म्हणाली. ''जाऊदे अने आपण हिच्यासाठी मुंबई पुणे इथेच उचलुन घेऊन येऊ तिला दाखवायला ही कश्याला यायला पाहिजे आहे, ही जर आली न तर आपला पूर्ण खायचा समान ही खाऊन टाकेल भुक्कड कुठली''.अवि हसत म्हणाली. ''ये गप्प ग बिचारीला अस काय म्हणतेय'' मी अविला म्हणाली. ''हो हो खुप मोठी बीचारी आहे न ही'' अवि म्हणाली. अवे हिला काय झालं ग हिच्या तोंडावर बारा का वाजलेत, ही बोलत का नाही? नेहमी तर तिला काही बोलले तर तिच्या नाकावर निंबु ठहरत नाही. मग आता काय झालं आपण ही केव्हचे बोलतोय पण ही काहीच बोलत नाही आहे''. मी अविला म्हणाली. ''मी नाही येणार जा, मी नाही गेले तर काय बिघडणार आहे काहीही नाही कधी माझ्या मनासारखे कधी होते का''. रुपाली बळबळत होती. काय झालं ग हिला अशी का बळबळतेय ही वेळगिळ लागलं की काय. मी अविला म्हणाली.'' ये रूपे काय झालंय सांगशील का नाहीतर आम्हाला कसं कळणार'' अवंतिका म्हणाली. ''यार पप्पा नाही म्हणताय मला सहलीला जायला मी खूप समजावलं त्यांना पण ते ऐकायलाच तयार नाही आहे'' रुपी म्हणाली. ''चांगलंच आहे न आमच्या मागच डोकडदुकी नाही राहणार ना हो न अने'' आम्ही तिची मजा उडवत होते. आमच्या गोष्टी ऐकून ती अक्षरशः रडायला लागली होती. ये रड्डबाई रडू नकोस, करतो आम्ही काहीतरी अने बस यायला किती वेळ आहे'' अवंतिका म्हणाली अजून पंधरा वीस मिनिट आहे अजून मी तिला सांगितले. चला मग माझ्या सोबत. अवि म्हणाली. पण कोठे रुपी आणि मी आम्ही एका स्वरात म्हणाले. तुम्ही चला तर खर मी सांगते तुम्हाला. आम्ही तेथून निघाल्या रस्त्याने जात जात अविणे आम्हाला सांगितले. रुपाच्या घरी येऊन आम्ही पोहचलो. मी आणि अवि ने आपआपल्या पप्पाना फोन लावला आणि त्यांना रुपीच्या पप्पांना समजावण्याला सांगितले. आम्ही दरवाज्यातून बघितले तर रुपीचे पप्पा आणि आई घरीच होते. काकू आम्ही या का घरामध्ये'' मी आणि अवि म्हणाल्या. ''हो बाळांनो या घरात विचारता कशाला तुमचंच तर घर आहे'' रुपाची आई किचनमधून बाहेर येताना म्हणाल्या. आम्हाला बघून रुपाचे पप्पा मजाणले की तुम्ही इथे कश्या ह्यावेळेला बस नाही येत आहे का''. ''हो काका येत आहे बस'' आम्ही म्हणाल्या. तुम्ही ह्या वेळेला इथे कश्या त्यांनी थोडं नकळतच विचारलं. काका आम्ही तुमच्याकडून एक परवानगी घ्यायला आलो आहोत रुपाला येऊ द्या न सहलीला आम्ही



Created by Universal Document Converter

दोघे पण जातोय आणि रुपी नाहीच आली तर मग आम्ही कश्या जाणार बघा बिचारीचा चेहरा कसा झाला तो तुम्ही का नाही म्हणताय जाऊ द्यात न काका'' अवि एकामागून एक बोलतच होती. ''ओ तर ह्या शहाण्या मला समजवायला आल्या आहेत तर, मी काल तिला सहज नाही म्हटलं तर ती कालच रूम लॉक करून बसली होती आणि सकाळी मी तिला जाण्यास हो म्हणणारच होतो पण ती मला न भेटताच निघून गेली, तुमच्या दोघांच्या पप्पाचा फोन आला होता माझ्याकडे मी त्यांनाही हेच सांगितले. रूपा जा मम्मी जवळून पैसे घे आणि जा बसस्टॉपवर नाहीतर बस जाइल. आम्ही काकुजवळून पैसे घेतले आणि बसस्टॉपवर आले. आमच्या प्रयत्नाना यश मिळाले आमचं अस झालं होतं की आनंदी आनंद गडे जिकडे तिकडे चोहीकडे आमचा आनंद मावतच नव्हता. आम्ही बसस्टॉपवर आले तोपर्यंत बस आलीच होती आम्ही बसमध्ये जाऊन बसल्या. बस चालण्यास सुरुवात झाली. आम्ही सर्व इतके बोल्ट होतो की अख्खी बस दणदण करत होती. ''कंडक्टर काका आम्हाला म्हणाले की शांत बसताय की इथेच सर्वांना उतारू'' ते खूप संतापले होते बसमध्ये एकदम शांतता पसरली होती. आम्ही शाळेत आलो नेहमीप्रमाणे आम्ही वर्गात जाऊन बसलो प्रार्थना झाली आणि पहिल्या तासाचे शिक्षक वर्गावर आले. त्यांनी जे जे सहलीला जात होते त्यांची नावे घेतली. आज ज्याची नावे घेतली जाणार ते फायनल असणार नंतर कोणतीच नावे घेतली जाणार नाही आणि पैसेही आजच घेतली. बघता बघता खूप जणांनी नावे दिली होती. नावे घेता घेता दोन तास संपले आता तिसऱ्या तासाला सुरवात झाली होती शिक्षकांनी नावांची फाईल जमा केली आणि खाली हॉपिसला जमा केले आणि वर्गात आले ते आम्हाला म्हणाले की ''फक्त आज आणि उद्या पॅकिंगला वेळ आहे म्हणून आता हा तास संपला की तुम्हाला सुट्टी दिली जाईल उद्याचा पूर्ण दिवस पॅकींग ला द्या आणि हा परवा पहाटे सर्वांनी लवकर यावे. जर कोणी उशिरा आले तर त्याला नेले जाणार नाही'' सर बोलतच होते की बेल वाजली आणि शाळा सुटली. आम्ही घरी आलो. घरी येता येता संध्याकाळ झाली होती आजचा दिवस तर असाच गेला आता सर्व काही उद्या कराव लागणार होतं. मी घरात बडबड करत फिरत होती. आई मी हे नेणार ते नेणार खायला काय करून देणार आहे.सर्व विचाराणं आईच डोकं दुखवता होती. बघता बघता सकाळ झालीच. आज सुट्टी आहे म्हणून जर उशीरच उठली होती. घरातील सर्व कामे आतपुन मी कापाटाजवळ बसले कोणते कपडे घेऊन जाऊ हा विचार चालू होता कपाटातील सर्व कपडे बाहेर काढून ठेवले होते. आणि पूर्ण घरात पसरवून ठेवले होते. पूर्ण कापाटभरून जरी कपडे असले तरी अस वाटत की हे तर घातलेले आहे मग काय तेच घालायचे पण प्रत्येक वेळेसाठी नवीन कुठून आणायचे न मग तेच घालावे लागणार म्हणून विचार करत बसली होती की कोणते कपडे घेऊन जाऊ तेवढयात आई मला म्हणाली की ''हे काय पसारा करून ठेवला आहे घरात जे घेऊन जायचे आहे ते काढ आणि बाकीचे ठेव कपाटात. मी पटापट जे कपडे घेऊन जायचे ते काढले आणि बाकीचे ठेवले. माझ्या दोन बॅग गाचागच भरल्या. खूप काही खायचा समान आणि बाकीचे कपडे भरले होते. आज दिवस पूर्ण पॅकिंग मध्ये गेला दोन दिवस कसे गेले सजलच नाही. ज्या दिवसाची आतुरतेनं वाट बघत होते तो आज उजाडलाच. पहाटेच निघायचं होत म्हणून लवकरच उठाव लागलं होतं, जो वेळ दिला त्या वेळेवर निघावं लागणार होत. मला सोडायला आई आणि पप्पा येणार होते आणि अवि रुपीचे पण आईवडील येणार होते. म्हणून तिघांच्या पप्पानी एक गाडी बुक केली होती. आम्ही त्यात जाणार होते. आवि आणि तिचे आईवडील आणि रुपीचे पप्पा पण आले होते आता बाकी होते ते रुपी आणि तिची आई, दोघ सारख्या होत्या आई तशी मुलगी दोघांना येण्यास उशीर होतो केव्हाही. ''अवे कुठं राहिली ग ही रुपी,रोज येते तर येते उशिरा आजही उशीरच करतेय.'' मी अविला चिडून म्हणाली. हो न आहे तरी कुठं ही थांब फोन लावते तिला. आजून आपलयाला जायला अर्धा पाऊण तास तरी लागतो, म्हणून म्हटलं की जर लवकर निघावं पण ही आहे की येण्याचं नाव नाही घेत आहे. अविचा आता पारा चढला होता. आम्ही तिला फोन लावू तेवढयात ती आलीच. इतका वेळ लागतो का कुठं आम्ही तुला सोडून जाणार होतो आता मग करत बस घरी तयारी आम्ही दोघे एक मागून एक तीला बोलत होते. चला मुर्लीनो बसा गाडीत इथेच बोलत नका बसू आधीच उशीर झाला आहे. काका आम्हाला म्हणाले आम्ही इथून निघाले. तरी आम्ही तिला बजावले होते की लवकर येशील तरी ती उशिराच आली. पप्पा लोकांच्या आणि मम्यांच्या गप्पा शाळा येईपर्यंत मस्त रंगल्या होत्या. त्या मोठ्यांच्या गोष्टी ऐकून आम्ही तर पूर्ण पणे कंटाळल्या होत्या. आम्ही त्यांच्यात बोलुही शकत नव्हत्या. आलीच बाबा एकदाची शाळा. आम्ही गाडीतून खाली उतरले आणि आम्ही शाळेत गेटमधून आत प्रवेश केला.

जस जस आम्ही पुढे पाऊल टाकत होतो तस तस आमची उत्सुकता अजूनच वाढत होती. आमच्या शाळेच्या मागच्या बाजूला ग्राउंड आहे तिथे सर्व बसेस उभ्या होत्या, तेथे जाऊन आम्ही पोहचलो. खूप साऱ्या बसेस होत्या. आता आम्ही कोणत्या बसमध्ये असणार काय माहिती. आमच्या आधी खूप विद्यार्थी येऊन पोहोचले होते आणि काही यायचे बाकी होतो. आम्ही तिथे उभे असतांना असे लक्षात आले की सर्वांना वर्गा प्रमाणे बस मध्ये बसवण्यात येणार आहे मावले तर ठीक नाहीतर दुसऱ्या बसमध्ये बसविण्यात येतील अस आम्हाला कळलं होतं. लगभग सर्व आले होते म्हणून सर्व गोंधळ गोंधळ चालू होता पालकांचा वेगळा आणि विद्यार्थ्यांचा वेगळा जणू एक प्रकारे जत्रा भरली होती. सर्व आले की नाही हे बघण्यासाठी शिक्षकानी ज्या यादीत विद्यार्थ्यांची नावे होती त्यात एक एक करून चेक करून बघत होते.पण कोणी ऐकायलाच तयार नव्हत कारण गोंधळच इतका होता की सरांचा आवाज कोनापर्यंत पोहचत नव्हता. पुढच्याना ऐकायला येत होतं तर मागच्याना येतच नव्हता. शिक्षकांचा ओरडून ओरडून घास बसण्यावर आला होता. ज्यांच्यापर्यंत आवाज जात होता त्यांनी बाकीच्यांना आवाज कमी करण्यास सांगितले. आता कुठं आवाज कमी झाला एकदम शांतता झाली आता शिक्षकांचा आवाज सर्वांपर्यंत पोहचत होता. शिक्षकांनी बघितले तर सर्व आले होते. त्यांनी आम्हाला काही सुचना दिल्या आणि नियम सांगितले आणि एक एक करून आम्हाला बसमध्ये बसवले. प्रत्येक बसमध्ये दोन किंवा तीन शिक्षक होते. गणपती बाप्पा मोरया म्हणत बस चालण्यास सुरवात झाली. पूर्ण बसमध्ये धुमाकूळ चालू होता, मस्ती मजाक, गप्पा गोष्टी सर्व काही सर्व काही चालू होतं. मला तर हे सर्व स्वप्नवतच वाटत होतं. माझ्या वर्गातील माझी एक मैत्रीण सोनाक्षी ही नेहमी आमच्या तिघांसोबत राहते ती आमच्या जवळ आली आणि आम्हाला म्हणाली की चला ना आपण कोणतीतरी गेम खेळूया. हो ग अवे चला आपण गेम खेळूया. मी म्हणाली. पण कोणता खेळायचा अविने विचारले. अंताक्षरी खेळुया आपण सोनाक्षी बोलली. ग्रेट चला आम्ही शीटवर्ण उठलो.सर्वांना सांगितले की आपण अंताक्षरी खुळूया. अंताक्षरीला सुरवात झाली. बेठे बेठे क्या करे करना हे कुछ काम सुरू करे अंताक्षरी लेके प्रभु का नाम.



Created by Universal Document Converter

गाण्यांमध्ये सूर बेसूर सर्व लागत होते. जणू त्या बसमध्ये लता मंगेशकर,आशा भोसले हे उतरले होते. खेळता खेळता कधी दुपार होऊन गेली कळलच नाही.

नाशिक आता काहीच अंतरावर होत. पहाटेच निघाल्यामुळे संध्याकाळच्या आत नाशिकमध्ये पोहचणार होते. सर्वांना आता भूक लागली होती. नाशिकला पोहचताच जेवणच बघणार होते. पण खुप उशीर पण झाला होता. आणि सर्वांना भूकही लागली होती म्हणून इथेच एक होटेल लागलं आम्ही तिथेच उतरलो जेवनासाठी. तेथे टेबल होते त्याच्यावर जाऊन आम्ही जाऊन बसलो. शिक्षकांनी जेवणाची ऑर्डर दिली. थोडं थकल्या सारख वाटत होत एकसारखं सहा तास बसून प्रवास केला होता आणि अजून एक दिड तास लागणार होता. नाशिकला पोहचण्याला हे हॉटेल जवळ खूप भारी होत ते शहराबाहेरील होत तिथे येणाऱ्या जाणाऱ्या गाड्या थांबत होत्या जेवणाला. आम्ही तिघा आणि ती सोनाक्षी पण आमच्या सोबत टेबलावर बसली होती. सोनाक्षी थोडी सिंसिटीव होती . पण आमच्यात राहून राहून ती पण खोडकर झाली होती. आम्ही चौघे जोवर जेवण येत नाही तोवर आम्ही चम्मच ने प्लेटवर वाजवत होते. आम्ही लहान मुलांसारखं वागणूक करत होते . आम्ही एकच वाक्य परत परत बोलत होते जल्दीसे खान दो, जल्दीसे खान दो. हे कृत्य बघून एक कटाक्ष आमच्याकडे टाकला. आम्ही चिडीचूप एकदम गप्पच झाले. ते आमच्या जवळ आले आणि म्हणाले काय आहे हे तुम्ही लहान आहात का आता ? हे कृत्य करण्यासाठी ते खूप रागात होते. आता तिथल्या वेटरने आमच्या टेबलवर जेवणाचे ताट आणून ठेवले. मटर पनीरची भाजी, पोळी,फोडणीचा भात, लोणचं इतकं काही होत त्यात. आम्ही जो जेवणावर ताव मारला ताटातले संपेपर्यंत थांबल्याच नाही पोट भरून खाल्लं. सर्वांचं झालं होत. अर्धा तास तरी झाला होता आम्हाला इथे थंबून.आम्ही येऊन बसलो बसमध्ये आणि बस सुरू झाली. बसमध्ये अजुनच धिंगाणा वाढला जणू जेवनामुळे आमच्यात फुल चार्जिंग झाली होती मस्ती करण्यासाठी. आम्ही नाशिकमधल्या पंचवटीला येऊन पोहचलो बस थांबली आणि आम्ही बसमधून एक एक करून खाली उतरत होतो. आम्ही मागे बसलेल्या असल्यामुळे आम्हाला झाली खाली सर्वात शेवटी उतरावं लागत होते पण त्या पुढच्या मुली इतक्या हळू हळू उतरत होत्या की आम्हाला इथे उभं राहून राहून कंटाळा आला होता. मी आणि अवि पुढच्या उतरणाऱ्या मुलींना म्हणाली ''ये पोरीनो उताराकी पटापट की आम्हाला इथूनच पंचवटी दाखवण्याचा विचार आहे की काय तुमचा.'' आमचं बोलणं ऐकून पुढची एक मुलगी आम्हाला म्हणाली. हो ग बाई उतरतोय न इतकी काय घाई झाली आहे तुम्हाला. हा मग उतर ना लवकर इतक्या हळू हळू उतरताय की पायाखालची मुंगी पण मारणार नाही मी तिला म्हणाली. सर्व उतरले बसमधून. आम्ही पंचवटीच्या परिसरात पुढे पुढे जाऊ लागले खूप सुंदर आहे हे ठिकाण. आम्ही एक एक करून सर्व मंदिर पाहू लागले. खूप सारे मंदिरे आहे या ठिकाणी. आम्ही येथे खूप सारे फोटो काढले. ह्या प्रत्येक मंदिराचा इतिहास आणि महत्व शिक्षकांनी आम्हाला सांगितले येथे असलेल्या काळाराम मंदिरात पाच वटवृक्षाचा समूह आहे म्हणून या स्थळाला पंचवटी म्हणतात. जेवढ ऐकलं होतं त्यापेक्षा सुंदर आहे. सर्व परिसर बघून झाला होता. आता येथून निघण्याची वेळ झाला येथून जाण्याची इच्छा तर होत नव्हत पण जावं तर लागणारच होत. आम्ही हळू हळू पंचवटीला बघत बघत गप्पा गोष्टी करत चालत होत्या, सर्व बसमध्ये बसले होते फक्त आम्ही चौघेच खाली राहिले होते. ''अवे किती सुंदर आहे ग हे'' मी अविला म्हणाली. हो ग खूपच असं वाटत की इथेच राहून जावं किती सुंदर वातावरण आहे इथलं. अवि म्हणाली हो हो इथेच घर बांध आणि इथेच राहा म्हणजे आमच्या मागची कटकट एकदाची संपेल. मी तिला हसत म्हणाली. जा मला नाही बोलायचं तुमच्याशी. अवि पाय आपटत पुढे निघून गेली. ये अवे थांब रुपे थांबव ग ह्या वेडीला. मी अवीच्या मागे मागे जात म्हणाली. अवे थांब ग तिचा स्वतःचा स्क्रू ढिला आहे आणि ही तुला वेडी म्हणतेय कश्याला रागवतेय ग तुला कोणतं खरचं इथे घर बांधायचं आहे''. रुपी तिला समजावत होती. तेवढयात आमच्या शिक्षकांनी आम्हाला आवाज दिला. मुलींनो चला लवकर बाकीचे केव्हचे आलेत तुम्ही इतक्या हळू हळू का चाललाय, तुम्हाला राहायचे आहे का इथे रहा माझं काही म्हणणं नाही की तुम्ही चलाच आमच्या सोबत. सरांनी आम्हाला थोडी स्माईल दिली आणि बसमध्ये चढले आणि त्या ड्रायव्हरला म्हणाले की चला आलेत सर्व. त्यांनी गाडी चालू केली. आम्ही धावत धावत जाऊन बसमध्ये चढलो आणि शिक्षकांना म्हणाल्या की ''नाही नाही सर आम्हाला पण यायचं आहे पुढचे स्थळ पण बघायचे आहे आणि घरी पण जायचं आहे ओर हम नाही आये तो शैतानी कोन करेंगा.'' मी एक दमात सर्व काही बोलून गेली. ''हो का बस मग लवकर'' सर म्हणाले. आता आम्ही तेथून निघाले पांडव लेणीकडे. पंचवटीपासून काहीच अंतरावर होत. बस हळूहळू पुढे जाऊ लागली आम्ही तीन कार्टून्स उभ्याच होत्या.

अवे रूपे किती सुंदर होत न ते पंचवटी तेथे असलेले छोटे छोटे मंदिर त्या प्रत्येक मंदिरात जाऊन बघायला मजा आली तेथे असलेले ती लोकांची गर्दी खूप मस्त वाटत होतं आपण कोठे जातच नाही तर आयला जगाची सुंदरता कधी बघताच आली नाही. पण आता आपण बघतोय. मी नुसती बडबडत होती रुपी ऐकत होती तर अवि नख खात काहीतरी विचार करत होती. अवे ऐकत आहेस न. मी तिला धक्का देत म्हणाली, मी धक्का दिला कारणामुळे ती पुढच्या शीटला जाऊन आदळली. मी आणि रूपा हायफाय देत तिला हसत होत्या. ती रागात माझ्याजवळ आली. ती बोलणार तेवढ्यात मी तिला म्हणाली अवे तुला लागलं नाही ना. माझ्या बोलण्याने ती अजूनच भडकली होती. त्याच्यात रुपी पेट्रोल टाकण्याचं काम करत होती.ये अने तुला डोकं आहे की नाही मला जर लागलं असत तर तुला मी अजिबात सोडलं नसत. ती एका दमात बोलत होती. हो बघू तुझं नाक चपट झालं का दात तुटला, चष्मा तर तू लावत नाही की तो तुटलं. मी रुपीकडे बघत हसत होती. जा मला न तुमच्याशी बोलायचंच नाही. मला विचारत नाही की खरच मला लागलं आहे का? माझी मज्जा उडवताय. दात काढताय. ती रागावून शिटवर बसली. ये अवे ऐकणं तू रागवू नकोस न. आम्ही तर असच तुझी थट्टा करत होतो.मला काय माहिती की तू हलकी उभी आहेस ते. हे सर्व जाऊ देत तू इतका काय गंभीर विचार करत होते की तुला माझा आवाज येत नव्हता. मी तिला हलकी स्माईल देत म्हणाली. अरे तू जे बोलत होती मी त्याचाच विचार करत होते की आपण कधी कुठं सोबत फिरायला गेलेच नाही, हे कधी अनुभवलंच नाही आपण तेच ते जगत होतो. रोज सकाळ झाली की शाळेत या आणि संध्याकाळ झाली की घरी या हेच करत होते पण आता हे काही नवीन करायला मिळतय नवीन नवीन बघायला मिळणार काही नवीन शिकायला मिळणार. ती एक दमात सर्व काही बोलून गेली. बाप रे! अवे इतका विचार करत होते तू हे खरं आहे मी आपण कुठंच गेले नाही पण आता आपण हे क्षण जगायचे हो न रूपे मी म्हणाली. हो ग रुपी म्हणाली. आता



Created by Universal Document Converter

आम्ही पांडव लेणीला पोहचलो, बस थांबली.

सर्व उतरत होते तोपर्यंत मी खिडकीतून बाहेर बघितले तर एक सुंदरशी लेणी तिथे एका टेकडीमध्ये चोखपणे कोरलेली होती.मी शिटवरून उठली आणि आम्ही बसमधून खाली उतरले. लेणीकडे बघत पुढे पुढे जात होते. वर बघता बघता मला ठेच लागली. मी पडणार तेवढ्यात मला अवि आणि रूपाने संभाळले. ये बाय संभाळून चाल जरा पडली असती न आता तू रुपी म्हणाली. अग काय करू ह्या लेणीची भव्यता आणि सौंदर्यता बघून माझी नजर हटतच नाही आहे. मी म्हणाली इथे ऐकून चोवीस लेण्या आहे. त्या आम्ही एक एक करून बघत होत्या. ते बघता बघता असे लक्षात आले की तेथे असलेल्या काही लेण्या व  मुर्त्या चांगल्या स्वरूपाच्या आहे तर काही खंडित स्वरूपात शिल्लक आहेत. तिथे दगडात कोरल्या मुर्त्या किंवा बुद्ध स्तूप सुंदर प्रकारे होत्या. आम्ही तीन तिगड सोबतच फिरत होते वाटत होतं की काहीतरी बिघडवणारच होतं.  तिथे त्या लेणींमध्ये काहीतरी लिहलेला होत. आम्हाला काहीएक समजत नव्हतं की त्यात लिहिले आहे. मी रुपाला म्हणाली की रूपे हे बघ कस तुझं अक्षर दिसतेय मी तिला हसत म्हणाली अविही हसत होती. रुपी मला म्हणाली की ''ये अने मला म्हणतेय आणि तुझं कोणतं इतकं सुंदर अक्षर आहे चिडीमुंगी सारख तर आहे. मला तर हे तुझंच दिसतेय''. आता ती मला हसत होती. तेवढ्यात अवि म्हणाली ''नाही हे तर ते डाक्टरांच्या अक्षरासारखं दिसतेय हो न तिघांनी एकमेकांना हायफाय दिला आणि हसत होत्या. आमचे हे कारनामे सर कान देऊन ऐकत होते आणि बघत होते. आमचं लक्ष त्यांच्या कडे गेलं तर त्यांनी एक रागीट कटाक्ष टाकला आणि आम्ही तेथून सटकल्या. जाताजाता मी त्यांच्याकडे पाहिलं तर ते स्वतःच हसत होते. आणि ते म्हणाले की काय कारट्या आहेत ह्या. ती सर्व लेणी बघून झाली. आणि शिक्षकांनी त्या लिहलेल्या ठिकाणाजवळ बोलवलं आणि ते आमचं बोलणं ऐकून त्यांनी आमच्या तिघांकडे बघत सर्वांना सांगितले की, हे इथे लिहलेल आहे ते पाली भाषेतील शिलालेख आहेत नाकी डॉक्टरांचं अक्षर. ये अवे रूपे हे शिलालेख आहे डॉक्टरांचं अक्षर नाही. मी त्यांना म्हणाली आम्ही सर्वांच्या मागे उभ्या राहून तोंड दाबून हसत होत्या. चला मुलांनो पुढे बघुयात शिक्षक म्हणाले. ह्या लेणीत खूप छान प्रकारे कोरीव काम केलेले आहे. इथे अजून खूप काही बघितले आम्ही शिक्षकांनी प्रत्येक मूर्त्यांची लेणीची एक एक करून सर्वांची माहिती सांगितली. सर्व काही बघतच होते की रुपी आम्हाली म्हणाली अने अवे मला न भूक लागली आहे ते काहीतरी खायला पाहिजे. ये रूपे आता दोन तीन तास आधी तर खाल्लं आहेस तू आणि आता एवढ्याश्या वेळात भूक लागलीही तुला पोट आहे की कोट तुझं खातच असते. मी रुपाला म्हणाली. अने तिने खाल्लं नाही हादळलय दोन लोकांचं एकटी खाऊन गेली ही आणि म्हणे मला भूक लागली. अवि म्हणाली तीन चार तास झाले ग. आणि तीन चार पण खूप होता. ती घड्याळा कडे बघत म्हणाली हो खा मग गे दगड खूप छान दिसतंय हे सर्व पिझ्झ बर्गर समजून खाऊन टाक हा फक्त दात राहतील की नाही हे आम्हाला माहीत नाही. आणि पोटाचा काय हाल होणार देव जाणे हो न अवे. मी तिला हसत म्हणली हे बघ माझी अशी थट्टा करू नका मला खरच भूक लागली आहे. ती एवढस तोंड करत म्हणाली हो थांब बसमध्ये गेले की खाशील आम्ही खूप काही आणलं आहे. ते बॅगेत ठेवलेलं आहे. पण तिला सबुरी असेल तर ना. तिने तिच्याजवळ असलेल्या बॅगेतून चिप्सचे पॅकेट काढले आणि खात बसली. चल आता खाउगल्ली कुठली. इथेच उभं राहण्याचं विचार आहे का ? आता पूर्ण लेणी बघून झाली होती. आम्ही बसजवळ येऊन पोहोचलो. लवकर लवकर बसमध्ये बसल्या आणि चालली आमची गाडी पुढच्या स्थळाकडे. आम्ही सप्तशृंगी गड बघणार होतो. गड हा नाशिकपासून साठ किलोमीटर अंतरावर होतं तेथे जाण्यासाठी दोन अडीच तास तरी लागणार होते. आम्ही आमच्या आमच्या शिटवर बसलो होतो. मी आताचे मोबाइलमध्ये काढलेले फोटो बघत होती. अवि इअरफोन लावून सॉंग ऐकत होती आणि रुपी खात बसली होती. तिघे शांतपणे बसल्या होत्या म्हणून तरी बसमध्ये शांतता होती. सोनाक्षी आमच्या जवळ आली आणि तिने जो भाषण चालू केल ते थांबण्याचं नाव घेत नव्हतं.मी अवि आणि रुप कान देऊन ऐकू लागल्या. ''का ग तुम्ही का इथे मोबाईल चालवण्यासाठी आला आहात वाटतं आणि ती तर जेव्हा पहा तेव्हा फक्त खातच असते मला तर असं वाटते की ही इथे खाण्यासाठीच आली आहे. घरी तर मिळत नसेल म्हणून इथेच जितकं मिळेल तितकं खाऊन घेऊ, मी तर ऐकलं होतं की तुम्ही खूप मोठं मोठ्या गोष्टी केल्या होत्या की आम्ही अस करू तस करू आता काय झालं ह की फक्त ते म्हणतात न की बडयाबडया बाता आणि.....आणि मला आठवत नाही आहे.तुम्ही समजून घ्या याच्या पुढच, हा मेन मुद्द्यावर येऊ एवढंच केलं तुम्ही बाकी काहीच नाही''. सोनाक्षी नुसती बडबडत होती. मला तर हसूचं आले. मी मोबाइल बाजूला ठेवला. आणि मी तिला म्हणाली, अरे! हो हो बाई थोडं थांब जरा आम्ही ह्यासाठी बसलो होतो की, जरा फिरून फिरून दमल्यासारखं वाटत होते. म्हणून जरा रिल्याक्स होण्यासाठी बसलो होतो नाहीतर आम्ही एकाठिकानी बसणाऱ्यातले  नाहीच मी सोनाक्षीला म्हणाली, ये खाऊगुल्ले ठेव ते खाण्याच बाजूला किती खाशील फुटेल न ते पोट तुझं, आता याच्या पुढे तुला काही एक खाऊ देणार नाही आम्ही, तू आता डायरेक्ट संध्याकाळीच जेवायचं. आम्ही तिच्याजवळून तिची बॅग घेऊन घेतली ज्यात खाण्याच्या वस्तू होत्या. मी आणि अवि तिला म्हणत हायफाय देत हसत होत्या. तुम्ही नेहमी असच करता बघा तिला याचा थोडा रागच आला होता. ती आम्हाला रागारागात बघत होती. बस झालं उठ शिटवरून. आम्ही चौघे पुढे येऊन उभ्या राहिल्या.अटेन्शन प्लिज म्हणत सर्वच लक्ष आमच्याकडे वेधलं. हे बघ अस चुपचाप बसल्या बसल्या हे ट्रिप तर बोरिंग होऊन जाईलन. मी सर्वाना म्हणाली माझं बोलणं ऐकून बसमधील एक मुलगी मला म्हणाली की मग करायचं तरी काय? काही करू या अवि म्हणाली, अंताक्षरी खेळूयात का? एक मुलगी म्हणाली नाही आपण तेव्हा तर खेळलो होतो. सोनाक्षी म्हणाली मग आता करायचं तरी काय. तीच मुलगी म्हणाली  काही तर करा डान्स करा, मारामारी करा, जोक्स सांगा, बसवर चढा, बस डोक्यावर घ्या पण करा काहीतरी करा कारण हे क्षण पुन्हा येणार नाही म्हणून काहीतरी करा. हा फक्त बसवर वगैरे चढू नका नाहीतर सर आपल्याला इथेच उतरऊन जातील ते इ फक्त बोलण्यात बोलून गेली नाहीतर तुमचं काही खर नाही बाबा चढून जासाल  बसवरती हा एक वेळा बस डोक्यावर घेतले तर चालेल पण ते नाही हो परवडणार. नाहीतर बसवर चढसाल आणि सांगसाल की अनघाने सांगितले होते. मी त्यांना म्हणाली माझं बोलणं ऐकून सर्व मला हसत होते. हसण बंद करा आधी विचार करा की काय करायचे आहे. मी रागाने त्यांना म्हणाली. डांस करूयात अवि म्हणाली. नाही यार डांस नको सोना म्हणाली. अंताक्षरी खेळूयात रुपी म्हणाली झालं न ग बाई ते खेळून आताच तर सांगितले



Created by Universal Document Converter

मी तुझ्या डोक्यात ते आलूचे चिप्स भरलेत सर्वे मी तिला चिडून म्हणाली. इथे तू क्रिकेट, फुटबॉल किंवा खो-खो तर खेळू शकत नाही मग खेळायचं तरी काय. रुपी म्हणाली कीर्तन करत बसा मग अरे विचार करा नाहीतर वेळ निघून जाईल आणि आपण बसू म्हणत काय खेळायचं काय खेळायचं करत मी त्यांना म्हणाली.

ये आयडिया सोनाक्षी जोरात ओरडली. काय काय लवकर सांग आम्ही तिला म्हणाल्या आपण न कुशन पासिंग चा गेम खेळूयात म्हणजे ते हम आपके हे कोण मध्ये कसे खेळत तसा खेळायचा एकाच्या मोबाईल मध्ये गाणं लावू आणि उशी पास करू गाणं जेव्हा थांबलं आणि ज्याच्याजवळ उशी असली त्याने इथे येऊन काहीही करून दाखवायचं. सोनाक्षी म्हणाली पण उशी आणायची कोठून आवि म्हणाली अरे आपल्याकडे रुमाल वगैरे असतील न त्याचे बनवू सोना म्हणाली हो आणि मी आणला आहे. म्हणजे गाण्याचा सर्वांना आवाज येईल मी धावत जाऊन माझ्या बॅग मधून काढला आणि ने कनेक्ट केलं आणि एक मुली जवळ ते दिल तिला उलट्या साईड ला उभं केलं आणि साँग चालू झाल आणि कुशन पाशिंग व्हायला सुरुवात झाली पकडलेल्या मुलगी मस्त गाण्याचा मजा घेत होती आणि आम्ही कुशन पाशिंगचा. साँग स्टॉप झालं आणि कुशन एक मुलीजवळ थांबलं. आता ती सर्वांच्या समोर येऊन उभी राहिली आणि म्हणली सांगा आता काय करायचंय मला. तुला येईल ते कर असे सर्व म्हणू लागले. तिने मस्त डांस करून दाखवला.सर्वांनी गेमला सुरवात केली. आता उशी थांबली अवि जवळ तिने तर शोले पिक्चरातील धर्मेंद्र ची ऐक्टींग केली जे तो हिरो पाण्याच्या टाकीवर चढून सुसाईड करण्याची धमकी देतो ते हिने केलं. बसंती इन कुत्तो के सामने मत नाचना हे मध्येच तिने घुसवलं. मग अमिताभ बच्चन, सनीदेवोल यांची पण तिला ऐक्टींग सर्व तिची कृत्य बघून पोट धरून धरून हसत होते. तिने सर्वांना खूप हसवले तिने तीच संपवलं आणि खेळ पुन्हा सुरू झाला हेच नाही तर कोणी शिक्षकांची ऐक्टींग केली कोणी मम्मीच्या रागवण्याची , आजीची,भावाची,शेजारच्याची सर्वांची ऐक्टींग झाली इथे खूप काही झालं ह्या गेम मध्ये खूप मजा पण आली. आमचा गेम सर मागच्या शिटवर बसून बघत होते. आमचं लक्षच नव्हतं त्यांच्या नंतर माझ लक्ष गेलं तर तेही हसत होते त्यांनाही खूप मजा आली असेल हे सर्व बघून. आता आमची बस येऊन पोहचली सप्तश्रृंगी गडाजवळ येऊन पोहोचलो. आम्ही बसमधून खाली उतरलो. आम्ही इथे पोहचता पोहचता सांध्याकाळ होत आली होती.अजूनही आम्ही हसतच होतो. खूप उंच अश्या डोंगरात हे मंदिर आहे.आणि वर चढण्यासाठी पायऱ्या बनवलेल्या आहेत. संध्याकाळ होत असल्यामुळे इथले लाईट्स आणि लायटिंग लागले होते ते खूपच छान दिसत होते. आता थोडी थंडी वाजत होती. आम्ही खाली गाडीजवळ मंदिराला बघत होते. चला ग मुलींनो लवकर सर म्हणाले. आम्ही पटापट पायऱ्या चढू लागले. खूप साऱ्या पायऱ्या होत्या म्हणुन चढल्या जातं नव्हत्या पण बोलत बोलत आम्ही चढलोच वर. आम्ही देवीचं दर्शन घेतलं. खूप उंचावर हे मंदिर होत म्हणून येथून सूर्य मावळताना खूपच छान दिसत होता.

आम्ही त्या दृश्य ला खूपच वेळपर्यंत बघत होत्या. थोडा वेळ मंदिरातच बसले. आता पूर्णपणे अंधार पडला होता. आम्ही आता तेथून निघाले. पुर्णपणे थकवा जाणवत होता. आम्ही पायऱ्या उतरत होत्या आणि आमची बाळबळ चालूच होती. रूपे काय झालं ग तुझा चेहरा का उतरला आहे. मी तिच्याकडे बघत म्हणली. नाही काहींनी झालं कुठं काय. रुपी म्हणाली. सांग सांग काय झालं ते पोटात दुखतंय, हा खरंच इतकं जर खाशील तर पोट तर दुखणारचन. आवि म्हणाली नाही ग पोट कश्याला दुखलं रुपी म्हणाली मग झालं तरी काय. मी तिला म्हणाली अ.. मला न भूक लागली आहे खूप वेळ झाला खाऊन आणि तुम्ही माझी बॅग पण घेऊन घेतली आहे. रुपी एवढस तोंड करत म्हणाली मी तेच तर म्हणत होती की,आजूनपर्यंत तुला भूक लागली नाही तू म्हणत कशी नाही आहे मी तिला म्हणाली हो ग आता न मला पण भुक लागली आहे. आवि म्हणाली आम्ही पटापट पायऱ्या उतरल्या आणि बस मध्ये जाऊन बसल्या. बस आता चालू लागली पुण्याच्या दिशेला. आम्ही तेथून निघाले बस हळूहळू पुढे जाऊ लागली. आमची बडबड चालूच होती. सर्वांना कडकडून भूक लागली होती. आम्ही येऊन पोहोचलो एका धाब्यावर. एक एक बस तेथे थांबली. आम्ही बसमधून स्वेटर आणि मफलर घालून खाली उतरलो. शहराबाहेरील तो ढाबा तिथे असलेलं पायाला मऊसर लागणार गवत, धाब्याच्या बहेर ठेवलेले ते टेबल त्याच्यावर ठेवलेले आकर्षित फुल आणि वर असलेला काळभोर आकाश त्यात पडलेल्या चांदण्या आणि इथे असलेल्या तीन झाडांना लावलेली वेगवेगळ्या कलरची लायटिंग, मंद आवाजात चाललेले गाणे आणि अंगावर शहारे आणणारी थंडी, खूप छान वाटत होतं. अवे रूपे बघा किती सुंदर जागा आहे गं ही. मी अविला आणि रुपाला म्हणाली हो गं अने बघ ते झाड किती मस्त दिसतंय. आवि म्हणाली वाव! किती भारी वास येतोय भाजीचा. रुपी म्हणाली हो गं बाई तुला तर भाजीचाच वास येणार न आता. मी आणि आवि सोबत हसत म्हणाल्या आम्ही जाऊन त्या टेबलवर बसले. त्यांनी गरम गरम जेवणच ताट आणून आमच्या समोर ठेवलं. त्यात पुरणपोळी त्यावर टाकलेला तूप, खीर, आलुची भाजी हे सर्व त्यात होत. आम्ही जेवणावर तव मारला. गप्पागोष्टी करत जेवण करत होते. आमचं जेवण झालं आणि बाकीचे बसमध्ये जाऊन बसले आम्ही बसायला जात होते पण रुपाली पाणी प्यायचा होत म्हणून आम्ही पण तेथे थांबलो. शिक्षकांनी बिल दिलं आणि सर त्यांच्याशी काहीतरी बोलत होते. बोलता बोलता त्यांनी असे सांगितले की सर पुढे खूप दाट जंगल आहे सांभाळून जवा ,जंगली जनावर फिरत असतात रस्त्यावरती ते धाब्याचे मालिक म्हणाले,आम्ही ते ऐकत होते. अवे ऐकल जंगल आणि म्हणे जंगलात भूत पण असतात.मी अस ऐकल होत होणं रूपे. मी रुपाला टाळी देत म्हणाली. असं काही राहत नाही जंगलात मी तर नाही ऐकलं अस कधीं. ती थोडं घाबरतच म्हणाली. अवि दोन गोष्टीना घाबरते एक भूत आणि दुसरे म्हणजे कुत्रा ह्या दोघांनाच घाबरते ती नाहीतर वाघ जरी तिच्या समोर आला तरी ती घाबरत नाही. लहानपणी तिला तिच्याच लाडल्या मोतीने चावल होतं म्हणून ते कुत्र्यांना घाबरते. आणि आम्ही तिघांनी म्हणजे रुपी मी आणि अविचा दादानी मिळून लहानपणी भुत बनून घाबरवल होत म्हनून ती इतकी घाबरते. हो ग भूत असतात म्हणे जंगलात रुपी हसत म्हणाली जा मला तुमच्याशी बोलायचंच नाही आहे. ती आम्हाला म्हणाली आणि बसमध्ये जाऊन बसली. ये अवे थांब आम्ही तिला थांबवत होत्या पण ती एकटीच नव्हती आम्हीही सरांसोबत बसमध्ये जाऊन बसले. आता बस चालण्यास सर्वात झाली. आता बसमध्ये शांतता होती. सर्वे दमले होते. रात्र झाली होती म्हणून काही झोपण्याच्या तयारीत होते.

आम्ही अजूनही तिची मजा घेत होते. अवे तू घाबरलीस न भूत च नाव ऐकून. मी तिला म्हणाली नाही ग मी नाही घाबरत भूता गीत



Created by Universal Document Converter

ला ती म्हणाली. मग तुझी बोबडी का वळली होती तेव्हा रुपी म्हणाली जा जा झोप जा रात्र झाली खुप, सकाळी फ्रेश वाटायला पाहिजे.जा तुझ्या शिटवर जाऊन झोप अविणे तिला हाकलले. हो जाते पण खरं सांग तू घाबरली होतीस ना रुपी म्हणाली तू जातेस का तुला लाथ हानू आता अवि म्हणाली. रुपी पळाली इथून ती डायरेक्ट सोनाक्षी च्या शिटवर जाऊन बसली मी दोघांना हसत होती. हसू नको झोप आता अवि चिडून मला म्हणाली. मी खिडकीतुन बाहेर बघत होती. घनदाट जंगल लागलं होतं. मला आता घरची आठवण येत होती. घरी आता सर्व झोपले असतील नाहीतर फोन केला असता.लगभग अर्धी रात्र झाली आहे.मला फिरण्याच्या चक्कर मुळे मला आठवणच नाही की घरी फोन लावू त्यांचा आला होता पण मोबाइल सायलेंटवर होता म्हणून मी उचलला नही काय विचार करत असतील घरचे की बाहेर गेली तर घरची आठवण पण येत नाही हिला पण खरच जेवणाच्या चक्कारमुळे फोन लावणं राहून गेलं. मी स्वतःचं बडबडत होती. बाहेर आणि बसच्या आत शांतता होती.लगभग सर्व झोपले होते.रात्रीच्या रातकिड्याचा किर्रर किर्रर आवाज येत होता. फक्त मी जागी होती. कारण मला प्रवासामध्ये झोपच लागत नाही. मी इअरफोन लावून साँग ऐकत होती. तेही घनदाट जंगलामुळे रेंज सोडपकड करत होती ते लोडिंग होत होतं. मी खिडकीच्या बाहेर पाहिलं तर आम्ही वाटतं की जंगलाच्या खूप आतमध्ये आले आहे. कारण दुर दूर पर्यंत जंगल दिसत होतं. मी साँग लावले आणि डोळे मिटून ऐकत होती. माझं अर्ध साँग संपलं आणि गाडीचा इतका जोरात ब्रेक लागला की मीच काय तर सर्वच समोरच्या शिटवर जाऊन आदळले. सर्व झोपेत होते म्हणून दचकून उठले. मी रुपी आणि अविला म्हणाली की ये चालग बघू काय झालं ते. भूत तर नि असणारना रुपी अविकडे बघत म्हणाली नाही ग भूत वगैरे काही राहत नाही माझ्या आईने मला सांगितले आहे. अवि म्हणाली हो हो चला बघूतर खर काय आहे ते मी त्यांना म्हणाली आम्ही पुढे जाऊ लागल्या अवि आमच्या मागे हळूहळू येत होती. आम्ही पुणे जातच होतो की पुढून ते ड्रायव्हर काका पळत पळत येऊन आम्हाला धक्का देऊन जाऊ नका पुढे, नका जाऊ ते बोलत मागच्या शिटवर जाऊन बसले. त्यांना पूर्णपणे घाम फुटला होता आता आम्हालाही थोडी भीती वाटत होती. की काय असेल पुढे शिक्षक त्या ड्रायव्हरला पाणी देत विचारत होते काय झालं ते शिक्षक पुढे येणार तेवढ्यात त्या काकांनी त्यांना पकडले जाऊ नका तिकडे हे एकच वाक्य बोलत होते ते. आम्ही हळूहळू पुढे जाऊ लागले. अने खरच भू.. भूत असेल का ग अवि म्हणाली. नाही ग भूत वगैरे काही राहत नाही मी म्हणाली. ती आनंदात म्हनाली की हेच मी म्हणतच होती की भूत वगैरे काही राहत नाही. मी तिच्याकडे पहिलं आणि मी तिला म्हणाली पण असू शकतो. तिने मला घट्ट पकडले आणि आम्ही पुढे गेले पुढे पाहिलं आणि रुपीने इतक्या जोरात आरोळी मारली की शिक्षकही मागून पुढे आले. आम्हालाही घाम फुटला होता. त्यांनीही पाहिलं तर बसच्या पुढे एक वाघ आला होता. तो आमच्या बसच्या गोलगोल फिरत होता. त्याने एक डरकाळी फोडली.आता सर्वच घाबरले. तो वाघ बसच्या आत येण्याचा प्रयत्न करत होता. अवे वाघ पळा मी जोरात ओरडली आम्ही मागे सरकल्या सर्वे पुढच्या बसेस वाल्याना फोन लावू तर रेंज पण नव्हती कसे लावणार काहीच पर्याय उपलब्ध नव्हता. बसमध्ये सर्व मुली रडत होत्या. एक मुलगी जोर जोरात रडत होती आणि म्हणत होती की मम्मी... मला घरी जायचय. आता तुम्ही घाबरल्यानं, मला भुताच्या नावाने घाबरवत होत्या आणि आता काय झालं अवि म्हणाली ये बाई अक्षरशः मरण उभं आहे समोर आनि तू म्हणतेय की घाबरताय.

हार्टआटेक येण्याची रडायची पाळी आली आहे. आता मी तिला चिडून म्हणाली हो मी तर नाही घाबरत त्याला मला न हा तुझा मावस भाऊ दिसतोय म्हणजे घाबरवण्यात काही अर्थ नाही अवि हसत म्हणाली, हिला वेड लागल की काय सिचवेशन काय आणि ही काय बोलतेय ह्या टाईमाला पण तुला माजक सुचतोय. तो माझा नाही तुझा भाऊ आहे म्हणुन तर तू घाबरत नाही आहे आम्ही बोलतच होतो की माझ्या मोबाईल चा नोटिफिकेशन वाजला म्हणजे नेटवर्क आलं मी पटक्यात मोबाईलजवळ गेली आणि इंटरनेटवर शोधू लागली हडबडीमध्ये माझे हात पण चालत नव्हते बघता बघता अस समजलं की इथेच पंधरा वीस मिनिटांवर चिडीयाघर आहे. त्यातून एक वाघीण पळून गेली आहे. तिच्या पिल्लासोबत मी त्यांना पटक्यात फोन लावला आणि त्यांना सांगितले की इथे आमच्या बससमोर वाघ आहे. आता फक्त ते येईपर्यंत सर्वांचा जीव धोक्यात होता. त्या वाघाने परत जोरात डरकाडी फोडली. सर्व अजून जोरजोरात रडू लागले. तो वाघ थोडा मागे सरकला आणि जोर जोरात धावत आमच्या बसच्या काचेतून आत येणार तेवढ्यात ते लोक आले आणि त्यांनी त्यांच्यावर जाळी टाकली. आणि त्याला अडकवले तेव्हा आमच्या जिवात जीव आला. आम्ही आणि आमचे शिक्षक बसमधून खाली उतरले. शिक्षक त्यांना धन्यवाद देत होते. आम्ही पाहिल्या वेळा वाघाला सॉरी वाघीण ला इतक्या जवळून बघितलं होत. खाली उतरले तेव्हा आम्हाला कळाल की वाघिणीच्या पिल्लाला बसने ठोकल होत म्हणून ती इतकी रागावली होती . आम्ही त्या वाघिणी सोबत फोटो काढले त्या वाघिणीच्या पिल्लाला आम्ही आमच्या जवळ उचलून घेतलं. त्याला जास्त काही लागलं नाही पण ते थोडं बेहोश झालं होतं म्हणून त्या वाघिणीला वाटलं की मेलं म्हणून ती हे करत होती. ते चिडीयाघरवाले त्यांना गाडीत टाकून घेऊन गेले. आम्ही बसमध्ये बसले आणि आमची बस चालू झाली. आता माहिती झालं की मरण समोर आल्यावर कसं वाटत. संपुर्ण बसमध्ये त्याच गोष्टी चालू होत्या आम्ही आता जंगलातून बाहेर आहे. सकाळ झाली होती. बस पुढे जात होती.आमची बस समोरच्या मोठ्या खाईत पडली आणि मम्मी... मी जोरात आरोळी मारली. मला पूर्णपणे घाम फुटला होता. श्वास फुलली होती. आई पापा आणि दादा माझ्याजवळ आले.मला म्हणाले काय झालं तुला ? तू ओरडलीस का आई मला म्हणाली, तुम्ही? मी इथे कशी? मी मी तर बस ,खाई मध्ये होती. मी बडबडत होती. जागी हो जरा काय बडबडतेय, काही स्वप्न पाहिले का? दादा म्हणाला आईने मला पाणी दिलं. मी थोडा शांत झाली. घाम पुसला मी त्यांना सांगितले की,मला थोडं भयानक स्वप्न पडले. मी वेळ पहिला तर तीन वाजले होते. आई म्हणाली की, झोप आता खूप रात्र झाली आहे. सकाळी बोलू मी लेटले आणि विचार करू लागली. हे सर्व स्वप्न होतं उठण्यापासून तर कप फुटण्यापर्यंत,शाळेत जाण्यापासून तर सहलीला जाण्यापेर्यंत.वाघा पासून तर खाईत पडण्यापर्यंत सर्व स्वप्न होत. अरे हा सहलीला जाण्याचं तर काय? पण आम्ही आता घरातून बाहेर निघू शकत नाही.फक्त घरात राहू शकता असो! मी तोंडावर रग घेऊन झोपून गेली.



Created by Universal Document Converter

# कविता
# मराठी-हिंदी

" मराठी असे आमुची मायबोली
जरी पारतंत्र्यात ही खंगली ।
हिची थोर संपत्ती गेली
उपेक्षेमुळे खोल कालावर्णवाच्या तळी ।
तरी सिंधू मंथूनी काढुनि रत्ने,
नियोजू तयांना हिच्या मंडनी ।
नको रीण देवोत देतील तेव्हा
जगातील भाषा हिला खंडणी "



......................कवी : माधव जुलियन



Created by Universal Document Converter

## मला पण कोणीतरी बघुन जगतेय

मला पण कोणीतरी बघुन जगतेय
माझी माय मला बघुन जगतेय
माझा बाळ जगाला काहीतरी करून दाखवेल...

मला पण कोणीतरी बघुन जगतेय
मी माझ्या आई मायला बघुन जगतेय
माझी मायनं केलं ते मी पण करून दाखवेल...

मला पण कोणीतरी बघुन जगतेय
माझा बाप मला बघुन जगतेय
माझा बाळ जगात काय करून दाखवेल...

मला पण कोणीतरी बघुन जगतेय
मी माझ्या बापाला बघुन जगतेय
माझ्या बापाने काय केलं
ते मी पण उद्या करून दाखवेल...

मला पण कोणीतरी बघुन जगतेय
माझा भाऊ माझा सहारा बघुन जगतेय
माझा भाऊ काहीतरी करून दाखवेल...

मला पण कोणीतरी बघुन जगतेय
मी माझ्या भाऊला बघुन जगतेय
माझा भाऊ उद्या माझा सहारा म्हणून जगतेय...

मला पण कोणीतरी बघुन जगतेय
माझी बहीण मला बाप-बघून जगतेय
माझा भाऊ विश्वात काय करून दाखवेल...

मला पण कोणीतरी बघुन जगतेय
दोघी जणं एकमेकांना बघुन जगतोय
तो माझा ती माझी सहारा म्हणून जगतेय...

**वसावे सुभाष (सुबु)**
**टी.वाय.बी.एस्सी.नंदुरबार**



## पुण्याहून घरचा प्रवास

मी ट्रॉवेल्स मधी बसलो तो भोसरी गांव
गाडी धावे धनाधन दिवे सुखात नाचती...

झाडे हसत हसत मागच्या दिशेने पडली
दिवे रात्री जागी होऊनी जग दाखवली

माझ्या मनी मन भरूनी सुख प्रवासकरी
दिवे बोलीत ''श्रीग'' माझ्या मनी सारखी

दिवे संगत बोली आपुलं कोणतरी पाही
आपुलं मन जो जानी तो नवजग पाही

दिवा विना दिन ना, प्रवास विना दिशा ना
अंधारी दिन पाही, माझ्या विना शक्य ना

जोशी प्रवास करी तोशी जग नयन दिखे
मी प्रवास करित पाही गाडी एकका मागे धावी

जो ट्रॉवल्स ती प्रवास करीतो तो सुबु
जो सुबु प्रवास करीतो तो दिवे विना

माय-बाप ने दाखवलं मला आयुष्याच जग
मी पण दाखवेल माय-बाप त्या आयुष्याच जग

मी ट्रॉवेल्स मधी बसलो तो भोसरी गांव
गाडी धावे धनाधन दिवे सुखात नाचती...

**वसावे सुभाष (सुबु)**
**टी.वाय.बी.एस्सी.नंदुरबार**

## आई

**मी शब्द तर आई त्याचा अर्थ आहे**
**मी चित्र तर आई त्यातील रंग आहे**
**मी शरीर तर आई त्यातील प्राण आहे**
**कितीही लिहाव**
**आई तुझ्यासाठी तर कमीच आहे**
**शेवटी येवढंच सांगेल,**
**आई तु आहेस म्हणून मी आहे...**

**कु.रोशनी छगन गाढे**
**एफ.वाय.बी.ए.**



## पहाट

उजळलेली पहाट दिसते किती सुंदर
पाखरांच्या थव्यांनी वाटते किती सुंदर
पाखरे डोलतात झाडावर बसुनी
झाड कसं बघतं निरांत राहुनी
झाडही कसं डोलतं वाऱ्याच्या ज्ञात राहुनी
दिसते कसं सारं सुंदर होऊनी
पाहाता पहाता आठवते कविता मला
लिहावे कसं सुचेना मला
सुर्य मला दिसतो कसा
गोल - गोल दिसणारा लाडू जसा
लिहता लिहता वाटतं कसं कराव
असं वाटत सार बघतच रहावं
बघता बघता वाटतं बघाव किती
बघतांना आले डोळे भरूनी येती
बघुनी वाटतं सारं चित्र काढुनी घ्याव
थोड्या वेळात वाटतं बघतच रहावं
खरं सांगू किती डोलतच रहावं
साऱ्यांनी मिळुनी गातच रहावं
अस वाटतं पक्षी होऊनी उडावं
विमानासंगे उंच उंच फिरावं
होऊनी गेली दिवसाची रात्र
पक्षी सारे गेले निजुनी मस्त
आजची झाली पहाटची रात्र
उद्या नवी उजळेल पहाट...

**कु.सानिका मोहन पाटील**
**एफ.वाय.बी.ए.**

## मैत्री

रडवून हसवण्यात असते मैत्री,
समजून घेण्यात असते मैत्री...

धिंगामस्ती करण्यात असते मैत्री
मन हलक करण्याची हक्काची जागा असते मैत्री...

संपूर्ण अंधारात एक उजेडाची किरण असते मैत्री
जीवन जगण्याची आशा असते मैत्री...

जीवनात अनमोल असते मैत्री
दोन शरीर एक प्राण असते मैत्री...

आयुष्यभर साथ निभवण्यात असते मैत्री
निभवली तर संपूर्ण आयुष्य असते मैत्री...

**कु.सुवर्णा कैलास धनगर**
**एफ.वाय.बी.ए.**



Created by Universal Document Converter

# एक तरी मैत्रीण अशी असावी...

एक तरी मैत्रीण अशी असावी
जरी न बघता पुढे गेले तरी
मागून आवाज देणारी
आपल्यासाठी इच्छा नसतांना हसणारी
वेळ आल्यावर आसु ही पुसणारी!

स्वत:च्या घासातला घास
आठवणीने काढून ठेवणारी
वेळ प्रसंगी आपल्या वेड्या मैत्रीणीची
समजूत ही काढणारी!

वाकड पाऊल पडतांना मात्र
मुस्काट्यात मारणारी
यशाच्या शिखरांवर
आपली पाठ थोपटणारी!

सगळ्यांच्या गर्दीमध्ये
आपणास सैरभैर शोधणारी
आपण नसतांना आपल्या
आठवणीत व्याकुळ होणारी!

खरंच! अशी जिवाभावाची
एक तरी मैत्रीण नक्की असावी
तिची साथ कधी न सुटावी
एक तरी मैत्रीण अशी असावी!

**कु.रोशनी छगन गाढे**
**एफ.वाय.बी.ए.**

Challenge Yourself.

# स्वत:ला आव्हान देऊन बघ...

यश हातातच आहे तुझ्या,
थोड स्वत:ला जागवून बघ...
स्वप्न झोपू देणारच नाहीत,
काळजात ध्येय कोरून बघ...

यश अपयश येत जीवनात,
यशासाठी थोडं झुंजुन बघ...
भुतकाळ भविष्याचा विचार कशाला,
वर्तमानाला गुलाम करून बघ...

क्षितीजाच्या पलीकडचे स्वप्न नको
कर्तुत्वाने तुझ्या त्याला झुकवून बघ...
वाजेल नगाडा सह्यांद्रीवर तुझा
परिकष्टाने यशाला, बुलंद करून बघ...

यश हातातून जाणारच नाही
गोंधळलेल्या मनाला वारून बघ...
होतील वादळे नतमस्तक तुझ्यापुढे
स्वत:ला आव्हान देऊन तर बघ...

**कु.कोमल यशवंत पाटील**
**एफ.वाय.बी.ए.**

# नशीब

जीवन हा एक प्रवास आहे
चालत राहणे कर्तव्य आहे
काय आपणास मिळेल पुढे
हा तर नशिबाचा भाग आहे

कधी आनंद तर कधी दु:ख
हा ऊन सावलीचा खेळ आहे
आंबट गोड नात्यांची इथे
एक चविष्ट भेळ आहे

आयुष्य खूप सुंदर आहे
जगता येण महत्त्वाचे आहे
अडचणी सर्वांनाच आहेत
मात्र करणं महत्वाचे आहे

आयुष्यात नको होऊ निराश
खरंच इतक ते कठीण नाही
हे दिवस ही बदलून जातील
स्थिर जगात असे काहीच नाही

जीवन हा एक प्रवास आहे
नशिब त्याचा एक भाग आहे

**कु.किर्ती प्रमोद चौधरी**
**एफ.वाय.बी.ए.**

# आई

करावे किती आई तुझे कौतुक, अपुरे पडतील शब्द माझे,
नाही फेडू शकत गं आई उपकार मी तुझे...

माझ्या सर्व अवगुणांचा केलास गं आई तू विलय
होतात माझे सर्व गुन्हे माफ असे आई तुझे न्यायालय...

आई तुझ्या कुशीतील गाढ झोप संपूर्ण संसारात नाही,
पुढचे सातही जन्म तुझ्या गर्भात मिळो मी हेच वाट पाही...

असे वाटते मजला जगावे पुन्हा येऊनी तुझ्याच पोटी
तुझ्याविना सर्वच दुनिया वाटे गं आई मला खोटी...

आई तूच माझ्या आयुष्याची बदललीस ग काया
साष्टांग नमन करूनी पडते गं आई मी तुझ्या पाया...

**कु.रोशनी छगन गाढे**
**एफ.वाय.बी.ए.**

# चारोळी

डोळ्यात न दाखवतांनाही जो आभाळा एवढं प्रेम करतो
त्याला वडील नावाचा राजा माणूस म्हणतात...

ज्याला खरंच कळतय भावभावनांच गांभीर्य
तोच स्थितास टाकतो कागदावरच सौंदर्य...

लढता लढता हरलो दारी, हरण्याची मला खंत नाही
लढा माझा माझ्यासाठी लढाईला माझ्या अंत नाही
पुन्हा उठेल आणि पुन्हा लढेल शांत

चांगल्या गोष्टी त्यांना मिळता जे वाट पाहतात
अधिक चांगल्या गोष्टी त्यांना मिळतात जे प्रयत्न करतात
पण सर्वोत्तम गोष्टी त्यांनाच मिळतात जे आपल्या प्रयत्नांवर

अतुट विश्वास ठेवतात...
आयुष्य अवघड आहे पण अशक्य नक्कीच नाही...

**कु.किर्ती प्रमोद चौधरी**
**एफ.वाय.बी.ए.**



Created by Universal Document Converter

# आयुष्याला द्यावे उत्तर...

असे जगावे दुनियेमध्ये, आव्हानाचे लावून अत्तर,
नजर रोखुनी नजरेमध्ये आयुष्याला द्यावे उत्तर...

नको गुलामी नक्षत्रांची, भिती आंधळी ताऱ्यांची
आयुष्याला भिडतांनाही चैन करावी स्वप्नांची...

असे दांडगी इच्छा ज्याची मार्ग तयाला मिळती सत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये आयुष्याला द्यावे उत्तर...

पाय असावे जमिनीवरती कडेत अंबर घेतांना
हसू असावे ओठांवरती काळीज काढून देतांना...

संकटही ठणकून सांगावे आता हे बेहत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये आयुष्याला द्यावे उत्तर...

करून जावे असेही काही दुनियांतूनी या जातांना
गहिवर यावा जगास साऱ्या निरोप शेवटचा देतांना...

स्वर कठोर त्या काळाचाही क्षणभर करता-कातर
नजर रोखुनी नजरेमध्ये आयुष्याला द्यावे उत्तर...

**कु.किर्ती प्रमोद चौधरी**
**एफ.वाय.बी.ए.**

# सोशल मिडीया

सध्या मी माणसं आता, बोटांवर
चालतांना पाहिलय...
आजकाल हे जीवन, सोशल
मिडीयांवरच चाललंय...

भल्या पहाटे उठल्यावर,
जाम नेच होतेय सुरवात...
एकदाच ढकलता, व्हॉट्सॲपवरती
दिवसभर निवांत...

सर्वात आधी पोस्ट, अशी ही जणू
पर्वणीच बनली...
माणसाने आपल्यातली आपुलकी ताणली...

काय ती शॉर्ट भाषा ऋ, ऋ तर कधी ठळझ...
असा कसा रे बनला, तू एवढा व्हीआयपी...

वाढदिवस असला, वर्षाव शुभेच्छांचा होतो...
त्यालाच उत्तर, आभार प्रदर्शनाचा फेकतो...

जयंती अन् सण, खुपच उत्साहात साजरे...
ऑनलाईन शुभेच्छा, ऑनलाईनच साजरे...

मित्र झाले हजार, पण ऑनलाईनच भेटायचे...
सुख आणि दुखातही, इमोजीनेच
डोळे मिटायचे...

म्हणून की काय, सेल्फीचा पर्याय आला...
फोटो स्वत:च काढण्याचा हा काळ आला...

झाला आता दुरावा, जीवन मिडीयाला
वाहिलंय...
हो आजकाल हे जीवन,
सोशल मिडीयावर चाललंय...

**कु.कोमल यशवंत पाटील**
**एफ.वाय.बी.ए.**

# ती सुरक्षित आहे का?

तिच्या पदरी मूल, नसते म्हणून
तिला 'वांझोटी' म्हणून हिणवले जाते
केसात गुरफटलेल्या जटांसाठी तिला
'देवदासी' म्हणून सोडले जाते...

पैशांच्या त्या हव्यासापोटी
तिला 'देहव्यापारात' ढकलले जाते
कधी मंदिरात प्रवेश केला म्हणून
तिला 'मंदिराबाहेर हाकलले' जाते...

वंश फक्त मुलगाच वाढवतो
म्हणून 'गर्भात तिला मारले' जाते
आणि जन्मास जरी आली तरी
तिचे 'नकुशी' नाव ठेवले जाते...

हुंड्याच्या त्या लाभापायी
तिला 'जिवंत जाळले' जाते
आणि पुरूषार्थ गाजवावा म्हणून
तिचे 'लैंगिक शोषण' केले जाते...

पुरूषप्रधान संस्कृतीत वारंवार
तिला 'अपमानास्पद वागणुक' दिली जाते
आणि अन्यायाविरूद्ध आवाज उठवला
की तिला 'पायदळी तुडवले'जाते...

रोज रोज वर्तमानपत्रात
एक तरी अशी बातमी येते
आजही या जगात 'दु:शासन' जिवंत आहे
ह्याची आठवण ती करून देते...

**कु.तेजस्विनी चंद्रकांत पाटील**
**एफ.वाय.बी.ए.**



Created by Universal Document Converter

# मंत्र शिवाजी

किती ताकदवान आहे हा मंत्र शिवाजी!
पावनखिंड देह सोडतो बाजी,

नंतर होईल वरबाप लग्नामध्ये
आधी कोंढाण्याचे लगीन लावतो तानाजी

झिडकारितो सन्मान कुतुबशाहीचा
निष्ठा काय असते दाखवितो येसाजी

दिल्लेराच्या काळजात थरकाप उडवी
शुर विर मुरार बाजी

कापुनी गनिमाला विजेच्या वेगाने
काळालाही चकीत करितो नेताजी

रचू दे, केवढेही कारस्थान शत्रुने
गुप्त हेराची क्षमता जगाला सांगितो बहीर्जी

लढता येईल शिवाजी म्हणून
शिवा काशिद होतो मरणासाठी राजी...

सैयद बंडाला कापून जीवा
पराक्रमाची निशानी ठेवतो ताजी...

राजं, द्या सन्मान फक्त तुमच्या
पायधुळीचा,
अमृताचं दान मागतो हीरोजी

निष्कलंक स्वराज्य उभारले राजांनी
म्हणून सुरक्षित राहिले देठासहित भाजी
इतका ताकदवान आहे हा मंत्र शिवाजी

वसावे सुभाष (सुबु)
टी.वाय.बी.एस्सी.नंदुरबार

# मुलगी आणि बापामधील अबोल नाती

पोरीची पसंती आली की
बापाचं काळीज धडधडतं
चिमणी घरच सोडणार म्हणून
आतल्या आत खूप रडतं...

हसरे खेळकर बाबा एकदम
धीर गंभीर दिसू लागतात
पोरीला पाणी मागण्यापेक्षा
स्वत:च उठून घेऊ लागतात...

या घरातला चिवचिवाट आता
कायमसाठी थांबणार असतो
म्हणून बाप लेक झोपल्यावर
तिच्याकडे पाहून रडत असतो...

अंबुच्या लिंबुच्या करत करत
मोठी कधी झाली कळलं नाही
बाप सांगतो तिला सोडून
मला पाणीही गिळणार नाही...

दिवसातून एकदा तरी
मायेने जवळ घ्यावं वाटतं
परक्याचं धन असलं तरी
द्यायला मात्र नकोस वाटतं...

उठल्या पासून झोपेपर्यंत
बाबाची काळजी घेत असते
आज ना उद्या जाणार म्हणून
पोरगी जास्त लाडाची असते...

पोरगी जाणार म्हणलं की,
बाप आतून तुटून जातो
कळत नाही बैठकीतून
अचानक का उठून जातो...

इकडे तिकडे जाऊन बाबा
गुपचुप डोळे पुसत राहतो
लेकीचं कल्याण झालं म्हणून
पुन्हा बैठकीत हसत असतो...

तिचा सगळा जीवन प्रवास
क्षणाक्षणाला आठवत राहतो
डोळ्यात येणाऱ्या आसवांना
बाबा वापस पाठवत राहतो...

गोळी घेतली का?
आता कोण विचारील गं?
जास्त गोड खाऊ नको म्हणून
कोण दाटवील गं?

बाबा कुणाचं ऐकतं नाही पण
पोरीला नकार देत नाही
तिने रागात पाहिले की मग
ताटात गोड घेत नाही...

एका अर्थानं पोरगी म्हणजे
काळजी करणारी आई असते
पण आपल्या मुलीचा हात
दुसऱ्याच्या हातात द्यायलाही
खुप मोठ काळीज लागते...

कु.तेजस्विनी चंद्रकांत पाटील
एफ.वाय.बी.ए.

# ऑनलाईन शाळा...!

बाका वरची मजा ऑनलाईन लेक्चर मध्ये नाही,
नेटवर्क च्या जाण्या येण्यात अर्ध डोक्यावरून जाई...
फळ्यावर लिहून जसं समजावत होत्या बाई
मोबाईलमध्ये शिकवलेलं आता समजत नाय काही...

आठवतो तो वर्ग डस्टर आणि खडू
मधल्या सुट्टीची मस्ती आठवून येते आता रडू
आलेले दिवस वाटतं आता खोडरब्बर ने खोडू
लवकर शाळा सुरू होऊदे, बाप्पा समोर हात जोडू...

डिजिटल च्या शाळेत राहिला नाही छडीचा धाक
आठवते ही केलेली शिक्षा आणि शिक्षकांची हाक
भरमसाट सुट्टीमध्ये डोक्यातले पाढे झाले साफ
अभ्यास करावं वाटतं आता, पण परीक्षा ही झाली माफ...

शाळा ही विचारते आता कुठे गेले माझे विद्यार्थी ?
किती दिवस झाले आता, का झाले सगळे स्वार्थी ?
वाजेल का पुन्हा घंटा, खातील का मुलं खिचडी ?
आठवेल का त्यांना त्यांची इयत्ता आणि तुकडी ?

कु.तेजस्विनी चंद्रकांत पाटील
एफ.वाय.बी.ए.



Created by Universal Document Converter

# हिंदी कविता



## वो बचपन के दिन

कभी न भुले थे उन दिनो को
याद कर आज रोते है हम
कुछ पल ऐसे भी है
उन्हे कभी भुला ना सकेंगे हम
कभी झगडे से तो कभी हसी मजाक से
हर किसी को परेशान करते हम
तो एक बचपन ही था।
जब जिंदगी जिया करते थे हम
ना किसी बात की टेंशन
नाही किसी बात का बहाना था
तो बचपन ही था
जिसने हमे हर पल जिना सिखाया था
ना ही भुख लगती थी नाही कभी प्यास
नाही कभी चोट लगने पर दर्द होता था
आज बडे होकर खुश होने की कोई वजह नहीं है
तो बचपन ही था जब छोटी छोटी चिंजो
पर खुश होने का बहाना था
और वो बचपन ही था
जब जिंदगी जिया करते थे हम।

## पिंजरा

एक पिंजरे मे कैद थी
बेजान सी परी
अपने सपनो को देखती
ख्वाबोमें ही खरी
उडना भी चाहे तो
उडना पाती वो
जंजीरो मे जखड जाती है वो
अपने सपनो को पुरा
कभी कर ना पाती वो
घुट घुटकर जिना जेसे
आदत सी बन गया है
रोना तो जैसे जिंदगी मे
वरदानसाही मिलता है
जब भी देखा तो पिंजरे के अंदर
ही पाई जाती है
अपनी सपनों को कभी
पुरा ना कर पाती है
जिंदगी खुलके जिना भी चाहे
तो अपने तरीके से जी ना पाती वो
जाने कैसे पिंजरे मे
घुट घुट कर जिंदगी जी पाती है
काश एक दिन ऐसा भी आएगा
तो पिंजरेसे बहार निकलकर भी आएगी
अपने सपनो को पूरा भी कर पाएगी
पिंजरे को तोडकर बाहर आएगी
अपने उडान को खुलकर जी पाएगी
कभी होना पा रहा था जो भी पुरा
आज वो भी कर पाएगी
अपने सपनो को पुरा
अपने सपनो को पुरा
अपने सपनो को पुरा...

कु.सानिका मोहन पाटील
एफ.वाय.बी.ए.

## जिंदगी क्या है?

जिंदगी वो किताब है,
जो पुरी भी नही होना चाहती
नाही अधुरी रहना चाहती है।।

जिंदगी वो पन्ना है,
जो किताब में ही रहना चाहे, नही तो
बाहर आया तो उड जायेगा।।

जिंदगी वो खुशनसिब फुल है,
जो खिलना भी चाहेगा, मगर खिला तो
भवरे परेशान करते है।।

जिंदगी तो रास्ता है,
जिस पर हर आदमी चलना चाहेगा, लेकिन
मंजिल जर किसी को नही मिलती।।

जिंदगी वो हवा है,
जो कभी नही रूकती,
अगर रोकने कोशिश की
तो तुफन आ जाता है।।

जिंदगी वो समुंदर है,
जो शांत रहे तो ही अच्छा लगता है,
वरना बाढ आने में देर नही लगती।।

जिंदगी वो नही है,
जो हमेशा बहती रहतीं, अगर ना बही
तो मंजिल कैसे पायेगी।।

जिंदगी वो गगन है,
जहा हर कोई खुले मन से उड सके, लेकिन
आकाश मे उडना हर किसी के बस मे नही।।

जिंदगी वो पेड है,
जहा हर कोई अपना हक जमाना चाहता है, पर
पेड पर सबका अधिकार बराबर का होता है।।

जिंदगी वो रंग है,
जो हर कोई अपनी जिंदगी मे भरना चाहेगा,
सबको रंग भरने का अधिकार है, लेकिन
हर कोई रंग भर नहीं सकता।।

जिंदगी क्या है,
एक कोरा पन्ना जिसे ना कोई पढ सका है,
ना कोई पढ पायेगा।।

कु.दिपाली अनिल पाटील
एस.वाय.बी.एस्सी प्लेन



Created by Universal Document Converter

# वैचारिक लेख
# मराठी



Created by Universal Document Converter

# माझे आवडते पुस्तक

कु.विद्या संजय जव्हरे
एस .वाय.बी.एस्सी

विद्या नाम नरस्य रूपमधिकं प्रच्छन्नगुप्तं ध्वनम्
विद्या भोगकरी यश: सुखकरी विद्या गुरणां गरू: ।
विद्या बन्धुजनो विदेशगमने विद्या परं दैवतम्
विद्या राजसू पुज्यते न तू धन विद्या विहीन पशु: ।।

वरील 'नीतीशतकातील' सुभाषित आपल्याला विद्येचे महत्व सांगतांना म्हणते. 'विद्या' हे मनुष्याचे एक प्रकारचे सौंदर्य आहे. विद्या हे गुप्त धन आहे. विद्या आनंद व समाधान प्राप्त करून देणारी आहे. विद्या ही गुरूंची गुरू आहे. परदेशात गमन करण्यासाठी विद्या ही बंधूसमान आहे. राज्यसभेतदेखील विद्यावान व्यक्तींचा सम्मान केला जातो. ज्या व्यक्तीजवळ विद्या नाही तो मनुष्य पशुसमान समजला जातो.

विद्यमुळे सर्व उद्दिष्ट्ये साध्य होतात. विद्या ही कल्पवृक्षांप्रमाणे सर्व इच्छांची पूर्ती करते. विद्येमुळे मनुष्याचे समाजातील स्थान उंचावते. विद्यमुळेच व्यक्तीचा समाजावर उत्तम ठसा उमटत असतो. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम, मुकेश अंबानी, महेंद्रसिंग धोनी, श्रीनिवास रामानुजन, लता मंगेशकर या व्यक्ती आपल्याला ज्ञात आहेत. कारण, त्यांच्याजवळ विद्या होती आणि त्या विद्येच्या बळावर ते त्यांच्या क्षेत्रात यश मिळवू शकले आणि ही विद्या मिळविण्याचे एक प्रभावी साधन म्हणजे 'वाचन'.

वाचन हे ज्ञान मिळवण्याचे अत्यंत प्रभावी साधन आहे. वाचनामुळे चारित्र्य, सद्गुणरूपी संपत्ती, ज्ञान तसेच उत्साह वाढतो. वाचनामुळे अनेक विषयांचे आकलन होते, वाचन हे बालपणी ज्ञान देणारे, तरूणपणी चारित्र्याचे रक्षण करणारे आणि म्हातारपणी दु:ख दूर करणारे साधन आहे. म्हणून चांगल्या ग्रंथांचे वाचन कल्याणकारक असते. म्हणूनच मी नेहमी पुस्तक वाचन करत असते. वाचन हा माझा छंद आहे. मी अनेक पुस्तके वाचलेली आहेत. प्रत्येक वाचलेल्या पुस्तकातून मला भरपूर ज्ञान व प्रेरणा व जीवन जगण्यासाठी आवश्यक भासणारे विचार मिळाले या सर्व गोष्टी ज्या पुस्तकात समाविष्ट आहेत असे माझे आवडते पुस्तकदेखील आहे.

लेखक कृष्णकृपामुर्ती श्री.अभय चरणविंदा भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांनी लिहिलेली 'भगवद्गीता'. खरे तर, भगवतगीता महर्षी व्यास मुनी व भगवान गणेश यांनी लिहिली असे पुराणांमध्ये नमुद आहे. ए.सी.भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांनी लिहिलेले 'भगवद्गीता' हे माझे आवडते पुस्तक आहे. प्रस्तुत पुस्तकाचे प्रकाशन 'भक्तिवेदांत बुक ट्रस्ट' हे आहे. पुस्तकाच्या मुखपृष्ठावर भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला रथावर बसून उपदेश करतांनाचे चित्र आहे. पुस्तकाच्या मलपृष्ठावर पुस्तकाचा थोडक्यात सारांश लिहिलेला आहे. लेखकांबद्दल थोडी माहिती नमूद केलेली आहे. मलपृष्ठावर –

गीता भागवत करिती श्रवण ।
अखंड चिंतन विठोबाचे ।। या संत तुकारामांनी सांगितलेले वचन आढळते. त्याचप्रमाणे ए.सी.भक्तीवेदांत स्वामी प्रभूपाद या पुस्तकाच्या लेखकाच छोटा फोटो दिलेला आहे.

वास्तविक श्रीमद् भागवत गीतेचे महत्त्व शब्दांनी वर्णन करणे कोणालाच शक्य नाही. कारण हा एक संपूर्ण जगाचे ज्ञान सामावणारा ग्रंथ आहे. भगवद् गीतेत अठरा अध्याय आणि सातशे श्लोक दिलेले आहेत. तसेच यात चारही वेदांचे तात्पर्य सांगितले आहे. यातील संस्कृत भाषा इतकी सुंदर व सरळ आहे की, थोड्याशा अभ्यासाने माणूस ती सहज जाणू शकतो; पण या पुस्तकाचा आशय इतका सखोल आहे की, जन्मभर सतत अभ्यास करीत राहूनही त्याचा थांग लागत नाही. नेहमीच नवनवे भाव उत्पन्न होत राहतात, त्यामुळे ही नेहमीच नवी वाटते. तसेच नेहमी श्रद्धा व भक्तियुक्त अंत:करणाने एकाग्र होऊन विचार करू लागल्यास यातील प्रत्येक शब्दात मोठे रहस्य दडल्याचे प्रत्यक्ष अनुभवाला येते.

भगवंताचे गुण, प्रभाव आणि मर्म यांचे वर्णन या पुस्तकात ज्या रीतीने केले गेले आहे. तसे वर्णन इतर ग्रंथात सापडणे कठीण आहे. भारतीय आध्यात्मिक ज्ञानाचा मुकुटमणी म्हणजे 'श्रीमद् भगवत गीता' मानवाचा स्वभाव, सभोवतालची प्रकृती आणि त्यांचा भगवंताशी असलेला संबंध याविषयीचे सखोल आणि सुलभ ज्ञान भगवद् गीतेत आहे. जीवनाच्या प्रत्येक वळणावर योग्य निर्णय घेणे गरजेचे असते, कारण योग्य निर्णय घेणे म्हणजेच जीवनाला योग्य वळण देणे होय. मग ते वळण चुकीचे की योग्य हे आपल्या निर्णयावरच अवलंबून असते. हे योग्य निर्णय घेण्यासाठीच भगवद् गीतेत सखोल ज्ञान समाविष्ट आहे. भगवद्गीतेनुसार,

कोणताही निर्णय भावनेच्या ओघात घेऊ नये. भगवद्गीतेतील १७ व्या अध्यायातील २१ व्या श्लोकानुसार श्रद्धा न ठेवता केलेली गोष्ट व्यर्थ आहे. त्यामुळे कोणतीही गोष्ट करण्याचा निर्णय घेण्याआधी माझी त्या गोष्टीवर श्रद्धा आहे का? हा विचार मनात आणणे गरजेचे आहे.

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जन: ।
य सत्प्रमाणं कुरूते लोकस्तदनुवर्तते ।।

भगवद्गीतेतील या ३ ऱ्या अध्यायातील या २१ व्या श्लोकानुसार, श्रेष्ठ व्यक्ती जे-जे आचरण करतो. तसेच आचरण इतर व्यक्ती करतात. त्यामुळे आपण आचरणात आणणार असणारी गोष्ट इतरांसाठी श्रेष्ठ असेल की नाही याचा विचार करावा.

मानवी जीवनातील एक विचार म्हणजेच क्रोध, जो मनुष्याला प्राप्त असलेल्या पदावरून त्याला क्षणातच उतरवू शकतो. त्यामुळे 'मनुष्याने क्रोध करणे टाळावे', असा उपदेश गीतेच्या दुसऱ्या



Created by Universal Document Converter

अध्यायात दिसून येतो.

त्रिविधं नरकरयेदं द्वारं नाशनमात्मन्: ।
काम: क्रोधस्तया लोभस्तस्मादेतत्त्रेयं त्यजेत् ।।

प्रस्तुत श्लोकात भागवान श्रीकृष्ण काम, क्रोध व लोभ यांना नरकाचे द्वार म्हणजेच वाईट वेहेत प्रवेश करण्याची साधने म्हणतात.

प्रत्येकाला जीवनामध्ये यशस्वी व्हायचे असते, त्यामुळे प्रत्येकजण अत्यंत मेहनत करतांना दिसतो. पण त्यापैकी काहीच व्यक्ती यशस्वी झालेले दिसतात. यामागील कारण– भगवद्गीतेच्य दुसऱ्या अध्यायातील ४७ व्या श्लोकात सापडते. तो श्लोक पुढीलप्रमाणे–

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भूमी ते संगोडस्त्वकर्मणि ।।

या श्लोकाचा अर्थ असा की, कर्म कर पण फळाची चिंता करू नकोस. यावरुन मला माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले. जे लोक अयशस्वी होतात ते सतत फळाविषयी विचार करतात. सर्वप्रथम आपले ध्येय ठरवावे. त्या ध्येयप्राप्तीसाठी अतोनात मेहनत करावी पण परिणामाविषयी विचार अथवा चिंता करू नये. फळाचा सतत विचार केल्याने विचारांचा समतोल बिघडतो व योग्य रितीने कर्म केले जात नाहीत. त्यामुळे कदाचित ध्येयपूर्ति होत नाही. हा श्लोक माझ्या मनावर अगदी खोलवर बिंबलेला आहे. मला जीवनात यशस्वी व्हायचे आहे आणि यशस्वी होण्याचा मूलमंत्र मला ज्या भगवद्गीतेतूनच मिळाला त्यामुळे 'भगवद्गीता' हे माझे आवडते पुस्तक आहे.

भगवद्गीतेतत असलेले अध्यात्मिक, धार्मिक, शैक्षणिक ज्ञान तसेच जीवन जगण्याचा मार्ग संपूर्ण समाजाला कळणे गरजेचे आहे. जेणेकरून समाजातील गुन्हेगारी, अत्याचार, अंधश्रद्धा तसेच अज्ञान नष्ट होऊन एक वैभवशाली समाज उदयास येईल.

वाचले मी अनेक पुस्तके,
परंतु, माझे आवडते पुस्तक 'भगवद्गीता' मी निवडले.
व्यक्तीमत्व घडवण्याचे व सुखमय जीवन जगण्याचे, मार्ग त्यातून मला मिळाले.

# कोविड-१९ आणि आपण

कु.रोशनी छगन गाढे
प्रथम वर्ष कला

मागील वर्षी कोरोनाची साथ आली आणि त्यामुळे सक्तीने लॉकडाऊन झाले. अत्यंत तातडीच्या सेवांव्यतिरिक्त सगळ बंद झालं. कोणाकडे जायचं नाही, यायच नाही, कुणाशी हात मिळवायचा नाही. थोडक्यात सांगायच झाल तर स्वत:ला बंदिस्त करून घ्यायचं. संपूर्ण जग स्तब्ध झाल्यासारखं वाटत होत. विनाकारण केल्या जाणाऱ्या खर्चाला खीळ बसली आणि सगळ्यात महत्वाच म्हणजे कमी पैशातही घर चालवता येऊ शकते हा धडा या कोरोनामुळे मिळाला. या काळात प्रत्येक बरे–वाईट अनुभव आले. लोकांनी एकत्र कुटुंबातील सर्वच सदस्यांसोबत राहून तणावमुक्त आनंदी जीवनाचा अनुभव घेतला.

लॉकडाऊनच्या काळात लोकांना कुटुंबातील सदस्यांनी कोणत्याही परिस्थितीत एकत्र असावं याची जाणीव झाली. लॉकडाऊनमध्ये शाळा, कॉलेज बंद असल्याने आम्ही घरीच नव–नवीन पुस्तकांशी मैत्री केली. तसेच टाकावू पासून टिकावू वस्तू ही तयार केल्या. कोरोनाने गरीब–श्रीमंत, काळा–गोरा अशा प्रत्येकाला स्वच्छता आणि निरोगी जीवन कस जगायच हे शिकवलं. संकटाला सामोरे कस जायचं हे ही शिकवलं. संकटाच्या वेळी फक्त आपलीच माणसे धावत आली आणि आपुलकीच सोंग करणारी माणस आपल्याला ओळखता आली.

कोरोनाने कोणत्याही परिस्थितीमध्ये जगता येते. हे स्पष्ट करून दिले. शेजारधर्म कसा सांभाळायचा ते कोरोनाने शिकवल. केवळ शिकवलच नाही, तर तसे वागायला भाग देखील पाडले. स्वच्छता, संयम, सहनशीलता, माणुसकी, आर्थिकदृष्ट्या दूरदृष्टी ठेवून नियोजन कस करायच ते शिकवलं. खरंच कोरोनाने न भूतो न भविष्यती अशी अनुभूती दिली. क्षणार्धात जनजीवन एखाद्याने स्टॅच्यू म्हणावं आणि समोरच्याने जिथल्या तिथ थांबाव, तसच सर्व थांबल होत. अडीअडचणीत शेजारी आधी धावून येतात. त्यामुळे छोट्या–छोट्या गोष्टींवरून न भांडता एकमेकांना समजून घेऊन शेजारधर्म सांभाळण गरजेचा आहे. हे कोरोनानं शिकवलं.

कोरोनाने जगण्याचा नवा मंत्र दिला कोरोनाकाळात खूप साऱ्या संकटांना तोंड द्यावे लागेल. कठीण प्रसंगांना तोंड देण्यास आत्मविश्वास निर्माण केला. कोरोनामुळे मास्क वापरणे किती महत्वाचे आहे, ते समजले. भारतासारख्या देशामध्ये प्रदूषण मोठ्या प्रमणात आहे. मास्कमुळे आपण प्रदूषणापासून वाचू शकतो. तसेच मास्क आणि स्वच्छतेच्या सवयीमुळे आपण आजारापासून दूर राहू शकतो.

आजपर्यत आपण रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी काही प्रयत्न केले नाही. मात्र कोरोना आल्यापासून जास्तीत – जास्त रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यावर भर दिला. या कठीण काळात पैश्यांची बचत कशी करावी हे देखील कोरोनाने शिकवलं. तसेच आपल्या कुटुंबासोबत वेळ घालण्यातला आनंद देवून जगण्याचा नवा मंत्र दिला.

आपल्या स्वास्थाबद्दलच्या जागरूकतेपासून सामाजिक जबाबदारी पर्यंत असे अनेक धडे कोरोनाने शिकवले. थोडक्यात सांगायच झाल, तर कोरोनाने 'आत्मनिर्भर' व्हायला शिकवल. अनिश्चित भविष्यासाठी आर्थिक नियोजन करणे, बचत करणे या सारख्या गोष्टींकडे कोरोनाने गंभीरपणे पाहण्यास शिकवले.



Created by Universal Document Converter

## माझे आवडते पुस्तक

# रावण राजा

योगेश संतोष धंजे
एस .वाय.बी.ए.

कुठलंही पुस्तक वाचून झाल्यावर स्वाभाविकच मी काही प्रश्न स्वत:ला विचारतो. या पुस्तकातून मला काय घेता आलं? या पुस्तकाने मला काय दिले ? मात्र कधी कधी उत्तरे शोधण्यासाठी धडपड असूनही ते अनेकदा सापडत नाही. मन हव असलेले उत्तर कधी कधी देत नाही. कारण खोलवर कुठेतरी त्या पुस्तकाने मनाचा ठाव घेतलेला असतो. 'रावण राजा राक्षसांचा' लेखक श्री.शरद तांदळे त्यांच्या कादंबरीचही अगदी तसंच आहे. ही कादंबरी मी तीन वेळा वाचली पण प्रत्येक वेळी ती मला अगदी नवीनच भासली. सर्व पात्रांची पुन्हा नव्याने ओळख झाली. दशग्रीव ते रावण राजा राक्षसांचा कसा घडलेला त्याचां प्रवास लेखनात लेखकाने अत्यंत खुबीने यात लिहीला आहे. अनेक रूपात नाविण्याचा शोध घेत लेखकाने रावणाचे व्यक्तीचित्रण केले आहे.

रावण राजा या कादंबरीतून एवढं तरी शिकायला नक्कीच मिळेल. की स्वत:च्या मनाला एखाद्या आधी ठरवलं त्या ध्येयाला प्रत्यक्ष कृतीत उतरतं तेंव्हा अपयश जरी उंबरठ्यावर असलं तरी देखील शेवटी मात्र यशाच्या पावसात आपल्याला भिजवत असते. रावण हा तत्वज्ञानी, बुद्धिमान, वैदिकशास्त्र व तत्वनिष्ठ, स्वाभिमानी राजा या पृथ्वीवर कोणी नव्हता. स्वत:च्या मनगटावर स्वत:चे अस्तित्व निर्माण करणारा एकमेव राजा रावण आपल्या कुटुंबावर झालेल्या अत्याचाराचा प्रतिशोध घेण्यासाठी सुरू झालेला प्रवास पुढे दैत्य, दानव, असून, नाग अशा अनेक भटक्या जमातींना एकत्र करून रक्ष:इती राक्षस हे ब्रीदवाक्य साध्य करत राक्षस संस्कृती समतेवर आधारित होती. त्यांनी स्वत:ची राक्षस संस्कृती उभी केली होती. विशेष कोण कुठल्या जमातीचा हे महत्वाची नाही. त्यातच त्रैलोक्या प्रसन्न असे म्हणत मातेला उत्तम स्थान देणारा रावण शिवाय महिलेविषयी समतेची भावना निर्माण व्हावी म्हणून लंकीनीच्या नेतृत्वात सुरक्षा व शस्त्र चालवणारे पथकं निर्माण करून महिलाही कर्तुत्व सिद्ध करू शकतात हे दाखवून दिले. राक्षस संस्कृतीमध्ये मुक्त स्वातंत्र्य होते. अनेक प्रश्न, विचार, समाज, अपसमज मनात घोळत राहतात. सीतेचे अपहरण रावणाने केलं तर हा अधर्म होता तर मग त्याची भगिनी शुर्पणखेचे कान, नाक कापले हा कोणता धर्म...? ही कोणती धर्मनीती...? एकाचं पुण्य आणि रावणाचं पाप हा एकास एक न्याय कसा काय ठरू शकतो? दृषणा बरोबर दंड करण्यात १४ हजार सैन्य राम-लक्ष्मण या बंधूंच्या हातातून मारले गेले. यावरून ते निश्चित धुरंधर योद्धे आहेत हे लक्षात घेऊन रावणाने त्याचवेळी सावध पवित्रा घ्यायला हवा होता पण तो त्यांनी का घेतला नाही...? अशा कितीक उलट-सुलट प्रश्नांच्या विचारांचा भस्मासुर डोक्यात घोंगावू लागतो.

आजवर कुठल्याच पुस्तकात न कळलेला रावण या कादंबरीत अनेक भरभरून बोलला आहे. नवनिर्मिती ही आनंद देत असते. रावण स्वत:च्या ताकदीच्या जोरावर एवढं मोठं साम्राज्य उभारतो. रावण हा व्यापारी, व्यावसायिक असतो. दर्शन राज्यशास्त्र आधी विषयात पंडितव्य मिळवूनही विध्वंसक, दृष्ट का? शिवतांडव स्त्रोत्र रचणारा रूद्वींना, बुद्धिबळ, रावणसंहिता, कुमारतंत्र हे तयार करून ज्ञानार्जन करणारा रावण खलनायक कसा? कित्तेक निरूत्तरीत प्रश्न या कादंबरीत तर होताच पण काही रावणाच्या उदार अंत:करणावर विचार करायला भाग पाडतात. ''लक्ष्मणा तुझ्या भावाला सांग दोन बुद्धिमान पुरूषांनी संवाद न करता लढलं तर त्यात द्रुत आणि लबाड लोकांचा फायदा होत असतो.'' जसा सुग्रीव आणि विभिषणाचा होणार आहे. कपटी लोकांचा आधार घेऊन मिळालेला विजय निराशेच्या गर्तेत नेत असतो. विध्वंसक हा कधी चांगला नसतो. हे माहिती असूनही रक्ताच्या नात्यात साठी रक्तचंदन कपाळी लेप लावावा लागतो. संघर्ष करावा लागतो आणि बीड पडलीतर तत्वासाठी मरावं आणि मारावंही लागतं, माझ्या आयुष्यात घडलेल्या अघटित घटना, आलेली अनपेक्षित वादळ... त्यानंतरही विचारांच्या झालेल्या चिंध्या, जपत स्वत:च्या हिंमतीवर लंकाधिपती झालो. इतर राजांसारखी मी एकट्याच सुख उपभोगली नाहीत. माझी जनता सोन्याच्या घरात राहत होती. हजारो वर्षापासून अनुत्तरीत असलेल्या माझ्या वैयक्तिक आयुष्याचा, माझ्या अंगभूत व्यक्तीमत्वाचा धोंडोळा घेतला का कधी? माझं आयुष्य रोमहर्षक प्रसंगांनी आणि चित्तथरारक कर्तुत्वाने भारलेलं आहे. स्वत:च्या बळावर सर्व देवांना मी पराभूत केलं. मला न जाणता माझी प्रतिमा जाळणाऱ्या लोकांच्या अज्ञानाची कीव येते. सीतेचे अपहरण केल्याचा मला दोष देता. पण मी तिची विटंबणा केली नाही, हे का विसरता? वाचा आणि ठरवा... मी खरोखर खलनायक होतो की स्वसामर्थ्यावर झालेला महानायक...!



Created by Universal Document Converter

## माझा आवडता लेखक

# पु.ल.देशपांडे

कु.तनुषा संजय महाले
एफ.वाय.बी.कॉम्.

पुलस्पर्श होताच, दु:खे पळाली
नवा सुर, आनंदयात्रा मिळाली
निराशेतुनी माणसे मुक्त झाली
जगू लागली, हास्यगंगेत न्हाली

प्रख्यात कवी मंगेश पाडगावकर यांनी पु.लं.विषयी वरील सार्थ उद्गार काढले आहेत. पुरूषोत्तम लक्ष्मण देशपांडे म्हणजेच पु.ल.देशपांडे हे माझे आवडते लेखक आहेत. ते एक लोकप्रिय मराठी लेखक, नाटककार, विनोदकार, कथाकार, दिग्दर्शक, संगीत दिग्दर्शक असे विविध पैलू असणारे व्यक्तिमत्व होते. पु.ल. देशपांडे यांचा जन्म ८ नोव्हेंबर १९१९ साली मुंबईतील गावदेवी या भागात झाला. संगीत, लेखन, कविता अशा वातावरणात ते लहानाचे मोठे झाले. त्यांचे मराठी भाषेवर विलक्षण प्रभुत्व होते. शाळेत असतांना ते आजोबांनी लिहुन दिलेले दहा पंधरा ओळींचे भाषण खणखणीत आवाजात म्हणून दाखवायचे. पण काही वर्षानंतर ते स्वत:चे भाषण स्वत: लिहू लागले. लेखनासोबतच पु.लं.ना वाचन करण्याची रेडिओवरील संगीत ऐकण्याची, पेटी वाजवण्याची आवड निर्माण झाली. एवढेच नव्हे तर लोकांच्या वागण्यातील विसंगती हास्यास्पद गोष्ट हेरून ते लोकांच्या नकला करायचे. त्यांचे शिक्षण मुंबई व पुणे येथे एम.ए.एल.एल.बी. पर्यंत झाले. त्यांनी संस्कृत व बंगाली या भाषांचा परिश्रमपूर्वक अभ्यास केला. त्यांनी लिपिक, शिक्षक, प्राध्यापक अशा विविध स्तरांवर नोकऱ्या केल्या. आकाशवाणीवर नाट्यविभाग प्रमुख म्हणुन काम केले. दिल्ली दूरदर्शनवरील कार्यक्रमांचे ते पहिले निर्माते होते.

पु.लं. जवळ असामान्य निरीक्षणशक्ती होती. त्यांच्या लहानपणी घरी आलेल्या पाहुण्यांचे अचूक निरीक्षण करून आपला बाळ हा काही जगावेगळे बोलणार नाही ना अशी भीती त्यांच्या आईला वाटे. पण याच निरीक्षणशक्तीतून पु.लं.च्या 'व्यक्ती आणि वल्ली' साकार झाल्य. 'गणगोता' तील आप्तजन चिरंजीव झाले. पु.लं.च्या लेखनाचे वैशिष्ट्य असे की, अनेकदा वाचून, पाहुन, वाचकांनाही ती सारी माणसे आपलीच, जवळीचीच वाटू लागली. 'बटाट्याची चाळ' या पु.लं.च्या पुस्तकातील प्रत्येक माणूस आपल्यापरीने वेगळा आहे. केवळ विनोदी म्हणुन त्यात बाष्कळपणा येऊ न देता हसवत हसवत त्यांनी मानवी जीवनातील कारूण्याचा पदर नकळत आपल्या लेखनातून उलगडून दाखवला. कॉलेजमध्ये असतांना त्यांनी राजा बढे यांच्या 'माहेरा जा' या कवितेला चाल लावली. आज हे गाणे मराठी भाव संगीतातील अनमोल ठेवा समजला जातो. साहित्य क्षेत्रात पदार्पण करण्यापूर्वी ते काही काळ शाळेमध्ये शिक्षक होते. १९३७ पासून पु.ल.देशपांडे यांनी छोट्या – मोठ्या नाटकात भाग घेण्यास सुरूवात केली. १९४४ मध्ये पु.लं.नी अभिरूची लिहिले. १९४६ साली त्यांचा सुनीताबाईंशी विवाह झाला. १९४७ ते १९५४ या काळात त्यांनी चित्रपटांमध्ये आणि चित्रपटांसाठी काम करायला सुरूवात केली. वंदे मातरम्, गुळाचा गणपती या चित्रपटांमध्ये त्यांनी अष्टपैलू कामगिरी केली. तसेच चोखामेळा, देव पावला, दूध भात, देव बाप्पा, नवरा बायको, मोठी माणसे अशा चित्रपटांमध्ये त्यांनी संगीत दिग्दर्शनही केले. १९५५ मध्ये पु.ल. देशपांडे आकाशवाणीत नोकरीला लागले. आकाशवाणीसाठी त्यांनी अनेक श्रुतिका लिहिल्या. १९५६ ते १९५७ मध्ये त्यांची प्रमुख नाट्यनिर्माते म्हणून बढती झाली आणि ते दिल्लीला रवाना झाले. तेथे त्यांनी व सुनिताबाईंनी गडकरी दर्शन कार्यक्रम सादर केला. त्यातूनच बटाट्याची चाळ या अद्भूत कलाकृतीचा जन्म झाला. पु.लं.चा स्वभाव निरीक्षणच्या अचूकतेतूनच व्यक्ती आणि वल्ली साकार झाले, असा मी असामी अशी त्यांनी लिहिलेली पुस्तके आजही लोकांच्या मनात घर करून आहेत.

पु.लं.नी भरपूर प्रवास केला आणि 'अपूर्वाई' (१९६०), 'पूर्वरंग' (१९६९), आणि 'वंगदेशा' अशा पुस्तकांतून तो वाचकांपुढे मांडला. युरोपातील 'काप्री' बेटावरील निळाईच्या सौंदर्शाने पु.लं.चे अंत:करण भरून आले. आणि त्यांना आठवला ज्ञानेश्वरांनी वर्णिलेला 'कोटिचंद्रप्रकाश' पु.ल.चे चित्रपट, नाटके, एकपात्री प्रयोग सारेच लोकांनी डोक्यावर घेतले. त्यातल्या संवादांनी, गाण्यांनी, अभिनयाने आणि दिग्दशृनाने रसिकांना अमाप आनंद दिला. पु.लं.चा विनोद हा अभिजात होता. कुणालाही न दुखावणारा, कुणाच्याही व्यंगावर बोट न ठेवणारा शब्दशब्दांवर ते लीलया कोट्याधीश हे पुस्तक होय. जे वाचकाला मनसोक्त हसवते.

मानवी स्वभावाचे वैविध्यपूर्ण पैलूंचा त्यांच्या आयुष्यातील दु:खाची हलकी किनार आपल्या पर्यंत पोहोचवण्यात पु.ल.ची शब्द किमया काही औरच होती. पु.ल. स्वत: मुलत: कविमनाचे होते, संगीतकार होते. त्यांचे 'नाच रे मोरा' हे गाणे ऐकल्यावर प्रत्येक मराठी बालकाचे बालपण सुखातून जाते. पु.ल. आणि त्यांच्या पत्नी सुनीताबाई हे दोघेही काव्यवेडे, स्वानंदासाठी ते नेहमीच कविता वाचत, म्हणत त्यांना शेकडोंनी कविता पाठ होत्या. पण त्यांच्या मनात आले. हा आनंद आपण इतरांपर्यंत पोहोचवला तर... आणि मग भाईंनी आणि सुनीताताईंनी कविवर्य बोरकर, मर्ढेकर आणि आरती प्रभूंच्या कवितांच्या वाचनाने जाहीर कार्यक्रम केले. स्वत:ला मिळालेला आनंद हजारो श्रोत्यांवर उधळून दिला.

पु.लं.च्या बाबतीत म्हणावे लागते की, 'देणाऱ्याचे हात हजारो, दुबळी आमुची झोळी'. आपल्या साहित्यातून, अभिनयातून नाटकांतून पु.लं.नी लाखो रूपये मिळवले आणि ज्या समाजाने त्यांना हे दिले त्या समाजासाठीच त्यांनी ते वेचले. त्यातही त्यांची शोधक वृत्ती दिसे. कोठे कोणी चांगले काम करत आहे, पैशांसाठी काम अडले आहे असे कळले की, पु.लं.चा मदतीचा हात तेथे पोहोचत असे. कुणा एका आडवळणाच्या गावी एक प्राचार्य आपल्या महाविद्यालयासाठी धडपडत आहे. हे कळल्यावर पु.ल.फाऊंडेशन तेथे मदतीला गेले. रक्तपेढ्या, रूग्णालये, मुक्तांगण, शैक्षणिक संस्था... साऱ्यांना भरभरून मदत पोहोचली. कुणी तरूण तज्ज्ञ डॉक्टरीण व्यसनाधिनांना व्यसनांपासून मुक्त करण्यासाठी धडपडत आहे. असे कळल्यावर हा थोर दाता तेथेही पोहोचला.

प्रत्येक व्यक्तीला कोणत्या ना कोणत्या कलेची आवड असते.



Created by Universal Document Converter

गायन, वादन, नृत्य, चित्रकला, कविता लेखन, नाटक अशा अनेक विविध कला माणसाच्या अंगी जोपासलेल्या असतात. त्या कलेला साधून ती कला उत्तम करणारा कलाकार हा आपला आवडता आणि आपला आदर्श असतो. म्हणूनच पु.ल.देशपांडे यांना महाराष्ट्राचे लाडके व्यक्तीमत्व म्हणून ओळखले जाते. पु.लं.नी लोकनाट्याचा, व्यक्तिचित्रांचा, विनोदी कथांचा अनमोल ठेवा आपल्याला दिला. हे आपले खूप मोठे भाग्य आहे. या संपूर्ण प्रवासात त्यांची पत्नी सुनिताबाई यांनी सुद्धा मोलाची कामगिरी बजावली. त्यांना पद्मभूषण, पद्मश्री, महाराष्ट्र भूषण या मानाच्या पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे असे अष्टपैलू व्यक्तीमत्व १२ जून २००० साली अनंतात विलीन झाले. तेंव्हा नभोवाणी, दूरचित्रवाणी, विविध वर्तमानपत्रे, साप्ताहिक, मासिके यांमधून पु.लं.वर विपुल लेखन झाले. त्या सर्व लेखकांनी पु.लं.चा उल्लेख 'आनंदयात्री' असाच केला आहे. पु.ल.आनंदात जगले, विविध कलांच्या क्षेत्रात ते लीलया वावरले. विशेष म्हणजे पु.लं. ना जो जो आनंद गवसला, जेथे जेथे आनंद मिळाला, तो त्यांनी सर्वांसाठी मुक्तपणे उधळला. आपल्या एका मुलाखतीत पु.ल.म्हणाले होते, 'मला जेंव्हा जेंव्हा काही चांगले दिसते, आवडते तेंव्हा तेंव्हा ते दुसऱ्याला सांगण्यासाठी मी उत्सुक असतो, आतुर असतो' म्हणून पु.ल.हे केवळ शब्दार्थी आनंदयात्री नव्हते, तर ते खरोखरीचा आनंद उधळणारे 'आनंदयात्री' होते. आपल्या कलेचा वापर करून लोकांना नेहमी हसवणारे, लोकांच्या मनावर राज्य करणारे ते एक थोर व्यक्तिमत्व होते. पु.लं.नी मराठी माणसाला काय दिले, असा प्रश्न विचारण्याऐवजी पु.लं.नी मराठी माणसाला काय दिले नाही ? असेच विचारावे लागेल.

# सोशल मिडिया शाप की वरदान

कु.कांचन जगन्नाथ लुल्हे
प्रथम वर्ष कला

सोशल मिडियाच्या आविष्काराने आपले जीवन कमालीचे बदलले आहे. इन्स्टंट मेसेजिंग, अमर्यादित प्रवेश संवादाचीएक स्वस्त पद्धत जागरूकता वाढवणे आणि वस्तू आणि सेवांचा प्रचार करून उत्पन्न निर्माण करणे. सोशल मिडियाने आधुनिक समाजात क्रांती घडवून आणली आहे. तथापि व्यसने विकसित करून गोपनीयतेची व्याख्या बदलून घोटाळे निर्माण करून आणि असामाजिक संदेश पसरवून, सोशल मिडिया मानवजातीसाठी हानिकारक असल्याचे सिद्ध होऊ शकते. याचा निर्णय जनतेवर सोडला आहे.

अशाच प्रकारे सोशल मिडिया एकतर जगासाठी वरदान किंवा शाप असू शकतो. इन्स्टंट मेसेजिंगमुळे लोक काही सेकंदात जगभरात कुठेही त्यांचे कुटुंब आणि मित्र संपर्क साधू शकतात. आणि आम्हाला फक्त इंटरनेट कनेक्शनची आवश्यकता आहे. उदाहरणार्थ, एम.एस.एन. मेसेंजर ही एक सोशल नेटवर्किंग सेवा आहे, ज्याने जगभरातील संप्रेषणाच्या गतीमध्ये अमूलाग्र बदल केला आहे. पूर्वी, लोक पत्रे आणि टेलिग्रामद्वारे संदेश पाठवत असत जे त्यांच्या गंतव्यस्थानावर पोहोचण्यास दिवस घेत असत. सोशल मिडियामुळे आम्हाला आमच्या प्रियजांकडून ऐकण्यासाठी इतका वेळ थांबवण्याची गरज नाही.

मात्र सोशल मिडियाचा एक मोठा तोटा म्हणजे लोक व्यसनाधिन होतात हे व्यक्तींच्या आरोग्यावर गंभीरपणे परिणाम करू शकते. सोशल मिडिया वापरण्याचे आणखी एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे अमर्यादित प्रवेश लोक त्यांना हवे तितके संदेश पाठवू शकतात आणि २४ ७ कनेक्ट राहू शकतात.

इंटरनेट कनेक्शनसाठी आम्हाला फक्त एक निश्चित दर (मासिक किंवा वार्षिक) भरावा लागेल. उदाहरणार्थ रॉगेटस् सारख्या कंपन्या सर्वात कमी किमतीत हाय स्पीड इंटरनेट कनेक्शन प्रदान करतात तर सेल्युलर फोनद्वारे लोकांशी संपर्क साधल्यास आम्हाला प्रति मिनिट दर द्यावा लागेल. त्यामुळे सोशल मिडियाची किंमत कमी आहे. दुसरीकडे सोशल मिडियाने गोपनीयतेची व्याख्या बदलली आहे, पूर्वी मानवजात कोणतीही खाजगी माहिती आपल्या प्रियजनांना इंटरनेटवर उघड होणार नाही याची जास्तीत-जास्त खोल वरील माहिती न बघता नाही पाहीजे याची जाणीव असली पाहीजे. यामुळे ओळख चोरी होऊ शकती जे आपल्या जीवनांत गंभीर समस्या निर्माण करू शकते.

अनोळखी व्यक्ती एका क्षणात तुमचे पैसे, मालमत्ता आणि इतर मालमत्ता चारू शकतात. यामुळे आपली खाजगी माहिती जास्ती टाकत जाऊ नका. याशिवाय, सोशल मिडियाच्या जन्मामुळे जगभरात घडत असलेल्या महत्वाच्या समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे इतके सोपे, सोयीस्कर आणि किफायतशीर झाले आहे.

उदाहणार्थ, नैसर्गिक आपत्तींनी ग्रासलेल्या लोकांसाठी पैसे कमवण्यासाठी फेसबुक मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. याउलट सोशल मिडियाचा वापर वैयक्तिक फायद्यांसाठी लोकांची फसवणूक करण्यासाठी केला जाऊ शकतो. उदाहरणार्थ, नायजेरिया पत्र ४१९ अॅडव्हॉन्स फी फसवणूक हा सर्वात सामान्यपणे ज्ञात घोटाळा आहे. म्हणून, आपण सोशल मिडियाद्वारे कोणासोबत संवाद साधतो हे आपण जागरूक असले पाहिजे.

शिवाय व्यवसायांसाठी ते लोकांसाठी प्रचार करत असलेल्या वस्तू आणि सेवांबद्दल बाजार संशोधन करण्यासाठी सोशल मिडिया हा सर्वांत प्रभावी मार्ग आहे. ग्राहकांना व्यक्त केलेल्या रचनात्मक टीकेचा व्यवसाय त्यांची उत्पादने वाढविण्यासाठी आणि लोकांच्या मागण्या पूर्ण कऱ्णयासाठी वापरू शकतात.



Created by Universal Document Converter

# माझी आवडती कविता

# हा देश माझा

कु.ऋतुजा महेश उपाध्ये
टी.वाय.बी.ए.

कविता... कविता... कविता...

सर्वांच्या आवडीचा, आपुलकीचा, जिव्हाळ्याचा विषय कविता असतो. कविता म्हटल की आपल्या बालपणात हरवून जावस वाटतं. लहानपणी ये रे ये रे पावसा पासून ते तर जीवनाच्या अखेर श्वासापर्यंत आपला सहवास या वाङमयाशी येतो.

तस पाहील तर मला कविता हा विषय खुप आवडतो. कवितेतून व्यक्त होता येत, आपली सुख, दु:ख, मत, मतांतर मांडण्याच त्याला काव्यात्मकता देण्यास कौशल्य फक्त आपल्यात असण आवश्यक आहे. स्वत: बरोबरच इतरत्र समाज लेखन प्रकारातील झालेल्याचा सखोल अभ्यास असला की आपण सुद्धा सहजरीत्या कविता हा साहित्य प्रकार सहज मांडू शकतो.

लहान पणापासून मी बऱ्याच कविता अभ्यासत आली. प्रत्येकात काहीना काही अर्थ, भावार्थ, येण्यासारख असत. प्रत्येक कवितेतून कवी आपुल्या भावना, आशा, आकांक्षा, त्यांची मत, समाजातील वातावरण एखादा घटक हे सर्व कवितेच्या माध्यमातून मांडत असतो. कविता या विविध प्रकारच्या असतात, नैसर्गिक कविता, देशभक्तीवर कविता, भाव कविता, चिंतन गर्भ कविता, कथाकविता, नाट्य कविता, गीत असे विविध प्रकार कवितेचे आहेत.

मी माझ्या निबंधात देशभक्तीपर कविता मांडण्याचा प्रयत्न करते. सेनापती बापट यांची हा देश माझा याचे भान जरासे आले मी आठवीला असतांना मराठी अभ्यासक्रमात आम्हाला ही कविता होती. खुप सुंदर अशा प्रकारे शिक्षकांनी तिचा भावार्थ आम्हास उलगडून सांगितला. आजही त्या वर्गातील त्या तासाच सुरेख चित्र माझ्या डोळ्यासमोर उभ राहतय शिक्षकांनी आमच्या मनामध्ये ओतलेच ते देशप्रेम, ती आत्मियता तो आपलेपणा आज त्या कवितेवरती लिहिण्यास मला प्रवृत्त करतोय त्या कवितेचे बोल पुढीलप्रमाणे ;

हा देश माझा

हा देश माझा याचे, भान जरोस राहू द्या रे ।।धृ ।।
हा उंच हिमालय माझा, हा विशाल सागर माझा
ह्या गंगा, यमुना, शेती, धरती, बागबगीचा माझा
अभिलाषा याची धरिता, कुणी नजर वाकडी करता
या मरण द्यावया, स्फुरण आपुल्या बाहू पावू घ्या रे ।।१।।
जे गत उत्सुकलेले दगडांच्या वर्षावाला
रोखा, ते लावा कार्याला, या देशाच्या प्रगतीला
हे बंद करा उत्पात थांबवा आपुला घात
सामर्थ्य न जावो व्यर्थ, काहिसा अर्थही येवू घ्या रे ।।२।।
जरी अनेक आपुले धर्म, जरी अनेक आपुल्या जाती
परी अभंग आमुच्या, सदैव आपुली माणुसकीची नाती
ह्या सर्वदूर ललकारी, फुंका रे एक तुतारी
संदेह रोज जे, द्वेष मनातील वाहून जावू द्या रे ।।३।।
हा देश माझा याचे भान जरासे राहू घ्या रे ।।

कवि – सेनापती बापट (पांडुरंग महादेव बापट)

सेनापती बापट यांनी आपल्या कवितेतून देशाबद्दलचा असलेला आदर, प्रेम, आपुलकी, जिव्हाळा, आपलेपणा, आत्मियता या कवितेतून व्यक्त केली आहे. ते आजच्या तरूण पिढीला उद्देशून बोलतात त्यांना मोलाचा संदेश देतात. निद्रीस्त असलेल्या मानवी समाजाला उठवण्याच काम त्यांनी आपल्याला या कवितेतून केलेले दिसते.

पहिल्या कडव्यात ते सांगतात की, आपल्या देशाच नैसर्गिक वैभव, देशाला लाभलेला हनुमानासारखा बलाढ्य, प्रचंड असा हिमालय पवित्रतेची माऊली गंगा नदी जी इतरांना पवित्र करत करत आज स्वत:च दुषित झालीये, आपल्या भारत भूमीला लाभलेल नैसर्गिक वैभव ते आपल्या पहिल्या कडव्यात व्यक्त करतात.

दुसऱ्या कडव्यात ते म्हणतात की, देशाच्या कार्यासाठी स्वत:ल ओढवून घ्या, ज्या हाताला काम नाही त्याला काम लावा, स्वत:च स्वत:ची जी फसवणूक करताच ती थांबवा (तरूण वर्ग) ह्या भारत भूमिवरती होणारा घातपात थांबवा, हिंसा थांबवा चांगल्या कार्यात स्वत:ला अर्पण करा अस सेनापती बापट सांगतात.

तिसऱ्या कडऱ्याते सांगतात की, भारत भूमी म्हटली म्हणजे विविधता आहे. मग ती समाजाची, चालीरीतींची असो, संस्कृती असते, भाषेची असो सर्व सर्व स्वरूपात विविधता असणारा हा भारत देश याने एकता आत्मसात केली पाहिजे. मानव नावाची एकच जात आहे हे स्वीकारून सर्वांनी एकत्र आले पाहिजे. हे स्वीकारून सर्वांनी एकत्र भाव आणि स्वत:च कल्याण करून घ्यावा. मानव जातीच्या कल्याणासाठी हातभार लावावा. असा वापर आपल्या कवितेच्या शेवटच्या ओळीत सांगतात. त्यांची कळकळीची विनंती आपल्या मानवी समुद्राला आहे.भारत मातेच्या प्रत्येक वीराला आहे ही विनंती जर प्रत्येकाने स्वीकारले ते यातून सर्वांचे कल्याण आहे.

आज या २१ व्या शतकात अशाच समजा प्रबोधनाची गरज आहे. त्यांची ही कविता खरच खुप मोलाच मार्गदर्शन करणारी आहे आणि मी तर म्हणेल की भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ या सवार्त मार्गदर्शन करणारी ती रचना आहे. तिचा ताजेपणा आपणास जाणवेल अशी तीची रचना आहे. प्रत्येक ओळीत प्रत्येक शब्दात गहण असा अर्थ दडलेला आहे. तो मानवी समाजाला अविरत प्रेरीत करणारा आहे.

मी ही कविता जाणीवपूर्वक घेतली, कारण याच्या माध्यमातून माझ्या विद्यार्थी मित्र–मैत्रिणींना जाग कारण, त्यांच्यात देशप्रेम, तसेच मानवी समुहाबद्दल आत्मियता वाढावी त्यांनी सकारात्मक व्हावा. समाजाशी एकरूप होता याव या हेतूने मी ही कविता घेतली



Created by Universal Document Converter

# कोविड-१९ महामारीने काय शिकवले?

कु.वैष्णवी गणेश सुतार
(प्रथम वर्ष कला)

हजारो लोकांचा बळी घेणाऱ्या कोरोना महामारीशी संपूर्ण जग झुंजत आहे. विज्ञानाच्या तसेच वैद्यकीय क्षेत्रात प्रगतीची घोडदौड करूनही माणूस कोरोनाच्या अतिसूक्ष्म विषाणूपुढे किती हतबल आहे, हेच या महामारीने दाखवून दिले आहे. बाधित झालेल्यांचे प्राण वाचविण्यासाठी डॉक्टर शर्थ करत आहेत व या विषाणूवर प्रतिबंधक लस विकसित करण्यासाठी वैज्ञानिक जिवाचे रान करत आहेत. हा प्राणघातक विषाणू राजा आणि रंक असा भेदभाव करीत नाही की, देश आणि धर्माचे भेदही पाळत नाही. त्याचा प्रसार रोखण्यासाठी एकापाठोपाठ अनेक देशांमध्ये 'लॉकडाऊन' करावे लागत आहे. एकीकडे माहितीच्या महाजालाने जगभरातील लोक पूर्वी कधी नव्हते एवढे परस्परपरांशी जोडले गेलेले असतांनाच देशांना सीमा बंद करायला लागाव्यात आणि देशातील नागरीकांनाही एकमेकांत अंतर ठेवण्यास सांगावे लागावे हा केवळ विरोधाभासच नाही तर कटू वास्तवही आहे.

संपूर्ण मानवी समाजासाठी ही परीक्षेची घडी आहे. या लढ्यातून बाहेर पडल्यावर वास्तवाचे, आर्थिक मंदीचे व व्यक्तिगत आयुष्याच्याही झालेल्या मोठ्या विस्फोटाची आपल्याला जाणीव होईल. अशी विनाशकालाची पुनरावृत्ती टाळता येईल का ?, यावर गांभीर्याने विचार करून त्यावर उपाय शोधावे लागतील. आपण अनुसरलेली विकासाची मॉडेल्स, अशाश्वत पद्धतीवर आपल्याला प्रश्नचिन्हे उभी करावी लागतील. माणसाच्या हव्यासाने अन्य सजीवांचे अधिवास नष्ट होण्याचा हा भयावह परिणाम आहे, हे अनेक विचारवंतांचे मत खरे तर नाही ना, याचाही आपल्याला विचार करावा लागेल.

पर्यावरण संतुलनाचा सन्मान करून ते पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी प्राचीन भारतीय दृष्टीकोन मार्गदर्शक ठरू शकेल, ज्यात सर्व सजीवांना सारखेच महत्व असेल अशा विश्वाची कल्पना वैदिक ऋषींनी दोन हजार वर्षापूर्वी मांडली होती. तशा अनेक प्रार्थना ऋग्वेदात आहेत. वृक्षांसह सर्व सजीवांमध्ये देवत्वाचा अंश मानणारी निसर्ग रक्षण व पर्यावरण संतुलनाची आपली प्राचीन परंपरा आहे. पृथ्वी, त्यावरील माणसासह सर्व सजीव आरोग्य संपन्न राहावेत यासाठी सर्व भारतीयांसह जगातील नागरीकांना निसर्गरक्षणाच्या लढ्यात सक्रिय सैनिकांची भूमिका बजवावी लागेल. आरोग्याची अनेक निकषांमध्ये भारताने स्वातंत्र्यानंतर खूप प्रगती केली आहे. अनेक संसर्गजन्य रोगांचे उच्चाटन झाले आहे. सरासरीपेक्षा अपेक्षित आयुष्यमान ६९ वर्षापर्यंत वाढले आहे. गेल्या ३० वर्षात साथ रोगांमुळे, बाळंतपणात, बाल्यावस्थेत व कुपोषणामुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण ६१ वरून ३३ टक्क्यांवर आले आहे.

मात्र, बदलत्या जीवनशैलीमुहे साथींखेरीज अन्य आजारांचे प्रमाण खूप वाढले आहे. काही वर्षांपूर्वीची जागतिक आरोग्य संघटनेची आकडेवारी सांगते की, आपल्याकडे ६१ टक्के मृत्यू हृदयरोग, कर्करोग व मधुमेह यांसारख्या साथींखेरीजच्या आजारामुळे होत आहेत. हे रोखण्यासाठी शरीराला अजिबात व्यायाम न देणारी जीवनशैली व कदान्नाच्या सेवनाचा त्याग करून आरोग्य संपन्न जीवन जगण्याची राष्ट्रीय महामोहीम हाती घ्यावी लागेल. योग, ध्यानधारणा व खाण्या-पिण्याच्या चांगल्या सवई बालवयातच बनवाव्या लागतील. शालेय अभ्यासक्रमांत याचा समावेश व्हायला हवा. इंडियन मेडिकल असोसिएशन व अन्य वैद्यकीय संस्थांनी या लोकशिक्षणात पुढाकार घेऊन माध्यमांनीही यात सक्रियतेने सहभागी व्हायला हवे.

ज्येष्ठ नागरिक व वयोवृद्धांना रोगाची लागण चटकण होण्याचा संभव असल्याने त्यांची काळजी घेणे तेवढेच महत्वाचे आहे. 'कोरोना' च्या निमित्ताने आरोग्य सेवांच्या बाबतीत शहरी व ग्रामीण भागातील मोठी तफावत समोर आली आहे व सार्वजनिक आरोग्यासाठी अधिक निधी देण्याची गरज अधोरेखित झाली आहे. ५० कोटींहुन अधिक लाभार्थींना आरोग्य विम्याचे संरक्षण देणारी व दीड लाख आरोग्य कल्याण केंद्रातुन आरोग्याच्या मुलभूत सुविधा पुरविणारी 'आयुष्यमान भारत' योजना काही प्रमाणात याचे निराकरण करणारी आहे. उपचारांएवढेच रोगप्रतिबंधावर आणि नागरीकांचे जीवन समग्रपणे आरोग्यसंपन्न करण्यावर आपल्याला भर द्यावा लागेल.

या जागतिक साथीने माणूस व निसर्ग यांच्यातील अतुट नात्याकडे नव्याने पाहणे भाग पाडले आहे, ही वसुंधरा फक्त मानवासाठी नाही तर वनस्पतींसह सर्व सजीवांसाठी ही आहे याचे भान ठेवावे लागेल. आपले हे एकमेव जग एकमेकांशी घट्ट निगडीत व परस्परावलंबी आहे. आरोग्यदायी आयुष्यासाठी हे संतुलन जपणे अपरिहार्य आहे. आपल्याला पुस्तकी ज्ञानाला प्रज्ञेची जोड द्यावी लागेल. पर्यावरणाचा ऱ्हास होऊ न देता माणसासह सर्वच सजीवसृष्टीला बहरता येईल, अशी सुरक्षित पृथ्वी साकार करावी लागेल.

तसेच वाढते प्रदुषण व वनांचा विनाश जंगलाचा ऱ्हास व वन्य प्राण्यांची संख्या कमी झाल्याने निसर्गात जो असमतोल निर्माण होईल त्याचे परिणाम सरळ आपल्या अस्तित्वावर घाला घालणारे असतील. यामुळे जागतिक तापमान वाढ व बदलते हवामान यांचे गंभीर संकट उभे आहे. त्यातून मुक्त होण्यासाठी 'जगा आणि जगू द्या' विचारसरणी आत्मसात करावी लागेल. जंगलवनांचा, जैवविविधतेचा ऱ्हास थांबवावा लागे, तसेच निसर्ग-पर्यावरण व जैवविविधता यांचे अतोनात नुकसान करणाऱ्या विकास प्रकल्पांविषयी गांभीर्याने विचार करावा लागेल, अन्यथा आपलाच विनाश अटळ आहे, हे लक्षात घ्यावे.

निसर्गापासून मानवाला अनेक देणग्या मिळालेल्या आहे. त्यापैकी एक म्हणजे पर्यावरण होय, मानव पर्यावरणाचा उपयोग वेगवेगळ्या प्रकारच्या आपल्या गरजा भागवण्यासाठी करतो. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होऊन मानवाच्या जीवनावर त्याचे दुष्परिणाम होतात. जसे विविध प्रकारच्या भौतिक, रासायनिक व जैविक क्रियांचा धोकादायक घटकांच्याद्वारे पर्यावरण आपल्या आरोग्यावर अनेक प्रकारचे परिणाम करीत असते. मानवी आरोग्याचा बव्हंशी समस्या निर्माण होण्याचे मुळ कारण पर्यावरणाचे प्रदूषण होय. पर्यावरणाची सर्वाधिक वाईट स्थिती मानवी कृत्यांशी संबंधीत आहे. त्यामुळे मानवी आरोग्यात बिघाड होत आहेत.

आपले आरोग्य हे पर्यावरणावर अवलंबून आहे. आपण पर्यावरणाचे संरक्षण - संवर्धन केले तर पर्यावरण आपले संरक्षण करणार हे या कोविड-१९ महामारीने आपल्याला शिकवले.



Created by Universal Document Converter

# कोविड-१९ महामारीने जगाला काय धडा दिला?

कु.हर्षाली योगेश महाजन
प्रथम वर्ष कला

आता परिसरामध्ये पाहून खूप आनंद वाटतोय. कारण खुप दिवस निघून गेले कोविड-१९ महामारीने सर्व बंद होतं. गावोगावातील, शहरातील शाळा, कंपन्या, दुकाने सर्व काही बंद होते. आज सर्वांना कोविड-१९चे नियम पाळतांना पाहून आनंद वाटतो. किती काही शिकवलं ह्या कोरोना मोठ्याआजाराने यावर एकदा निबंध लिहावसं वाटले. कोविड-१९ महामारीने आपल्याला काय शिकवले?

मागील वर्षांपूर्वी कोरोनाची साथ आली आणि सक्तीने लॉकडाऊन झाला. स्वत:ला घरात बंदिस्त करून घ्यायचं संपूर्ण जग स्तब्ध झाल्यासारखं वाटत होतं. विनाकारण केल्या जाणाऱ्या खर्चाला खीळ बसली आणि महत्वाचं म्हणजे कमी पैशातही घर चालवता येऊ शकत हा धडा या कोरोनामुळे मिळाला. या काळात प्रत्येकाला बरे वाईट अनुभव आले. लोकांनी एकत्र कुटुंबातील सर्वच सदस्यांसोबत राहून तणावमुक्त आनंदी जीवनाचा अनुभव घेतला. कुटुंबातील सदस्यांनी कोणत्याही परिस्थितीत एकत्र असावं यावी जाणीव लॉकडाऊनमध्ये झाली. आम्हाला एकत्र असण्याचा खूप फायदा झाला. त्यामुळे बंदीच्या काळातही कशाचीच कमतरता भासली नाही. या उलट आपलं घर सोडून रोजगारांसाठी दूर शहरात राहणाऱ्या लोकांना अनेक समस्यांना तोंड द्यावं लागलं. मदतीला येईल असं कोणीही जवळचा माणुस नाही. त्यामुळे एकटेपणा जास्त जाणवला या लॉकडाऊनमध्ये आम्ही बरीच पुस्तकं वाचली. नियमितपणे केलेल्या वाचनामुळे ज्ञानात भर पडली. शिवाय पुस्तकांसोबत वेळ कसा गेला ते कळलंच नाही. कोरोनाने गरीब श्रीमंत, काळा-गोरा अशा प्रत्येकाला स्वच्छता आणि निरोगी जीवन जगायचं हे शिकविलं.

शेजार धर्म कसा सांभाळायचा ते शिकवले कोरोनाने केवळ शिकवलेच नाही तर तसे वागायला भाग पाडले. स्वच्छता, संयम, सहनशीलता, माणुसकी, आर्थिक दृष्ट्या दूरदृष्टी ठेवून नियोजन कस करायचं ते शिकवलं, खरंच कोरोनाने 'न भूता न भविष्यती' अशी अनुभूती दिली. हे प्रलयंकारी कोरोना संकट मार्च अखेरीस ओढवलं आणि या संकटाची परिणीती टाळे बंदीमध्ये झाली. क्षणार्धात जनजीवन एखाद्याने स्टॅच्यू म्हणाव आणि समारच्याने जिथल्या तिथे थांबावं, तसं थांबलं. पहाटे ५:३० ला उठून करावी लागणारी मुलाची शाळेची तयारी, डबे, योगाचा क्लास, रोजचा बाजार हाट हा सर्वांचा नित्यनेम एका एक थांबला. जिवनावश्यक असलेला किराणा माल तसेच भाजीपालाही ठरावीक वेळीच मिळत असल्यामुळे वेळेत न गेल्यास काहीच मिळत नव्हतं, बाहेरच्या खाण्याने पैसा तर जातोच; शिवाय आरोग्याचीही हानी असे दुहेरी नुकसान होते याची तीव्रतेने जाणीव झाली. घरच्या भाजी-भाकरीची किंमत कळली. स्वच्छतेची काळजी घेतली तर इतरही अनेक आजारांना आळा बसतो याचा अनुभव घेतला.

सतत घरात असल्यामुळे माझा किती वेळ वाया जातो आणि कुठे जातो याची जाणीव मला झाली. आळस झटकून वेळेचं व्यवस्थित नियोजन केलं तर सारं काही शक्य होतं, हे लक्षात आलं, अडीअडचणीत शेजारी पहिले धावून येतात. त्यामुळे छोट्या-छोट्या गोष्टींवरून न भांडता एकमेकांना समजून घेऊन शेजारधर्म सांभाळणं किती गरजेचे आहे हे कोरोनाने शिकवलं, कोरोना काळात खूप साऱ्या संकटांना तोंड द्यावे लागले. मात्र, या कोरोनाने मला भरपूर गोष्टी शिकवल्या कठीण प्रसंगांना तोंड देण्याचा आत्मविश्वास निर्माण झाला. तसेच एक गोष्ट माहीत पडली की, नोकरी कायमस्वरूपी नाही ती आज आहे, उद्या नाही. मात्र स्वत:चा व्यवसाय असेल तर आपण मुंबई सारख्या शहरामध्ये जगू शकतो. कोरोनामुळे मास्क वापरणे हे किती महत्वाचे आहे, ते समजेल. भारतासारख्या देशामध्ये प्रदूषण मोठ्या प्रमाणात आहे. मास्क मुळे आपण प्रदुषणापासून वाचू शकतो.

तसेच मास्क आणि स्वच्छतेच्या सवयीमुळे आपण आजारापासून दूर राहू शकतो. आजपर्यंत आपण रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी काही प्रयत्न केले नव्हते. मात्र आपण कोरोना आल्यापासून जास्तीत जास्त रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यावर भर दिला. या कठीण काळात पैशांची बचत कशी करावी, हे देखील कोरोनाने शिकवले. कोरोनाने नातेसंबंध जपत तसेच स्वत:च्या कुटुंबासोबत वेळ घालवण्यातला आनंद देऊन जगण्याचा आनंद नवा मंत्र दिला.

कोरोनाने 'आत्मनिर्भर' व्हायला शिकवले, कोरोना विरूद्धच्या युद्धाला दोन वर्ष पूर्ण झाले. या वर्षभरात बऱ्याच गोष्टी मला शिकायला मिळाल्या. स्वच्छतेच्या सवयींपासून ते नात्यांच्या संदर्भापर्यंत, स्वास्थ्याबद्दलच्या जागरूकतेपासून सामाजिक जबाबदारी पर्यंत असे अनेक धडे कोरोनाने मला दिले. थोडक्यात काय, तर कोरोनाने 'आत्मनिर्भर' व्हायला शिकवले. या काळात काय महत्वाचे आहे आणि कोणत्या गोष्टी तात्पुरत्या शोभेच्या आहेत यातील फरक अधिक स्पष्ट झाला. या विषाणूने आपल्या परंपरा,रूढी म्हणजेच आयुर्वेद आणि योगा इ. चे महत्व सांगितले. आपले स्वास्थ हे आपल्याच हाती आहे ही मुख्य शिकवण कोरोनाने दिली. हवामान बदलामुळे ताप, सर्दी होणे हा दरवर्षी ठरलेला नियम! पण दरवर्षी ठरलेले आजार आपण मानत आणलं तर टाळू शकतो, ही शिकवण कोरोनाने दिली. दुसऱ्यांवर अवलंबून राहण्याची सवय कोरोनाने मोडीत काढली. स्वत:ची कामे स्वत: करता येणे किती महत्वाचे आहे. याची जाणीव या काळात झाली. अनिश्चित भविष्यासाठी आर्थिक नियोजन करणे, बचत करणे यासारख्या गोष्टींकडे कोरोनाने गंभीरपणे पाहण्यास शिकवले.

आपण सर्वच जण कोरोनाच्या दहशतीत जगतोय दिवसगणित वाढत जाणाऱ्या आकडेवारीनं काळजात धस्स होतय. अनेकांनी आपली जीवलग माणसं गमावली. अनेकांचे जीवलग कोरोनाशी झुंज देत आहेत. मात्र या भयाण आणि तणावपूर्ण वातावरणात आपल्याला काही नव्या सवयी जडल्या, तर काही लावून घ्याव्या लागल्या, कोरोनानं सकारात्मक आणि नकारात्मक अंगाने आपल्या सर्वांच्याच आयुष्यात प्रचंड बदल घडले. सर्व जगात हाहाकार झालेला असतांना लाखो लोकांचे बळी घेऊन मानवी जीवन उध्वस्त करणाऱ्या अतिशय वेगवान गतीने निसर्गाचा ऱ्हास करून पुढे जाणाऱ्या माणसाला अचानक ब्रेक लावण्याचं काम या उघड्या डोळ्यांनी न दिसणाऱ्या



Created by Universal Document Converter

कोरोना नावाच्या व्हायरस ने केलं.

कोरोनाचे संकट हे खूप काही शिकवणार असून यातून वेळोवेळी खूप काही बदल होणार आहे. जसे आपण स्वत:चे जीवन वाचवण्यासाठी वाटेल ती तडजोड करतो, त्याचप्रमाणे आपल्या सभोवतालचा निसर्ग अबाधित राहण्यासाठी आपण नेहमी तत्पर असले पाहिजे. सगळी माध्यमे, सोशल मिडिया जिकडे तिकडे चहुकडे कोरोना... कोरोना... आणि फक्त कोरोना बरं तो डोळ्याने तर दिसत नाही. इतका सुक्ष्म पण त्याचा प्रताप इतका मोठा की त्याने जगाला वठीस धरलं मी मी म्हणणाऱ्या महासत्ता अगदी लोळागोळा झाल्या. आम्ही नाही भीत म्हणणारे महाभाग कोरोना प्रतिबंधाचे औषध घेऊ लागले. मग सकाळी गरम पाणी. तुळस टाकून, लिंबू पाणी, व्हिटॅमिन सी.ई असे बरेच काही संगणकाच्या सगळ्या साईटवर हा भीडमार कोरोना कसा होऊ शकतो कसा नाही त्यापासून बचाव कसा करायचा, कोणता प्राणायाम, कपालभाती योग्य, पाणी ते ही गरम किती वेळा घ्यायचे इथ पासून गवती चहा, मध ते होमियोपॅथी औषधांपर्यंत सगळ सांगणारे घरगुती डॉक्टर सगळीकडे दिसू लागले आहेत. काल परवापर्यंत भेटीसाठी आसुसलेले सगळेजण तोंड फिरवू लागले आहेत. हातात हात मिळवणे तरदूर ते दोन महिने फोनवर किंवा व्हॉट्सॲपवर किंवा फेसबुकवर अगदी नाही जमले तर तुझा निरोप नाही म्हणजे तू ठिक आहेस, असे समजेन इथपर्यंत अथांग माणुसकीचे दर्शन सगळीकडे पहायला मिळत आहे.

कोरोनाच्या पूर्वी गावी मनिऑर्डर पाठवणारे आज गावी नकोसे झालेत. शहरातच रहा. गावाकडे नको रे बाबा तुझी ब्याद असे सामाजिक चित्र आज पाहायला मिळत आहे. काल परवापर्यंत हवाहवासा वाटणारा प्रत्येकजण आज नको नकोसा झालाय. ही किमया कोणाची मायक्रॉनमध्ये अस्तित्व असलेल्या एका विषाणुची हजारो पट लहान-मृत विषाणू नकात, डोळ्यात जातो काय आणि जिवंत होऊन हैदोस घालतो. आपले जीवन किती मोलाचे आहे हे कोरोनाने शिकविले.

# भारतीय लोकशाहीत मतदानाचे महत्व

कु.सानिका मोहन पाटील
प्रथम वर्ष कला

शास्त्रज्ञ मंडळी आयुष्यभर अतिशय मेहनत घेऊन संशोधनाद्वारे मानवी जीवन सुसाह्य करण्याचा प्रयत्न करित असतात. देशातील युवक युवती सैन्यात विविध पदांवर राहून देशसेवा करतात. संरक्षण, संशोधन, कृषी विकास उद्योग याचबरोबर अगदी राष्ट्रसेवा दलाच्या व शालेय विद्यार्थी एन.सी.सी. का असेना प्रत्येकजण आपआपल्या एक भाग आहे. लोकशाही सुदृढ व सक्षम असेल तर देशाच्या विविधांगी विकासाला चालना मिळण्यास विकासाला गती देण्यास भरीव मदत होते. याच दृष्टीकोनातून या देशाच्या नागरिक म्हणून प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क प्राथमिकेने बजावणे नितांत गरजेचे आहे.

केव्हा ही लोक असेच म्हणतात , मी एकट्याने मतदान नाही केलं तर काय फरक पडतो! मतदानानिमित्त सुट्टी आहे. या सुट्टीचा आनंद उपभोगु या, कुठेतरी सहल काढू या! हे विचार म्हणजे नाकर्तेपणाचा कळस होतात, पण थेंबे थेंबे तळे साचे या उक्तीप्रमाणे एका - एका मतानेच मतांचा डोंगर उभा राहतो. यामुळे प्रत्येक व्यक्तीने मतदान करून आपला मतदानाचा हक्क बजावण्याबरोबर लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी आपलाही खारीचा वाटा उपयुक्त होतो. ही बाब गांभीर्याने लक्षात घ्यायला हवी. भारत जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर लोकशाहीच्या माध्यमातून जनतेच्या आशा - आकांक्षांची पुर्तता  करण्याचे अनेक स्तरावर प्रयत्न करण्यात आले. मतदान हे करायला पाहिजे. कारण की आपण निवडून दिलेल्या नेत्यामार्फत आपल्या देशाचे भवितव्य देशाचा विकास त्यांच्या हाती असतो. आणि तो योग्य हाती असतो. आणि तो योग्य हाती सोपवणे हे आपल्या मतांवर अवलंबून असते.

१५ ऑगस्ट स्वांत्र्यदिन, २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन या दिवशी प्रत्येक भारतीयांच्या मनात राष्ट्रप्रम, राष्ट्रभक्ती ओसंडून वाहत असते. याच पद्धतीने ध्वजदिन निधी संकलनासही जनता सढळ असते. नैसर्गिक आपत्ती असो किंवा सुन्नजन्य परिस्थिती. प्रत्येकजण देशप्रेमाने भारावून जावून मदतीसाठी पुढे सरसावतो व आपल्या परिस्थितीनुसार मदत करतो. मतदानाबाबतही लोकांच्या मनात अशी कर्तव्य भावना चेतविण्याची नितांत गरज आहे.

भारत निवडणुक आयोगामार्फत दरवर्षी २५ जानेवारी हा दिवस 'राष्ट्रीय मतदार' दिवस म्हणून साजरा केला जातो. विविध उपक्रम राबवण्यात येणार आहे. प्रत्येक तालुक्यात, जिल्हास्तरावर मोठ्या लोकसंख्येच्या गावात प्रभात फेरी आयोजित केला जातात. प्रत्येक विविध जिल्ह्यात विविध महाविद्यालये व ज्युनिअर कॉलेज मधून युवक-युवतींसाठी मतदान करणे गरजेचे आहे. या विषयांवर प्रबोधन करणारी व्याख्याने, निबंधस्पर्धा, रांगोळी स्पर्धा, शाहिरांच्या पोवाड्यात, जनजागर आदी उपक्रम राबविण्यात येत आहेत. विशेषत: १८ वर्षे पूर्ण केलेल्या युवक - युवतींना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला आहे. या अनुषंगाने मतदान जागृती बाबत तरूणाईला जास्तीत जास्त प्रोत्साहीत करण्यात भर दिला जाणार आहे.

ग्रामीण भागात मतदानाचे प्रमाण कमी झाले आहे; पण शहरी भागात सुद्धा मतदानाचे प्रमाण वाढावे, शहरी क्षेत्रांमध्ये उदासिनतेमुळे मतदानाचे प्रमाण अल्प असल्याने दिसून येत आहे. हे प्रमाण वाढविण्यासाठी शहरी क्षेत्रात मतदान कमी होण्याची नेमकी कारणे शोधून काढून त्यासंबंधी उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यासाठी शहरी भागात दूरदर्शन, सिनेमागृहे, केबल टिव्ही इत्यादींच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. वेबसाईट व इतर सोशल मिडियाच्या माध्यमातून शहरी भागांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

वंचित समाज समुह यांची मतदान नोंदणी वाढवावी आणि मतदानामध्ये त्यांच्या सहभाग वाढावा आणि यासाठी विशेष प्रयत्नांची गरज आहे. नागरीकांमध्ये सेनादलातील अधिकारी सोलापूरमधील विंडी कामगार, बीड मध्ये ऊस तोड कामगार, गडचिरोलीमध्ये बडामडीया हा आदिवासी समुह तर ठाणे जिल्ह्यामध्ये तृतीयांशी मतदान नोंदणी प्रमाण कमी असलेले वंचित समाज आढळून आलेले आहे. या समाजाची वस्ती आणि त्यांची संस्कृती यांचा अभ्यास करून त्यांना मतदान प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी त्यांच्याशी प्रत्यक्ष संबंध साधणे आवश्यक आहे. आणि प्रत्येक नागरीकांचे कर्तव्य आहे; की आपण आपल्या देशाच्या हितासाठी आणि विकासासाठी मतदान करायला हवे. योग्य तो नेता निवडायला हवा.

''भारतीय लोकशाहीच अभिमान, चला करू मतदान''



Created by Universal Document Converter

# २१ व्या शतकात धर्माचे स्थान

कु.सोनल योगेश पाटील
प्रथम वर्ष कला

धर्म म्हणजे काय? हा प्रश्न आपल्याला कधी पडतो का? आजकालच्या परिस्थितीला पाहिले की आपण म्हणतो की त्या धर्मातच ती शिकवण आहे. मग त्याचा आणि तुमचा धर्म वेगळा का? याची नेमकी व्याख्या काय? तर धर्म म्हणजे सत्याचे ज्ञान; वेदांतानुसार धर्म म्हणजे सत्य आणि धार्मिक म्हणजेच सत्याकडे जाणारा माणूस. धर्म म्हणजे नैतिकता, गुढ मनाचा शोध, सृष्टीक्रमाशी मानवाचे नातेसंबंध, सत्य हेच ईश्वर मानून त्याचे ज्ञान करून घेणे आणि त्याचे अनुकरण करणे, पवित्र बाबींशी संबंधित श्रद्धा व रितीरिवाजाचे ऐक्य, सामाजिक वर्तनाची पद्धत, अनंताचा ध्यास अशा धर्माच्या अनेक व्याख्या करता येतील.

महाभारतानुसार ध्रियते लोकोनेनेति धर्मः। धारणाद् 'धर्ममित्याहुर धर्मो धारयते प्रजाः ।।

अर्थात समाज व प्रजा धारण करण्याचे सामर्थ्य ज्याच्या ठायी आहे तो धर्म, धर्म म्हणजे सहज प्रवृत्ती, उपजत वृत्ती, धर्म म्हणजे अंगभूत गुणविशेष हे सर्व बाहेरून आणता येत नाही ते मानवाच्या स्वभावात, आचरणात असावे लागते. धर्म नावाची ही अशी एक संकल्पना आहे की जिने आजपावेतो जगातील कोट्यावधी लोकांना सुख, शांतता व समाधान दिले. त्यासोबतच धर्मानेच आजपावेतोची सर्वात मोठी मनुष्यहानी केली आहे. विश्व कोणीतरी चालवतो व आपल्यावरील नियंत्रण देवाच्या वा अज्ञात शक्तीच्य हाती आहे, असे आपण समजतो तेंव्हा आपण धर्माला अर्धवट समजून घेतले आहे. जेंव्हा आपल्या सगळ्या प्राथमिक गरजा भागल्या जातात तेंव्हा माणूस स्वतः हा विचार करायल लागतो. जेंव्हा विचार धार्मिक दृष्ट्या होतो तेंव्हा तो अंतर्मुख व्हायला लागतो.

कुठल्याही धर्माला निर्माण व्हायला दोन प्रमुख बाबी महत्वाच्या असतात. एक म्हणजे धर्माचे तत्वज्ञान आणि दुसरे त्या धर्माची दैनंदिनी म्हणजे कर्मकांड नुसत्या कर्मकांडावर आधारित धर्म म्हणजे अंधश्रद्धा तर नुसत्या तत्वज्ञानावर आधारित धर्म म्हणजे वैचारिक बुद्धीभेद वा नुसतेच वैचारिक तत्वज्ञान या तत्वज्ञानाच्या आधारावर आपण आपल्या स्वतः मधील काही गोष्टींना दूर करून माणूस हा त्या सत्याकडे जाऊ शकतो. त्या सत्याचे जेंव्हा ज्ञान होईल तेंव्हा तो ज्ञानी होईल. उदा. देव तुम्हाला दिसला का? त्या प्रश्नांवर उत्तर देतांना रामकृष्णांनी हो सांगितले व पुढे विवेकानंदांना 'आत्मसाक्षात्कार' घडवून आणण्यास मदत केली. हा आत्मसाक्षात्काराकडे जाणारा मार्ग म्हणजे धर्म होय आणि म्हणूनच विवेकानंदाच्या मते सत्य वा आत्मसाक्षात्कारच आहे जो फक्त अनुभूती घेऊनच मिळतो.

वरील धर्माच्या ज्या व्याख्या आहेत किंवा जी उदाहरणे आहेत ते अध्यात्मिक दृष्टीकोन ठेवून केलेल्या आहेत. धर्माची आधुनिक दृष्टीकोनातून पाहिलं तर समाजात सुसुत्रता राखण्यासाठी गरजेतूनही धर्म निर्माण झाला. त्यासाठी विभिन्न नियम व कायदे करण्यात आले.

मानवाच्या पृथ्वीतलावर जन्म झाला तेंव्हा तो आजच्या इतका प्रगत नव्हता. उत्क्रांतीच्या विविध टप्प्यांमध्ये त्याची बुद्धी आणि शरीर रचना यांचा विकास होत गेला. या विविध टप्प्यांचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, टोळी करून राहणारा मनुष्य अतिप्राचिन काळात अश्मयुग ते जवळपास ताम्रपाषाण युगाच्या कालखंडापर्यंत धर्म नावाच्या कुठल्याही व्यवस्थे शिवाय जगत होता. कारण निसर्गाच्या आधारावर जीवन जगणाऱ्या माणसाच्या आयुष्यात धर्मव्यवस्था नावाची व्यवस्था नसली तरीही काहीही फरक पडत नव्हता. मानवाचे नित्याचे व्यवहार, कार्य अखंडीतपणे चालू होते.

याचा अर्थ आपण जन्माला येतोच कुठलेही कतृत्व न करता आपल्याला चिकटतो. तो धर्म वा जात निसर्गात अस्तित्वातच नाही तर एक अनैसर्गिक व्यवस्था आपण पिढ्यान्‌पिढ्या वाहतोय खर म्हणजे धर्माची साधी व्याख्या करायची तर जीवन जगण्याचे, नैतिकतेचे पालन निसर्ग नियमांचे पालन म्हणजे धर्म पण ही व्याख्या आता पूर्णपणे बदलून धर्म म्हणजे कर्मकांड अशी व्याख्या रूढ झाली आहे.

धर्माचे स्त्रोम केव्हापासून सुरू झाले. प्रथमतः समाज अस्तित्वात आला. सामाजिक बंधनांनी अनेक जणांना एकत्र आणले गेली. गावासारखे समाज त्यातून निर्माण झाले. समाजाचे कार्य व्यवस्थित चालवण्यास पोषक नाही तो अधर्म व जो त्यास पोषक आहे तो धर्म तो अधर्म व जो त्यास पोषक आहे तो धर्म ती नितिमत्ता व ते सदाचरण नुसार माणुस वागत होता. पूर्वीच्या मानवाला धर्मव्यवस्था नव्हती पण... जगण्याचे त्याचे काही संकेत नियम नक्कीच ठरलेले असणार हे नियमांचे पालन म्हणजे एकप्रकारे धर्मपालनच असेल पण वैदिक काळापासून हे चित्र बदलले. ऋगवेद काळातील धार्मिक धारणा साध्या व सोप्या होत्या. देवाची साधी पुजा होत होती. बालविवाह प्रथा नव्हती तर विधवा पुर्नविवाहास संमती होती. स्त्रियांना शिक्षणाचा सार्वजनिक सभांमध्य सहभागी होण्याचा अधिकार होता. उत्तरवैदिक काळात मात्र देवाची स्तुती जादुई तंत्रमंत्र असा प्रवास सुरू झाला. मध्ययुगीन कालखंडात ईश्वराने मानवाला निर्माण केले आणि धर्माचीही स्थापना केली. यासारख्या धर्माच्या नावाखाली धारणांसोबतच अनेक अतार्किक संकल्पना रूढ केल्या जाऊ लागल्या. महिलांना वेदांचा अधिकार नाकारणे, जन्मावर आधारित वर्णव्यवस्था प्रचलित करणे इत्यादी



Created by Universal Document Converter

नव्या प्रथांचा उगम झाला. ही सर्व व्यवस्था उच्च वर्गासाठी लाभदायक तर खालच्या वर्गासाठी क्लेशदायक ठरली.

जसा जसा काळ बदलत गेला तस तशा धर्माच्या नावाखाली अनेक रूढी, परंपरा, अनिष्ठ चालीरिती यांचा नव्याने उगम झाला. साधारणत: १७ ते १९ व्या शतकात महिलांवर धर्माच्या नावाखाली होणारे अत्याचार, सती सारख्या प्रथा यामध्ये अधिक वाढ झाली. धर्म मानून चालविलेल्या या अनिष्ठ रिती, परंपरा अनिष्ठ रूढी या सर्वांना बळी पडल्या त्या फक्त महिला, धर्म काय आहे किंवा तो काय शिकवतो? धर्माची नेमकी बाजू कोणती ? ह्या प्रश्नांची उत्तरे आपण शोधली तर वरील इतिहास पाहता असे लक्षात येते की, मानव जेंव्हा सृष्टीवर निर्माण झाला. तेंव्हा मुळात धर्म, जाती, वंश, परंपरा या संकल्पना नव्हत्या. मानवाची निर्मिती झाली आणि त्याने फक्त आपल्या प्राथमिक गरजा समजल्या त्याची पूर्तता करणे हाच त्याचा विचार होता. पुढे मात्र मानवाच्या जीवनात हळूहळू बदल घडून आले. त्याची उत्क्रांती झाली. ते घडून आलेले बदल कदाचित चांगले सुद्धा असतील तर काही वाईट सुद्धा जीवन जगत असतांना मानवाने स्वत:वर काही बंधने किंवा काही नियम जे त्याच्या दृष्टीने योग्य असतील असे काही नियम ती बंधने त्याने स्वत:साठी निर्माण केली. पण मुळात धर्म ही संकल्पना नव्हतीच. याच नियमांचे पुढे एकत्रीकरण होऊन धर्म ही संकल्पना उदयाला आली. त्यानंतर जाती निर्माण झाल्या आणि हळूहळू माणसाने एकत्र राहत समाजाचे विभाजन धर्म, जात, वंश यांमध्ये केले. काळ अजून पुढे गेला. मानव हा काही अंशत: बदलला तसेच त्याचे विचारही बदलले पण दुर्दैवाने इतिहासात रूढ झालेली 'धर्म' या संकल्पनेला आजवर कुठेच तोड मिळाली नाही.

इतिहासातप्रमाणे आज २१ व्या शतकात जर आपण पाहिलं तर धर्माच्या नावाखाली स्त्रीयांना आजसुद्धा भोगवं लागत आहे. आजची परिस्थिती पाहता एखाद्या स्त्रीवर अत्याचार होतो, बलात्काराची अनेक प्रकरणे समोर येतात. मग हे अनिष्ठ कृत्य करणे किंवा एखाद्या माणसाने असे क्रुर आचरण ठेवणे असे एखाद्या धर्मात सांगत नाही किंवा असे एखाद्या धर्म ग्रंथात लिहून ठेवले नाही. तसेच आज जात, धर्म यांच्या नावाखाली राजकारण करणे हा उच्च जातीचा तो खालच्या जातीचा असे म्हणून जातीभेद करणे हा आपल्या धर्माच नाही, म्हणून एखाद्याला जीवेनिशी मारणे, धर्माच्या नावाखाली समाजात, गावात, शहरात, ठिकठिकाणी दंगल घडवून आणणे, विशिष्ट जातीच्या लोकांचे शोषण करणं त्यांना हिणवणं, माणसाने माणूसकी सोडून वागणं या सर्व आणि अजुन अशा कितीतरी अनेक गोष्टी आहेत. ज्या कोणत्याही धर्मात उल्लेखीत नाही किंवा विशिष्ट धर्म तसेच आचरण करायला शिकवतही नाही. पण तरीही हे लोक माणूसकी विसरून पशू बनतात. जर ईश्वराने धर्म आणि मानवालाही निर्माण केलं असत, तर त्याने इतके धर्म का निर्माण केले असते. आणि जरी निर्माण केले तर एकाच धर्माच्या अनेक जाती का निर्माण केल्या? ईश्वरासाठी सर्व समान असलेल्या मानवाची जगभरात धर्माची विधी आणि पुजनाची प्रथा वेगळी नसती.

२१ व्या शतकात धर्माच्या नावाखाली काय जगभरात थैमान चाललयं? धर्म कशासाठी ? धर्म मानवासाठी की मानव धर्मासाठी? धर्म निरपेक्षता काय? हे समजून घेण्याची गरज आज निर्माण झाली आहे. लोकशाही सत्तेवर अप्रत्यक्षपणे धर्माचा प्रभाव दिसून येतो. धर्म, वंश, जात यावर आधारित राजकारण केले जात आहे.

धर्म काय शिकवतो तर धर्म सत्याच्या किंवा जे योग्य आहे त्या वाटेवर चालायला शिवतो. कोणताही धर्म माणसाच्या अनैतिक विचारांना ज्यामुळे माणूस माणसाचे अहित करतो किंवा मानवाच्या वाईट प्रवृत्तीला कधीच प्रोत्साहन देत नाही. आज धर्म या शब्दाचा समावेश असलेली तत्सम बिरूदे लावून घेऊन काही स्वयंघोषित नेते लोकांचा मानसिक गोंधळ वाढवतांना दिसतात. त्यांचे वा त्यांच्या संघटनेचे अनेकदा होत असलेले धर्मविरोध, झुंडशाहीचे आणि गुन्हेगारीचे हे वर्तन पाहुन हाच धर्म असतो का? असा काहींचा समज निर्माण होतो आणि जनतेचा धर्माकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा अर्थातच बदलत चाललेला आहे.

आज २१ व्या शतकात धर्माचे स्थान मानवाने फक्त त्याच्या स्वार्थासाठी म्हणून उपभोगले आहे. धर्माच्या काही सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही बाजू आहेत. पण आजच्या शतकात मानवाने धर्माला नकारात्मक बाजूचे स्थान दिले आहे. मानवाने धर्माकडे आजच्या काळात सकारात्मक वृत्तीने पाहिले तर आज धर्माचे स्थान मानवी जीवनाला नक्कीच मार्गदर्शन करणारे ठरेल.



Created by Universal Document Converter

# 'कोविड १९ महामारीचे मानवी जीवनावरील परिणाम'

कु.वासनकर भाग्यश्री रविंद्र
एस.वाय.बी.एस्सी.

आपण सर्वजण कोरोनाच्या दहशतीत जगतोय. मागील एक ते दोन वर्षापासून कोरोनाने थैमान घातलाय दिवसागणित वाढत जाणाऱ्या आकडेवारीनं काळजात धस्स होतंय अनेकांनी आपली जीवलग माणसं गमावली अनेकांची जीवलग कोरोनाशी झुंज देत आहेत.

मात्र या भयाण आणि तणावपूर्ण वातावरणातही अनेकांनी काही गोष्टी नव्या शिकल्या, आपल्याला काही नव्या सवयी जडल्या तर काही सवयी लावून घ्याव्या लागल्या. कोरोनान सकारात्मक आणि नकारात्मक आपल्या सर्वांच्याच आयुष्यात प्रचंड बदल घडवले. 'कोरोना नामक विषाणू संपूर्ण मानव जातीवर राज्य करीत आहे. त्याने आम्हाला बरेच काही शिकविले आहे. आम्ही या काळात सर्व गोष्टी आचरणात आणल्या' मागील वर्षापूर्वी कोरोनाची साथ आली आणि त्यामुळे सक्तिने लॉकडाऊन झाला. अत्यंत तातडीच्या सेवां व्यतिरिक्त सगळ बंद झाल कोणाकडे जायचं नाही, यायचं नाही, कुणाशी हात मिळवायचा नाही. थोडक्यात काय तर स्वत: ला घरात बंदिस्त करून घ्यायचं. संपूर्ण जग स्तब्ध झाल्यासारखं वाटत होतं. विनाकारण केल्या जाणाऱ्या खर्चाला खीळ बसली आणि सगळ्यात महत्वाच म्हणजे कमी पैशातही घर चालवता येऊ शकतं हा धडा या कोरोनामुळे मिळाला.

या काळात प्रत्येकाला बरे-वाईट अनुभव आले. कोरोनाने लोकांना बरेचं दिवस घरात बंदिस्त करून ठेवलं. लोकांनी एकत्र कुटुंबातील सर्वच सदस्यांसोबत राहुन तणावमुक्त आनंदी जीवनाचा अनुभव घेतला. लॉकडाऊनच्या काळात लोकांना कुटुंबातील सदस्यांनी कोणत्याही परिस्थितीत एकत्र असावं, याची जाणीव झाली या काळात आम्हाला एकत्र असण्याचा खूप फायदा झाला. त्यामुळे बंदीच्या काळातही कशाचीच कमतरता भासली नाही. याउलट आपलं स्वतःच घर सोडून रोजगारासाठी दूर शहरात राहणाऱ्या लोकांनी अनेक समस्यांना तोंड घ्यावे लागलं मदतीला येईल असं कोणीही जवळचा माणूस नाही. त्यामुळे एकटेपणा जास्त जाणवला या लाकडाऊनमध्ये आम्ही पुस्तक वाचली, नियमितपणे केलेल्या वाचनामुळे ज्ञानात भर पडली. शिवाय पुस्तकांसोबत वेळ कसा गेला ते कळलंच नाही. 'कोरोनाने' गरीब- श्रीमंत, काळा - गोरा अशा प्रत्येकाला स्वच्छता आणि निरोगी जीवन कसं जगायचं हे शिकविलं.

''कोरोना'' सारख्या अशुभ काळात आपण काही चांगल्या सवयी अंगीकारल्या सार्वजनिक ठिकाणी मुखपट्ट्या' (मास्क) वापरत राहुन वारंवार हात धूवत राहणेच उत्तम खोकण्याचा स्वच्छ सवयी सांभाळणेच बरे...

''धो लो हाथ कुछ भी खाने से पहले
ताकि जिंदगी से हाथ न धोना पडे...''

अशी सवय लागली असेल तर तोही एक फायदाच म्हणायचा कोरोनाने या अशुभ काळात मानवास खुप काही शिकवण दिली. आपण आयुष्यभर कोणत्या न कोणत्या कारणामुळे नाराज होते, नाखूष होतो आणि चिडचिडही करतो. मात्र ही कोरोनाची महामारी सुरु झाली आणि आपण किती बदलत गेलो ज्या ज्या गोष्टी गृहीत धरल्या त्यांची किंमत आज कळायला लागली. आधी जे आयुष्य बिनकामाचे किंवा बेकार वाटायचे तेच अचानक सुंदर वाटायला लागलं. पर्यावरण वाचवणारे तीन R (Reduce, Reuse, Recycle) आपल्या जीवनाचा भाग खऱ्या अर्थाने होऊ लागले. किती तरी लहान- लहान बाबतीत आपण समाधान मानायला लागलोय. इतकेच काय तर भव्यदिव्य लग्न सोहळा होऊनही कोणीतरी असमाधानी असेल स्वच्छता काळजी आणि दया या हरवलेल्या गोष्टी' पुन्हा अंगीकरायला लागलोय.

कोरोनाने दाखवून दिली माणसाला मर्यादा
दाखवून दिली निसर्गाची ताकद
दाखवून दिली कौटुंबिक जिव्हाळा
आणि माणसाला माणसाची किंमत
पुसुन टाकला भेद, मग तो गरिब असो की श्रीमंत
अगोदर प्राणी होते पिंजऱ्यात आणि माणसे रस्त्यात
आता प्राणी रस्त्यावर आणि माणसे घरात
प्रत्येकाचा कसा लागतोय जीवन जगण्यात
आता तरी अग्रेसर होऊ निसर्गाचा समतोल राखण्यात.

कोरोनाने आपल्याला काय शिकवले ??? आपण जिवंत आहे ही सुद्धा आनंदाचीच गोष्ट आहे... आणि हा आनंद साजरा करायला शँपेन नसली तरी लिंबू सरबत तरी नक्कीच असेल... काय नाहीये त्यापेक्षा काय आहे हे बघुयात हेच आपल्या आयुष्याची दिशा बदलणार आहे...! कोरोनाच्या ह्या बिकट प्रसंगी सुद्धा जगायला शिकूयात कारण आयुष्य क्षणभंगुर असेल तरी खुप सुंदर आहे !! आनंद आयुष्यातून गेल्यावर आता आपण त्याची किंमत समजून घेतली आहे... मात्र ते दिवस पुन्हा कधी येतील हे आता परमेश्वरच जाणे... त्यामुळे सध्या जे समोर आहे. हातून निसटून जाऊ द्यायचे नाही अशा परिस्थितीत मानवाला आपल्या ज्या बुद्धीवर गर्व आहे, ती देखील यापुढे निष्प्रभ झाली आहे. आज मुक्तपणे तो चार भिंतींच्या पलीकडे श्वास घेऊ शकत नाही. मानवाच्या स्वप्नांचे नव्हे; हे तर अहंकाराचे पंख छाटले गेले पण, खरंच ''कोरोना'' ने आम्हाला काय दिले ?

जसे नाण्याला दोन बाजू असतात. त्याचप्रमाण प्रत्येक गोष्टीला चांगले आणि वाईट दोन परिणाम असतातच सकारात्मक गोष्टीचा विचार केला तर आम्ही कुटुंबासाठी वेळ द्यायला शिकलो. कामानिमित्त बाहेर राहणारे आम्ही एकमेकांसाठी वेळ देऊ शकत नव्हतो. आता एकमेकांच्या जवळ आलो. घरातील मुलांसोबत लहान होऊन खेळू लागलो, घरातील लोकांच्या आवडी निवडी समजायला लागल्या. प्रत्येक व्यक्तीच्या अंगी कुठली ना कुठली कला असतेच या 'लॉकडाऊनच्या काळात आपल्यातील कलेला



Created by Universal Document Converter

वाव मिळाला. कला जोपासू लागलो, कलेच्या माध्यमातून नवनिर्मिती केली. घरातील महिला व पुरुष दोघेही बाहेर मिळणारे नवनवीन पदार्थ शिकवू बनवू लागले. त्यामुळे त्यांच्यातील पाककला बहरू लागली. शहरी जीवनाची आवड. क्रेझ आमची क्षणार्धात कमी झाली. 'आपला गाव खरा 'गडया ' असे म्हणू लागले. गांधीर्जीनी खेड्यांकडे चला' हा संदेश एकेकाळी दिला होता, तो गरजेचा वाटू लागला व अनेकांनी तो अंमलात आणला हॉटेलिंग बंद झाले. त्यामुळे सहाजिकच जिभेचे चोचले पुरविणाऱ्या खर्चावर नियंत्रण आले. बाहेरचे पदार्थ खाल्याने होणारे आजार बंद झाले. त्यामुळे डॉक्टारांकडे दवाखान्यात होणारा खर्च ही वाचला घरातील उपलब्ध साधनसामग्रीवरही जगता येते याची जाणीव झाली... अनावश्यक खरेदीवर आळा बसला. कोरोनाकाळात आपण घेतलेले काही धडे आयुष्यभर विसरणार नाही. आपल्या आयुष्यात खुप अपेक्षांच्या आपण ओझ्याखाली दाबून टाकलेले आहेत. वर्तमानात जगा स्वप्न नक्की बघा... भविष्य काळाची थोडीफार तरतूद करा मात्र हे सगळ करत असतांना आपल्या वर्तमानाचा चूरडा होतो. अनेक अडचर्नीना तोंड दयावे लागत नाही. ज्ञानाची, जोक्सची, पदार्थाची, देवाण - घेवाण नाही. सगळेच दूरावले. पण आत्ताच्या घडीला समोर काय आहे ते ही पाहा... त्याचाही आनंद घ्या... फक्त भविष्यकाळाच्या मागे लागून आयुष्यातला गोष्टीचा सतत आस्वाद 'आज गमावू नका, घ्यायला शिका प्रत्येक बदलत राहते... जे आज आहे ते उदया कारण वेळ असेलच अस नाही. त्यामुळे जे आज आहे ते ही अनुभवा आनंदाच्या वेळी सगळ्याची एक रिऍक्शन असते... आनंद मस्त साजरा करायचा... पण आताच्या या महामारीने सगळेच जग बदलून टाकले आहे. आनंद सहजासहजी मिळवणे खूपच अवघड झाले आहे.

''यू मायूस ना हो
जिन्दगी से प्यारे,
ये बुरा वक्त भी
महज़ कुछ दिन की बात है ।''

स्वातंत्र्य : आधी आपल्याला कुठेही फिरायची मुभा होती. कधीही मनात आले की घराबाहेर पडून आपण कुठेही जाऊ शकत होतो. आपल्या आयुष्याला आपण हवे तसे जगत होते... माणूस म्हणून जगायचे नियम पाळले तर आपण जणू एक 'स्वतंत्र्य' पक्षी होतो. पण आता हया कोरोनापासून स्वतःला वाचवायला मात्र आपल्याला स्वतःच्याच घरात कोंडून बसायला लागत आहे. जणू आयुष्य मना प्रमाणे जगायचे स्वातंर्त्य आता कोणीतरी हिरावून घेतले आहे...

सुखसोई : घरातल्या सुखसोई आणि आराम जरी भरपूर मिळत असला तरी आता घराबाहेरच्या सुखसोईना आपण मुकलो आहे. स्वयंपाकाचा कितीही कंटाळा आला तरी बाहेरून जेवण मागावायची - सोय राहिली नाही. आपण सगळे नक्कीच हे करतोय.

विविधता : नव्हता आपल्या आयुष्याला आधी एकसुरीपणा खूप विविधता आपल्या जीवनात होती. आता मात्र ऑनलाईन भाज्या मागवणे, धान्य मागवणे हे नखरे न करता स्वीकारले आहे. जे आहे त्यातच आपली हौस भागवायला लागत आहे. कसलेही स्वतःचे निवड स्वातंत्र्य नाही, कसली विविधता नाही... आयुष्य कसे एकसूरी झाले आहे...

माणसांशी असलेले संवाद : आपल्या नातेवाईकांना भेटणे, मित्रमंडळीसोबत , मिळणे, फॅमिली सोबत फिरायला जाणे हयातून सगळ्यांशी संवाद साधणे हे देखील दोन वर्षात आपण करू शकलो नाही. कलिंग्स ना भेटताही येत नाही. ह्या गोष्टीमुळे उदास व्हावे ते ही समजेनासे झाले आहे... सगळे वर्चुअल संवाद सुरु आहे, समोरा समोर येणे जाणे अशक्य झाले आहे...

घराबाहेरची मौजमजा : कधी नाटक - सिनेमा बघायला जायचो आपण... ते तर आता स्वप्नात झाले आहे...

''पहुंच गई है गिनती हजारो में,इसे लाख मत होने दो।
रूक जाओ अपने घरो में, वतन की राख मत होने दो''

कसलीही मौज उरली नाही. आयुष्यातून मनोरंजन सुद्धा हद्दपार झाले आहे...

अर्थव्यवस्था : समाजातले सगळेच घटक कसे देशाच्या व्यवस्थेला हातभार लावत होती. कामवाली बाई आणि कष्टकरी मजूर यांची निकड भासत आहे. आपले घरातले कामे सुद्धा यांच्या मुळे खोळंबले आहे... आपण सगळेच आर्थिक आणि भावनिक दृष्ट्या एकमेकांवर अवलंबून आहोत याची आज जाणिव होत आहे. आयुष्याकडे बघायचा दृष्टीकोन कसा बदलता चाललय.

''कोरोना को हम भागकर रहेंगे,जिंदगियों की हम कर रहेंगे,
वक्त बुरा हो सकता है,जिंदगी नहीं यारी ।

कोरोनाने आपल्याला काय शिकवले ?

कोरोनाने जगण्याचा नवा मंत्र दिला : कोरोनाकडून खूप साऱ्या संकटांना तोंड दयावे लागले. मात्र या कोरोनाने मला भरपूर, गोष्टी शिकवल्या. मुंबईत जगण्यासाठी लागणारे कौशल्य माहीत पडले. कठीण प्रसंगांना तोंड देण्याचा आत्मविश्वास निर्माण झाला. तसेच एक गोष्ट माहित पडली की नोकरी कायमस्वरूपी नाही, ती आज आहे उदया नाही, मात्र स्वतःचा व्यवसाय असेल तर आपण मुंबईसारख्या शहरात जगू शकतो. कोरोनामुळे मास्क वापरणे किती महत्त्वाचे ते समजले. मास्कमुळे आपण प्रदूषणापासून वाचू शकतो. आजपर्यत आपण रोगप्रतिकारक शक्ति वाढवण्यावर भर दिला. या कठीण काळात पैशांची बचत कशी करावी हे शिकलो. स्वतःच्या गरजे प्रमाणे पैसे खर्च करावेत. हे देखील कोरोनाने शिकवले नाते, संबंध जपत स्वतःच्या कुटुंबासोबत वेळ घालवण्यातला आनंद देऊन जगण्याचा मंत्र दिला.

कोरोनाने आत्मनिर्भर व्हायला शिकवले :

कोरोनाने केवळ शिकवलेय नाही तर तसे वागायला भाग पाडले. स्वच्छता, संयम, सहनशीलता, माणुसकी, आर्थिकदृष्ट्या दूरदृष्टी ठेवून नियोजन कसं करायच ते शिकवल खरंच 'कोरोनाने' केवळ न भूतो न भविष्यती' अशी अनुभूती दिली. या संकटामुळे क्षणार्धात जनजीवन एखाद्याने 'स्टेच्यू' म्हणावं आणि समोरच्याने जिथल्या तिथ थांबाव तस थांबल. कोरोनाच्या काळात कोणत्याही धर्माचा देव, बाबा, बुवा कामाला आला नाही. 'निसर्ग हाच खरा धर्म, हाच खरा देव' हे माणसांन लक्षात ठेवाव. हाल्ली रोगप्रतिकारक शक्ती हीच आपली खरी ताकद आहे. तिला बळकटी द्यवी. ''जिवंत राहणे हिच प्राथमिकता आहे'' हे या काळात कोरोनाने शिकवल. आयुष्याचे नवीन पदर याच काळात उलगडले. कोरानानं लहान-मोठा, श्रीमंत - गरीब हे भेदभाव संपवले. आपण मनुष्य आहोत हे बिंबवले. ''कोरोनाने कुटुंबाच महत्व दाखवून दिल. आपण पैशाच्या मागे धावत होती. पण या काळात लोक जवळ



Created by Universal Document Converter

आले.'' या कोरोनामुळे फक्त पैसाच महत्वाचा नसून माणुसकीचही तेवढीच महत्वाची आहे हे समजल.

''कोरोनानन तीन गोष्टी शिकवल्या पहिली म्हणजे कठीण परिस्थितीत जगायला शिकवल. दुसरी म्हणजे, नुसत पळत राहण्यापेक्षा थांबून सुख शोधायला शिकवलं आणि तिसरी म्हणजे,'' निसर्गाचा आदर करायला शिकवलं.''

कोरोनामुळे शिक्षण क्षेत्रावर पण खुपच परिणाम झाला. माणसाच्या मुलभूत गरजांपैकी शिक्षण ही एक मुलभूत गरज आहे. २१ व्या शतकात शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही. कोरोना विषाणूचा सर्वात जास्त परिणाम याच शिक्षण क्षेत्रावर झालेला पहायला मिळते. त्या अनुषंगाने राज्य शासनाकडे शाळा बंद पण शिक्षण सुरू ही मोहिम हाती घेण्यात आली. त्या अंतर्गत विद्यार्थ्यांना ऑनलाईत शिक्षण देण्याचे धोरण आखण्यात आले. खाजगी शाळेतील विद्यार्थी मात्रऑनलाईन शिक्षणासाठी वंचित राहात असल्याचे दिसून आले आहे. व ग्रामीण भागातील अशिक्षित पालक आपल्या मुलांना शिकवण्यात असमर्थ ठरत आहेत. अशाप्रकारे कोरोना आणि लॉफडाऊनमुळे शिक्षण व्यवस्थेचा खेळ खंडोबा झाला आहे.

बितता वक्त खुद को खुद से मिलवा रहा है,
ये हर पल अपने वजूद होने का अहसास दिला रहा है,
कुछ चंद चीजो में भी जीवन गुजर सकता है,
ये यकिन दिला रहा है,बितता वक्तखुद की खुद से
मिलवा रहा है''

# जागरूक मतदार राष्ट्राचा विकास

कु.सोनल योगेश पाटील
प्रथम वर्ष कला

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने लोकशाही व्यवस्था स्वीकारली आणि भारत हा सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था असलेला देश बनला. लोकांनी लोकांसाठी निवडून दिलेल्या प्रतिनिधींमार्फत या देशाची लोकांसाठी निवडून दिलेल्या प्रतिनिधींमार्फत या देशाची शासन व्यवस्था आजतागायत चालविली जात आहे. देशाला विकासाच्या, समृद्धीच्या वाटेवर प्रगतीपथाकडे नेता यावे यासाठी जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी राज्याचा कारभार चालविण्यासाठी सक्षम असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मतदारांनी निर्भयपणे तसेच विचारपूर्वक आपला प्रतिनिधी निवडून देणे हे त्यापेक्षाही गरजेचे झाले आहे.

निवडणुक हा लोकशाही प्रक्रियेचा कणा आहे. भारतात स्थानिक स्तरापासून ते राष्ट्रीय स्तरापर्यंत सर्व प्रतिनिधी हे निवडणुक प्रक्रीयेद्वारे निवडले जातात. विशेषत: निवडणुकीमध्ये स्थानिक समस्यांची निवडणुक करण्यासाठी मतपेटीच्या माध्यमातून योग्य प्रतिनिधीची निवड तितकीच आवश्यक असते. विकासाचे नियोजन आणि सामाजिक विकास हा योग्य प्रतिनिधींच्या निवडीवर अवलंबून असतो. म्हणून मुक्त आणि निर्भय वातावरणात मतदारांना मतदान करण्याची संधी मिळायला पाहिजे. भारतीय लोकशाही गणराज्यात प्रत्येक भारतीय नागरीकाला सार्वजनिक तथा पोट निवडणुकीत मतदानाचा मुलभूत हक्क बहाल केलेला आहे. त्यामुळे मतदार यादीत नाव नोंदवून मतदानाचे कर्तव्य पार पाडून लोकशाही बळकट करण्याचा वाटा उचलण्याची संधी प्रत्येक भारतीय नागरीकाला आहे.

राज्य आणि राष्ट्राच्या विकासाची चावी निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या उमेदवारांच्या हातात नसून ती चावी मतदारांच्या हातात आहे. जागृत मतदार हा सुदृढ व निकष लोकशाहीचा आधार आहे. देशाला बदलण्याची तसेच आपला व राष्ट्राचा विकास करण्याची चावी आपल्या हातामध्ये असूनही आज मात्र जनता या चावीचा उपयोग करायला ती लावायला विसरली आहे. आपले हित सर्वस्वी आपल्या एका मतावर निर्भर आहे. आजच्या काळात अशी परिस्थिती बनली आहे की एक गोष्ट नोट मिळाली तर मतदार भ्रष्टाचारी, गुंड, सरकारी तिजोरीची लुट करणारा, व्याभिचारी उमेदवाराला आपले अमुल्य मत देतो आणि देशाचा कारभार हा वाईट माणसांच्या हाती सोपवण्यात येतो. त्यामुळे विधानसभा व लोकसभे सारख्या पवित्र मंदिरामध्ये कलंकित व भ्रष्टाचारी उमेदवार निवडून दिले जातात. हे लोकराज्य, देश आणि सामान्य जनतेचे भविष्य काय घडवणार?

लोकशाही म्हणजे जबाबदार शासन पद्धतीने पण दुदैवाने जबाबदारपणा कुठेच दिसत नाही ही जबाबदारीची जाणीव केवळ सामान्य जनतेलाच नव्हे तर देशाचा व स्थानिक संस्थांचा कारभार चालविण्यासाठी निर्धारलेल्या राजकीय कार्यकर्त्यांनाही असलेली दिसत नाही. देशाचा कारभार चालविणारा प्रतिनिधी हा त्याच्या शैक्षणिक गुणवत्तेच्या आधारावर न निवडता पैसे मोजून किंवा भ्रष्टाचारी पद्धतीने निवडला जातो. उमेदवार पैशांच्या जोरावर आपली सत्ता स्थापन करतांना दिसत आहे. आणि हिच आपल्या देशहितासाठी असलेली मोठी शोकांतिका आहे.

आज मात्र हे सर्व कुठेतरी बदलायला पाहिजे. देश व राष्ट्रहित साध्य करण्यासाठी देशाला विकासाच्या सर्वोच्च शिखराकडे नेण्यासाठी आजचा नवतरूण वर्ग प्रयत्नशील दिसून येतो. प्रौढ तसेच तरूण वर्गाला आपल्या एका मताची किंमत काय आहे, या एका मताची ताकद कुठपर्यंत आहे हे जाणीवपूर्वक विचार करावयाची वेळ आली आहे. लोकशाही उभारणी फक्त एक जागरूक मतदारच करू शकतो आणि ही उभारणी लोकशाहीवर श्रद्धा असणाऱ्या व जनतेच्या जागृत आणि संघटीत शक्तीच्या आधारे झाली पाहिजे. आजचे प्रौढ व्यक्ती आणि तरूण वर्ग यांनी जर आपला प्रतिनिधी जाणीवपूर्वक निवडला तर या देशाला विकास आणि आपले राष्ट्रहित निश्चितच साध्य करता येणार आहे? आता इतरांना त्याचप्रमाणे स्वत:ला मतदानाबद्दल जागरूत तसेच आपण या देशाचे एक जागरूक मतदार आहोत हे सिद्ध करण्याची वेळ आली आहे. भ्रष्टाचारमुक्त निवडणुकीमार्फत निवडून दिलेला प्रतिनिधीच हा आपल्या देशाचे भवितव्य ठरवणार आहे. आणि राष्ट्र हे प्रगतीपथाकडे वेगाने वळेल. म्हणूनच आजचा जागरूक मतदार हाच असेल लोकशाहीचा आधार...



Created by Universal Document Converter

# कोविड १९ महामारीने काय शिकवले?

कु.बारी रितिका संजय
द्वितीय वर्ष कला

कोरोना व्हायरस हा अतिसुक्ष्म व घातक विषाणू आहे. या व्हायरसला कोविड-१९ ही म्हटले जाते. हा व्हायरस सर्वप्रथम डिसेंबर २०१९ मध्ये चीनमधील वुहान या शहरात आढळून आला होता.जागतिक आरोग्य संघटना (डब्ल्यू.एच.ओ.) ने या व्हायरसला महामारी म्हणून घोषित केले आहे. हा संसर्गजन्य रोग असल्याने याचा प्रसार जगभरातील जवळपास १८० पेक्षा अधिक देशांमध्ये वेगाने पसरला आहे.

कोरोना व्हायरसने जगामध्ये सर्वत्र धुमाकुळ घातला आहे. मनुष्याने आतापर्यंत अनेक रोगांचा सामना केला आहे. पण आज संपूर्ण जगभरात एका अशा व्हायरसने थैमान घातलंय कि ज्यामुळे संपूर्ण दुनियेची झोप उडाली आहे. लोकांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ज्यामुळे सर्वांचे जीवन जगणे कठीण बनले आहे.

''चीन मधुन आलेली ही स्वारी
जगासाठी ठरली सगळ्यात मोठी महामारी
खबरदारी घेणे हिच आपली जबाबदारी''

या विषाणूला नष्ट कोणीही करू शकत नाही.

जगातील सर्वात मोठ्या महामारीचे रूप घेतले आहे. अमेरीका सारख्या महासत्ता देश ही कोरोना पुढे हतबल झाला आहे. आजपर्यंत तो जगाच्या कान्याकोपऱ्यातपर्यंत पोहचला व जागतिक महामारीचे रूप घेतले. या आजाराच्या सामान्य लक्षणांमध्ये उच्चताप, सर्दी, खोकला आणि श्वास घेण्यात अडथळा यांचा समावेश आहे. प्रचंड थकवाही जाणवतो. लागण झाल्यापासून लक्षणे दिसण्याचा कालावधी दोन ते चौदा दिवसापर्यंत असू शकतो. हा आजार बहुतेक लोकांमध्य अगदी सौम्य असतो. तर अगदी अल्प प्रमाणात घातक ठरू शकतो.

हा विषाणू प्रामुख्याने जवळच्या संपर्कामुळे पसरतो. खोकल्यामुळे, शिकल्यामुळे किंवा बोलतांना आपल्या थुंकीतून कोरोना पसरतो. या विषाणूपासून स्वत:ला दूर ठेवण्यासाठी वारंवार हात धुतले पाहिजे. मास्कचा वापर केला पाहिजे. गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळले पाहिजे. अत्यावश्यक असेल तरच घराच्या बाहेर पडले पाहिजे.

सरकारने कोरोनाला आटोक्यात आणण्यासाठी लॉकडाऊन म्हणजेच बंद ठेवला आहे. या कोरोनामुळे अनेक माणसे मारली गेली. रोजगार बंद झाले. व्यवसाय बंद पडले. शिक्षणव्यवस्था, पर्यटन, चित्रपटसृष्टी, कृषीव्यवस्था यांच्यावर विपरीत परिणाम झाले. अनेक देशांच्या अर्थव्यवस्थाही मंदावल्या एकंदरीतच जनजीवन विस्कळीत झाले.

''काय सांगू कोरोनाबद्दलचा अनुभव माझा,
हिरावली त्याने कॉलेजची शिकण्याची मज्जा
घरात बसून राहायची दिली आम्हा सजा
बस झाले आता कोरोना आतातरी जा!''

माझे बारावीचे पेपर संपलेच होते. दहावीच्या शेवटचा पेपर होता. त्यात माझ्या मैत्रीणीच एक दिवसा अगोदरच म्हणजे १८ मार्चला लग्न झाले होते. आणि २० मार्चला लॉकडाऊन लागलेलं होतं. त्यमुळे पेपर संपण्याची मज्जा व कोठे नवीन गावाला जाणयाची उत्सुकता मला खुप होती. शाळेला बाय बाय म्हटल्यानंतर कॉलेजची मज्जा यांची खुप नवलाई वाटत होती. आतापर्यंत डिसिप्लीन मध्ये राहीलेली होती. शाळेचे सोडून माझ्यासाठी जगायच होतं. नवीन जग पाहायच होत. आम्ही गड-किल्ले पाहण्यासाठी जावू अस ठरवल होत. परंतु ते तर राहिल मध्येच ही कोविड-१९ ची महामारी आली जी कोणालाच सोडत नव्हती. त्यामुळे घरात राहणे हाच एक मार्ग होता व केंद्र सरकारने पण लॉकडाऊन लावले. हे गरजेचे होतेच पण त्यामुळे पूर्ण भारत हा 'स्टॅच्यू' म्हणजे एकाच जागेवर थांबला.

'कोरोनामुळे तुम्हा सर्वांना सुट्टी' असं एकल्यावर खूप आनंद झाला होता. माझ्या भावाचा तर १० वीचा भुगोलचा पेपरच रद्द झाला. आणि सर्वात महत्वाच माझ्या लहान बहिणीचे आठवीचे पेपर येणार होते. त्यांना आपल्याला पेपर द्यावे लागणार नाही म्हणून आकाशाला आपण टेकलो, असा आनंद झाला होता. कोरोना...

महाराष्ट्रात कोरोनाचे रूग्ण आढळल्याने व नंतर त्यात वाढ झाल्याने प्रतिबंधात्मक उपाय म्हणून राज्य सरकारने, २२ मार्च रोजी आपल्या देशांचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांनी 'जनता कर्फ्यू' व त्यानंतर २५ मार्च रोजी 'लॉकडाऊन' जाहीर कले. कोरोना विषाणू संक्रमित असलेल्या व्यक्तिच्या (कोरोनारूग्णाच्या) संपर्कात एखादी व्यक्ती आल्यास कोरानाचा प्रसार वेगाने होतो, त्यामुळे या कोरोनाची साखळी तोडणे व कोरोनावर नियंत्रण मिळवणे यासाठी लॉकडाऊन जाहीर करण्यात आला.

कोरोनामुळे मनात भीती निर्माण झाली होती. त्यात त्या दररोजच्या टी.व्ही.वरच्या बातम्या ऐकूण पाहून तर खूपच घाबरली होती. आणि तो पुणे-मुंबई महाराष्ट्रात देखील दाखल झाला होता. आपल्या शेजारी असलेले राज्य मध्यप्रदेशाच्या बऱ्हाणपूर मध्य पहिला जेंव्हा कोविड-१९ चा साखळी तोडणे व कोरोनावर नियंत्रण मिळवणे यासाठी लॉकडाऊन जाहीर करण्यात आला.

आपल्या शेजारी असलेल राज्य मध्यप्रदेशाच्या बुऱ्हाणपूर मध्ये पहिला जेंव्हा कोविड-१९ चा संशयीत व्यक्ती सापडला तेंव्हा पासून आम्ही जरा जास्तच काळजी घ्यायला लागले होती. तो विषाणू आमच्या जवळच्या गावात आला होता. ते राज्य दुसरे होते



Created by Universal Document Converter

पण रावेरच्या अगदी जवळ होते. त्यामुळे तो आपल्या गावात येवून जाईल यांचीही भिती होती. आणि तसेच झाले सुद्धा. पहिला कोरोनाचा व्यक्ती हा आमच्या गावात म्हणजे रावेरमध्ये आलाच तर आला परंतु आमच्याच वाड्यातून राजे शिवाजी चौकात पोलीसांच्या गाड्या, अॅम्ब्युलन्स मधले ते आकाशी कपडले घातलेले ते लोक ते लोक केसांपासून ते पायाच्या नखापर्यंत सर्व झाकलेले, त्यांच्या सर्व घराला ते लोक कोविड रूग्णालायात घेऊन गेले. आम्ही त्यावेळेस खुप घाबरले होतो. म्हणतात 'जिव हातात येणे' तसं झाल होत आमचं.

रावेरच्या बातम्या सर्व पेपरात, परंतु आमच्या गावाच्या नगरपालिकेच्या गाडीने सगळीकडे सॅनिटाईझरने निर्जुंतुकी करणासाठी फवारणी केली गेली. घरोघरी मास्कचे वाटप करण्यात आले. वाड्यात कोणालाही दहा दिवस येण्याची परवानगी नव्हती. सगळा वाडा सिंल केली गेली. घरोघरी मास्कचे वाटप करण्यात आले. गावात सगळीकडे जनजागृती करण्यात येत होती. आमच्या गावातील सर्वजण कोरोनाविरूद्धची ही लढाई जिंकण्यासाठी स्वत:ला सैनिक समजून लढू लागले, म्हणजेच शासन निर्देशांचे तंतोतंत पालन करू लागले. योग्य ती खबरदारी घेऊ लागले.

यासाठी सर्वात मोठा मुलमंत्र आम्ही पाळला, 'घरी रहा, सुरक्षित रहा!'

या काळात माणुसच माणसाचा शत्रू होता. आतापर्यंत माणूस लोभ, मत्सर आणि अनेक अशा विकाराने भरले होते. गरीब-श्रीमंत, उच्च-निच्च, काळा-गोरा, ब्राह्मण - क्षत्रिय असे भेद करत होते. या विषाणूने माणसातला हा भेद ही पाळला नाही. सर्वां समान मानून त्याचा विनाश केला. ज्या व्यक्तीला हा विषाणू लागला त्या व्यक्तिला कोणीही लागत नसे म्हणजे त्यांच्या जवळही जात नसे. अस झाल होत. लोक पहिले म्हणजे ''आजार फक्त गरीबांनाच होतात श्रीमंताकडे एवढे पैसे असतात त्यांना आजार झाला. तरी ते वाचू शकतात'' परंतु या आजाराने हा ही भेद केला नाही. आमच्या गावातीलच माजी आमदार हरिभाऊ जावळे यांना ह्या विषाणुमुळे प्राण गमवावे लागले. एवढा पैसा असूनही काहीही उपयोग झाला नाही. त्यांचा मृतदेह पण कोणीही पाहू शकले नाही. अंत्यसंस्कार हा शब्द आपल्या सगळ्या भारतीयांच्या जीवनातील महत्वाचा क्षण त्यात आपला पुढील जन्मासाठी पुजा केली जाते. आपले जवळचे लोक आपल्याला शेवटचे दर्शन घेतात हा ही क्षण त्यांच्या जीवनात आला नाही. पहिले ही अनेक आजार आले. संसर्गजन्य रोग आले पण हा आजार 'भुतो ना भविष्यती' पाहिलेला होता.

बडे दौर गुजरे है जिंदगी के...
यह दौर भी गुजर जायेंगा,
थाम लो अपने पांव को घरों में...
कोरोना भी थम जाएगा...!

अनेक लोकांना कोरोना विषाणूचा संसर्ग झाला. त्यातील अनेकांचे जीव सुद्धा वाचले. त्यामध्ये सर्वांत महत्वाची कामगिरी केली ती आपल्या डॉक्टर्स, नर्सेस आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी त्यात डॉक्टर्स असो की कंपाऊंडर सगळ्यांनीच महत्वाचे स्थान आहे. सर्व आपला जीव सोडून रूग्णांच्या सेवेत कार्यरत आहे. त्यांना आपल्या घरीही जाण्याची परवानगी नव्हती. अशा काळातही त्यांनी अगोदर रूग्णसेवेला महत्व दिले आहे. यांच्यात कितीतरी लोकांनी आपल्या प्राणाची आहुती दिलेली आहे. त्याच्यावर आम्हा सर्वांना अभिमान आहे. कोविड महामारीने हे शिकवल की आपल्या जिवनात त्याचं किती महत्व आहे. या काळात त्यांच्या सोईसाठी हॅसमॅट सुट त्यांना उपलब्ध करून दिला होता.

कोरोना विषाणूने काय शिकवले ह्या प्रश्नाचे उत्तर मला जेंव्हा मिळाल तेंव्हा ह्या विषाणुमुळे माझ्या घरातील माझ्या अत्यंत जवळची व्यक्ती माझी मैत्रीण, माझे सर्व लाड पुरवणारी माझी 'आजी' ती जेंव्हा ह्या विषाणूच्या सानिध्यात आली व तीचे होणारे हाल तिच्यापासून दूर जाण्यास सांगणारे माझे आई, वडील, आणि तिला झालेला त्रास. सर्वांकडू मागीतलेली मदत आमच्या घराला ठेवलेले कोविड सेंटरमध्ये आजीसाठी कोणीच नाही राहील. आजीच्या भावानेही येण्यास दिलेला नकार तिच्या मुलींनाही तिच्या जवळ येण्यासाठी त्यांच्या घरच्यांचा नकार ही गोष्ट आठवूनही माझ्या डोळ्यातून निघणार पाणी एवढे लोक आजीने जोडले होते. त्यांच्यासाठी केलेले जीवनातील कष्ट हे सर्व व्यर्थ होते. त्या दिवशी समजल कोणीच कोणाच नसतं. म्हणतांना ''जो आपला आहे, तोच फक्त जाणार आहे! त्यांच्यासोबत कोणीच जात नाही. जीवनात फक्त आपल्यासाठी जगा लोकांसाठी किंवा नातेवाईकांसाठी जगू नका हे शिकली मी.

जिन्दगी हम सब के लिए
महत्वपूर्ण है, खुबसुरत है, इसे बचाइये।
अभी इसे दूरियों से ही सजाईये...।।

या महामारीपासून वाचण्यासाठी अनेक उपाय आहे. याचा वापर केल्याने या विषाणुचा प्रादुर्भाव होत नाही. त्यात कोठेही गर्दीच्या ठिकाणी मास्कचा वापर करा. चेहऱ्याला हात लावण्यापूर्वी हात स्वच्छ धुवा. त्यासाठी हॅण्डवॉश आणि सॅनिटायझरचा वापर करा. ताप किंवा खोकला असलेल्या रूग्णांचा सहवास टाळा व स्वत:ला असे काहीही लक्षण वाटत असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या. कोणत्याही गोष्टीला घाबरू नका. सकारात्मक विचार करा. दररोज व्यायाम करण्याची हात स्वच्छ धुण्याची सवयच लागून गेली आहे. कोठेही जातांना मास्क घेण्याशिवाय मी जात नाही. जशी आपण मेकप केल्याशिवाय बाहेर जात नाही किंवा स्त्रिया मंगळसुत्र घालल्याशिवाय जात नाही तसं झालंय माझ. मास्क आणि सॅनिटायझर कोरोनाने मला स्वच्छतेचा धडा शिकवला. वर्गातील अभ्यास, मैदानावरचे खेळ, गप्पागोष्टी, दंगामस्ती असेल, तरी मी तिला सॅनिटायझर घेतल्याशिवाय येवू देणार नाही.

कोविड महामारीने काय शिकवले असा प्रश्न पडताच ते लॉकडाऊनचे दिवस आठवतात. त्याचा फक्त वाईटच उपयोग



Created by Universal Document Converter

झाला असं नाही खूप काही चांगलही शिकवलं, सर्वच घरात होते. त्यामुळे वडलांचा आणि आईचा सहवास लाभला. मला त्यांच्या सोबत भेटीसाठी मला फक्त रविवार भेटायचा आता रोजच होता. त्यांच माझ्यावरती असलेल प्रेम व तेंव्हा जास्त मिळालं. ऑफीसच रोजच टेंशन पप्पांना न होत की आईला डब्बा काय करावा याच रोजच नवीन गोष्ट आणि खायला मिळत होती. दररोज आम्ही नवनवीन एक्सपेरिमेंट करायचो. युट्युब तर दिवस दिवस पहायचो. आम्ही, पाणीपुरी, डॉरगॉनो कॉफी, केक असे कितीतरी पदार्थ शिकलो. एवढच नाही सर्व चित्रपट आम्ही पाहून काढले. सर्व जुने चित्रपट मी माझ्या जीवनात पहिलांदा पाहिले आणि कुटुंबासोबतची मज्जा तर वेगळीच होती. चित्रपट तर राहुच द्या पण ते 'रामायण', 'महाभारत' पाहुन पाहुन आमचं पाठांतरच झालय. ते पाहून असं वाटायचं शेवटच्या वेळी कसे देवाचे नाव घ्या अस सांगता तसं झालं होत आमचं.

समय समय की बात है।
कभी घर पर पडे रहने वाले की
''निकम्मा'' कहा जाता था और
आज '' समझदार''!

कोविड ने आमच्या शाळा बंद केल्या पण रोजच उठण्याच टेंशनही घेवून गेला. आईला रोजच शाळेत न जाण्याचे कारणी सांगावे लागत नव्हते. काही काळ लोटला गेला आता शाळा हवीहवीशी वाटायला लागली होती. ते मित्र-मैत्रिणीच्या गप्पांची आठवण येत होती. अभ्यास करावासा वाटत होता. घरातून निघावस वाटत होत. सगळं शेवट पर्यंत चांगल नव्हती आमच्या पेक्षा आमच्या घरी ज्या काकू काम करायच्या त्यांच्या साठी वाईट वाटत होते. त्या कमवत त्यातुनच त्याच घर चालायच. आता ते काय करत असतील त्यांना आम्ही मदतपण केली. पण त्यातून त्या कितीदिवस घर चालवणार. त्याची दोन मुले व ते काका, काकू असा छोटा परिवार त्याचा होता. तेंव्हा गरीबीच दर्शन झालं. आमच्या कडेही एवढ नव्हते. आम्हीही एक कमवणारा आणि तीन खाणारे होते. आम्हालाच एक वेळ साधी खिचडी खाऊन किंवा पाणी पिऊन काढावे लागले. त्या काळात अन्नाची किंमत कळाली मला. जीवनातील तो क्षण म्हणजे शेवटचा क्षण असे वाटत होते. कमी खर्चातही घर चालू शकते आणि नवीन कपड्याशिवाय, ऐशो आरामाशिवायही जीवन जगता येते हे मी शिकले. स्वत: शिवाय इतरांची काळजी घ्यायला शिकली. केंद्र सरकारने पण मोफत धान्य देवून आमची खुप मदत केली. अनेक दात्यांना पैसे असो की अन्न त्यानुसार मदत केली. त्यात माझे वडीलही आपल्या पेक्षा त्यांच्याकडे काहीच आहे नाही. त्यांना मदत केली मी त्यातून दानी बनण्याचे सामर्थ्य मला लाभले.

'प्रकृति का कहर भी जरूरी है साहब,
हर कोई खुद को मालिक समझने लगा है...!'

आजपासून लॉकडाऊन संपल कळताच सगळ्यांना आनंद झाला होता. पण कोरोना गेलेला नव्हता. सर्व बंद होत तेव्हा सगळ्यांच्या नोकऱ्या गेलेल्या होत्या. काही ना होत्या पंप सगळ्यात जास्त लोकांना नोकऱ्या नविन शोधायच्य होत्या. जे छोटे उद्योग होते ते तर बंद झाल्या असे समजायला वावगे होणार नाही. आर्थिक आणीबाणी लागू होता. नवीन उमेदीने लढायच होत जेही काम मिळेल त्यात भागवायच होत. माझ्या वडिलांनी रिक्षा काय चालवली, शेतात कामाला काय गेले, वस्तू सुद्धा विकलया. कोरोनाने शिकवल कोणतच काम लहान असत नसत. तो काम करायच ठरवतो त्यांच्या कडून सर्व काम होता. त्यांना हातभार लावण्यासाठी आईनेही डब्बे बनवण्यास सुरूवात केली आणि जी ते डब्बे पोहचवण्याचे काम केल असे महिने निघून गेले आणि माझ्यातील मीपणा नष्ट झाला. मला आई-वडिलांची किंमत समजली. अनेक समाज सुधारकाने, देशातील अनेक नागरीकांनी जेही मदत केली त्यांच मला धन्यवाद मानायचे आहे. त्यात सगळ्यात महत्वाचे सोनू, सुद, अमिर खान यांचे सगळ्यांनी त्यांच्याकडून जे झाल त्याप्रमाणे मदत केली. पण सोनू सुद यांनी भारतातील जे लोक आपल्या घरी येवू शकत नाही त्यांना घरी पोहचवणे व अमिर खान यांनी गरजूंना दान देण्यासाठी रात्री बारा वाजता तांदूळ वाटप केले. ज्यांना गरज खरच होती. तेच रात्री उठले व त्यात पैसे होते. ही त्यांची युक्ती मला खूप आवडली. या सर्वांकडून मी आपल्या जवळ जे आहे ते दुसऱ्यांनापण द्या असे शिकले.

कोराना काळात सर्वात महत्वाच मी शिकले. आपल्याजवळ जे आहे त्यात समाधान माना या काळात सण उत्सव पण कमी खर्चात होवू शकतात. तेही इतक्या आनंदन ते मी शिकले. लग्नासाठी बापाला घर व शेत गव्हाण ठेवाव लागत नाही हे मी शिकले. डीजेशिवाय व नवरदेवाच्या बहिणीशिवाय लग्न होतांना मी पाहिलंय. मान-पान तिचाच असतो अस वाटणारी मी तो नसला तरी चालतो हे मी शिकले, स्वत: पेक्षा दुसऱ्यांना वेळ दिल्याने ते आनंदी होवू शकतात हे मी शिकले. छोट्या छोट्या गोष्टीत पण आनंद राहतो हे मी शिकले.

मंदिरे, मजिद आणि चर्च, गुरूद्वारा बंद असतांनाही देव हा असतो मी शिकले. प्राण्यांना मारून खाणाऱ्यांना प्राणीही संपवू शकता हे मी शिकली. निसर्गाच ऱ्हास करणाऱ्या प्राण्यांना पिंजऱ्यात कोंडल्यावर व त्यांचे अवयव काढणाऱ्यावर जेंव्हा ही पाळी आली तर त्यांना प्राण्यांना कसं वाटत असेल हे मी शिकली. शेवटी माणसाला त्यांची माणुसकी आहे. देवाजवळ एकच प्रार्थना करते.

''दूर कर हे संकट, दयाळू- दयाधना,
पूर्ण कर माझी मनोकामना जाऊ दे हा कोरोना...
देवा प्लीज माफ कर आम्हाला''

शेवटी ज्यांनीही या महामारीसाठी आपला जीव धोक्यात घालून दुसऱ्याचे जीव वाचवले त्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांना, पोलीसांना, सफाई कर्मचाऱ्यांना आणि देशातील नागरीकांना धन्यवाद... कोरोनाला हरवूया, देशाला जिंकवू या! काळजी घ्या ! स्वस्थ रहा! घरी रहा ! प्रशासनाला सहकार्य करा!



Created by Universal Document Converter

# भारतीय लोकशाहीत मतदानाचे महत्व

कु.रितिका संजय बारी
द्वितीय वर्ष कला

मतदान ही एखाद्या गटास अथवा समुहास विशिष्ट निवडणुकीसाठी अथवा एखादा महत्वाचा निर्णय घेण्यासाठी लिखित अथवा ठरविलेल्या माध्यमाद्वारे (जसे-मतदान यंत्र इत्यादी) मतप्रदर्शन करण्याची एक पद्धत आहे. लोकशाही राज्य प्रणालीत उच्च पदावरच्या व्यक्तीसाठी निवडणूक घेऊन मतदान करण्यात येते. एखाद्या क्षेत्रातील अशा निवडणुकीसाठी ज्याला मतदान करण्यात येते तो उमेदवार असतो व जो मतपत्रिकेद्वारे अथवा ठरवून दिलेल्या पद्धतीद्वारे मतदान करतो तो मतदार म्हणून ओळखण्यात येतो. मतदारांनी केलेल्या मतांच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांची निवड केली जाते.

भारतामध्ये लोकशाही पद्धतीचा स्वीकार हा संविधानात करण्यात आला. लोकशाहीत सत्ता जनतेच्या ताब्यात असते. लोक त्यांचे राज्यकर्ते स्वत: निवडून देतात. ठरावीक काळानंतर निवडणुका घेतल्या जातात. एखाद्या राज्यकर्त्याचा राज्यकारभार किंवा शासनाचा कारभार समाधानकारक नसेल लोकांना त्रास होत असेल तर त्यांना बदलण्याची संधी लोकांकडे असते. यामुळे शासन आणि राज्यकर्त्यांना जनतेच्या हितसासाठी आणि भल्यासाठी काम करावे यासाठी भाग पाडले जाते. तसे केले नाही तर पुढच्या निवडणुकीत त्यांचा पराभव केला जाऊ शकतो. परंतु काही नेत्यावर यांचा काहीही फरक पडत नाही.

लोकशाहीत लोक त्यांच्या प्रतिनिधींद्वारे देशाचा राज्यकारभार करतात. स्वातंत्र्यानंतर पहिल्या निवडणुकीपासूनच सर्वच नागरीकांना मताधिकार देण्यात आला आहे. भारत हा पहिलाच देश आहे की जेथे प्रौढ मताधिकाराच्या तत्वाचा स्विकार केला आहे. प्रौढ मताधिकार म्हणजे, ''धर्म, वंश, जात, लिंग, पंथ, प्रांत व वय इत्यादी कारणाहून व्यक्ती-व्यक्ती मध्ये भेद न करता प्रत्येक स्त्री, पुरुष नागरीकांना मतदानाचा हक्क प्राप्त करून देणे असे होय.''

आपल्या देशातील लोकशाही संपूर्ण जगात भक्कम व यशस्वी असल्याचे भारतीय निवडणुक आयोगाने सर्व जगाला दाखवून दिलेले आहे. अशा या भारतात निवडणुक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी झाल्याने हा दिवस देशभर राष्ट्रीय मतदान दिवस म्हणून साजरा केला जातो. मतदानाविषयी जनजागृती करण्याच्या दृष्टीने सर्व भारतात तसेच तालुक्यात, जिल्हयात आणि शाळेत मार्गदर्शनासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

देशाच्या हितासाठी व विकासासाठी मतदान करणे आवश्यक आहे. मतदार हा राजा आहे. लोकशाहीचा पवित्र हक्क बजावला पाहिजे. मतदार हा एखाद्या व्यक्तीला मत देतो तर त्यांची कुवत काय आहे. तो त्या पदासाठी योग्य आहे. का? याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. भारतात अशिक्षित लोकांचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे लोक त्या नेत्याच्या आश्वासनाला बळी पडतात आणि आपल मौल्यवान मत चुकीच्या हातात जाते आणि त्यामुळे देशाचा विकास बंद होतो व भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढतो. त्यामुळे आजची पिढी त्या गोष्टीकडे लक्ष देणेच सोडून देतात. आणि आपल्या देशाचा राज्यकारभार चुकीच्या हाती म्हणजे पपुंच्या हातात जाऊ शकतो आणि देश हा विकसित न होता अधोगतिला जाऊ शकतो. तसेच मत विकत घेण्याच्या या कारभारामुळे मतदान करणाऱ्यांची संख्या कमी कमी होत चालली आहे. त्याच एक उदाहरण -

आचरण तर माणूसही तसा...
आजचा बाजारभाव
म्हैस - रू.८०,०००/- बैल रू.५०,०००/-
डुक्कर - रू.३,०००/- ते १०००/-
स्वत:ला विकणाऱ्यांना सांगा...
तुमच्यापेक्षा डुक्कर महाग आहे... म्हणून
स्वाभिमानाने मतदान करा...

म्हणून प्रत्येकाने मतदान हे स्वत:ला विकून नाही तर योग्य व्यक्तीला निवडून द्या. जातीमुळेही मोठ्या प्रमाणात त्याला काहीही समजत नाही. तोही निवडून येतो तसेच श्रीमंत व्यक्तीच्या वेळेसही असा भेदभाव केला जातो. लोक त्यांच्याकडे लक्ष देवून तो योग्य आहे का? त्याला विसरून जातात आणि आपले काही कामे झाले नाही, देशाचा विकास थांबला किंवा कोणता नेता भ्रष्टाचारी निघाला तर आपण सरकारवर थोपतो आणि सरकारच खराब आहे हे म्हणून सुटे होतो. परंतु आपण मतदान चुकीच्या व्यक्तीला केलय असं कधी म्हणतच नाही. आपली चुक असूनही दुसऱ्यापासून अपेक्षा करणे हे किती चुकीच आहे. मतदान करतांना तुम्ही जाती-पातीच्या व पैशांचा विचार कराल तर निवडून येणारा नेता 'जातीवादी' निघेल आणि जर मतदान करतांना तुम्ही रोजगार, आरोग्य शिक्षणाचा विचार कराल तर निवडून येणारा नेताही रोजगार, आरोग्य शिक्षणाच्या विकासासाठी काम करेल. मग आपल्याला काय हव ते आपल्या हातात आहे. मतदानाचे महत्व अनन्य साधारण असं आहे. त्यामुळे देश विकसित होवू शकतो किंवा देश प्रगती पथावर ही जाऊ शकतो. जीवनात एका तरी वेळेस देशाला जीवनात महत्वाचे स्थान देवून बघा.

जाति देखकर वोट
देने वालो, याद रखो
तुम नेता चुन रहे हो...
अपना जिजा नही ।
अपना वोट देना नेता की जॉच परख कर भविष्य बदल



Created by Universal Document Converter

कर।

मतदान करणाऱ्यांमध्ये महिलांचे व युवकांचे प्रमाण कमी आहे. महिलांमध्ये जनजागृती करणे गरजेची आहे. हे प्रमाण वाढवण्यासाठी बचत गट, अंगणवाडी केंद्र तसेच महिलांच्या सामाजिक संघटना इ. द्वारे जनजागृती केली जाते. मा.प.नरेंद्र मोदीजी यांनी टेलिव्हीजन (टी.व्ही.) यांच्या वरती केलेल्या जाहिरातीमुळे महिलांना माहिती झाली मतदानाच्या महत्वाची. अनेक महिला ह्या आता निवडूनही येत आहे व पद पण सांभाळत आहे. उदा.१७ व्या लोकसभेत सर्वात तरूण खासदार चंद्रांनी मुरमम (ओडीसा २५ वर्षे ११ महिने) ही पण एक महिला आहे.

लोकतंत्र का सन्मान करेंगे
निर्भय होकर मतदान करेंगे...

युवक पण कमी प्रमाणात मतदान करतांना दिसून येतात. कारण शिक्षणासाठी बाहेर गावात मुल गेलेली असतात. एक दिवस आपल्याला सुट्टी मिळते इतकांच त्यांना निवडणुकीचा आनंद असतो. युवकांना पक्षातील काही लोक दारू आणि मटण यांच्या पार्ट्या देवून त्यांना पक्षाची कामे करायला लावतात. पण त्यांच्या कामाच्या वेळेस मदत करत नाही. त्यामुळे ते मतदान करायला टाळतात. पण आता युवकांना अनेक कार्यक्रमातून मतदानाचे महत्व सांगितले जात आहे. जसे की युवक महोत्सव विविध क्रीडा स्पर्धा,बाईक रॅली, निबंध स्पर्धा इ. माध्यमातून मतदार नोंदणीचे महत्व युवकांना पटवून देण्यात येत आहे.

''जो बाटें दारू, साडी, नोट।
उनको कभी न देंगे वोट।।''

आताच्या युवकांमध्ये मतदानाच आणि मतदान करण्याच महत्व मोठ्या प्रमाणात सोशल मिडियाने वाढले आहे. व्हॉटस्अॅप वरती मुलांनी लावलेल्या स्टेटस वरून तसेच फेसबुक वरती आलेल्या मॅसेजमुळे जोश नुसता वाढत असतो. मतदान केल्या-केल्या आपला काळपट बोटासहितचा फोटो अपलोड करण्यासाठी युवक मोठ्या प्रमाणात मतदान करतात. मोबाईलच जाळे असणाऱ्या या देशात मतदानाबद्दलची आणि लोकशाही बद्दलची अशी जागृती चांगलीच आहे. यात शंका नाही. परंतु यात बदल झाला नाही तर लोकशाही नष्ट होवू शकते.

सर्वांची आहे जबाबदारी
मत देणार सर्व नर-नारी

आता युवकांना त्यांचा हक्क समजले आहे मतदान हा आपला हक्क नसुन देशाची गरज आहे. आपल्या देशाला पारतंत्रातून मुक्त केल्यानंतर आपला देश विकासाच्या दिशेने चांगला आहे. त्यासाठी अशा व्यक्तीच्या हाती आम्ही कारभार देवू तो आमच्या भागात सुधारणा करेल आणि मला वाटते मी भाजपाला (कमळाला) मत देवून योग्य उमेदवार देशाला दिला आहे. लोकशाही शासन चालवण्यासाठी राजकीय पक्ष आवश्यक आहे.

हर तरफ वोटों की खुब लुटमार मची हुई है
वोटरो को लुभाने की दुकाने सजी हुइ है।
बचो न ईमान दोस्तो थोडे से फायदे के लिये
सुंदर भारत बनाना है, अपने बच्चों के लिये।।

वेल्लोर (तामिळनाडू) मतदार संघात मतदारांना पैशाचे अमिष दाखविल्याचा प्रकार उघडकीस आल्यामुळे १८ एप्रिल २०१९ रोजी या मतदार संघातील निवडणूका रद्द करण्यात आली. हा देशातील पहिलाच प्रकार ठरला. देशातील मतदारांना मतदानाचे महत्व समजल्यामुळे हा प्रकार उघड झाला. त्यामुळे मतदार जागरूक झाला आहे. निवडणुकीचे घोषवाक्य आहे.

'नो वोटर टु बी लेफ्ट बिहांईंड' (No Voter To Be Left Behind)

सर्व मतदार आपल्या लोकशाहीचा वारसा पुढे नेण्यासाठी जागरूक झाले पाहिजे. मतदान करतांना योग्य उमेदवार बघुनच मतदान करायला हव. त्यामुळे देशाची प्रगती होईल.

आपण संसदीय लोकशाही प्रणालीचा स्विकार केलेला आहे. आपली संसदीय लोकशाही ही बहुमतावर आधारलेली आहे. घटनेप्रमाणे जनता सार्वभौम असून जनतेचा सरकारवर असलेला विश्वास हा आपल्या लोकशाही प्रणालीचा आत्मा आहे, तर शांततापूर्ण सत्तांतर हे आपल्या लोकशाहीचे वैशिष्ट्ये आहे.

'नवे वारे नवी दिशा,
मतदानच आहे उदयाची आशा,

लोकांचा मंत्रिमंडळावर विश्वास नसणे, याचाच अर्थ लोकसभेचा सरकारच्या धोरणावर, प्रशासनावर, कार्यप्रणालीवर विश्वास नाही असा होतो. त्यामुळे जनतेला मान्य नसलेली धोरणे त्यांनी राबवू नये. उदा- शेती विषयक हे मान्य नाही होत आहे. त्यात काही बदल करणे गजरेचे आहे. मंत्रीमंडळाची लोकसभेची म्हणजे जनतेशी असलेली उत्तरदायित्व लोकसभेशी म्हणजे जनतेशी निगडीत असल्याने हाच लोकशाहीचा पाया आहे.

''लोकतांत्रिक देश हमारा
ना जाने कब सिखेगा
मत का सही उपयोग कर पाना''

मतदान हे देशातील गरीबी, शिक्षण न मिळाल्यामुळे होणारे दरिद्रता, पाण्याचे प्रश्न, घाणीमुळे तसेच झोपड पट्ट्यामुळे होणारे आजार, त्यामुळे झालेले लहान मुलांची मृत्यू आणि भ्रष्टाचार यांना बंद करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने मतदान करणे गरजेचे आहे. आणि योग्य व्यक्तीला करणे तेही ऐवढेच गरजेचे आहे.

शुरू हुआ मतदान का त्योहार,
अबकी बार किसकी सरकार।
छोडे ना अपना अधिकार,
मतदान कर चुने अच्छी सरकार।।



Created by Universal Document Converter

# भारतीय लोकशाही आणि मतदान

कु.रेणुका विनोद महाजन
प्रथम वर्ष विज्ञान

भारत जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे. लोकशाही म्हणजे जबाबदार शासनपद्धती; पण भारत निवडणुक आयोगाने सर्व जगाला दाखवून दिले आहे. अशा या भारत निवडणुक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी झाल्याने हा दिवस देशभर राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो. मतदानाविषयी जनजागृती करण्याच्या दृष्टीने सर्व जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. देशाच्या हितासाठी व विकासासाठी मतदान करणे आवश्यक आहे. मतदार हा राजा आहे. लोकशाहीच्या बळीकटीकरणासाठी मतदारांनी निवडणुकीत मतदानाचा पवित्र हक्क बजावला आहे. नवीन मतदानामध्ये जागृतीसाठी हा दिवस साजरा केला जातो. या निमित्ताने जिल्ह्यात विविध स्पर्धा, जनजागृतीचे कार्यक्रम ही शालेय पातळीवर आयोजित केले जाते. आयोगाने मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी काही उद्दिष्टे समोर ठेवली आहेत. एकूण लोकसंख्येमधील मतदारांचे प्रमाण व १८ वर्षावरील मतदारांची संख्या ही समान असावी यासाठी उपक्रम राबवून ती वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. मतदारांच्या नोंदणीचे प्रमाण का कमी आहे. याची चौकशी करणे आवश्यक आहे. १८ ते १९ या वयोगटातील युवकांच्या मतदानाचे प्रमाण सध्याच्या ३५ ते ४० टक्क्यांवरून ८० टक्के इतके व्हावे. युवक मतदारांची संख्या वाढविणे हे महाराष्ट्र शासनाचे व मतदारांचे हक्क आहे. त्यांना त्याचे महत्त्व पटवून द्यायला हवं. मतदान हा आपला महत्वाचा अधिकार आहे.

आपल्या देशाने लोकशाही स्वीकारली आणि आपण ही पद्धती अजूनही टिकवून ठेवली आहे. मतदान करणे हा आपला मुलभूत अधिकार आहे. त्यामुळे मिळालेल्या या अधिकारांचा वापर प्रत्येक भारतीय नागरीकाने प्राधान्याने करावा आणि मतदानाचे कर्तव्य पार पाडावे. लोकशाही व्यवस्थेमध्येच भयमुक्त व नि:पक्षपाती वातावरण निवडणुका पार पाडणे. अत्यंत महत्वाचे व आवश्यक आहे. भारतीय लोकशाहीला उज्वल परंपरा आहे. भारतीय लोकशाही अधिक सक्षम, बळकट, लोकाभिमुख होऊन अधिक प्रभावशाली बनेल. मतदानाचे प्रमाण गेल्या लोकसभा निवडणुकीपेक्षा किमान १० पटीने वाढणे अशी अपेक्षा आहे. गेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीमध्ये जेवढे टपाली मतदान झाले होते. त्यामध्ये १० पट वाढ करावयाची आहे. त्यासाठी सैन्यदलामधील कर्मचारी, शासन सेवेतील कर्मचारी आणि विदेशी कार्यालयामध्ये काम करणारे कर्मचारी शासन कर्मचारी अशा नागरीकांनी टपाली मतदान करणे आवश्यक आहे. साधारणपणे शासन सेवेतील कर्मचारी जे आणि विदेशी कर्मचारी निवडणुकीच्या प्रत्यक्ष कामाकरिता नेमले जातात किंवा नेमले जाण्याची शक्यता असते. अशा कर्मचाऱ्यांचा शोध घेवून त्यांना आगावू कल्पना देणे आणि त्यांची कागदपत्रे जमा करून त्यांना पोस्टल मतपत्रिकेची सुविधा उपलब्ध करून देण्यास हे प्रमाण वाढू शकेल. भारत निवडणुक आयोगाने या बद्दलची सविस्तर कार्यपद्धती विशद केली आहे.

निवडणुकीमध्ये मतदारांचा सहभाग वाढावा यासाठी योग्य ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. एकूण लोकसंख्येमध्ये आजही अशिक्षित समाजाचे प्रमाण लक्षणीय आहे. एकूण लोकसंख्येमध्ये अशा मतदारांना समजावून त्यांचा हक्क त्यांना मिळवून देणे महत्वाचे आहे. त्यासाठी लोक शिक्षण/प्रौढ शिक्षणाच्या माध्यमातून जनजागृती करणे गरजेचे आहे. याशिवाय सामाजिक चालीरिती, रूढी परंपरा या प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संवाद साधून या परंपरा उणीवा त्या मध्ये हस्तक्षेप करून त्यांना मतदानाचा व लोकशाही बळकटीकरणाचा व मतदान जनजागृती करणाचा या क्रियेला प्रचलीत करायला हवं. आगामी लोकसभा ६५ टक्के असावे असे उद्दिष्ट भारत निवडणुक आयोगाने ठरविले आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्र राज्यामध्ये सरासरी ५९.५० टक्के इतके मतदान झाले होते. भारत निवडणुक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे ही टक्केवारी ६५ टक्के इतकी असणे आवश्यक आहे. विशेष जनजागृती करून लोकांना लोकशाहीचे महत्व पटवून देणे गरजेचे आहे. यासाठी ज्या ठिकाणी कमी मतदान झाले आहे. अशा १० टक्के मतदान केंद्राचा शोध घेवन त्या मागणी कारणे शोधून योग्य ती उपाययोजना करण्याबाबत सर्व जिल्हा प्रशासन आयोगाने यापूर्वीच कळविले आहे. अधिवासी भारतीयांची मतदार म्हणून नोंदणीचे प्रमाण ०.१ टक्का आहे. ते १० टक्के पर्यंत इतक्या अल्प प्रमाणात अधिवासी भारतीयांच्या मतदार म्हणून नोंदणी झाली आहे. त्यासाठी १० टक्के पर्यंत वाढवण्याचे असल्यास विशेष प्रयत्न गरजेचे आहे. त्यासाठी परराष्ट्र मंत्रालयाच्या माध्यमातून अधिवासी भारतीयांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. भारतीय राज्यघटनेने या देशातील नागरीकांना निवडणुक मतदानाचा हक्क एक फार महत्वपूर्ण अधिकार प्रदान केला आहे. स्त्री, पुरूष, गरीब, श्रीमंत, उच्च, नीच असा कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता राज्यघटना लिहिणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी प्रत्येकाच्या मताचे समान मुल्य मानले. समानतेचे हे एक फार महत्वाचे सुत्र घटनेद्वारे भारतातील प्रत्येकाला मिळाले आहे. मतदान हे प्रत्येक नागरीकांचे राष्ट्रीय कर्तव्य आहे.

लोकशाहीने दिलेला हा अधिकार बजावणे म्हणून अतिशय महत्व आहे. आपल्याला जो पक्ष किंवा उमेदवार महत्वाचा वाटतो, त्या पक्षाला मत देणे म्हणजे आपण ज्या विचारांवर विश्वास ठेवतो. आपल्याला जो पक्ष किंवा उमेदवार महत्वाचा वाटतो. त्या पक्षाला मत देणे म्हणजे आपण ज्या विचारांवर विश्वास ठेवतो. त्याला आधार देण्यासारखे असते. मत दिल्याशिवाय या देशात परिवर्तन होणे अशक्य आहे. याची जाणीव ठेवली तर हे सरकार नको होते, असे घडले त्याला हेच संस्कार कारणीभूत आहे. अशा चर्चांना पूर्णविराम मिळेल. सरकारकडून असलेल्या अपेक्षा व्यक्त करण्याची मतदान ही एक संधी असते. कोणत्या प्रकारचे सरकार आपल्याला हवे आहे हे सांगण्याचे ते एक निमित्त असते म्हणून मतदानाच्या दिवशी सहलीला जाणे किंवा मतदानालाच न जाणे अतिशय चुकीचे आहे.

भारतीय लोकशाहीचा अखंड ठेवा जतन करण्यासाठी नागरीकांनी मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणे गरजेचे आहे. देशाचे ऐक्य, एकात्मताबरोबर एकसंघ भारताच्या स्वप्न पूर्तीसाठी मी मतदान करणार आणि इतरांनाही लोकशाही मतदानाचे महत्व पटवून देण्याचे कार्य करेल. देशातील मतदाराचे घटते प्रमाण हे भारतीय लोकशाहीला विशेषत: सुरक्षित मतदारांचे घटते प्रमाण असल्याचे चिंताजनक वाटत



Created by Universal Document Converter

असते. यासाठी शासन स्तरावर व सामाजिक संस्थांकडून वेगवेगळ्या पातळीवर होणारी जनजागृती व प्रबोधन आपण गांभीर्याने घेतली पाहिजे. भारतीय लोकशाही सर्वश्रेष्ठ मानली जाते.

प्रौढ मताधिकाराच्या आधारे, खुल्या व नि:पक्षपाती निवडूनद्वारा लोकांनी निवडणुकीद्वारे लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीद्वारे चालणारे राज्य, लोकशाही हा डिमॉक्रसी या इंग्रजी संज्ञेचा मराठी प्रतिशब्द अशी फोड केली असून त्यांना अनुक्रमे सामान्य लोक व सत्ता असा अर्थ दिला आहे. हा शब्द डिमॉस+क्रॅटोस या ग्रीक शब्दापासून झालेला असून त्यापैकी अब्राहम लिंकन यांची लोकांचेच लोकांनी केलेल राज्य ही व्याख्या लोकप्रिय व सुप्रसिद्ध आहे.

# लोकशाहीची भक्कम पायरी मतदान नोंदणी

कु.भाग्यश्री रविंद्र वासनकर
द्वितीय वर्ष विज्ञान

आपल्या देशातील लोकशाही संपूर्ण जगात भक्कम व यशस्वी असल्याचे भारत निवडणुक आयोगाने सर्व जगाला दाखवून दिलेले आहे. अशा या भारत निवडणुक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी झाल्याने हा दिवस देशभर राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जात आहे. मतदानाविषयी जनजागृती करण्याच्या दृष्टीने सर्व जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

देशाच्या हितासाठी व विकासासाठी मतदान करणे आवश्यक आहे. 'मतदार हा राजा आहे' लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदारांनी निवडणुकीत मतदानाचा पवित्र हक्क बजावला पाहिजे. हे या राष्ट्रीय मतदार दिवसाने अधोरेखित केलेले आहे. नविन मतदारांमध्ये जनजागृतीसाठी हा दिवस साजरा करण्यात येत आहे. यानिमित्ताने जिल्ह्यात विविध स्पर्धा, जनजागृतीचे कार्यक्रम ही शालेय, महाविद्यालयीन पातळीवर आयोजित केलेले आहेत. गाव, तालुका व जिल्हास्तरावरील भारत निवडणुक आयोगाच्या निर्देशानुसार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

आपणास माहितच आहे, आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारत निवडणुक आयोगाने स्वीप-२ हा महत्वकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. आयोगाने मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी काही उद्दीष्टे घेऊन समोर ठेवली आहेत. एकूण लोकसंख्येतील मतदारांचे प्रमाण व १८ वर्षावरील मतदारांची संख्या ही समान असावी यासाठी उपक्रम राबवून ती वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. मतदारांच्या नोंदणीचे प्रमाण का कमी आहे याची कारणे शोधून त्यामध्ये लक्ष घालणे अपेक्षित आहे.

१८ ते १९ या वयोगटातील युवकांच्या मतदानाचे प्रमाण सध्याच्या ३५ ते ४० टक्क्यांवरून ८० टक्के इतके व्हावे. युवक मतदारांची नोंदणी वाढविण्याकरिता विद्यापीठे, महाविद्यालये आणि त्यांचे युवक प्रतिनिधी यांचेशी संवाद साधावा आणि काही माध्यमातून मतदार नोंदणीचे महत्व युवकांना पटवून देण्यात येत आहे. शहरी क्षेत्रामध्ये उदासिनतेमुळे मतदानाचे प्रमाण अल्प असल्याचे दिसून येत आहे. हे प्रमाण वाढविण्यासाठी शहरी क्षेत्रात मतदान कमी होण्याची नेमकी कारणे शोधून काढून त्यासंबंधी उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यासाठी शहरी भागात दूरदर्शन सिनेमागृह, केबल टिव्ही इत्यादींच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे.

''चला मतदार नाव नोंदणी करू या,
आपल्या देशाच्या लोकशाहीला
अधिक सशक्त करू या!''

निवडणुकीमध्ये मतदारांचा सहभाग वाढवा यासाठी योग्य ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. एकूण लोकसंख्येमध्ये आजही अशिक्षित समाजाचे प्रमाण लक्षणीय आहे. अशा मतदारांना निवडणुकीच्या कार्यक्रमाचे महत्व समजावून सांगणे लोकशाही प्रक्रियेचे महत्व पटवून देणे आवश्यक आहे. त्यासाठी लोक शिक्षण आणि प्रौढ शिक्षणाच्या माध्यमातून जनजागृती करणे गरजेचे आहे. याशिवाय सामाजिक चालिरीती, रूढी परंपरा यामुळे मतदानाचे प्रमाण कमी होत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष संवाद साधून या चालिरीती, परंपरा यातील दोष आणि उणीव दूर करण्यासाठी हस्तक्षेप करणे गरजेचे आहे. याशिवाय गरीब जनतेला आर्थिक मोह दाखवून मतदानाला प्रवृत्त केले जाते. असेही दिसून आले आहे. यास्तव शिक्षणाच्या माध्यमातून जनजागृती करणे प्रामुख्याने गरजेचे आहे. आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदाराचे सरासरी प्रमाण ६५ टक्के असावे असे उद्दीष्ट भारत निवडणुक आयोगाने ठेवले आहे.

''लोकशाहीला बुलंद करण्यासाठी तरूणांचा साथ
नेहमीच महत्वाची असते.''

यासाठी ज्या ठिकाणी कमी मतदान म्हणून प्रमाण गेल्या लोकसभेत निवडणुकीपेक्षा १० पटीने वाढावे अशी अपेक्षा आहे. गेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीमध्ये जेवढे टपाली मतदान झाले होते. त्यामध्ये १० पट वाढ करावयाची आहे. त्यासाठी शासन सेवेतील जे कर्मचारी निवडणुकीच्या प्रत्यक्ष कामाकरीता नेमले जातात.

लोकशाही व्यवस्थेमध्ये भयमुक्त व नि:पक्षपाती वातावरणात निवडणुक पार पडणे अत्यंत महत्वाचे व आवश्यक आहे. भारतीय लोकशाही उज्वल परंपरा आहे. यादिनानिमित्त मतदारामध्ये जनजागृती व प्रबोधन होण्यास मोलाची मदत होईल व भारतीय लोकशाही अधिक सक्षम, बळकट व लोकाभिमुख होईल.

प्रत्यक्ष नागरीकांसाठी मतदान करणे अत्यंत महत्वाचे आहे, निरोगी लोकशाही निर्माण करण्याचा ही एक प्रक्रिया आहे.

भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे. जिथे प्रत्येक प्रौढ नागरीक आपल्या मताचा वापर करण्यास स्वतंत्र असतो. सरकार बनविण्यात देशातील प्रत्येक मतदारांची महत्वाची भूमिका असते.



Created by Universal Document Converter

# वैचारिक लेख हिंदी

## सोशल मिडीया : शाप या वरदान

कु.रुषाली गोकुळ पाटील
प्रथम वर्ष कला

वर्तमान समय मे सोशल मिडीया सबसे तेजी से विस्तार करने वाले वर्चुअल प्लेटफॉर्म के रूप में उभरा है। सोशल मिडिया का विस्तार दुनिया के हर उस कोने तर है जहा इंसाण मौजूद है। आज के समय में सोशल मिडिया बाकी सभी प्लेटफॉर्म्स से कही ज्यादा विकसित है और इसपर लोगो की अथाह भीड इसे और भी अधिक विशाल बनाती है। सोशल मिडिया लागों की दिनचर्या का एक अहम हिस्सा बन चुका है जिसे अब खत्म करना असंभव सा लगता है। सोशल मिडीया बहुत से लोगो के जीवन मे मनोरंजन, शिक्षा और अवसर के रूप में मौजूद है।

सोशल मिडीया या सामाजिक मिडिया वर्तमान समय में सभी के जीवन का एक अभिन्न अंग बन चुका है जिसके बिना प्रत्येक व्यक्ती अपने आप को अधूरा महसुस करने लगा है। लोगों मे सोशल मिडिया के प्रति इस प्रकार का लगाव उन्हे इसपर निर्भर बना रहा है। सोशल मिडिया लोगों के शिक्षा, मनोरंजन, आय तथा कार्यक्रम संचालन मंच आदि का एक सुविधाजनक जरिया है। सोशल मिडिया लोगो का काम और अधिक आसान बनाने के साथ साथ अपनी तरफ इतना आकर्षित करता है कि लोग इसके पिछे अपनी रोजाना जिंदगी का किमती वक्त गवा देते है।

वर्ष २००४ में फेसबुक कि शुरूआत होने के बाद जब फेसबुक का आगमन भारत में हुआ तभी से भारत के लोगों का सोशल मिडिया की तरफ आकर्षण बढता नजर आया। लोगो ने फेसबुक को खुप पसंद किया उसके बाद २००६ मे विडिअओ स्ट्रीमिंग सोशल मिडीया ऐव युट्यूब की शुरूआत हुई जिसे भी लोगों ने भारी संख्या मे इस्तेमाल किया और धीरे धीरे यह लागो के लिऐ मनोरंजन और आय का साधन बन गया। समय बढने के साथ साथ ट्विटर, व्हॉटस्ॲप, टिंडर, इंस्टाग्राम, टिक-टॉक आदि सोशल मिडिया एप्लीकेशन्स आते रहे और लोग सोशल मिडिया के धारा में बहते चले गए।

वर्तमान समय में सोशल मिडीया का विस्तार इस प्रकार से है की लोग जगने के बाद से लेकर सोने से पहले तक सोशल मिडिया पर सक्रिय रहते है। सोशल मिडिया से लोंगो का लगाव इसप्रकार का है की अब बहुत से लोग अपनी पुरी दिनचर्या की तस्वीर या चलचित्र के माध्यम से सोशल मिडिया पर प्रेषित करते है। लोगो ने क्या खाया है, क्या देखा है, कहाँ घुमने गए है आदि चीजें सोशल मिडिया पर साझा करने के साथ साथ वो वर्तमान समय पे क्या महसुस कर रहे है, ये तक सोशल मिडिया पर साझा करते है।

अगर आकडो की बात करें तो बीते दो वर्षो मे व्हाटस्ॲप पर १०%, युट्युब पर १२ %, फेसबुक पर ६%, इंस्टाग्राम पर ८%, तथा ट्विटर पर ५%, उपयोगकर्ताओ का इजाफा हुआ है। नए सर्वेक्षणो के अनुसार भारत में तकरीबन ४४.८ करोड लोग सोशल मिडिया पर सक्रिय रहते है। अगर भारत के छात्रो की बात करे तो लगभग ३७.६ करोड छात्र सोशल मिडिया पर सक्रिय है। विश्वभर के युट्युबर्स में १६% युटयुबर्स अकेले भारत के है यह जनसंख्या लगभग २२.५ करोड की है।

सोशल मिडिया हमारे जीवन में हमारी एक गहरी आदत की तरह बन चुकी है। सोशल मिडिया न आज के दौर में लगभग सभी क्षेत्रो में अपनी एक अहम भूमिका निभाई है। बात चाहे आईटी सेक्टर की, कृषि सेक्टर की, चिकित्सा क्षेत्र की या फिर शिक्षा क्षेत्र की करें हर कही सोशल मिडिया किसी न किसी रूप से अपनी हिस्सेदारी निभाती है।

सोशल मिडिया के माध्यम से लोग पिछडे से पिछडे इलाको से अपनी प्रतिमा को दुनिया के सामने रख सकते है। अपने कला गुणो को दिखा सकते है। लोगो को सोशल मिडिया के जरिए आय के एक से एक अवसर प्राप्त हो जाते है। सोशल मिडिया डिजिटल इंटरनेट जनसंचार माध्यम का रूप है। सोशल मिडिया से तात्पर्य ऐसे माध्यम से है, जहाँ पर विश्व के अलग - अलग हिस्सो में दूरदराज बैठे लोग आपस में संपर्क स्थापित करते है। इसके लिए व इंटरनेट के माध्यम का उपयोग करते है। सोशल मिडिया या सोशल नेटवर्क व्यक्तियो और उनके बीच व्यक्तीगत संबंध स्थापित करने का एक माध्यम है जो करोडो लोगो का एक-दुसरे से संपर्क कराने में



Created by Universal Document Converter

सहायक होती है। सोशल मिडिया का उपयोग व्यक्तिगत और व्यावसायिक कार्यो दोनो के लिए किया जाता है। सोशल मिडिया एक ऐसा प्लेटफॉर्म है जिसकी मदद से लोग अपने घर एक कमरे में बैठकर लाखो का आय कर सकते है। आज के समय में किसी भी कार्यक्रम को प्रसारित करने का एक बेहतरीन मंच है सोशल मिडिया।

भारत के संचार माध्यम मिडिया के अन्तर्गत टेलीविजन, रेडियो, सिनेमा, समाचार पत्र, पत्रिकाएँ तथाअन्तरजालीय पृष्ठ आदि है। अधिकांश मिडिया निजी हाथो में है और बडी कंम्पनियो द्वारा नियंत्रित है। भारत में ७०,००० से अधिक समाचार पत्र है, ६९० उपग्रह चेनल है जिनमें से ८० समाचार चेनल है।

सोशल मिडीया के द्वारा लोग अपने दूर स्थित संबंधियो से जुडे रहते है। यह आय अर्जन में भी मदत करती है। इसके माध्यम से एक समय में लाखो लोगों तक सुचना साझा कर सकते है। सोशल मिडिया के द्वारा हम सरकारया उच्च अधिकारियो तक अपनी बात पहुँचा सकते है। इसके माध्यम से हम घर बैठे शिक्षा प्राप्त कर सकते है। यह एक अच्छा मनोरंजन का साधन है।

इसके जितने लाभ है, उतने ही नुकसान भी है जैसे, सोशल मिडिया के द्वारा अफवाहो की भी बडी आसानी से फैलाया जा सकता है। इस पर ज्यादा समय देने से युवा पथभ्रमित हो जाता है। इसका बहुत अधिक इस्तेमाल करने से बहुत से मानसिक बीमारिया भी होती है। सोशल मिडियापर लोगो की निर्भरता उन्हे आलसी बना रहा है। यह तरह तरह के सायबर क्राईम का भी कारण है।

दुनिया में किसी भी चीज का आविष्कार कभी भी अभिशाप के रूप में नही किया जाता। तब तक जीतने भी आविष्कारको ने अपने आविष्कार किए उन सभी की अपने आविष्कार को लेकर एक समाज के लिए एक बेहतर मंसा ही रही है। कोई भी वस्तू एक अच्छे और भले उद्देश से बनाई जाती है लकिन वह वस्तू एक वरदान साबित होगी या अभिशाप ये तो उस व्यक्ति के हाथों में जाने के बाद पता चलेगा कि उस व्यक्ती ने उस वस्तु का किस तरह से इस्तेमाल किया। बहुत से लोग फेसबुक, व्हाटस्ॲप आदि का प्रयोग अच्छी सुचनाओं को साझा करने के लिए करते है तो वही कुछ लोग सोशल मिडिया पर अफवाहों को फैलाने काम करते है लेकिन इस बात से इनकार करना गलत होगा की फेसबुक, व्हाटस्ॲप आदि का निर्माण अच्छे उद्देश के लिए किया गया है। अगर सोशल मिडिया को गलत हाथों मे जाने से रोक लिया जाए या उन गलत मानसिकता वाले लोगों को थोडी समझ आ जाए तो सोशल मिडिया शत प्रतिशत एक वरदान कहलाएगा परंतु अभी प्रतिशत के समय में सोशल मिडिया को सिर्फ वरदान कहाँ भी सही नही होगा। सोशल मिडिया का कुछ हिस्सा ऐसा है जो समाज को किसी न किसी रूप से क्षति पहुंचा रहा है।

सोशल मिडिया पर जिस प्रकार की निर्भरता इस वक्त लोगो की है उसे देखकर तो यही अनुमान लगाया जा सकता है की भविष्य में सबसे अधिक विकसित प्लेटफॉर्म सोशल मिडिया का ही होने वाला है। भले ही आज कल सारे काम सोशल मिडिया पर होते है लेकिन हमें अपना कम से कम समय ही वर्चुअल प्लेटफॉर्म पर देना चाहिए तथा हमे ज्यादा से ज्यादा भौतिक रूप से सक्रिय रहना चाहिए। सोशल मिडिया के सिमित और सहि इस्तेमाल से ही ये एक वरदान की तरह साबित होगा।



Created by Universal Document Converter

# संशोधन लेख मराठी





Created by Universal Document Converter

# पहिल्या भारतीय स्त्रीवादी विचारवंत: सावित्रीबाई फुले

कु.चैताली समाधान पाटील
तृतीय वर्ष कला

''स्त्रीवाद म्हणजे लिंगभेद झुगारून स्त्री-पुरुष समानतेकडे वाटचाल करणारा विचारप्रवाह होय.'' सामान्यत: जरी स्त्रीवाद ही पुरूषविरोधी चळवळ समजली जातेय. त्यामुळे ही स्त्रियांचे ऐतिहासिक दुय्यमत्व उजेडात आणुन हे शोषण संपण्याचा प्रयत्न करते. ही एक सामाजिक, राजकीय जाणीव आहे. स्त्रीवाद ही संकल्पना जरी पाश्चात्य आधुनिकतेत उदयास आली, अशी सामान्य समजूत असली तरी ही जाणीव त्यापूर्वी वेगवेगळ्या कालखंडात आणि ठिकाणी आढळून आलेली दिसते. म्हणूनच एकच स्त्रीवाद नूसन अनेक स्त्रीवाद दिसून आले आहेत.

महात्या ज्योतिबा फुले यांचे क्रांतीकार्य स्त्रियांच्या आत्मसन्मानाला जागृत करणारे आणि तत्कालीन स्त्रीसाहित्याला प्रेरणा देणारे आहे. इ.स.१८४८ मध्ये त्यांनी पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. त्यांची पत्नी सौ.सावित्रीबाई फुले यांना स्वत: शिकवून शिक्षिका बनवली. स्त्रीशिक्षण म्हणजे अनैतिकता व सामाजिक अनाचाराला निमंत्रण आहे, असा दांभिका प्रचार तत्कालीन सनातनी वर्गाने केला. त्यांनी सावित्रीबाईंना दगड व शेण फेकून मारले. ज्योतीरावांच्या वडीलांवर दडपण आणून त्यांनी ज्योतीबा व सावित्रीबाईंना घराबाहेर काढण्यात भाग पाडले. पण ज्योतीरावांनी सर्व विरोधांवर मात करून मुलींसाठी आणखी शाळा काढल्यात. शिक्षण मिळाल्याने कशी जागृती येते याचे प्रत्युत्तर ज्योतीरावांच्या शाळेत शिकणाऱ्या मुक्ता नावाच्या मांग समाजाच्या मुलीने वयाच्या ११ व्या वर्षी लिहीलेल्या (इ.स.१८५५) च्या एका निबंधातून मिळते. हा निबंध अहमदनगर येथून प्रकाशित होणाऱ्या ज्ञानोदय पत्राने छापला होता. त्यात ती म्हणजे, ''ब्राह्मण लोक म्हणतात की, इतर जातींनी वेद वाचू नये याचा अर्थ आम्हास धर्मपुस्तक नाही. इंग्रजी राज्यापूर्वी उच्चवर्गातील लोकांचा उपरोध करणाऱ्या महार-मांगांचे डोके मारीत असत. गुलटेकडीच्या बाजारात फिरण्याची मोकळीक नव्हती. ती आता मिळाली. या देशातील स्त्री मुक्तीचा हा पहिला उद्‌गार होता.

सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांनी इ.स.१८६३ साली बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करून मोठमोठी पोस्टरे गावभर सर्वत्र लावली. अडचणीत सापडलेल्या विधवांनी तेथे यावे व आपल्या मुलांना जन्म द्यावा. त्यांची नावे जाहीर होणार नाही. जातांना त्यांनी मुल घेवून जावे किंवा ठेवून जावे. अनाथाश्रमात त्यांच्या मुलांचे संगोपन केले जाईल. अशी सोय केली. केश वपनाची पद्धत रोखण्यासाठी फुले दांपत्यांनी एक दिवसासाठी न्हावी यांचा संप पुकारला. लग्नाला अनेक वर्ष होऊनही त्यांना मुलबाळ नव्हते तेंव्हा वडीलधाऱ्यांनी त्यांना दुसरे लग्न करण्याचा सल्ला दिला. पण ज्योतीरावांनी त्याल ठाम नकार दिला. स्त्रीला जर अपत्यप्राप्तीसाठी दुसरा नवरा करता येत नाही. तर पुरूषाला तरी दुसरी पत्नी करण्याचा अधिकार का असावा? असा प्रश्न त्यांनी केला. अशा अनेक प्रयत्नांतून ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीवादी आणि स्त्री-पुरूष समतेचा पुरस्कार केला.

त्या काळाच्या स्त्रीलेखिका जरी तथाकथित उच्च वर्गातून आलेल्या व उच्च वर्गातील स्त्रियांचे प्रश्न मांडणाऱ्या असल्या तरी सुद्धा त्यांनाही आप्तस्वकियांच्या प्रखर रोषाला सामोरे जावे लागले. या स्त्रीवादी साहित्याच्या पहिल्या हुंकाराच्या पाठीशी आपल्या विचारांचे पाठबळ समर्थपणे उभे करण्याचे महत्वाचे कार्य म.फुलेंनी केले.

सावित्रीबाईचे सासरे गोविंदराव फुले हे मुळचे फुरसगीचे गोरे, परंतु पेशव्यांनी त्यांना पुण्यातील फुलबागेची जमीन बक्षीस दिली म्हणून ते पुण्याला येऊन राहिले व फुलांच्या व्यवसायावरून त्यांना फुले हे आडनाव मिळाले.

सावित्रीबाईंचे पती ज्योतीराव यांना लहानपणापासूनच मातृप्रेम लाभले नाही. त्यांची मावस आत्या सगुणाऊ यांनीच त्यांचा सांभाळ केला होता. सगुणाऊ एका इंग्रज अधिकाऱ्याला असणाऱ्या मुलाच्या दाई म्हणून काम करायच्या. त्यांना इंग्रजी कळायचे व बोलताही यायचे. त्यांनी आपल्या या ज्ञानाचा उपयोग ज्योतीरावांना प्रेरित करण्यासाठी केली. ज्योतीरावही शिक्षणाकडे आकर्षित झाले. सावित्रीबाईंना ख्रिश्चन मिशनऱ्यांनी लग्नापूर्वी दिलेले एक पुस्तक त्या सासरी घेऊन आल्या होत्या. त्यावरून ज्योतीरावांनाही एक नवा मार्ग सापडला. त्यांनी स्वत: शिकून सावित्रीबाईंना शिकवले. सद्‌गुणाऊ तर शोषत होतीच दोघींनी रितसर शिक्षण घेतले.

१ मे १८४७ रोजी सावित्रीबाईंनी सगुणाऊला मागासांच्या वस्ती एक शाळा काढून दिली. ही त्यांची पहिली शाळा. गुणाऊंना त्या शाळेत बोलाविण्यात आले. सगुणाऊ तेथे आनंदाने व उत्साहाने शिकवू लागल्या. पुढे ही पहिली शाळा मध्येच बंद पडली. १ जानेवारी इ.स.१८४८ रोजी पुण्यातील बुधवार पेठेतील भिडेवाड्यात जोतीराव आणि सावित्रीबाईंनी मुलींची शाळा काढली. साऱ्या कर्मठ समाजाच्या विरोधाला न जुमानता विवाहानंतर शिक्षण घेतले. आणि शिक्षक मुख्याध्यापक बनुन शिक्षण दिले. कवेळ चार वर्षात १८ शाळा उघडल्या आणि चालवल्या. तत्कालीन ब्रिटिश भारतातली एतद्देशीय व्यक्तीने काढलेली ही पहिलीच मुलींची शाळा ठरली.

या शाळेत सावित्रीबाई मुख्याध्यापिका म्हणून काम पाहू लागल्या. त्या काळात पुण्यातील अन्य भागातही २-३ मुलींच्या शाळा त्यांनी सुरू केल्या व काही काळ चालवल्या. मुंबईतल्या गिरगावातही त्याच सुमारास स्टुडन्ट्स लिटररी ॲन्ड सायंटिफिक सोसायटीने कमळाबाई हायस्कूल नावाची मुलींसाठीची शाळा सुरू



Created by Universal Document Converter

केली. ती शाळा आजही चालू आहे. मिशनरी नसलेले पिअरी चरण सरकार यांनी मुलींसाठी पहिली शाळा बारासात टाऊन येथे १९४७ मध्ये काढली. शाळेसाठी नवीन कृष्ण मित्र आणि कालीकृष्ण मित्र या दोन भावांनी आर्थिक मदत केली. ही शाळा कालीकृष्ण हायस्कूल या नावाने चालू आहे. मुंबईत पारशी लोकांनी १८४९ मध्ये मुले आणि मुलींसाठी पहिली सहशिक्षण शाळा काढली, पण काही दिवसातच या शाळेच्या मुलांसाठी आणि मुलींसाठी अशा दोन शाखा निर्माण झाल्या.

सावित्रीबाईंच्या शाळेत सुरूवातीला सहा मुली होत्या, पण १८४८ साली ही संख्या ४०-४५ पर्यंत जाऊन पोहचली. या यशस्वी शाळेचे स्वागत सनातनी उच्च वर्णीयांनी ''धर्म बुडाला... जग बुडणार... कली आला... असे सांगून केले. सनातन्यांनी विरोध केला अंगावर शेण फेकले. काही उन्मत्तांनी तर अंगावर हात टाकण्याची भाषा केली. पण अनेक वर्ष संघर्ष करत हा सावित्रीबाईंचा शिक्षण प्रसाराचा उपक्रम चालूच राहिला. त्यासाठी त्यांना घर सोडावे लागले. सगुणाऊ सोडून गेली. अनेक आघात होऊनही सावित्रीबाई डगमगल्या नाहीत. त्या ठामपणे आपला पदर कसून या कार्याला उभे राहिल्या.

शिक्षणाच्या प्रसारासाठी अन्य सामाजिक क्षेत्रातही काम करणे गरजेचे आहे, स्त्रियांच्या आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे हे सावित्रीबाईंनी ओळखले. काही क्रुर रूढींनाही त्यांनी आळा घातला. बाल-जरठ विवाह प्रथेमुळे अनेक मुली वयाच्या १२ ते १३ व्या वर्षी विधवा व्हायच्या. ब्राह्मण समाजात विधवा पुनर्विवाह अजिबात मान्य नव्हता. पतीच्या निधनानंतर अशा विधवांना सती जावे लागे किंवा मग त्यांचे केशवपन करून कुरूप करण्यासाठी करत. विरोधाचा अधिकार नसलेल्या या विधवा म्हणून समाज छळ करणार, जन्माला येणाऱ्या मुलाला यातनांशिवाय काहीच मिळणार नाही. अशा विचारांनी या विधवा आत्महत्या करत. किंवा भ्रुणहत्या करण्यासाठी त्या स्त्रियांचा नाईलाज व्हायचा...

ज्योतीरावांनी व त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी या समस्येवर उपाय म्हणून बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू केले. सावित्रीबाईंनी ते समर्थ पणे चालवले. फसलेल्या वा बलात्काराने गरोदर राहिलेल्या विधवांचे त्या बाळंतपण करत. या बालहत्या प्रतिबंधक गृहातील सर्व अनाथ बालकांना सावित्रीबाई आपली मुले मानत. याच ठिकाणी जन्मलेल्या काशीबाई या ब्राह्मण विधवेचे मुल यांनी दत्तक घेतले. त्याचे नाव सावित्रीबाईंनी जिव्हाळ्याने व प्रेमाने यशवंत असे ठेवले व त्या मुलाचा सांभाळ केला.

केशवपने बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करणे व त्यांचा संप घडवून आणणे, विधवा पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी प्रयत्न करणे अशी अनेक कामे सावित्रीबाईंनी कल्पकतेने पार पडली. सत्यशोधक समाजाच्या कार्यातही सावित्रीबाईंचा मोठा सहभाग असे. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या निधनानंतर (इ.स.१८९०) सावित्रीबाईंनी सत्यशोधक समाजाच्या कार्याची धुरा वाहिली. आपल्या विचारांचा प्रसार त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून केला. 'काव्यफुले' व 'बावनकशी', 'सुबोध रत्नाकर' हे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले. पुढील काळात त्यांची भाषणेही प्रकाशित करण्यात आली.

इ.स.१८९६ सालातल्या दुष्काळात सावित्रीबाईंनी समाजाला सत्कार्याचा आदर्श घालून दिला. पोटासाठी शरीर विक्रय करणाऱ्या बाया, बापड्यांना दुष्टांच्या तावडीतून सोड्वून त्यांनी त्यांना सत्यशोधक कुटुंबात आश्रयास पाठविले. त्यांच्या कार्याला हातभार म्हणून पंडिता रमाबाई, गायकवाड सरकार अशा लोकांनी मदतीचा हात पुढे केला.

इ.स.१८९६ - ९७ साला दरम्यान पुणे परिसरात प्लेगच्या साथीने धुमाकुळ घातला. हा जीवघेणा आजार अनेकांचे जीव घेऊ लागला. हा रोग संसर्गजन्य आहे. हे कळाल्यावर ब्रिटीश शासनाने जबरदस्तीने संभाव्य रूग्णांना वेगळ काढून स्थानांतरित करण्याचा खबरदारीचा उपाय योजला. यातून उद्‌भवणारे हाल ओळखून सावित्रीबाईंनी प्लेग पिडीतांसाठी पुण्याजवळ वसलेल्या ससाणे यांच्या माळ्यावर दवाखाना उभा करून सुरू करण्यात आला. त्या रोग्यांना व रोग्यांच्या कुटुंबियांना आधार देऊ लागल्या. प्लेगच्या रोग्यांची सेवा करतांना सावित्रीबाईंनाही प्लेग झाला.

सावित्रीबाईंनी ज्योतिबांच्या सर्व कार्यात हिरीरीने भाग घेतला. स्त्रियांनी शिकावे हे त्यांचे ब्रीद वाक्य होते. प्लेग या आजाराने पिडीत असलेल्या लोकांना त्या सावरू लागल्या. त्यांच्यासाठी जीवाच रान सावित्रीबाई करू लागल्या. प्लेगची भयंकर साथ आली असतांना त्यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता प्लेगची लागण झालेल्यांसाठी काम केले. दुदैवाने त्या स्वत:च प्लेगच्या भीषण रोगाच्या बळी ठरल्या.

स्त्रियांचे, स्वत:च्या वेगळेपणाची जाणीव प्रकर्षाने व्यक्त करणारे व स्वत्वाचा शोध घेऊ पाहणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. सहाजिकच पुरुषी साहित्यातून ते स्वरूपात वेगळे ठरते.. तथापी स्त्रीवादी साहित्य असेही व्यापक अर्थाने म्हणता येईल. वास्तविक साहित्याच्या अविष्कारातील कोणत्या साहित्याला स्त्रीवाद म्हणता येईल. हा एक गुंतागुंतीचा प्रश्न आहे. परंतु एवढे निश्चित म्हणता येईल मानव म्हणजे पुरूष स्त्री हे त्याचे उपांग ह्या विचाराला छेद देणारे, त्याबद्दल प्रश्न उपस्थित करणारे, त्याला स्त्रीवादी साहित्य म्हणता येईल.

पुणे येथील हे शिक्षण कार्य व समाज कार्य पाहून सन १८५२ मध्ये इस्ट इंडिया कंपनी सरकारने फुले दांपत्यांना मेजर कॅन्डी यांच्या हस्ते जाहीर सत्कार केला होता. आणि भारतातल्या त्या पहिल्या महिला शिक्षिकेने आपले शिक्षण देण्याचे व्रत चालुच ठेवले. त्यांनी त्यांनी 'गृहिणी' नावाच्या मासिकात काही लेखही लिहिले आहेत.

पेशवाईमधील सामाजिक जीवन, सांस्कृतिक जीवन अशा विविध विषयांवर सावित्रीबाईंनी काव्यरचना केली. सावित्रीबाईंचा पहिला काव्यसंग्रह 'काव्यफुले' १८५४ मध्ये प्रसिद्ध झाला तर दुसरा काव्यसंग्रह 'बावन्नकशी', 'सुबोध रत्नाकर' हा ज्योतिबांच्या निधनानंतर म्हणजे म्हणजे १८९१ साली प्रसिद्ध झाला. सावित्रीबाईंनी पुष्कळ असे स्फुटलेखनी केले आहे. 'काव्यफुले' हा पहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. त्यावेळी आधुनिक काव्याचे जनक म्हणून साहित्य समीक्षकांनी ज्यांचा गौरव केला. त्या



Created by Universal Document Converter

कृष्णाजी केशव दामले उर्फ केशव सुतांचा जन्मही झाला नव्हता.

''जयाचे मुळे मी कविता रचीते
जयाचे कृपे ब्रह्म आनंद चित्ते
जयाचे दिली बुद्धीही सावित्रीला
प्रणाम करी मी यती ज्योतीबाला''

सावित्रीबाईंनी आपल्या संपूर्ण काव्याची प्रेरणाच या कवितेत स्पष्ट केली आहे. ज्यांच्यामुळे सावित्रीबाई कविता करू शकल्या. ज्यांच्या कृपेने त्यांना ब्रह्मानंद झाला; ज्यांनी कविता रचण्याची बुद्धी दिली ते दुसरे तिसरे कोणी नसून ते फक्त ज्योतीबाच आहेत. त्यामुळे त्या ज्योतिबालाच प्रथम प्रणाम करतात. १८११ साली सावित्रीबाईंनी ज्योतीरावांच्या पश्चात ज्योतीरावांचे एक पद्यमय चरित्र लिहिले आहे. त्यांच्या काव्य संग्रह खुप प्रसिद्ध आहेत. त्यांच्या या ज्ञानामुळे त्यांना ज्ञानज्योती म्हणू लागले. समाजात राहून त्या समाजाचे ऋण फेडत राहिल्या.

समाजाप्रती त्यांच्या अतुल्य अशा योगदानाला कधीही विसरता येत नाही. महिलांच्या शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांच्या कार्यामुळे त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. त्यांच्या या कार्यामुळे व त्यांच्या आत्मविश्वासामुळे त्यांना क्रांती ज्योती असेही म्हणतात.

प्लेग या साथीच्या रोग्यांशी सामना करत त्यांना आधार देत त्यांची सेवा करत आपल्या जीवाची पर्वा न करता त्या रूग्णांची सेवा करत राहिल्या व त्याही त्या प्लेग रोगाच्या आधिन गेल्या. त्यांनाही प्लेग साथीचा रोग झाला. तरीही त्या थांबल्या नाहीत त्या समाजासाठी कार्य करीत राहिल्या. शेवटी १० मार्च १८९७ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

सावित्रीबाईंच्या सामाजिक व स्त्रीवादी विचारातून कार्याबद्दल कृतज्ञता म्हणून १९९५ पासून ३ जानेवारी हा सावित्रीबाईंचा जन्मदिवस हा 'बालिका दिन' म्हणून साजरा केला जातो.

'सावित्रीज्योती' ही फुले दाम्पत्यावरील मालिका सोनी मराठी वाहिनीवर ६ जानेवारी २०२० पासून प्रदर्शित होत आहे. ही मालिका दशमी क्रिएशनची निर्मिती आहे. सावित्रीबाई फुले यांची भुमिका अभिनेत्री अश्विनी कासार साकारत असून जोतीराव फुले यांची भूमिका ओंकार गोवर्धन साकारतात. ''सावित्रीज्योती'' ही मालिका मी बघत असल्याने मी हा निबंध पूर्ण करू शकली. त्यासाठी मी हा निबंध लिहू शकली.

''सावित्रीबाई फुले'' व ''ज्योतिबा फुले'' यांच्यामुळे मी आज शिक्षण घेत असल्याने मी फुले दाम्पत्यांचे मनापासून आभार मानते. धन्यवाद.



Created by Universal Document Converter

# लेखक - मृत्यूंजयकार शिवाजीराव सावंत

कु.सोनल योगेश पाटील
एफ.वाय.बी.ए.

माझे आवडते लेखक मा.श्री.शिवाजीराव गोविंदराव सावंत यांचा जन्म ३१ ऑगस्ट १९४० साली सामान्य शेतकरी कुटुंबात कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा गावात झाला. सावंत उत्कृष्ठ कबड्डीपटू होते. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण आजऱ्यात झाल्यावर त्यांनी कोल्हापूरमध्ये बी.ए.चे प्रथम वर्ष पूर्ण केले आणि मग वाणिज्य शाखेतील पदविका घेतली. टायपिंग, शॉर्टहँडचा कोर्स करून त्यांनी कोर्टात कारकुनची नोकरी केली आणि नंतर ते कोल्हापूरातील राजाराम प्रशालेत १९६२ ते १९७४ या काळात शिक्षक होते.

पुण्यात स्थायिक झाल्यावर १९७४ ते १९८० अशी सहा वर्षे त्यांनी महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण विभागाच्या 'लोकशिक्षण' या मासिकाचे सहसंपादक व नंतर संपादक म्हणून काम केले. १९८३ मध्ये त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली आणि पुढील आयुष्यात फक्त लेखनावरच पूर्ण लक्ष केंद्रित केले.

शिवाजी सावंत हे इ.स.१९९५ पासून महाराष्ट्र साहित्य परिषदेचे काही वर्षे उपाध्यक्ष होते. १९८३ मध्ये बडोदा येथे भरलेल्या 'बडोद मराठी साहित्य संमेलनाच' ते संमेलनाध्यक्ष होते.

※ सावंतांच्या काही कादंबऱ्यांचा आढावा -

राजाराम प्रशालेत अध्यापन करीत असतांनाच त्यांनी मृत्यूंजय (१९६७) ही आपली पहिली कादंबरी लिहिली. कादंबरीत कर्णाच्या अंतरंगात शिरून त्याच्या मनोविश्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. हिंदीतील केदारनाथ मिश्र त्यांचे कर्ण आणि रामधारी सिंह दिनकर ह्यांचे रश्मिरथी ह्या दोन खंडकांव्याचा त्यांनी मृत्यूंजयच्या प्रस्तावनेत कृतज्ञापूर्वक उल्लेख केलेला आहे. ह्या कादंबरीत कर्णाच्या अंतरंगात शिरून त्यांच्या मनोविश्वाचा शोध घेण्याचा प्रगल्भ प्रयत्न त्यांनी केला आहे. महाभारताच्या विराट विश्वातून कर्णाला त्याच्या दु:खी यातनामय आयुष्याला त्याच्या अनेक संदर्भासह वेगळे करून त्यांनी त्याची प्रतिमा साकारली आहे. कर्णामध्ये त्याच्या जन्माच्या आणि त्यानंतरच्या आयुष्यातील अपमानास्पद घटनांच प्रभावातून काही दोष निर्माण झालेला असला तरी तो एक सत्प्रवृत्त, सर्मपणशील पण स्वाभीमानी पुरूष आहे. ज्या कुटुंबात तो आला, त्या कुटुंबातील सर्व नाती तो अत्यंत प्रेमाने आणि जबाबदारीने सांभाळतो. गुरजनांबद्दल त्यांच्या मनात कृतज्ञता आहे, मैत्रीसाठी तो आपले सर्वस्व अर्पण करतो. त्याच्या व्यक्तीमत्त्वाची ही प्रकाशमय बाजू त्यांनी समर्थपणे मांडली. ह्या कादंबरीला वाचकांचा फार मोठा प्रतिसाद मिळाला. त्यांच्या ह्या पहिल्याच कादंबरीने प्रभावी कादंबरीकार म्हणून ज्यांनी प्रतिमा प्रस्थापित केली. ह्या कादंबरीचा बहुतेक भारतीय भाषांतून अनुवादही झाला. तसेच त्यांची छावा (१९७९) आणि युगंधर (२०००) ह्या त्यांच्या नंतरच्या कादंबऱ्या. छावा ही संभाजी महाराजांच्या जीवनावरील तर युगंधर ही भगवान श्रीकृष्णाच्या जीवनावरील कादंबरी आहे. भाव्योदात्त जीवनाबद्दल त्यांना वाटणारा आदर मृत्यूंजय ते युगंधर पर्यंतच्या त्यांच्या तिनही कादंबऱ्यांमधून उत्कृष्टपणे प्रगट होतो. 'छावा' मध्ये जनमानस संभाजी महारांबद्दल निर्माण झालेली नकारात्मक स्वरूपाची प्रतिमा पुसून त्या जागी औरंगजेबाने दिलेल्या क्रुर मृत्यूदंडाच्या शिक्षेला धीरोदात्तपणे सामारे जाणारे आपले राजपद जबाबदारीने आणि विवेकाने सांभाळणारे संभाजी महाराज, ते उभे करतात. त्यासाठी संभाजी महाराजांच्या व्यक्तीमत्त्वाचा आणि त्यांच्या भोवतालच्या परिस्थितीचा ते मानसशास्त्रीय अंगाने विचार करतात. भारतीय ज्ञानपीठाने ह्या कादंबरीचे हिंदी भाषांतर प्रसिद्ध केले आहे. श्रीकृष्णाच्या जीवनातले जे चमत्कार ते वगळून श्रीकृष्ण दाखविणे हा 'युगंधर' लिहिण्याचा त्यांच हेतू होता. श्रीकृष्णासारखा एक माणूस भगवानपदापर्यंत पोहोचतो. त्याचप्रमाणे श्रीकृष्ण हा 'युगंधर' लिहिण्याचा त्यांचा हेतू होता. त्यासारखेच आचरण आपण करू शकू असा विश्वास सर्वसामान्य माणसातही निर्माण होण्याची शक्यता आहे. हे लक्षात घेऊन तो विश्वास जागृत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न आपण केला आहे असे त्यांचे प्रतिपादन होते.

या साहित्यकृतींच्या व्यतिरिक्त सावंत यांनी जे लेखन केले. त्यात 'लढत' (दोन भाग -१९८६) आणि 'संघर्ष' (१९९५) या दोन जीवनकहाण्यांचा अंतर्भाव होतो. 'लढत' ही सहकार महर्षी विठ्ठलराव विखे पाटील यांची तर 'संघर्ष' ही प्रसिद्ध कामगार नेते मनोहर कोतवाल यांची जीवनकहाणी होय. आपल्या जीवनात होती घेतलेल्या कामासाठी ध्यास घेऊन काम करणारी ही माणसे त्यांना चरित्र कथनासाठी योग्य वाटली.

अशी मने असे नमुने (१९७५) आणि 'मोरावळा' (१९९८) मध्ये त्यांनी वेगवेगळ्या माणसांची व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. अशी मने अशी नमुने मध्ये त्यांच्या जीवनाशी एकरूप झालेली, त्यांच्यावर प्रेम करणारी निर्मळ मनाची माणसे त्यांनी रंगविलेली आहेत. तर मोरावाळामध्ये त्यांना भेटलेली शिक्षण, समाजकारण, राजकारण, प्रकाशन साहित्य अशा क्षेत्रांतील कर्तुत्वान माणसे त्यांनी शब्दचित्रित केली आहेत.

मृत्यूंजयचे बीज रूजले...

शिवाजी सावंतांचा जन्म एका शेतकरी कुटुंबात झाला होता. कष्टकऱ्याच्या घरचं वातावरण कसं असणार तसंच त्यांच्या घरी होते. सणवार, देव-धर्म या निमित्तानं आईच्या तोंडून लहानपासून त्यांना पुराणकथा ऐकायला मिळत. या गोष्टींमुळे महाभारतातील घटना, त्यातल्या व्यक्तीविषयीचं त्यांच कुतुहल वाढीस लागलं,



Created by Universal Document Converter

गावातले सण- समारंभ, कक्षा-किर्तन, प्रवचन, भजन, नाटक यात लहानगा शिवाजी रमत होता. त्याला ते आवडत होतं. रूचत होतं. मना आणि कानात साठत होतं. आपल्या आयुष्यात पुढं काय व्हायचय, हे त्या लहानशा वयातही 'माझे ध्येय' या विषयावरील निबंधात 'मला लेखक व्हायचय' हे त्यात स्पष्टपणे लिहिलं होतं.

याच दरम्यान त्यांच्या आयुष्यात एका शाळकरी घटना घडली. त्याने त्यांच्यातला लेखक 'मृत्यूंजयकार' जागा झाला. हायस्कुलच्या स्नेहसम्मेलनात शिवाजी आणि त्यांच्या मित्रांनी शि.म.परांजपे लिखित 'अंगराज कर्ण' ही एकांकीका सादर करायची ठरवली. या एकांकिकेतील आपल्या श्रीकृष्णाची भूमीकेचं सगळ्यांकडून कौतुक झालं तरी शिवाजी मनातून अस्वस्थ झाला होता. परांजपेंनी लिहिलेली कर्णाचे संवाद त्याला मुख्य भूमिका असलेल्या श्रीकृष्णाच्या संवादापेक्षाही बेचेन करीत होते. कारण कर्णाचे ते संवाद बिनतोड आणि तर्कशुद्ध होते. लहानग्या शिवाजीच्या काळजात ते घट्ट रूतून बसले. 'मृत्यूंजय' या त्यांच्या साहित्यकृतीचं बीज त्यांच्याही नकळत अशा प्रकारे त्या शाळकरी वयात रूजू लागलं होतं.

१९५८ साली शिवाजीने मॅट्रिकची परीक्षा दिली व प्रथम वर्गात तो उत्तीर्ण झाला. कोल्हापूरातून १९६० साली टंकलेखन व शॉर्टहॅण्डचा डिप्लोमा त्यांनी पूर्ण केला. त्यामुळे त्यांना लगेचच कोल्हापुरच्या वरिष्ठ जिल्हा सत्र न्यायालयात नोकरी मिळाली.

पण शिवाजीरावांच मन काही कोर्टात रमेना त्यांना महाभारताविषयीच्या अनेक ग्रंथाच वाचन करायचं होते. त्यांना कृष्ण आणि कर्ण खुणावत होता. आपण शिक्षक म्हणून नोकरीस लागलो तर सतत ग्रंथसंपर्क येईल व आपल्या आवडीच्या विषयाबद्दल संबंधितांशी चर्चा करता येईल असं त्यांना वाटलं. सुदैवानं त्यांना १९६२ साली राजराजा हायस्कुलमध्ये टंकलेखन व लघुलेखन शिकवणाऱ्या शिक्षकाची नोकरी मिळाली. हायस्कूलसमोरच्या करवीर नगर वाचन मंदिराचे ग्रंथालय आणि तिथून काही अंतरावरील गोखले महाविद्यालयाच्या ग्रंथालयात त्यांची वहिवाट सुरू झाली. कर्ण व महाभारताविषयीच्या अनेक ग्रंथांच वाचन करायचं होतं. त्यांना कृष्ण आणि कर्ण खुणावत होता. आपण शिक्षक म्हणून नोकरीस लागले. संशोधकाच्या भूमिकेतून टिपण काढली. संदर्भग्रंथ तपासले अधिकारी व्यक्तींशी चर्चा केल्या. त्यांचा जणू महाभारतानं ताबाच घेतला होता. १९६० ते १९६३ अशी तीन वर्षे त्यांनी अफाट वाचन केले. चिंतन केलं. याच दरम्यान त्यांनी हिंदी विषयाची पुणे विद्यापिठाची एक.वाय.बी.ए.ची परीक्षा दिली आणि ते उत्तीर्ण झाले. या अभ्यासातच त्यांच्या हाती हिंदीतलं प्रख्यात कवी प्रभात उर्फ केदारनाथ मिश्र यांनी लिहलेलं कर्ण हे खंडकाव्य पडलं. कर्णकथेचं जे बीज त्यांच्या मनात रूजू लागल होतं. त्याला या खंडकाव्यानं अंकुर फुटु लागले. या खंडकाव्याची त्यांनी अनेक पारायण केली. कर्णानं त्यांना अक्षरश: झपाटून टाकलं.

१९६३ मध्ये शिवाजीरावांनी प्रदिर्घ चिंतन, मनन, वाचन केल्यानंतर 'मृत्यूंजय' ही कादंबरी प्रत्यक्ष लिहायला घेतली. त्यावेळी ते कोल्हापुरात पोलीस क्वार्टसमध्ये थोरले बंधू विश्वासराव यांचे सोबत बढ्या चाळीत राहत होते. ते काय लिहत होते हे त्यांच्या भावाखेरीज कुणालाच माहित नव्हतं.

शिवाजीरावांचे सहशिक्षक पण वयानं ज्येष्ठ स्नेही आर.के.कुलकर्णी यांच्यासोबत ते नेहमीच फिरायला जात असत. एकेदिवशी त्यांनी मित्राला आपल्या मनातलं गुढ सांगितलं आणि त्यांच्या मित्राला देखील त्यांनी लिहलेलं पटलं. त्यानंतर कोल्हापुरातील भाऊसिंगच्या रस्त्यावरच्या टाऊन हॉल बागेत आर.के. आणि शिवाजीरावांची वाचनाची बैठक अधुनमधुन आकार घेऊ लागली. मग शिवाजीरावांनी विचार केला की जे आपण लिहिणार आहोत ते ज्या ठिकाणी घडलं हे तिथे आपण प्रत्यक्ष भेट दिली आणि मग ते सगळं अनुभवून त्या शब्दांचा शुभारंभ केला तर? त्यांचा हा विचार आर.के.ना सुद्धा पटला आणि आर.के.नी त्यांच्या कुरुक्षेत्राला जाण्याची व्यवस्था लावून दिली.

कुरुक्षेत्रातील २ महिन्यांच्या या मुक्कामात त्यांनी अनेक ठिकाणी भेटी दिल्या. बुजुर्गांच्या मुलाखती घेतल्या. शंकानिरसन करून घेतलं. उपलब्ध संदर्भ तपासून पाहिले. मग भारताबाबत त्या परिसरातील लोककथांची माहिती घेतली. पण येतांना गोकुळ, वृंदावन, मथुरेला जाऊन त्यांनी आवश्यक ती छायाचित्र काढली. दोन महिन्यांच्या प्रवास आणि प्रत्यक्ष कुरुक्षेत्रावर राहुन केलेला अभ्यास त्याअगोदर वर्षानुवर्षे केलेलं वाचन आणि चिंतन, जाणत्या लोकांशी घडलेल्या चर्चा हे सगळ संचित बरोबर घेऊन ते कोल्हापुरात परतले. या मंतरलेल्या वातावरणात 'मृत्यूंजय' चं दिड हजार पानांचे भरगच्च हस्तलिखित साकारलं होतं. शिवाजीरावांनी मृत्यूंजय लिहिली. हा मराठी अर्वाचीन साहित्यातील चमत्कारच म्हणावा लागेल.

१९६७ च्या गणेश उत्सवात प्रकाशित झालेल्या 'मृत्यूंजय' कादंबरीनं मराठी साहित्य विश्वातील अनेक विक्रम मोडित काढले. अवघ्या साडेतीन महिन्यात तीन हजारांची पहिली आवृत्ती संपली. पुढं अनेक भाषांची शिखर आणि मानसन्मानानं 'मृत्यूंजय' न पदार्पण केलं. त्यातून 'मृत्यूंजयकार' ही शिवाजीरावांची ओळख अजरामर झाली. त्यांना व त्यांच्या या साहित्यकृतीला भारतीय ज्ञानपीठाचा मुर्तीदेवी पुरस्कार व अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

१८ सप्टेंबर २००२ रोजी या श्री.शिवाजीराव सावंत यांच हृदयविकाराच्या झटक्यानं दु:खद निधन झालं. आणि मृत्यूंजयकार नावाचं हे वादळ कायमचं शांत झालं. शिवाजीरावांनी मृत्यूंजय, छावा आणि त्यांच्या अनेक साहित्य कृतीमधून समाजाला नवी दिशा, नवे विचार दिले. आपल्या लिखाणातून उत्कंठापूर्वक अनुभव त्यांनी समाजापुढे ठेवला. त्यांच्या या साहित्यकृती मानवी जीवनाला नैतिक आचरण ठेवायला शिकवतात. त्यांनी साठवून ठेवलेला हा अमुल्य वारसा कायम अजरामर राहिल. अशा या महान साहित्यकारांना माझे शतश: नमन...



Created by Universal Document Converter

# माझा आवडता लेखक : आचार्य प्र.के.अत्रे

कु.कोमल राजेंद्र कोकाटे
एस.वाय.बी.एस्सी.

आचार्य अत्रे हे मराठीतील प्रख्यात लेखक, कवी, शिक्षणतज्ज्ञ, मराठीचे संपादक आणि सर्वात महत्वाचे म्हणजे प्रसिद्ध वक्ते होते. त्यांच्या श्यामची आई या मराठी चित्रपटाला १९५४ चा सर्वोत्कृष्ट फीचर चित्रपटाचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला. त्यांचे विनोदी – नाटक, मोरूची मावशी नंतर गोविंदा आणि रवीना टंडन अभिनीत हिंदी चित्रपट, आंटी नं.१ (१९९८) मध्ये रूपांतरीत झाले.

आचार्य अत्रे यांचे संपूर्ण नाव प्रल्हाद केशव अत्रे असे होते. आचार्य अत्रे हे उभ्या महाराष्ट्राचे लाडके व अष्टपैलू व्यक्तिमत्व होय. मराठी भाषेतील श्रेष्ठ विनोदी लेखक, नाटककार, झुंजार पत्रकार, प्रसिद्ध वृत्तपत्र संपादक, यशस्वी चित्रपट निर्माते व दिग्दर्शक अशा अनेक नात्यांनी ते मराठी जनतेला परिचित आहेत. एक प्रभावी व विनोदी वक्ते म्हणूनही ते प्रसिद्ध होते. त्यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील सासवडजवळील काठीत या गावी १३ ऑगस्ट १८९८ रोजी झाला.

त्यांचे शिक्षण सासवड, पुणे, मुंबई येथे झाले. पदवीपर्यंतचे शिक्षण घेतल्यानंतर उच्च शिक्षणासाठी ते इंग्लंडला रवाना झाले. तेथे त्यांनी शिक्षणशास्त्रातील टी.डी.ही लंडन विद्यापीठाची पदवी संपादन केली. अत्र्यांचे शिक्षण बी.ए., बी.टी., टी.डी.(लंडन) इतके झाले होते. आचार्य अत्रे यांनी आपल्या जीवनाची सुरूवात शिक्षक म्हणून केली. ते हाडाचे शिक्षक होते. शिक्षणक्षेत्रातील त्यांनी अनेक नवनवे प्रयोग केले. महाराष्ट्रातील एक नामवंत शिक्षणतज्ज्ञ म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो.

साहित्याच्या क्षेत्रात आचार्य प्र.के.अत्रे यांनी असामान्य कर्तुत्व गाजविले. एक यशस्वी व प्रतिभाशाली नाटककार म्हणून त्यांना विशेष लौकिक प्राप्त झाला होता. अत्रे यांच्या नाट्यक्षेत्रातील कर्तबगारीचे मुख्य वैशिष्ट्य असे की, मराठी रंगभूमीच्या पडत्या काळात त्यांनी नाट्यक्षेत्रात पदार्पण केले आणि आपली एकापाठोपाठ एक अशी यशस्वी नाटके रंगभूमीवर आणून त्यांनी मराठी रंगभूमीला पूर्वीचे वैभव पुन्हा एकदा प्राप्त करून दिले.

अशा प्रकारे नाट्यक्षेत्र गाजवून अत्र्यांनी त्या क्षेत्रातून स्वेच्छेने निवृत्ती स्वीकारली; परंतु दिर्घ कालावधीच्या विश्रांतीनंतर ते पुन्हा एकदा नाटकाकडे वळले आणि यावेळीही आपल्या पुनरागमनाने त्यांनी रंगभूमी दणाणून सोडली. साष्टांग नमस्कार,लग्नाची बेडी, जग काय म्हणेल? भ्रमाचा भोपाळा, मोरूची मावशी, उद्याचा संसार, तो मी नव्हेच, डॉक्टर लागू ही त्यांची रंगभूमीवर गाजलेली काही नाटके होत.

आचार्य अत्रे हे विडंबन कवी म्हणूनही लोकप्रिय झाले. त्यांनी 'केशवकुमार' या नावाने विडंबनात्मक कविता लिहिल्या. 'झेंडूची फुले' हा त्यांचा विडंबनात्मक कवितांचा संग्रह अतिशय गाजला. आचार्यांच्या विडंबनकाव्याचे अनुकरण करण्याचा प्रयत्न त्यानंतर अनेकांनी केला; पण आचार्याइतके यश दुसऱ्या कोणत्याही कवीला मिळवता आले नाही. झुंजार कोणत्याही कवीला मिळवता आले नाही. 'झुंजार पत्रकार' या नात्यानेही आचार्य अत्रे महाराष्ट्रीय जनतेला चांगलेच परिचित आहेत. पत्रकारितेच्या क्षेत्रात महाराष्ट्रांत अत्यंत अभिमानास्पद अशी परंपरा निर्माण झाली आहे.

या परंपरेतील एक महत्वाचे मानकरी असा अत्र्यांचा रास्त गौरव केला जातो. त्यांनी 'नवयुग' (१९०४) हे साप्ताहिक व 'मराठा' (१५ नोव्हेंबर १९५६) हे दैनिक चालविले होते. त्यापैकी 'मराठा' ने तर मराठी वृत्तपत्रसृष्टीच्या इतिहासत स्वत:चे आगळे वेगळे स्थान निर्माण केले होते. आचार्य अत्र्यांच्या 'मराठा' तील अग्रलेख मराठी वाङमयाची अमोल लेणी ठरले आहेत. मराठी चित्रपट सृष्टीतलेही आचार्य अत्र्यांनी मोठे कर्तृत्व गाजविले होते.

त्यांनी निर्माण केलेली ब्रह्मचारी, ब्रँडीची बाटली, वसंतसेना, श्यामची आई, महात्मा फुले इत्यादी चित्रट अतिशय लोकप्रिय ठरले. त्यांच्या 'श्यामची आई' या चित्रपटाला पहिले राष्ट्रपती पारितोषिक मिळाले होते. 'महात्मा फुले' हा त्यांच आणखी एक चित्रपट राष्ट्रीय पारितोषिकाचा मानकरी ठरला होता. अष्टपैलू व्यक्तिमत्व आचार्य अत्र्यांनी कथा, कादंबरी, आत्मचरित्र, प्रसांगिक स्फुटलेखन अशा अन्य वाङमयप्रकारांतही विपुल लेखन केले आहे. अत्र्यांची प्रतिभा अष्टपैलू होती.

त्यांनी जीवनाच्या विविध क्षेत्रांत चौफेर कर्तुत्व गाजविले होते. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातील त्यांची कामगिरी तर अतुलनीय अशीच होती. संयुक्त महाराष्ट्र समितीचे ते एक प्रमुख नेते होते. आपल्या घणाघाती वक्तृत्वाने आणि प्रभावी लेखणीने त्यांनी त्या काळात संपूर्ण महाराष्ट्र दणाणून सोडला होता. आचार्य अत्रे यांनी महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातही महत्वपूर्ण भूमिका बजावली होती. ते काही काळ पुणे नगरपालिकेचे सभासद होते. स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेसच्या प्रचारकार्यात त्यांनी भाग घेतला होता.

महाराष्ट्राच्या विधानसभेवर सन १९५७ मध्ये व १९६२ मध्ये अशी दोन वेळा त्यांची निवड झाली होती. लोकप्रतिनिधी या नात्याने विधानसभेतही त्यांनी प्रभावी कामगिरी बजावली होती. याशिवाय अनेक जनआंदोलनात त्यांचा सहभाग होता.अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. आचार्य अत्रे यांचा मृत्यू १३ जून १९६९ ला झाला.

आचार्य अत्रे यांनी विपुल लेखन केले आहे. त्यांचे काही महत्त्वाची पुस्तके आहेत ती पुढीलप्रमाणे त्यामध्ये साष्टांग नमस्कार, पराच कावळा, पाणिग्रहण, गुरूदक्षिणा, कवडीचुंबक, वंदे मातरम्, जग काय म्हणेल, घराबाहेर, उद्याचा संसार, मोरूची मावशी, ब्रह्मचारी, भ्रमाचा भोपळा, प्रीतीसंगम, मी मंत्री झालो, मी उभा आहे, बुवा तेथे बाया, डॉक्टर लागू, लग्नाची बेडी, तो मी नव्हेच इत्यादी नाटके झेंडूची फुले व गीतगंगा हे आहेत.

कथासंग्रहामध्ये कशी आहे गंमत, साखरपुडा, वामकुक्षी,



Created by Universal Document Converter

वेड्यांच बाजार, बत्तीशी आणि इतर कथा, ब्रँडीची बाटली इत्यादी आहेत.

ग्रंथामध्ये कऱ्हेचे पाणी व मी कसा झालो? आत्मचरित्रपर ग्रंथ, आषाढस्य,प्रथम दिवसे,केल्याने देशाटन, मराठी माणसे मराठी मने, सिंहगर्जलना हास्यकथा, हंशा आणि टाळ्या, अत्रे उवाच, विनोद गाथा, सुर्यास्त, मुद्दे आणि गुद्दे, समाधीवरील अश्रू, हुंदके, दूर्वा आणि फुले साहित्य यात्रा आहेत.

त्यांच्या बद्दल अजून सांगायचे म्हटले तर मराठीतील प्रसिद्ध लेखक, कवी, नाटककरार, संपादक, पत्रकार, मराठी व हिंदू चित्रपट निर्माते, शिक्षण तज्ज्ञ, राजकारणी व वक्ते होते. ते संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील प्रमुख नेते होते. अत्र्यांनी १९२३ साली अध्यापन मासिक सुरू केले. १९२४ मध्य मुंबईच्या सरकारी ट्रेनिंग कॉलेजमध्ये शिक्षणशास्त्राचे प्रशिक्षण घेऊन बी.टी. परीक्षेत वर्गात प्रथम क्रमांक त्यांनी मिळविला. त्यांनी १९२६ मध्ये रत्नाकर तर १९२९ मध्ये मनोरमा मासिक सुरू केले. १९३४ मध्ये नारद-नारदी चित्रपटाची कथा व संवादाचे अत्रे यांनी लेखन केले. १९३५ मध्ये नवे अध्यापन मासिक सुरू केले. १९३७ मध्ये धर्मवीर पटकथा (हंस पिक्चर्ससाठी) सुरू केली. १९३७ मध्ये पुणे नगरपालिकेनत निवडून आल्यानंतर शिक्षकांसाठी गांधी ट्रेनिंग कॉलेज सुरू केले. १९३८ मध्ये 'हंस' साठीच ब्रह्मचारी कथा लेखन केले. १९३९ मध्ये इलाखा शिक्षक मासिक सुरू केले. १९४० मध्ये नवयुग पिक्चर्सतर्फे लपंडाव चित्रपटाची कथा अत्र्यांनी लिहिली. १९ जानेवारी १९४० मध्ये नवयुग साप्ताहिक १९६२ पर्यंत चालू ठेवले. २ जून १९४७ मध्ये जयसिंग सांजदैनिक मासिक तर १५ नोव्हेंबर १९५६ मध्ये मराठा दैनिक सुरू केले.

अत्र्यांनी मुंबईतील सँडर्स्ट हायस्कूलमध्ये इंग्रजी व गणित शिकवले. फोर्टमधल्या भरडा न्यू हायस्कूल संस्कृत शिक्षक म्हणून कार्यरत राहिले. पुण्यामधील कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत १८ वर्षे मुख्याध्यापक राहिले.

त्यांनी पुण्यातील राजा धनराज गिरीजी व मुलींची आगरकर हायस्कूलची स्थापना केली. नवयुग वाचनमाला (प्राथमिक शाळेसाठी) व अरूण वाचनमाला (दुय्यम शाळेसाठी) ह्या दोन क्रमिक पुस्तकाच्या माला लिहिल्या. अत्र्यांनी दिग्दर्शित केलेल्या श्यामची आई चित्रपटाला १९५४ साली सुरू झालेल्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात सर्वोत्कृष्ट चित्रपटाचे पहिले सुवर्ण कमळ मिळाले होते.

त्यांनी उद्याचा संसार, एकच प्याला, विडंबन, कवडी चुंबक, गुरूदक्षिणा, घराबाहेर, डॉ.लागू, जग काय म्हणेल?, तो मी नव्हेच, पराचा कावळा, प्राणीग्रहण, प्रल्हाद (नाटक), प्रीतीसंगम, भ्रमाचा भोपळा, ब्रह्मचारी, मी उभा आहे, मी मंत्री झालो, मारूची मावशी, लग्नाची बेडी, वंदे भारतम, वीरवचन, शिवसमर्थ इत्यादी नाटके लिहीली.

त्यांनी चांगुणा, मोहित्यांचा शाप ह्या कादंबऱ्या लिहिल्या. त्यांना विष्णूदास भावे पुरस्कार मिळाला.

शाळांसाठी क्रमिक पुस्तके म्हणून आचार्य अत्र्यांनी मराठी भाषेत विपुल लेखन केले असून त्यांनी अनेक पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. त्यांनी आणि शंकर केशव कानेटकर (कवी गिरीश) यांनी संपादित केलेली अरूण वाचनमाला नावाची मराठीची क्रमिक पुस्तके शाळेच्या इंग्रजी पहिली ते इंग्रजी, पाचवी (हल्लीची पाचवी ते नववी) च्या अभ्यासक्रमांत होती, सन १९३४ साली निघालेल्या या क्रमिक पुस्तकासारखीच सुरेख पुस्तके त्यापूर्वी आणि त्यानंतर कधीही निघाली नाहीत, असे शिक्षकांचे आणि पालकांचे मत आहे. ही पुस्तके पहायला मिळणेही अशक्यप्राय झाल्याने, डिंपल प्रकाशनाने या पुस्तकांची नवीन पुनमुद्रित आवृत्ती आचार्य अत्रे यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त १३ ऑगस्ट २०१७ रोजी बाजारात आणली. आचार्य अत्रे यांचे नवयुग मराठा साप्ताहीकाचा पहिला अंक १९०४ हा २१ जानेवारी रोजी प्रकाशित झाला.

आचार्य अत्रे आणि गिरीश दोघेही हाडांचे दृष्ट्चे शिक्षक होते. त्यावेळी ते अनुक्रमे कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे हायस्कूल आणि न्यू इंग्लिश स्कुल पुणे येथे मराठीचे अध्यापक होते. अत्रे तर लंडनहुन शिक्षणशास्त्रातील उच्च पदवीका घेऊन परतले होते; आणि शाळेचे मुख्याध्यापक होते. तेंव्हा अशा जाणकारांच्या अनुभवातून ही पुस्तके तयार झाली. आणि एखाद्या दिपस्तंभाप्रमाणे अवघ्या शिक्षण क्षेत्राला दिशादर्शकाचे काम करू लागली. २०१७ साली ही या पुस्तकांतील कल्पना कालसुसंगत असल्याचे जाणवते.

त्यांनी शिक्षणाची व अध्यापनशास्त्राची तत्वे लक्षात घेऊन तयार केली आहेत. पुस्तकांची रचना करतांना कला आणि वाङमय हा मुख्य दृष्टीकोन ठेवला आहे. पुस्तके मनोरंजक करण्याच्या प्रयत्नात फार सोपी होतात आणि शैक्षणिकदृष्ट्या निरूपयोगी ठरतात. 'मनोरंजकत्व म्हणून सुलभत्व नव्हे!' गद्य-पद्य लेखनातील विविध फुलारे, छटा आणि तऱ्हा यांचा मनोज्ञ संगम या पुस्तकांत अनुभवायला मिळेल. सारांश, राष्ट्रीय, महाराष्ट्रात आणि मानवी अशा जाणकारांना प्रतीत होईल.

विष्णूदास भावे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ सांगलीची अखिल भारतीय नाट्य विद्यामंदिर समिती ही इसवी सनाच्या १९६० सालापासून विष्णुदास भावे पुरस्कार देत आली आहे. आचार्य अत्रे यांना हा पुरस्कार मिळाला आहे. आचार्य अत्रे यांना स्वत:ला फारसे पुरस्कार मिळाले नसले तरी त्यांच्यानावाने आचार्य अत्रे प्रतिष्ठान (पुणे) यासारख्या अनेक संस्था आचार्य अत्रे पुरस्कार देतात. अशोक हांडे यांची संकल्पना, लेखन व दिग्दर्शन असलेला 'अत्रे - अत्रे, सर्वत्र हा अत्रे यांची संगीतमय जीवनकथा सांगणारा कार्यक्रम आहे. 'मी अत्रे बोलतोय' हा एकपात्री कार्यक्रम करणारे अनेकजण आहेत. सदानंद जोशी हे त्यापैकी एक प्रमुख डॉ.अनंत एस.परांजपे हे देखील 'मी अत्रे बोलतोय' करतात. दरवर्षी आचार्य अत्र्यांच्या जन्मदिनी म्हणजे १३ ऑगस्ट रोजी सासवड येथे आचार्य अत्रे साहित्य संमेलन भरते. अनेक कार्यक्रमासोबत त्या संमेलनात अत्र्यांच्या नावाचे काही पुरस्कार दिले जातात. आचार्य अत्रे यांच्या संपूर्ण पुस्तकांचा दांडगा अभ्यास असलेले दिलीप देशपांडे हे आचार्य अत्रे यांच्यावर बेतलेला 'अष्टपैलू अत्रे' या एकपात्री नाट्यप्रयोग सादर करतात. थोर आहात आपण आचार्य अत्रे तुमच्या विषयी सांगायला शब्द सुद्धा अपुरेच आहेत, अशा या माझ्या आवडत्या लेखकाला माझा प्रणाम!



Created by Universal Document Converter



# माझे आवडते पुस्तक : श्यामची आई

कु.कोमल अनिल कोळी
एस.वाय.बी.एस्सी.

मायेच्या हळव्या स्पर्शाने खुलते
नात्यांच्या बंधात धुंद मोहरते...
मन उधाण वाऱ्याचे, गूज पावसाचे
का होते बेभान कसे गहिवरते
मन उधाण वाऱ्याचे

अशा आल्हाददायक मनाला रोजच्या धकाधकीच्या जीवनातून विरंगुळा हवाच, नाही का? म्हणूनच दैनंदिन जीवनातून थोडीसी विश्रांती मिळविण्यासाठी आपल्या मनाला भावणारा, रोजच्या नित्य व्यवहारात बदल घडवून आणणारा रामबाण उपाय म्हणजे 'छंद' प्रत्येकाला कशाचा ना कशाचा तरी छंद असतोच. व्यक्ती तितक्या 'प्रकृती' यानुसार कुणाला गायनाचा, कुणाला प्रवास करण्याचा, तर कुणाला बागकाम करण्याचा छंद असतो. मला मात्र वाचनाचा छंद आहे. वाचनाची गोडी मला लहानपणापासूनच आहे. मोकळा वेळ मिळाला की मी पुस्तकांकडे धाव घेते.

मन रमण्याचे, दु:ख विसरण्याचे, ज्ञानात भर घालण्याचे 'वाचन' हे एकमेव साधन आहे. माझ्या दृष्टीने पुस्तक म्हणजे ज्ञानाचे अद्‌भुत भंडार आहे. वाचन करतांना घटकाभर का होईना आपण रोजचे सगळे व्याप विसरून जातो. रसाळ, मधुर शैलीचा आस्वाद घेतांना साऱ्या जगाचा विसर पडतो. वाचनाचा छंद मला बरेच काही देतो. वाचनामुळे जगाकडे पाहण्याची नवी दृष्टीच मिळाली, विविध विषयांची माहिती मिळाली, ज्ञानकक्षा रूंदावली आणि शब्दसंपत्ती वाढली. आजपर्यंत बरीच पुस्तके वाचले. त्यातील बरीचशी भावली देखील. काही पुस्तकांनी तर थेट मनाच्या अंतरंगात प्रवेश केला. जणू काही माझीच कथा असल्यागत मीच त्यात हरवून गेले.

त्याचप्रमाणे मला आवडलेली पुस्तके म्हणजे डॉ.अब्दुल कलाम यांचे 'अग्निपंख' डॉ. नरेंद्र जाधव यांचे 'आमचा बाप आणि आम्ही', रश्मी बन्सल यांचे 'I have a Dream' शिव खेरा यांचे "You can wine' आणि चेतन भगत यांचे "Two Status' "Three Mistakes of My life'. तसेच नारायण धारप यांचे 'प्राणघातक कंठा' खरंच चांगली पुस्तके मन आकर्षुन घेतात.

माझ्या लहानपणी स्पर्धेत प्रथम क्रमांक आल्यानिमित्त मिळालेल बक्षीस माझ सगळ्यात आवडत पुस्तक 'साने गुरूजींचे श्यामची आई' जे माझ्या बालमनावर सुखद संस्कार घडविणारे, मायाळू, गोड व भावनाप्रधान असं जणू मातृप्रेमाचे महामंगल स्त्रोतचं.

श्यामची आई हे पुस्तक पवित्र आहे. पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितलेल्या आहेत. त्यांच्या आईने त्यांच्या बालमनावर जे विविध संस्कार केले त्यातूनच गुरूजींना जीवन विकास झाला. सर्वांभुती प्रेम करणारा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरूजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सद्‌भावनांनी वाट त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. पुस्तकात साने गुरूजींच्या हृदयात असलेल्या आईबद्दलच्या प्रेम, व्यक्ती व कृतज्ञता या भावना ओतप्रोत उतरल्या आहेत. त्यामुळे हे पुस्तक कृतार्थ झाले, असे म्हणता येईल.

साने गुरूजी नाशिकच्या तुरूंगात असतांना दिवसा कामे करत आणि रात्री जगन्माता, भारत माता व जन्मदात्री माता ह्यांच्या विचारात रंगून जात. मनात मातृप्रेमाचा त्रिवेणी संगम हात असतांना त्या तीर्थामधून अचानक 'श्यामची आई' चा उगम झाला. गुरूजींच्या अंत:करणात जन्मापासून हेलावत असलेले मातेचे प्रेम गोष्टींच्या रूपाने एकदम त्यांच्या मुखातून उसळून बाहेर पडले.

आकाशातून धबधबा गंगा खाली पडावी, तशी गुरूजींच्या लेखणीतून धो धो धो सरस्वती नुसती वाहत होती. अवघ्या पाच दिवसात त्यांनी हे पुस्तक लिहून काढले. तुरूंगात असतांना त्यांनी छत्तीस रात्री लिहिल्या तर बाहेर आल्यावर त्यांनी नऊ रात्री लिहिल्या.

'ममतेचा महिमा' हे या पुस्तकातील मध्यसूत्र आहे. त्याचबरोबर सुसंस्कृत व बालबोध घराण्यातील साध्या, सरळ व रम्य संस्कृतीचे चित्र ही यात आले आहे. श्यामच्या आईच्या आठवणी देतांना श्यामच्या गोष्टी यावयाच्याच, त्याचप्रमाणे श्यामच्या हालचालींची सारी हकीकत त्यातून शेवटी बाहेर पडणाऱ्या अमृतमय अशा मातेच्या प्रेमासाठीच आहे. आईचा एखादा उद्‌गार, एखादा शब्द सांगण्यासाठी श्यामला स्वत:च्या कथांच्या पार्श्वभूमीवर आईला पूर्णपणे प्रकट करण्यासाठी म्हणूनच स्वत:ला प्रकट केले आहे. त्याचे प्रकट होणे म्हणजे ते त्याच्या मातेचेच प्रकट होणे होय.

गुरूजींच्या सवंगड्यांनी त्यांना विचारले, 'गुरूजी' तुमच्या जीवनात हा कस्तुरीचा सुगंध कोठून आला? तुमच्यामध्ये ही सेवानिवृत्ती आणि ही निरहंकारीता कशी निर्माण झाली? गुरूजी अश्रूपूर्ण नेत्रांनी म्हणाले, ''गड्यांनो हे सारे माझ्या आईचे देणे आहे बरे, आई माझा गुरू आणि आई माझा कल्पतरू, ''गाईगुरावंर, फुलपाखरांवर, झाडमांडावर प्रेम करायला तिने मला शिकविले.'' कोड्यांचा मांडा करून कसा खावा अन गरीबीतही आपले सत्व न गमवीत कसे रहावे हे तिनेच मला शिकविले. मी माझ्या आईच्या गुणांचे गाणे तुम्हाला म्हणून दाखवितो. गाणाऱ्याचे ओठ जसे पवित्र झाले, तसे ऐकणाऱ्याचे कानही कृतार्थ झाले असे तिचे गुण.

आपल्या मुलांचे संगोपन कसे करावे ही कला गुरूजींच्या आईला चांगली माहित झाली होती. एकत्रित नि बालबोध घराण्यातील शुद्ध आणि सुंदर परंपरा तिच्या ठायी एकत्रित झाल्या होत्या. सुर्य चंद्राच्या किरणांनी जशी कमळे फुलतात. तशा आईबापाच्या कृत्यांनी मुलांच्या जीवनकळ्या फुलतात हे तिला माहित होते. अश्रूंचा गुरूमंत्रच तिने गुरूजींना दिला. असवून जल सींच सींच प्रेमवेली बोई! 'हा अश्रूंच्या पाण्याने मन शुद्ध करून त्याच्यात प्रेमाची आणि भक्तीची वेल वाटणाऱ्या मीराबाईच्या मंत्र गुरूजींना त्यांच्या आईनेच दिला. आपल्या जीवनवेलीला आत्मशुद्धीच्या आसवांचे शिंपण घालावयाला आईने गुरूजींना लहानपणापासून शिकविले. म्हणूनच त्या वेलीवर देशभक्तीची आणि ईश्वरभक्तीची चंद्रसुर्यासारखी दोन तेजस्वी फुले मोठेपणी उमलली.

मातृभक्त श्याम जेंव्हा पहिल्याच रात्री आईच्या माहेरबद्दलची गोष्टी सवंगड्यांना सांगत असतो, तेंव्हा सुरूवातीलाच तो सांगतो की, ''माझ्या आईचे माहेर जास्त श्रीमंत नव्हते, तरी सुखी होते.



Created by Universal Document Converter

माहेरी खाण्यापिण्याची ददात नव्हती. माझ्या आईवर तिच्या आईबाबांचे फार प्रेम होते. माझ्या आईला माहेरी कोणी आवडी म्हणत, कोणी बयो म्हणत... आवडी! खरेच लहानपणापासून ती सर्वांना आवडत असे. बयो! खरच ती जगाची बयो होती. आई होती. माहेरची गाडीमाणसे पुढे मोठेपणीही जेंव्हा 'बयो' म्हणून हाक मारीत तेंव्हा ती हाक किती गोड वाटे म्हणूनच सांगू; ती हाक मारण्यात असलेला जिव्हाळा ह्रदयालाच काळे!'' असे आईच्या प्रेमाने मधुर, रसाळ व कोमल वर्णन कोणत्या वाङ्मयात वाचायला मिळेल बरे?

'आई! तुझ्याच ठायी सामर्थ्य नंदिनीचे
माहेर मंगलाचे, औदार्य या घरेचे,
नेत्रात तेज नाचे त्या शांत चंद्रिकेचे
वात्सल्य गाढ पोटी त्या मेघमण्डलाचे
वास्तव या गुणांचे आई तुझ्यात साचे''

कवी यशवंत यांनी वर्णन केलेली ही आई जणू गुरूजींच्या जीवनात आचारांचे आणि विचारांचे सौंदर्य निर्माण करणारी, त्यांच्या हळुवार भावनांचे मनोहर काव्य ह्रदयात ओतणाऱ्या श्यामच्या आईच्या आईतच दिसते. फुलांचे वेड गुरूजींनी आपल्या वडिलांपासून घेतले पण फुलांवर प्रेम करायला त्यांच्या आईनेच शिकविले. फुलांच्या कळ्या झाडांवरून तोडू नयेत, फुलांना नीट झाडावर फुलु द्यावे. झाडे म्हणजे फुलांच्या माता, फुले फुलली मग ती देवासाठी तोडावीत. अशा कितीतरी काव्यमय शिकवणी गुरूजींना त्यांच्या आईने दिली.

गुरूजी म्हणत ''मोटारीने धावपळ करीत जाण्यात आपण सृष्टीशी एकरूप होत नाही. मोटारीने प्रवास करण्यापेक्षा बैलगाडीने प्रवास करण्यात अधिक काव्य आहे, असे गुरूजींना वाटे. लाडघरच्या तामस्तीर्याला देवीचा नवस फेडण्यासाठी गुरूजींच्या आईला एकदा जायचे होते.'' म्हणून एका पहाटे गुरूजी आणि त्यांची आई बैलगाडीतून निघाली हे वर्णन गुरूजींच्या शब्दात सांगितले पाहिजे, ''पहाटेची शांत वेळ होती. कृत्तिकांचा सुंदर पुंजाकार आकाशात दिसत होता. बैलांच्या गळ्यातल्या घंटा वाजत होत्या. गाडीमध्ये मी आणि माझी आई दोघेजणच होतो. मी व माझी आई. दोघे अगदी दोघेच होतो. मी आईच्या मांडीत डोके खुपसून निजलो होतो. आई माझ्या केसांमधून आपला हात फिरवत होती. काही वेळाने ती मला थोपटून ओव्या म्हणू लागली.

''घनदाट या रानात, धो धो स्वच्छ आटे पाणी
माझ्या श्यामच्या जीवनी, देव राही ।।''

मायलेकरांचे प्रेमाचे इतके रोमहर्षक चित्र आजपर्यंत कोणत्या कवीने रेखाटले आहे बरे! मनुष्य अन्नावाचुन जगेल, पण प्रेमावाचून जगणार नाही हे गुरूजींच्या ह्रदयातील प्रेमाची भूक त्यांच्या आईने उत्पन्न केली. प्रेम हे जीवनाचे जीवन आहे. गुरूजींच्या ह्या प्रेमाची तऱ्हा ही पण निराळीच होती. ते म्हणत, ''प्रेम घेण्यापेक्षा प्रेम देण्यात परम आनंद आहे.'' लहान अंकुराला जर प्रेमाने वागविले नाही तर ते हजारोंना प्रेम देतो म्हणून प्रेम द्यावे प्रेम घ्यावे अन् जगाला सुखी करून सोडावे.''

या मायलेकरांच्या प्रेमाच्या कितीतरी गोड गोड आणि ह्रदयस्पर्शी गोष्टी 'श्यामच्या आई' मध्ये आहेत! लहानपणी एकदा गुरूजींना त्यांच्या आईने आंघोळ घातली अन् आपल्या लुगड्यानेच त्याचे अंग पुसले. आई त्यांना म्हणाली ''जा देवाची फुले काढ'' गुरूजी म्हणाले ''माझे तळवे ओले आहेत. त्यांना माती लागेल. तुझे ओचे खाली पसर त्यावर मी माझे पाय पुसतो.'' गुरूजी लहानपणी हट्टी होते. आईने आपले ओचे पसरले. त्यांनी त्यावर उडी मारून आपले पाय पुसले. गुरूजी देवघरात गेले तेंव्हा त्यांची आई त्यांना म्हणाली. ''बाळ पायाला घाण लागू नये म्हणून तू जसा जपतोस तसाच मनाला घाण लागू नये, म्हूणन जप हो देवाला सांग शुद्ध बुद्धी दे म्हणून.''

श्यामच्या आईच्या काही स्तुर्तिमय शब्द खरंच मनाला उभारी देऊन जातात. जणू चैतन्याचा सागरच तो! 'श्यामची आई म्हणते. ''पुरूषांच्या ह्रदयात कोमलता. प्रेम, सेवावत्ती, कष्ट करून करण्याची तयारी; सोशिकता, मुकेपणाने काम करणे या गोष्टी उत्पन्न झाल्याशिवाय त्यांचा पूर्ण विकास झाला आहे असे म्हणता येणार नाही. त्याचप्रमाणे स्त्रियांच्या ह्रदयात धैर्य, प्रसंगी कठोर होणे, धीटपणे घरची व्यवस्था पहाणे, हे गुण येतील तेंव्हाच त्याचा पूर्ण विकास झाला असे म्हणता येईल, पुरुषांच्या ह्रदयात स्त्री गुण येणे व स्त्रीजवळ पुरुष गुण येणे म्हणजे विवाह होय.''

गुरुजी म्हणतात, 'माझी आई गेली, परंतु भारत मातेच्या सेवेसाठी मला तयार करून गेली. स्वातंत्र्य युद्धात मातृमोहाने मी पडणार नाही म्हणून ती कदाचित यापासून दूर गेली असेल. सर्व भारतातील माता माझ्या होवोत, एक नव्हे तर अनेक आया मला मिळोत म्हणूनही ती गेली असेल. ही दिव्य दृष्टी मला देण्यासाठी माझ्या आईने आपल्या भिरभिरीत देहाचा पडदा दूर करून टाकला. मानवतेच्या अत्युच्च शिखरावर बसून एखादा महान ऋषी उदात्त उपनिषद उच्चारतो आहे, तसे असे गुरुजींची ही दिव्यवाणी ऐकतांना वाटते. लहान मुलांची आणि विशाल स्वप्ने बघणाऱ्या तरुणांनी जीवने विशुद्ध, प्रेमळ व मातृह्रदयी बनविण्याचे विलक्षण संजीवनी 'श्यामच्या आई' मध्ये आहे.

मानवी जीवनातल्या सर्व सद्‌गुणांनी, सौंदर्याची अन मांगल्याची जणू काही धार काढून ती हया चांदिच्या कासंडीत भरून गुरुजींनी तरूण पिढीच्या हातात दिलेली आहे. म्हणूनच आचार्य अत्रे म्हणतात, ''श्यामची आई ही भारतातल्या मुलाबाळांची अन तरुणांची 'अमर गीताई'च आहे. खरंच''

''आई असते जन्माची शिदोरी
सरतही नाही, उरतही नाही ।''

अध्यापन कार्य, समाजसेवा, स्वातंत्र्ययुद्ध अशा बहुविध क्षेत्रांमध्ये आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणारे आदर्श व्यक्तिमत्व म्हणजे साने गुरुजी ! मातृभूमीच्या सेवेसाठी नोकरीचा राजीनामा – देऊन स्वातंत्र्य समरात स्वतःला झोकून देणारे, अखेरच्या श्वासापर्यंत जनतेच्या सुखासाठी झटणारे 'साने गुरुजी व त्यांना निर्माण करणारी अशी 'श्यामची आई' खरंच थोर आहे. त्यांच्या अंगी विविध गुण ठसवणारी, जागृत करणारी व त्यांना घडविणारी ती माता अमर आहे.

''थोर तुझे उपकार आई
थोर तुझे उपकार ! ''

असे आईच्या प्रेमाचे मधुर, रसाळ व कोमल वर्णन असलेले पुस्तक मला खूप आवडते.



Created by Universal Document Converter

# माझे आवडते पुस्तक (इकिगाई)

**कु.कोमल एकनाथ पाटील**
**एफ.वाय.बी.एस्सी.(कॉम्प्युटर)**

मला पुस्तके वाचायला खुप आवडते. पुस्तक वाचन हा माझा छंद आहे, मी खुप पुस्तके आज वाचली त्यातील बरीच पुस्तके मला आवडलेल्या पुस्तकांमधील एक पुस्तक ते म्हणजे ''इकिगाई''

सध्या वाचनात आलेले इकिगाई हे हेक्टर गार्सीया आणि फ्रान्सिस मोरेल्स यांच्याव्दारा संयुक्त लिहिलेले पुस्तक मला आवडते ते त्याच्या जीवनाविषयीच्या दृष्टांतामुळे यांच्या मराठी अनुवादाला न्याय दिलाय श्री. प्रसाद ढापरे यांनी...!

इकिगाई या जपानी शब्दाचा मुळ अर्थ ''स्वतःच्या अस्तित्वामागील कारण'' असा आहे. जपान मध्ये ओकिनावा म्हणून एक बेट आहे. या बेटाबद्दल गोष्ट अशी की येथील प्रत्येक नागरिकांचे आयुष्यमान १०० वर्षापेक्षा जास्त आहे आणि तिथे ८० ते ९० वर्षांचे जास्त वृद्ध देखिल दररोज सकाळी उठून आपापले काम अतिशय आनंदाने करतात. ते एवढे कार्यक्षम असतात, की येथील लोकांचा हॅप्पीनेस इंडेक्स जगात असतात. येथील सर्वाधिक आणि त्यांच्या दिर्घायुषी जीवनाबददल हे लोक प्रसिद्ध आहेत. या यशस्वी जीवनाचे रहस्य त्यांच्या एका सोप्या फॉर्मुल्यात लपले आहे. ''इकिगाई.''

इकिगाई म्हणजेच नेमक्या कोणत्या गोष्टीसाठी आपण प्रत्येक माणूस जन्माला आलो आहोत हे शोधणे; प्रत्येक माणूस हा कोणत्या ना कोणत्या ध्येयासाठी झटत असतो. जर त्याला हे ध्येय सापडले नाही तर त्याचा मेंदू नेहमी त्या हेतूच्या किंवा त्या ध्येयाच्या शोधात असतो.

जेंव्हा आपण आपले माध्यमिक किंवा महाविदयालयीन शिक्षण पूर्ण करतो त्यानंतर आपण नोकरीच्या शोधात असतो किंवा काही जण व्यवसाय निवडतात. माणूस त्याच्या जीवनाचा अर्धा भाग काम करण्यात घालवतो. म्हणून जेंव्हा काय काम करावे हे निवडण्याची वेळ येते तेंव्हा बहुतेक जण आपल्याला विविध प्रकारचे सल्ला देतात. जसे की, कोणी सांगतात तुला आवडेल ते काम कर म्हणजे त्यात तुला आनंद भेटेल. काही लोक सल्ला देतात की ज्या कामात तू एक्सपर्ट आहेस ते काम कर, कोणाचा सल्ला असेल की ज्यात पैसे जास्त मिळतील असे काम तू कर, कोणी म्हणेल जगाला म्हणजेच सर्वांना फायदा होईल असे काही कर, वास्तविक हे सगळे सल्ल कुठे ना कुठे चुकीचे आहेत. ते कसे चुकीचे आहेत हे समजण्यासाठी आपल्याला इकिगाई कसे कार्य करते ते समजून घ्यावे लागेल आणि त्याद्वारेच आपण आपला इकिगाई ओळखू शकतो.

आपल्याला हा मुद्द पटकन समजण्यासाठी इकिगाई या पुस्तकामध्ये हा मुद्दा चार वर्तुळाद्वारे समजावला आहे.

* पहिल्या वर्तुळात तुम्हाला कोणत्या गोष्टीमध्ये आनंद मिळतो.
* दुसऱ्या वर्तुळामध्ये कोणत्या गोष्टीमध्ये तुम्ही पटाईत आहात.
* तिसऱ्या वर्तुळामध्ये कोणत्या गोष्टीमध्ये जास्त पैसा आहे.
* चौथ्या म्हणजे शेवटच्या वर्तुळात कोणत्या गोष्टींची गरज मानवाला पडते.

इकिगाई हा चार संकल्पनांचा मिळून तयार होतो. इकिगाई या पुस्तकात लिहिलेले आहे की, जर तुम्हाला तुमची इकिगाई शोधायची असेल तर तुम्ही हातात. पेन आणि पेपर घेऊन बसा आणि त्यानंतर खालील प्रकारे चार रकाने बनवा.

१) या पहिल्या रकान्यात तुम्हाला कोणत्या गोष्टी करायला आवडते तसेच असे कोणते काम आहेत जे तुम्ही आवडीने करू शकता. उदा.गाणे म्हणणे, क्रिकेट खेळणे, जेवण बनवणे, गाडी चालवणे इत्यादी काहीही जे तुम्हाला आवडते ते काम.

२) या रकान्यात तुम्हाला अशा गोष्टी लिहायच्या आहेत ज्या तुम्ही सराईतपणे करू शकता. म्हणजे अश्या गोष्टी किंवा काम ज्यात तुम्ही एक्सपर्ट, मास्टर आहात; जे तुम्ही आत्मविश्वासाने करू शकता. उदा. कोणी पोहण्यात तरबेज असेल किंवा एखाद्याची वाचनाची गती सामान्य गती पेक्षा जास्त असेल.

३) अशी कोणती गोष्ट आहे कि, त्याद्वारे तुम्ही पैसे, संपत्ती कमवू शकता अशा गोष्टी या रकान्यात लिहायच्या आहेत. जसे कि, एखादा लिहिलं मी इंजिनियर चा जॉब करून पैसे कमावेल कोणी म्हणेन मी वस्तु विकेल. मी कमिशन संबधित व्यवसाय करेल इत्यादी.

४) आता या रकान्यात आपल्याला लिहायचे आहे की, मी अशी कोणती गोष्ट करू शकतो की त्यांचा फायदा माझ्या सोबत इतरांना देखिलहोईल, लोकांना आनंद होइल, लोकांचे कल्याण होईल, त्यांच्या अडचणी दूर होतील. यात कोणी लिहू शकतो मी समाजसेवा करेल, देशसेवा करेल किंवा लोकांना मदत करेल एखाद्या माध्यमातून त्यांची अडचण सोडवेल.

आता तुमच्याकडे प्रत्येकी चार रकान्यात विविध गोष्टींची यादी तयार असेल. आता फक्त आपल्याला निरीक्षण करून प्रत्येकी दोन रकान्यातील सारख्या गोष्टी शोधायच्या आहेत.

* एखादी गोष्ट आपल्याला करायला आवडते आणि त्यात आपण एक्सपर्ट देखील आहोत तर ती गोष्ट म्हणजे पॅशन, आवड असते, उदा. मला बुद्धिबळ खेळायला आवडते आणि मी त्यात तरबेज देखील आहे तर बुद्धिबळ हे माझे पॅशन आहे.

* जी गोष्ट आपल्याला करायला आवडते व त्यात आपल्याला आनंद वाटतो आणि लोकांना देखील आपण त्याद्वारे आनंद देऊ शकतो त्यांचे भले करू शकतो त्या कामाला त्या गोष्टीला उद्दिष्ट किंवा मिशन असे म्हटले जाते. उदा. अब्दुल कलाम यांचे मिशन २०२० हे भारताला महासत्ता बनवण्याचे स्वप्न होते; ते भारतीय जनतेच्या हितासाठी, भल्यासाठी झटत होते म्हणून त्यांनी ह्या स्वप्नाला मिशन हे नाव दिले.



Created by Universal Document Converter

ज्या कामात तुम्ही तरबेज आहेत; जे काम तुम्ही आत्मविश्वासाने आणि चांगल्या प्रकारे पार पाडू शकता त्याचबरोबर त्या कामासाठी पैसे मिळू शकतात म्हणजे ते काम करून तुम्ही पैसे मिळवू शकता. त्या गोष्टीला प्रोफेशन, पेशा, हुद्दा म्हटले जाते. उदा. आपण मोठमोठ्या आय.टी.कंपन्या बघाल तर तिथले बहुतांश कर्मचारी हे प्रोग्रामिंग आणि संबंधित वेगवेगळ्या तांत्रिक कामामध्ये अग्रेसर असतात.

✻ व्होकेक्षन म्हणजे व्यवसाय कोणत्याही मोठ्या व्यवसायाचा पाया हा जनतेशी निगडीत समस्येवर आधारित असतो. मोठे मोठे व्यावसायिक अगोदर लोकांच्या समस्या काय आहेत. याचा शोध घेतात व नंतर त्या समस्येवर उपाय शोधून त्या उपायावर वर आधारित व्यवसाय सुरू करतात. उदा. आजच्या पाच वर्षांपुर्वी इंटरनेट डेटा चे दर २०० – ३०० रूपयाला १ जी.बी. प्रति माह घेता तो आज जिओ मुळे २०० – ३०० रूपयाला १ जी.बी. प्रतिदिवस झाला आहे. आजच्या १०-२० वर्षापूर्वी वस्तू घरपोच येत नव्हती. ॲमेझॉन ने आज पूर्ण जगाला घरच्या घरी खरेदी करण्यासाठी बाध्य केले आहे.

वरील प्रत्येक संकल्पना खरेतर अपूर्ण आहे ते कसे बघूया..

✻ जर आपण फक्त फॅशन (आवड) फॉलो करत राहिलो तर आपण आनंदी तर राहू शकतो परंतु इतर गोष्टीत स्वत: बद्दल निरूपयोगी झाल्याची भावना निर्माण होऊ शकते. आपण आपल्या आजूबाजूला असलेल्या कलाकार माणसाचे निरीक्षण केल्यास आपल्याला ह्या गोष्टीची जाणीव होईल.

✻ फक्त एखादे उद्दिष्ट पूर्ण करण्यावर जर आपले पूर्ण लक्ष असेल तर आपल्या आर्थिक बाबी बिकट होऊ शकतात; आपल्याला मिशन किंवा उद्दिष्ट फॉलो करून पुर्णत्वाची भावना येईल तसेच समाजा प्रति आपण करत असलेल्या कामामुळे अभिमान वाटेल.

✻ जर कोणी प्रोफेशन (पेशा) निवडला तर तो आरामदायी परिस्थितीत जगू शकतो. पण त्याच्या मनात एक अपूर्णतेची भावना असेल.

✻ व्होकेशन म्हणजेच व्यवसाय निवडणाऱ्या व्यक्तीला नेहमी काहीतरी नाविन्यपूर्ण अनुभव मिळतो; आत्मसंतुष्टी मिळते पण सोबतच व्यावसायिक स्पर्धेचा तसेच अनिश्चिततेचा आणि इतर बाबींचा सामना करावा लागतो.

थोडक्यात सांगायचे म्हटले तर वरील पैकी कोणताही निर्णय योग्य किंवा तो परिपूर्ण नाही. प्रत्येक निर्णयात काही ना काही समस्या आहेतच. त्यातूनच इकिगाई या शब्दांचा उदय झाला. इकिगाई ही या चारही संकल्पनेचा मध्य आहे. आणि त्यामुळेच ती परिपूर्ण आहे. आपण ज्या कार्यासाठी बनलो आहोत ते कार्य आणि आपल्या अस्तित्वामागे नेमके कारण काय आहे ते या संकल्पनेने नक्की सापडेल.

आता आपल्याला फक्त आपल्याकडील चारही रकान्यातील एक कॉमन गोष्ट शोधायची आहे. म्हणजे अशी गोष्ट जी तुमची आवड देखील आहे, त्यात तुम्ही तरबेज देखिल आहात. तसेच तुम्हाला त्या गोष्टीसाठी पैसे ही मिळू शकतील. त्याचप्रमाणे जगाच्या देखिल कामाची असली पाहिजे आणि हाच तो तुमचा इकिगाई...!

उदा. विराट कोहलीचा इकिगाई हा क्रिकेट आहे कारण त्याच क्रिकेटवर प्रेम आहे. त्याने त्याचा सराव करून विशेष प्राविण्य मिळवले. आज तो भारतातील सर्वात महागडा खेळाडू आहे आणि त्याच्या हारल्याने लोकांना दु:ख तर जिंकल्याने लोकांना आनंद होतो. त्याच्य क्रिकेट कौशल्याच्या बळावर तो अनेक प्रकारे समाजाला उपयोगी पडतो मदत करतो.

दुसरे उदाहरण समजा एखाद्या व्यक्तीला बुद्धिबळ खेळायला आवडते त्यात तो प्रविण देखील आहे. त्याचबरोबर जर त्याला असा आत्मविश्वास असेल की, याद्वारे मी पैसे कमावू शकतो तसेच बुद्धिबळाद्वारे सामाजिक योगदान देखिल देऊ शकतो. तर बुद्धिबळ हा त्या व्यक्तीचा इकिगाई.

इकिगाई हे पुस्तक आपल्याला आपले करियर शोधण्यास मदत करते. आपल्यला आपला इकिगाई मिळणे खुप महत्वाचे आहे. सामान्य लोक अयशस्वी असण्यामागे सर्वात मोठे कारण हेच आहे की ते स्वत:ला तसेच स्वत:च्या व्यक्तिमत्वाला चांगल्या प्रकारे ओळखत नाहीत. सामान्य लोकांची दुसरी सर्वांत मोठी चुक ही कि त्यांना हे माहित नसत कि ते आपला जास्तीत जास्त वेळ कुठे घालवतात. त्यामुळे ते आपला बहुतांश मुल्यवान वेळ वाया घालवतात.

जगातल्या सगळ्या महान आणि यशस्वी माणसांचे म्हणणे आहे की, जो पर्यंत माणूस स्वत:ला ओळखत नाही तोपर्यंत तो त्यांच्या आयुष्यात मोठी प्रगती करू शकत नाही तसेच पुढे जाऊ शकत नाही.

या पुस्तकासाठी इकिगाई या संकल्पनेची माहिती गोळा करत असतांना लेखकांनी शतायुषी लोकांच्या मुलाखती घेतल्या आणि त्यांच्या दिर्घायुष्याचं खरं रहस्य जाणलं. ते त्यांनी या पुस्तकामधून आपल्या समोर मांडलं आहे.

या पुस्तकामुळे आपल्यालाही आपला इकिगाई सापडायला नक्कीच मदत होईल. त्यामुळे आपल्या जीवनाबद्दल सजग असलेल्या प्रत्येक माणसाने हे पुस्तक वाचलेच पाहिजे.

आपल्या आयुष्यात अशी अनेक पुस्तके वाचली जातात. हे वाचूनच आपल्यात रूची आणि आपले ज्ञान विकसित होते. अशी काही पुस्तके आहेत जी आपल्याला आयुष्यात खुप प्रेरणा देतात आणि हे आपल्या जीवनातील सर्वोत्कृष्ट पुस्तक आहे.



Created by Universal Document Converter

# साहित्य समाजाचा आरसा

कु.गायत्री धोंडू पाटील
तृतीय वर्ष कला

दर्पण बता बचपन कहाँ? हे गाणं ऐकलचं असेल तुम्ही थोडक्यात काय तर दर्पण म्हणजे हा जो आरसा आहे तो काही गोष्टींचे वा नानाविध प्रकारांच प्रतिबिंब दाखवण्याचे काम करतो. आपण काही ठराविक साहित्याला नक्कीच समाजाचा आरसा म्हणू शकतो. पण पूर्णतः एखाद साहित्य समाजाचा आरसा असेलच असं नाही. कारण काही साहित्य हे काळाच्या पुढील विचांरावर आधारलेल असते. ज्यात सध्या/चालू गोष्टी असते किंवा सामाजिक / आर्थिक वा इतर गोष्टींचा लवलेशही नसतो.

ते साहित्य समाजाचा आरसा आहे जे साहित्य त्या ठराविक काळाच्या ठराविक सामाजिक संदर्भांना समोर ठेवून लिहीलं जातं. अशी साहित्याची उदाहरण बरीच देता येतात.

उदा...

१) दुनियादारी :- ही विशिष्ट प्रकाराचा सामाजिक आरसा दाखवण्याचा प्रयत्न करते; जसे की त्या काळी प्रेम असलेले मन दाखवते.

२) युगंधरा - त्या पुरुषी अहंकार असा होता की बायको- नवऱ्या पेक्षा जास्त शिक्षीत नको. याचा अंत वाच्यासारखा आहे. संदर्भ काळानुसारची अनुभूती फार मनातून येते.

३) हसरे दुख - हे जरी चार्लीच आत्मचरित्र असलं तरी याला आपल्याला सामाजिक आरसा दर्शवणारं साहित्य नक्कीच म्हणता येईल, कारण यात तत्कालिन समाजामुळे भोगावे लागणारे परिणाम दाखविले गेले आहेत.

आरसा हा खरं तर प्रतिबिंब दाखवत असतो, आपलं आपल्याच. जे आहे जसं आहे अगदी तसंच आहे, समाजाच प्रतिबिंब दाखवतो. पण इथं तर खरी मेख आहे. आरसा हे बाह्यरूप दाखवतो. पण साहित्याला बाहयरूपासोबत अंतरूप आहे. त्यामुळे साहित्य वाचतांना जो जसा वाचेल, जो जसा पाहिल तसा अर्थ तो लावतो. आपण ज्या चष्म्या मधून जग पाहतो तसंच जग आपल्याला भावते. साहित्य समाजाचा आरसा तर आहेच तो असावा पण नुसतंच बाह्यरूपी न दाखवता त्यातलं अंतरूप दाखवावं. समाजाच अंर्तबाह्य प्रतिबिंब त्यातून प्रक्षेपित व्हावं असं वाटतं. लेखणी हे अतिशय धारदार शस्त्र आहे, आणि त्या शस्त्रातून निर्माण होत ते साहित्य म्हणून साहित्यामुळे समाज प्रबोधन झालंय, आणि पुढे व्हावं आणि होत राहावं असं मला वाटतं. जेव्हा जेव्हा लेखणी पेटली, तेंव्हा तेंव्हा क्रांती घडली. आणि याला इतिहास साक्षी आहे. साहित्य आणि समाज यांचा खूप घनिष्ठ संबंध आहे. समाजात घडणारी प्रत्येक गोष्ट, साहित्यीकांनी आपापल्या परीने मांडण्याचा प्रयत्न केला कोणताही साहित्यिक हा खूप मोठा विचारवंत असतो. आणि त्यांचे हे विचार जेव्हा वेगवेगळ्या साहित्य प्रकारांच्या माध्यमातून, स्वतःच्या लेखणीतून समाजापर्यंत पोहचतात, तेव्हा समाज हे विचार आचरणात आणण्याचा प्रयत्न करतो.

यामध्य साहित्याचे जे दोन प्रकार पडतात, त्यात पहिलं विज्ञान हे आपल्याला कसं जगायचं हे शिकवते, तर दुसरं ललित साहित्य समाजाने का जगावं, हे शिकवते, हे दोन्ही साहित्य आपापल्या ठिकाणी समाजाची वैचारिक पातळी उंचावण्याचे काम करतात. साहित्य हा समाजाचा करतात आविभाज्य घटक आहे. साहित्य हे मानवसापेक्ष असून, मानव हा समाजसापेक्षा समाज संस्कृतीसापेक्ष असल्याने साहित्याच्या माध्यमातून जीवनाचा खरा अर्थ उलगडण्याचे सामाजिक प्रयोजन साध्य होते. यामुळेच साहित्य हा समाजाचा आरसा आहे, या विधानाला कमालीची अर्थगर्भता आहे. साहित्य ही एक अर्थपूर्ण सामाजिक कृती असून साहित्यातील कोणतीही वैयक्तिक अभिव्यक्ती ही व्यापक अर्थाने सामाजिक ठरते.

साहित्य हे नव्या बदलांचा आरंभबिंदू ठरत, आधूनिक जग निर्माण करते. यात साहित्यातून प्रकट होणारी विज्ञानवाद, विवेकवाद आणि मानवतावाद ही मूल्ये अत्यंत महत्वाची ठरत असल्याने सामाजिक परिवर्तन घडवण्यात साहित्याच योगदान हे अनन्य साधारण असते. साहित्य हे नेहमीच सत्याशी निगडी असते.

आपल्याला भारतीय समाजसंस्थेत नाटक आणि चित्रपट या गोष्टीचा प्रभाव जास्त प्रमाणात दिसून येतो. गरजेनुरूप या गोष्टीचा करमणुकीचे साधन म्हणून स्वीकारला जातो. परंतु खरे पाहता या गोष्टी साहित्याचे मोठे व्यासपीठ म्हणून काम करतात. कारण आपल्याल श्यामची आई चित्रपटातून चांगली समजते. अनेक नाटक आपल्याला पडदयावरच पाहताना रंगतदार वाटतात. आणि अनेक कादंबऱ्या चित्रपटातून आपल्या समोर येतात.

समाजात साहित्य कसे प्रभाव दर्शवते याचा विचार केला तर अगदी आपल्या धर्मग्रंथापासून याच सुरुवात आपल्याला मान्य करावी लागेल. कोणताही धर्मग्रंथ हा ज्या ज्या धर्माला योग्य दिशा दाखवण्याच काम करतोय. यानंतर महान व्यक्तींचे चरित्रग्रंथ खूप प्रेरण देऊन जातात. शाहू फुले, आंबेडकर यांचे विचार त्यांनी लिहीलेल्या साहित्यात प्रकर्षाने जाणवतात. नंतरच्या काळात अण्णाभाऊ साठे, पु.ल.देशपांडे, केशवसुत, अत्रे यांनी आपल्या लेखणीतून अखंड समाज खिळवून ठेवला होता. त्यांच्याबरोबर इतर साहित्यिकांनी देखील हा दर्जा ढासळू दिला नाही. हाच वारसा पुढे महानोर मर्ढेकर मांडगुळकर यांनी चांगल्या प्रकारे जोपासला.

परंतु येत्या काही काळात साहित्याची कारण मीमांसा करतांना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे लोप पावत चाललेला वाचक वर्ग तयार असलेले साहित्य वाचलेच गेले नाही, तर नविन साहित्य निर्मिती होईल याची अपेक्षा ठेवणं चुकीचं आहे. आजच्या काळात



Created by Universal Document Converter

बरच साहित्य व्यवसायिक दृष्टिने तयार होताना दिसतंय. त्यामुळे स्वाभाविकच त्यातील धार कमी होत चालली आह यासाठी वाचक वर्ग वाढण्याची आणि साहित्यिकांना प्रोत्साहन मिळण्याची नितांत गरज आहे.

संपूर्ण वाढलेलं पक्कवान सुंदर पात्रात शोभून दिसतं, तसेच असते साहित्याचेही साहित्यामध्ये जागर होतो, प्रबोधन होते. ज्ञान भेटते. लोकांनी केलेल्या क्रांतीकारक कार्याची जपणूक ही साहित्यामध्ये केली जाते कारण माणूस आजन्म जे काही नवा उत्कर्ष करण्यासाठी प्रयत्न करतो, त्याची प्रतिमा ही साहित्य बनुन समोर येते. त्यामुळे प्रेरणा मिळते ती सर्व प्रकारच्या जमिनीत उगवणाच्या मुलांना अर्थातच कविता, निबंध लेख, ललित, ते आत्मचरित्र्यापर्यंत पोहोचणाऱ्या शब्दातच तेच प्रकट होते. यालाच म्हणू शकतो आपण साहित्य समाजाचा आरसा कारण मला भावले ते स्वामी विवेकानंदयांचे आत्मचरित्र यांच्या आयुष्यात आलेले कित्येक प्रसंग हेच दर्शवतात की, आपला समाजात किती मोठा संस्कृतीचा 'वारसा ' जपून आहे,

त्यांनी परदेशात केलेल्या भाषणाच्या आरंभी म्हटलेल वाक्य...., माझ्या बंधू आणि भगीनी आणि त्यामुळे आपल्या समाजाची परदेशी लोकांना कळली ती चार महत्वाची तत्वे ती अशी... .... मातृ देवो भव... पितृ देवो भव... आचार्य देवो भव.. अतिथी देवो भव.... यामुळे स्वामीजींनी केलेल्या विचार... कृती. कल्पना यांच्या घटना साहित्यात (आत्मचरित्रामध्य) आजही वाचायला मिळतात. आणि माणूस कसा दिसतो यापेक्षा तो कसा आहे, याच वर्णन साहित्यात भावपूर्ण आणि सत्य असते व एक माणूस मिळूनच समाज बनतो. घडतो. आणि त्यासाठी आवश्यक आहे आरसा.... प्रतिमा आणि प्रतिमा दोन्ही सुधारण्यासाठी...!!

साहित्य आणि समाज यांच्यातील परस्पर संबंधाचे स्पष्टीकरण करताना तेन म्हणतो की, कोणतीही साहित्यकृती घेतली तरी ती केवळ कल्पनांचा खेळ किंवा उददीपीत मेंदूतून निघालेली एक लहान लहर असत नाही. ती लिहीणारा साहित्यिक ज्या समाजात वावरतो, त्या समाजाचा त्याच्या देशाचा, त्या देशाच्या इतिहास, भुगोल सस्कृतीचा तो लेखक ज्या काळात जगला, त्या काळातील गुणधर्माचा एक समायावच्छेदे करून त्याच्या कृतीवर परिणाम होत असतो आणि या सर्व साहित्यकृतीच्या मागे जो लेखक आहे, त्याचा शोध त्या कलाकृतीवरून घेता येतो.

साहित्य हा समाजाचा आरसा असतो. हे विधान ही असेच फसवे आहे. मुळात वास्तवचित्रण हा साहित्यगुण मानायलाच, साहित्यसमीक्षेत्र स्पष्ट नकार दिला जातो. सैध्दातिकच्या पातळीवर साहित्य आणि समाज याच्यातील परस्परसंबंधाच्या बाबतीत निश्चितपणाचा अभाव आहे, तरीही समाज व्यवहावर साहित्य काही परिणाम करते. किंवा करूशकते विधान निश्चितपणे नाकारते येते. अर्थात हे विधान आधुनिक मराठी वाचायला अधिक चपखलपणे लागू पडते साहित्य हे सामाजिक परिस्थितीचे अपत्य मानले जाते. साहित्य निमितीची पाळेमुळे समाजात रुजलेली असतात. साहित्य आणि सामाजिक परिस्थिती यावर भाष्य करतांना सयाजीराव गायकवाडानी साहित्यावर समकालिन परिस्थितीवर प्रभाव असतो. हे उदाहरण दर्शविले आहे म्हणून साहित्य समाजाचा आहे आरसा मध्ये आपण आरसा बनला स्वतः पाहू शकतो फक्त पण आपल्या मनामध्ये काय आहे हे नाही पाहू शकता.



Created by Universal Document Converter

# नवीन शैक्षणिक धोरण - अपेक्षा आणि वास्तव

कु.पुनम अभिमान शिंदे
तृतीय वर्ष कला

३४ वर्षाच्या प्रतिक्षेनंतर खऱ्या अर्थाने भारतात असलेले आणि अमुलाग्र बदल करू शकेल असे नवीन शैक्षणिक धोरण मोदी सरकारने जाहीर केले आहे. अमेरिका, चीन, जपान, रशिया, ब्रिटन, फान्स, जर्मनी या प्रगत देशांत मातृभाषेतून शिक्षण दिले जाते. त्यामुळे पाचवीपर्यंतचे शिक्षण मातृभाषेतून देण्याचे नवीन धोरणात करण्यात आलेले सुतोवाच महत्वाचे आहे. नवीन शैक्षणिक धोरणात इतरही अनेक गोष्टी आहेत. मात्र त्या बद्दलच्या अपेक्षा आणि वास्तव हे भविष्यातच लक्षात येईल.

केंद्र सरकारने नवीन शैक्षणिक धोरण जाहीर केले आहे. त्याबद्दल वेगवेगळी चर्चा होत असती, वाद होत असले तरी त्याचे काही सकारात्मक परिणाम महत्वाचे आणि दूरगामी असणार आहेत. केजीपासून लाखो रूपये शुल्क आकारून पालकांना लुटणाऱ्यांचे दुकान त्यामुळे बंद होऊ शकेल अशी अपेक्षा आहे. इंग्रजीच्या भयगंडामुळे शिक्षणात मागे पडणाऱ्या मुलांना वरदान ठरणारा आणि समृद्ध हिंदुस्थानी प्राचीन भाषांना संजीवनी देणारा हा निर्णय आहे. परदेशी पैशांवर व अवाच्या सव्वा फी आकारून चालवल्या जाणाऱ्या तसेच पाश्चात्य संस्कृती आपल्या मुलांवर लादणाऱ्या कान्व्हेंट शाळांना चाप बसवणारा हा निर्णय आहे.

देशपातळीवर छत्रपती शिवाजी महाराज, एकही युद्ध न हरलेले पहिले बाजीराव पेशवे, राणा प्रताप, विविध धर्मसंस्थापक, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सातवाहन, विजय नगर, मौर्य आदी साम्राज्यांचा वैभवशाली इतिहास यापुढे शिकविला गेला पाहिजे. राज्य पातळीवरही आपले संत, झाशीची राणी, छत्रपती शाहू महाराज आणि इतर गौरवशाली इतिहास शिकवला जाणे गरजेचे आहे. भविष्यात आपल्या देशाकडे वाकड्या नजरेने पाहण्याचे कुणाचे धाडस होणार नाही अशी पिढी बनवण्यासाठी हे आवश्यक आहे. कारण इथून पुढे हिंदुस्थानच्या इतिहासाचे दोन महत्वपूर्ण भाग होणार आहेत. पहिला असे रामजन्मभूमी मुक्तीचा आणि दुसरा असेल मंदिर निर्मितीनंतरचा कारण मर्यादा पुरूषोत्तम राम त्यांचे राज्य हे कुठल्या धर्माशी नाही, तर राष्ट्रधर्माशी निगडित होते. त्यामुळे शिक्षणातील बदलांचा निर्णय मुलांना हिंदुस्थानी संस्कृती, इतिहास, प्रथा, परंपरा यांची ओळख करून देण्यास उपयुक्त ठरणारा, स्वावलंबी बनवणारा, नवनिर्मिती करण्यास उद्युक्त करणारा असणार आहे. अशा विविध कसोट्यांवर उतरणारा सिद्ध व्हायला हवा.

देशातील शालेय आणि उच्च शिक्षण प्रणालीत परिवर्तनात्मक सुधारणेला वाव देणाऱ्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला केंद्रीय मंत्रिमंडळाने २९ जुलै २०२० रोजी मंजुरी दिली. याआधीचे शैक्षणिक धोरण १९८६ साली आले होते. त्या राष्ट्रीय धोरणाची जागा हे नवे धोरण होणार आहे. बालवयात स्वयंनिर्मिती करण्यापासून विद्यार्थ्यांना अधिक पर्याय देण्यापर्यंत पाचवीपर्यंतचे शिक्षण मातृभाषेतून देणे, विद्यापीठांना महाविद्यालयांना स्वायत्तता देण्यापासून उच्च शिक्षणाच्या समन्वयासाठी एकच केंद्रीय संस्था उभारण्यापर्यंत अनेक शिफारशींचा समावेश असलेल्या या धोरणाचा मसुदा केंद्र सरकारच्या मागील टर्मपासून चर्चेत होता. त्यावर २९ जुलैला शिक्का मोतर्ब करून सरकारने पुढचे पाऊल टाकले आहे. ३४ वर्षानंतर नवे शैक्षणिक धोरण आले आहे. पुन्हा ते हिंदुत्व आणि राष्ट्रवाद यांची सांगड घालणाऱ्या मोदी सरकारकडून आणले जात असल्याने त्याकडे केवळ शैक्षणिक चष्मातून न पाहता त्यावर राजकारण होणार हे अपेक्षित होतच. तामिळनाडू व ममता बॅनर्जीच्या सरकारने त्यावर टीका सुरूही केली आहे.

तसेही शिक्षण हे सत्ताधाऱ्यांच्या हातातील साधन असल्याने शिक्षणातील बदलांमागे काळानुरूप गरजेबरोबर व राजकीय अजेंडाही असतोच. तरीही विरोधकांनी फक्त एकसुरी टिका न करता विधायक आणि उपयुक्त सूचना करणे अपेक्षित आहे. कोणताही मोठा बदल करतांना नवे धोरण स्वीकारतांना सर्वांगाने विचारमंथन होणे गरजेचे ही आहे. हे धोरण प्रत्यक्ष अमलात येईपर्यंत अनेक बदल सुचविले जातील, सूचना दिल्या जातील. त्या विचारात घेऊन आवश्यकतेनुसार धोरणात बदल करण्याची लवचिकता सरकारने दाखविल्यास देशातील शिक्षण क्षेत्र खऱ्या अर्थाने हिंदुस्थानी होऊ शकले.

सकृतदर्शनी या धोरणात करण्यात आलेल्या काही सुचना आणि शिफारशी स्वागताई आहेत. बालकाच्या विकास प्रक्रियेत बालवाडीचे शिक्षण मोलाची भूमिका बजावू शकते. बालवाडीच्या शिक्षणाबाबत अनेक अहवाल. सादर झाले असेल तरी ते सर्वांना दिले जावे यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद मात्र केली जात नव्हती. शिक्षण हक्क कायदा सध्या पहिलीपासून लागू होता. तो बालवाडीपासून सुरु होईल असा बदल अपेक्षित आहे. कारण बालवाडीच्या विद्यार्थ्यांना औपचारीक शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याची तरतूद हे या धोरणाचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे. पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिक शिक्षण यांसाठी सुचवलेली. ५ अधिक ३ ही रचना बारावीपर्यंतच्या शिक्षणाचा विचार करणारी आहे. मातृभाषा हेच शिक्षणाचे योग्य माध्यम असू शकते असे तज्ञांनी वारंवार मांडलेले मत नवीन धोरणात विचारात घेतलेले असून बहुतेक प्रगत राष्ट्रांत ते वापरलेही जात आहे. तरीही इंग्रजी माध्यमाच्या वेगाने वाढणाऱ्या इंग्रजी शाळा कशा थांबणार यावर या धोरणात भाष्य केलेले नाही या शाळा बहुतेक खासगी असून त्यांचे शुल्क सर्वसामान्यांना परवडणारे नसते. दहावी आणि बारावी या बोर्डाच्या परीक्षेचे महत्व कमी करण्याची भूमिका योग्यच आहे. शिवाय अकरावी, बारावीला सध्या असेलली शाखानिहाय रचना



Created by Universal Document Converter

बदलण्याची सूचना अधिक स्वागताई आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक विषयांचे पर्याय उपलब्ध होऊ शकतील. नवीन शैक्षणिक धोरणानुसार देशात प्रथमच 'राष्ट्रीय' संशोधन फाऊंडेशनची स्थापना करण्यात येणार आहे. आपल्याकडे मुलभूत शोध फारसे लागत नाहीत. या फाऊंडेशनमुळे संशोधनाला चालना तर मिळेलच पण त्याचबरोबर शैक्षणिक गुणवत्तेसह आवश्यक असलेली रोजगारनिर्मितीही वाढेल असे मत अनेक शास्त्रज्ञांनी व्यक्त केले आहे. वैद्यकीय आणि विधी या शाखा वगळता उच्च शिक्षणासाठीच्या अन्य सर्व शिखर संस्थांच्या एकत्रीकरणाचा विषय अनेक वर्षापासून चर्चेत आहे. त्याची शिफारस करून या धोरणाने उच्च शिक्षण अयोगाचा मार्ग मोकळा केला आहे. चार वर्षांच्या पदवीची पूर्वापार चालत आलेली संकल्पना सुरू राहणार आहेच. पदवी शिक्षणाच्या प्रत्येक वर्षातून बाहेर पडण्याची असलेली मुभा ही या धोरणातील नवीन बाब आहे. पहिल्या वर्षानंतर प्रमाणपत्र, दुसऱ्यानंतर पदविका, तिसऱ्यानंतर पदवी आणि चौथ्यानंतर संशोधनात्मक पदवी अशी वर्गवारी करण्यात आली आहे. पदवी शिक्षण अर्धवट राहिल्यास ते केव्हाही पूर्ण करण्याचा मार्गही आहे. या पर्यायाने उच्च शिक्षण बऱ्याच कारणांनी अर्धवट राहणाऱ्या महिलांना दिलासा मिळणार आहे.

संलग्न महाविद्यालयांच्या ओझ्याखाली आपली विद्यापीठे दबली आहेत. नवीन धोरणात महाविद्यालयांना स्वायत्तता देवून संलग्नतेची पद्धत बंद करण्याचे सुतोवाच आहे. हा काळानुरूप बदल फलदायी ठरेल. पुढील दहा वर्षात उच्च शिक्षण होणाऱ्यांचे प्रमाण (जीईआर) पन्नास टक्के म्हणजे सध्याच्या दुप्पट करण्याचे उद्दिष्ट या धोरणात आहे. त्यासाठी केवळ उच्च शिक्षणाच्या नव्हे, तर प्राथमिक शिक्षणाच्या सुविधाही वाढवाव्या लागणार आहेत. सध्या आपण जीडीपीच्या तीन टक्क्यांपेक्षा कमी खर्च शिक्षणावर करतो. तेंव्हा योजना कितीही चांगली असली तरी तिची अंमलबजावणी नीट होणार नसेल आणि त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद नसेल तर यश मिळण्याची शक्यता नसते. त्यामुळेच जीडीपीच्या सहा टक्के शिक्षणावर खर्च करण्याची सूचना अमलात आणली तरच उद्दिष्टांची पूर्तता होऊ शकेल.



Created by Universal Document Converter

# भारतीय शेतकऱ्यांची सद्यस्थिती

कु.श्रद्धा भगवान कोचुरे
तृतीय वर्ष कला

''शहरी भागात चांगला रोजगार मिळाला तर शेती सोडून जाण्याची मानसिकता शेतकऱ्यांमधून दिसून येत आहे. याला शेतीचे निसर्गावरील अवलंबित्व, तसेच शेतीतून मिळणारे तोडके उत्पन्न या गोष्टी कारणीभूत आहेत. या बाबी नवी दिल्ली येथील 'सेंटर फॉर द स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज' (सीएसडीएस) या संस्थेंनी केलेल्या सर्वेक्षणातून प्रकर्षाने दिसून आल्या या सर्वेक्षणाचा हा थोडक्यात आढावा...''

तीन वर्षांपूर्वी नवी दिल्ली येथील 'सेंटर फॉर द स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज' (सीएसडीएस) या संस्थेने देशातल्या शेतकऱ्यांच्या वास्तव स्थितीचे दर्शन घडवणारे एक सर्वेक्षण केले. भारतातील १८ राज्यांच्या १३७ जिल्ह्यांमधील २३४ खेड्यांमध्ये हे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणा अंतर्गत मुलाखतीसाठी यादृच्छिक पद्धतीने निवड (रेंडम सेक्शन) करण्यात आलेल्या तब्बल ८,२२० शेतकऱ्यांपैकी ५,३५० मुलाखती यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आल्या. या सर्वेक्षणावर आधारित अहवाल 'लोकनिती' या स्वयंसेवी संस्थेने प्रकाशित करण्यात आला. या अहवालातल्या ठळक बाबी पुढीलप्रमाणे –

सर्वेक्षणाच्या अहवालातील ठळक बाबी – ३६ टक्के शेतकरी झोपड्यांमध्ये किंवा कच्च्या विटांच्या घरांमध्ये राहतात. ४४ टक्के शेतकरी कच्यापक्क्या किंवा संमिश्र स्वरूपाच्या घरांमध्ये राहतात. त्यांच्यापैकी फक्त १८ टक्के लोकांकडे पक्की, स्वतंत्र घरे आहेत. २८ टक्के शेतकरी अशिक्षित असल्याचे आढळले. १४ टक्के शेतकरी मॅट्रिक उत्तीर्ण होते आणि ६ टक्के शेतकऱ्यांनी महाविद्यालयांमध्ये पदवीसाठी प्रवेश घेतला होता.

एकूण ८३ टक्के शेतकऱ्यांनी शेती हाच आपला प्रमुख व्यवसाय असल्याचे सांगितले. (तमिळनाडूत हे प्रमाण ६२ टक्के आणि गुजरातमध्ये ९८ टक्के होते.)

३२ टक्के शेतकरी कुटुंबाच्या अतिरिक्त उत्पन्नसाठी शेती खेरीज अन्य व्यवसायही करतात.

आज आपल्या देशातील शेतकरी कुटुंब निव्वळ शेती करून महिन्याकाठी किती पैसे कमावतो, तर फक्त तीन हजार रूपये, तो काही जोडधंदा करीत असले, तर त्याला मिळतात साडे सहा हजार रूपये.

देशभरातील सुमारे ९१ कोटी शेतकऱ्यांपैकी ५२ टक्के शेतकऱ्यांची घरे ही कर्जाच्या विळख्यात अडकली आहेत. २००८ च्या कर्जमाफी कार्यक्रमाचा फायदा अनेक छोट्या शेतकऱ्यांना मिळालाच नाही. उलटपक्षी, पात्र नसलेल्या अनेकांनाही या कर्जमाफीचा लाभ झाला. त्यावर्षी कर्जमाफी योजनेत ५२ हजार कोटी रूपयांचा घोटाळा झाल्याचेही 'कॅग' अहवालात स्पष्ट झाले आहे.

राज्यातील वसाहतीचे क्षेत्र १९७ लाख हेक्टर व वहितदारांची संख्या ९३७ लाख आहे. ९६ टक्के वहितीचे क्षेत्र पाच हेक्टरपेक्षा कमी व ८९ टक्के शेतकरी लहान शेतकरी कसत आहेत. शेतीक्षेत्राचा मुख्य प्रश्न लहान शेती आकार व लहान शेतकरी असून, त्यांचे उत्पन्न कसे वाढवायचे हा आहे. त्याकरिता नवीन आर्थिक धोरणाची गरज आहे.

उत्पादन व उत्पादकता वाढीचा प्रयोग पहिल्या हरितक्रांतीत अधिक उत्पादन देणारी बियाणे, खताचा व सिंचन वीजपुरवठा माध्यमातून झाला. अर्थात एका मर्यादेनंतर या प्रयोगाने शेतीचा आकार वाढू शकत नाही. जेनेटिकली मॉडिफाइड (जीएम) बियाणे पण शेताचा आकार वाढू शकणार नाही. शेतीच्या आकार वाढीतून शेतीचे व्यवस्थापन वाढून व शेतमालाची विक्री संघटीतरित्या केली तरच लहान शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल. हा मुद्दा महाराष्ट्रातील सर्व क्षेत्राला (पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा व कोकण) लागू आहे.

व्यवस्थापन बदल – वैयक्तिक लहान आकाराची शेती करण्याऐवजी गटशेतीला प्रोत्साहन देऊन उत्पन्न वाढवून संघटित विक्री प्रक्रियेतून लहान शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविता येईल. प्रायोगिक तत्वावर दीड लाख शेतकरी एकत्रित आणून हा प्रयोग सरकारने सुरू केला आहे. त्याचे प्रसारण सर्व महाराष्ट्राकरीता व्यवस्थापन केले पाहिजे.

विक्रीची संघटीत व्यवस्था – जागतिकीकरणाच्या स्थितीत शेतमालाची विक्री संघटितरित्या केली तर विक्रीचा खर्च कमी होऊन मालाला चांगली किंमत मिळेल.

बियाण्याच्या एकाधिकारावर नियंत्रण – कापसाव्यतिरिक्त आता गहू, तांदूळ, मका, भाजीपाला याकरिता बीटी बियाण्यांना परवानगी दिली आहे. बीटी कापसाचे बियाणे फक्त ३/४ खासगी बियाणे कंपन्यामुळे देशी बियाणे बाजारातून नाहीसे झाली आहे. ९३ टक्के कापूस जमिनीवर बीटीचा वापर आहे. देशी कापूस बियाण्यांच्या उत्पादनाला प्रोत्साहन देऊन हा खासगी कंपन्यांचा एकाधिकार संपवला पाहिजे. खासगी बियाण्यांचा एकाधिकार झाल्याने शेतकऱ्यांची पिळवणूक होते.

समान सबसीडीची व्यवस्था – सध्या रासायनिक शेतीला पाणी, खत, वीज इत्यादीच्या सबसिडी मिळतात. नैसर्गिक शेतीला या सर्व सोयी मिळत नाही. सेंद्रीय खताला सबसिडी मिळावी. गटशेती, सेंद्रीय शेतीला अधिक सबसिडी दिली पाहिजे.

शेताजवळ प्रकिया उद्योग – ग्रामीण भागात शेती क्षेत्रात प्रक्रिया उद्योगाचे कारखाने उभारणीसाठी स्वस्त जमीन, पाणी, वीज कर सवलती देऊन प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यामुळे ग्रामीण रोजगार वाहन तेथील उत्पन्न वाढेल. शहरातील कारखान्यांची गर्दी



Created by Universal Document Converter

कमी होईल.

हवामानानुसार पिके – हवामानानुसार, कापुस, डाळी, विदर्भ– मराठवाड्यात, तांदूळ, मुख्यत: विदर्भ व कोकणात, पश्चिम महाराष्ट्रात ऊस व फळफळावळ होते. ऊस उत्पादनास पाणी भरपूर लागते. नैसर्गिक पाणीपुरवठा पश्चिम महाराष्ट्रात कमी इतर पीक व उपयोगाचे पाणी याकरिता वळविल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा तुटवडा होतो. तेंव्हा कमी पाणी वापरण्याचे तंत्र विकसित केले पाहिजे.

विदर्भाच्या कोरडवाहू जमिनीत पावसाळी पाण्यावर शेती होते. तेथे अधिक पाणी लागणारी पिके घेण्यावर नियंत्रण आणले पाहिजे. शेती उत्पादन आर्थिक निकषावर असले पाहिजे राजकीय प्राथमिकतेवर नाही.

कृषी विद्यापीठे व कृषी विद्यालये – कृषी उत्पादनात गेल्या दहा ते बार वर्षात कृषी विद्यापीठांचे योगदान दिसून येत नाही. संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यस विलंब होत आहे. त्यांच्या कार्याचा आढावा घेऊन त्यांना क्रियाशील करून त्याचे संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले पाहिजे. केवळ उत्पादन वाढ हा एक निकष योग्य नाही. उत्पादकता वाढत असली पण उत्पादनाच खर्च वाढत असेल व शेतकऱ्याचे उत्पन्न कमी होत असेल तर कृषी तज्ज्ञांचा सल्ला योग्य आहे असे म्हणता येणार नाही.

दहा टक्के शेतकऱ्यांनी सांगितले की, गेल्या वर्षभरात त्यांच्या कुटुंबाला खायला काहीही नसल्यामुळे काही वेळा उपाशी राहावे लागले. बहुतांश (६९ टक्के) शेतकरी कुटुंबांना दिवसात दोन वेळा जेवायला मिळत होते. फक्त २ टक्के शेतकरी कुटुंबांना एक वेळचेच तर ३४ टक्के कुटुंबांना दिवसात दोनहून अधिक वेळा खायला मिळत होते.

दिवसातून तीन वेळचे जेवण फक्त ४४ टक्के शेतकऱ्यांना तर फक्त दुपारचे आणि रात्रीचे जेवण ३९ टक्के शेतकऱ्यांना मिळत असल्याचे सर्वेक्षणातून दिसून आले. ६५ टक्के शेतकऱ्यांना शेतीशी संबंधित कामांमध्ये कुटुंबातल्या इतर सदस्यांची मदत होत असल्याचे सांगितले. ७५ टक्क्याहून अधिक शेतकऱ्यांनी आपण दहा वर्षाहुन अधिक काळ शेती करत असल्याचे सांगितले. केवळ दहा टक्के शेतकऱ्यांकडेच शेतकरी संघटनांचे सदसत्व असल्याचे आढळले.

जमिनीची मालकी – ८६ टक्के शेतकऱ्यांकडे किंवा त्यांच्या कुटुंबांकडे स्वमालकीची शेतजमीन होती. या सर्वेक्षणात भाग घेतलेल्या शेतकऱ्यांपैकी १४ टक्के शेतकरी भुमिहीन होते, म्हणजे त्यांच्याकडे स्वमालकीची जमीन नव्हती. ६० टक्के शेतकरी अल्प–भूधारक (फक्त १ ते ३ एकरपर्यंतच शेती असलेले) शेतकरी होते.

शेतीततले स्वारस्य – सुमारे तीन चतुर्थांश शेतकऱ्यांना त्यांचा व्यवसाय आवडत असल्याचे या सर्वेक्षणातून आढळले. तुम्हाला शेती आवडते का? या प्रश्नावर ७२ टक्के म्हणजे बहुतांश शेतकऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. तर २२ टक्के शेतकऱ्यांनी मात्र आपल्याला शेती करायला आवडत नसल्याचे सांगितले.

या प्रश्नांविषयी प्रतिसादांच्या प्रादेशिक विश्लेषणातून असे दिसून आले की, मध्य भारतातल्या ८४ टक्के शेतकऱ्यांना शेती करायला आवडत होते. मात्र उत्तर आणि पूर्व भागात शेती आवडणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या या तुलनेत कमी होती. ती अनुक्रमे ६७ आणि ६९ टक्के अशी होती. शेती करणे आवडत असल्याचे सांगणाऱ्यांपैकी ६० टक्के शेतकऱ्यांनी शेती हा वंशपरंपरागत व्यवसाय असल्यामुळे आपल्याला आवडतो असे सांगितले. १५ टक्के शेतकऱ्यांना आपण शेतकरी असल्याचा अभिमान वाटतो असे त्यांनी सांगितले. शेतीतून चांगले उत्पन्न मिळत असल्यामुळे ९० टक्के शेतकऱ्यांनी, तर शेती करतांना आनंद वाटतो म्हणून शेती करायला आवडते असे उत्तर १० टक्के शेतकऱ्यांनी सांगितले.

२२ टक्के लोकांना शेती करायला आवडत नव्हते, त्याची कारण काय होती? शेतीतून चांगले उत्पन्न मिळण्याचा अभाव असेण हे शेतीविषयीच्या नावडीचे प्रमुख कारण असल्याचे ३६ टक्के शेतकऱ्यांनी सांगितले. कौटुंबिक दबावामुळे शेती करत असल्याचे त्यांच्यापैकी १८ टक्के लोकांनी तर या क्षेत्रात आपल्याला भवितव्य नसल्याचे १६ टक्के लोकांनी सांगितले. इतर काम करायला आवडेल असे ९ टक्के लोकांनी; तर शेती करणे जोखमीचे किंवा तणावपूर्ण असल्यामुळे शेती करायला आवडत नाही असे ८ टक्के लोकांनी सांगितले.

शेतकऱ्यांची वास्तव स्थिती – आपला भाग वगळता, देशातील उत्तर भागातल्या शेतकऱ्यांची स्थिती कशी वाटते, या प्रश्नाला उत्तर देतांना, देशातल्या शेतकऱ्यांची स्थिती वाईट असल्याचे ४७ टक्के शेतकऱ्यांनी आणि चांगली असल्याचे १५ टक्के शेतकऱ्यांनी सांगितले.

विशेषत: देशाच्या पूर्वेकडच्या पश्चिम बंगाल या आणि त्याखालोखाल दक्षिणेकडच्या केरळ या राज्यांतल्या शेतकऱ्यांनी देशातल्या शेतकऱ्यांच्या स्थितीविषयी अधिक नकारात्मक मते मांडली. पश्चिम आणि मध्य महाराष्ट्रातील शेतकरी मात्र तुलनेने कमी असमाधानी असल्याचे आढळले ही स्वारस्यपूर्ण बाब आहे.

शेतकऱ्यांच्या वर्तमानकालीन आर्थिक स्थितीविषयी – आपल्या वर्तमानकालीन आर्थिक स्थितीविषयी सुमारे ५० टक्के शेतकरी समाधानी; तर ४० टक्के शेतकरी असमाधानी होते. प्रादेशिक नमुन्याचा विचार करता, असे दिसून आले की; पूर्व भारतातल्या शेतकऱ्यांच्या तुलनेत मध्य भारतातले शेतकरी अधिक समाधानी होते.

आपल्या सध्याच्या आर्थिक स्थितीची तुलना पाच वर्षापूर्वीच्या आर्थिक स्थितीशी करण्यासही शेतकऱ्यांना सांगण्यात आले. पाच वर्षापूर्वीच्या आर्थिक स्थितीच्या तुलनेत आपल्या परिस्थितीत आता सुधारणा झाल्याचे ४० टक्के शेतकऱ्यांनी सांगितले. आर्थिक परिस्थितीत काहीही फरक झाला नसल्याचे ३७ टक्के शेतकऱ्यांनी सांगितले; तर पाच वर्षापूर्वीच्या तुलनेत आपली आर्थिक परिस्थितीत खालावल्याचे १५ टक्के शेतकऱ्यांनी सांगितले. मात्र तरीही आपल्या भविष्यकालीन आर्थिक स्थितीविषयी शेतकरी आशावादी आहेत.



Created by Universal Document Converter

# अहवाल विभाग





Created by Universal Document Converter

Created by Universal Document Converter

श्री व्ही. एस. नाईक कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,रावेर

# जिमखाना विभाग

## वार्षिक अहवाल २०२०-२१

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ सुरूवातीला कोरोना प्रादुर्भाव असल्यामुळे व गेल्या २ वर्ष जिमखाना बंद असल्याने ऑनलाईन कार्यक्रम करण्याचे नियोजन करण्यात आले. या मार्फत येणाऱ्या ऑलम्पिक स्पर्धेच्या अनुषंगाने व परीसरातील ऑलम्पिक खेळांसंदर्भात जनजागृती साठी नुतन मराठा महाविद्यालय, जळगाव, कबचौ उमवि जळगाव, जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय जळगाव यांच्या संयुक्त विद्यामाने ऑलिम्पिक जागरण समिती गठीत करण्यात आली व त्याव्दारे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

गेल्या दोन वर्षापासुन बंद झालेले जिमखाना तसेच कोव्हीड-१९ च्या प्रर्दभावाने शरिरीक शिक्षणाचे महत्व या अंनुषंगाने विदयार्थांच्या सर्वांगीनी विकास व्हावा म्हणून संस्थेने व महाविदयालयाने क्रिडा साहीत्य खेळाडूनसाठी उपलब्ध करूण दिले.

सन २०२१-२२ या वर्षी महाविदयालयाने विवीध स्पर्धेत सहभाग घेऊन विजेतेपद मिळवीले तसेच मैदान/ ज्युदो/ रग्बी/ कबडडी/ तायकांदो या स्पधेचे जनरल विजेतेपद सुध्दा प्राप्त झाले. या स्पधेतील विजयी खेळाळुंनी विभागीय स्पधेसाठी चांगले नैपुन्ना प्राप्त करून अखिल भारतीय विदयापीठ स्तरावर एकुण खेळाडूंनी सहभाग नोंदवीला त्यामधील विशेष बाब म्हणजे वेटलीफटींग या स्पर्धेत चंढीगड येथे गेलेल्या विदयापीठच्या संघामधील महाविदयालयाच्या खेळाडू गोविंदा महाजन व उदय महाजन यांनी सिल्वर मेडल तसेच अभीषेक महाजन याने कांस्य पदक प्राप्त केले तसेच अभिमानाची बाब म्हणजे दुसऱ्या खेलो इंडीया अंतरविदयापीठ स्पर्धेत जैन विदयापीठ बँगलोर या ठिकाणी(दि.२४/०४/२०२२ ते ०३/०५/२०२२) रोजी आपल्या महाविदयालयाचे गोवींदा महाजन याने पुन:श्च दुसऱ्यावर्षी गोल्ड मेडलची कमाई केली. उदय महाजन याने सिल्वर मेडल व किरण महाजन याने सील्वर मेडल तसेच अभीषेक महाजन या खेळाळुने अतीशय सुरक्षेच्या सामन्यात चांगले प्रदर्शन केले या चारही खेळाळुंच्या चांगल्या कामगीरीच्या जोरावर क.ब.चौ.उ.म. विदयापीठ व्दितीय रनअर चॅम्पीयन मिळाली सदर स्पर्धा डी. डी. स्पोर्टस लाईव्ह होत्या याच प्रमाणे ऑल इंडीया रग्बी फुटबॉल या स्पर्धा मुंबई विदयापीठ येथे पार पडल्या या संघात आपल्या महाविदयालयाच्या एकुण पाच खेळाळुंचा समावेश होता. या पाचही खेळाळुंचा क.ब.चौ.उ.म.विदयापीठ संघाला कांस्य पदक मिळाले त्यात महत्वाची भुमीका होती. या संघातील कु.वैष्णवी पाटील ही उत्कृष्ट खेळाडू ठरली अशा प्रकारे या वर्षी ऑल इंडीया लेव्हलला एकुण ११ पदके मिळवून देण्याची ऐतीहासीक कामगीरी आपल्या महाविदयालयाच्या वतीने पार पडली.

| Name of Title & date | Organizing committee | Name of resource person & Guest | No of Participant |
|---|---|---|---|
| ऑलम्पिक जागरण दि. १५ जुलै, २०२१ ते २० जुलै, २०२१ | कवयित्री बहिणाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व श्री. व्ही. नाईक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, रावेर व नुतन मराठा महाविद्यालय तसेच जळगाव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जळगाव यांच्या सयुंक्त विद्यमाने | १५ जुलै २०२१,उद्घाटन प्रभारी कुलगुरू डॉ. ई वायुनंदन,अध्यक्ष श्री. चंद्रकांत कांबळे मा.उपसंचालक नाशिक विभाग वक्ते - पै. मारूती आडकर ऑल्मपिक वीर १६ जुलै, २०२१ - अध्यक्ष - दिलीपजी रामु पाटील राज्यपाल नामनिर्देशित व्य. प. सदस्य वक्ते - मा. हेमंत डोणगावकर क्रीडा महर्षी १७ जुलै, २०२१,अध्यक्ष - विष्णुभाउ भंगाळे सिनेट सदस्य वक्ते आनंद लुईस मेनेझेस ऑल्मपिकवीर १८ जुलै - अध्यक्ष -प्राचार्य डॉ. आर. एस. पाटील अधिष्ठाता विज्ञान शाखा क. ब. चौ. उ. म. वि. वक्ते- श्री. नवनाथ फरताळे आंतरराष्ट्रीय चॅम्पीयन १९ जुलै- अध्यक्ष मा. श्री. सुनंदा पाटील जिल्हा क्रीडा अधिकारी, नंदूरबार वक्ते- मा. श्री. प्रदीप तळवेलकर शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त २० जुलै, २०२१ वक्ते- मा.श्री. योगेश दाधवे,समारोप अध्यक्ष - प्र.कुलगुरू डॉ. बी. व्ही. पवार कबचौउमवि, जळगाव शुभेच्छा- ओमप्रकाश बकोडीया आयुक्त क्रीडा व युवक विभाग महाराष्ट्र राज्य धनंजय भोसले - खजिनदार महाराष्ट्र ऑल्मपिक असोसियन | ६३ |



Created by Universal Document Converter

| Name of Title & date | Organizing committee | Name of resource person & Guest | No of Participant |
|---|---|---|---|
| एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा ऑल्मपिक जागरण दि. ०५ ऑगष्ट, २०२१ | कवयित्री बहिणाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व श्री. व्ही. नाईक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, रावेर, नुतन मराठा महाविद्यालय व इकरा महाविद्यालय, जळगाव तसेच जळगाव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जळगाव यांच्या सयुंक्त विद्यमाने | अध्यक्ष – डॉ. अब्दुल करीम सालार अध्यक्ष, इकरा एज्युकेशन सोसायटी, जळगाव वक्ते – डॉ. उदय डोंगरे, क्रीडा संचालक, ए. एस. सी. महाविद्यालय, कन्नड, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त | १७७ |
| राष्ट्रीय क्रीडा दिन निमित्त एक दिवसीय कार्यशाळा २९ ऑगष्ट, २०२१ | ऑल्मपिक जागरण समिती व भूसावळ कला व विज्ञान व पी. ओ. नाहाटा वाण्ज्यि महाविद्यालय, भुसावळ | कार्यक्रमाचे अध्यक्ष – डॉ. एम. यु. वायकोळे प्रमुख अतिथी – मा. श्री. संजय मिसळ अध्यक्ष महाराष्ट्र वेटलिफ्टिंग असोसियशन प्रा. डॉ. पी. व्ही. दलाल, प्राचार्य श्री. व्ही. एस. नाईक महाविद्यालय, रावेर जि. जळगाव डॉ. दिनेश पाटील, क्रीडा संचालक क. ब. चौ. उमवि जळगाव वक्ते – श्री. ओंकार ओतारी, आंतरराष्ट्रीय खेळाडु, कॉमनवेल्थ पदक प्राप्त खेळाडु वक्ते – श्री. शिरिष रुमाळे आंतरराष्ट्रीय खेळाडु, व रेल्वे प्रशिक्षक | २२० |
| एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा स्पोर्टस् दिनांक ०३ सप्टेबर, २०२१ | ऑल्मपिक जागरण समिती व दादासाहेब रावल महाविद्यालय, दोंडाईचा जिल्हा. धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने | अध्यक्ष – डॉ. के. डी. गिराशे, प्राचार्य दादासाहेब रावल महाविद्यालय, दोंडाईचा प्रमुख अतिथी – डॉ. दिनेश पाटील, क्रीडा संचालक क. ब. चौ. उमवि जळगाव प्रमुख अतिथी – प्रा. डॉ. पी. व्ही. दलाल, प्राचार्य श्री. व्ही. एस. नाईक महाविद्यालय, रावेर जि. जळगाव प्रमुख वक्ते – श्री. श्रीराम दिनानाथ भावसार, अर्जुन व शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त | ३८९ |
| स्वातंत्र्य दिनांच्या अमृतमहोत्सव निमित्त एक सप्ताही राष्ट्रीय कार्यशाळा व फीट इंडीया मोहिम दि. २७ सप्टेबर, २०२१ ते ०२ ऑक्टोबर, २०२१ | कवयित्री बहिणाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व जळगाव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जळगाव तसेच ऑल्मपिक जागरण समिती यांच्या सयुंक्त विद्यमाने | दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ – उद्घाटन प्रभारी कुलगुरु डॉ. ई वायुनंदन अतिथी – मा. अभिजित राउत, जिल्हाधिकारी, जळगाव जिल्हा प्रमुख वक्ते – डॉ. विरेंद्र झांझरिया एल. एन. आय. पी. ई ग्वालियर २८ सप्टेंबर, २०२१ अध्यक्ष – विष्णुभाऊ भंगाळे सिनेट सदस्य प्रमुख वक्ते – डॉ. अपर्णा अष्टपुत्रे सिसोदिया, प्रमुख, मानसशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद २९ सप्टेंबर, २०२१ अध्यक्ष डॉ. अशोक राणे प्रमुख, आंतरविदयाशाखा, कबचौउमवि, जळगााव प्रमुख वक्ते – श्री. सुरेश बोरकुल क्रिकेट मार्गदर्शक ३० सप्टेंबर, २०२१ अध्यक्ष– दिलीपजी राम पाटील राज्यपाल नामनिर्देशित व्य. प. सदस्य कबचौ उमवि जळगाव प्रमुख वक्ते – श्री. सचिन पाटील योगा मार्गदर्शक ०१ ऑक्टोबर, २०२१ अध्यक्ष – प्राचार्य डॉ. आर. एस. पाटील, अधिष्ठाता विज्ञान शाखा क. ब. चौ. उ. म. वि. जळगाव प्रमुख वक्ते – अनिल करवंदे क्रीडा मानशास्त्र तज्ञ ०२ ऑक्टोबर, २०२१ समारोपीय अध्यक्ष – प्र. कुलगुरू डॉ. बी. व्ही. पवार कबचौ उमवि, जळगाव प्रमुख अतिथी – ओमप्रकाश बकोडीया आयुक्त क्रीडा व युवक विभाग प्रमुख अतिथी – श्री. अशोक दुधारे इंडियन ऑल्मपिक असोसियशन प्रमुख वक्ते – डॉ. अजय उपाध्येय एल. एन. आय. पी. ई ग्वालियर श्री. संजय मिसळ अध्यक्ष महाराष्ट्र वेटलिफ्टिंग असोसियशन डॉ. एस. बेलवरकर क्रीडा संचालक एम. जे महाविदयालय, जळगाव | ५९३ |



Created by Universal Document Converter

| Name of Title & date | Organizing committee | Name of resource person & Guest | No of Participant |
|---|---|---|---|
| स्वातंत्र दिनांच्या अमृतमहोत्वा निमित्त एक सप्ताही फीट इंडीया व्र्हच्युअल रन मोहिम दि. २७ सप्टेबर, २०२१ ते | कवयित्री बहिणाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व जळगाव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जळगाव तसेच ऑल्मपिक जागरण समिती यांच्या सयुंक्त विद्यमाने | --- | ३७१ |
| एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा आधुनिक कुश्ती दि. ३० ऑक्टोबर, २०२१ | ऑल्मपिक जागरण समिती व ए. आर. बी. गरूड महाविदयालय, शेंदुर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने | अध्यक्ष - प्राचार्य डॉ. व्ही. आर. पाटील, ए. आर. बी. गरूड महाविदयालय, शेंदुर्णी प्रमुख वक्ते - श्री. काकासाहेब पवार, अर्जुन पुरस्कार प्राप्त प्रमुख वक्ते - श्री. संदीप रासकल आंतरराष्ट्रीय खेळाडु व प्रशिक्षक | २२० |
| एक सप्ताह महिला सशक्तीकरण योगा मोहिम दि. २०/१०/२०२१ ते २६/१०/२०२१ | ऑल्मपिक जागरण समिती व जे. के. शाह आदर्श महाविदयालय, निजामपुर जैताणे यांच्या संयुक्त विद्यमाने | अध्यक्ष - एल. बी. देशमुख प्राचार्य, नुतन मराठा महाविदयालय, जळगाव प्रमुख अतिथी- प्रा. डॉ. पी. व्ही. दलाल, प्राचार्य श्री. व्ही. एस. नाईक महाविद्यालय, रावेर जि. जळगाव डॉ. दिनेश पाटील, क्रीडा संचालक क. ब. चौ. उमवि जळगाव श्री. मिलिंद दिक्षित जिल्हा क्रीडा अधिकारी जळगाव जिल्हा प्रमुख | -- |

### या वर्षी अंतरमहाविदयालयीन स्पर्धेत आपल्या महाविदयालयातील सहभागी संघ व खेळाडू संख्या

| क्र. | खेळाचे नाव | पुरुष | महिला | पुरूष संघ संख्या | महिला संघ संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | कबडडी | प्रथम | | | १२ |
| २ | शक्तीतोलन | व्दितीय | व्दितीय | ०७ | ०६ |
| ३ | भारोत्तोलन | व्दितीय | व्दितीय | ०७ | ०६ |
| ४ | शरीरसोष्ठव | सहभाग | | ०३ | |
| ५ | रग्बी | व्दितीय | प्रथम | १२ | १० |
| ६ | मैदाणी स्पर्धा | प्रथम | प्रथम | १५ | १० |
| ७ | ज्युदो | प्रथम | प्रथम | ०८ | ०७ |
| ८ | क्रॉसकंट्री | सहभाग | | ०३ | |
| ९ | तायकांदो | प्रथम | प्रथम | १३ | ११ |
| १० | हॉकी | तृतीय | तृतीय | ११ | ११ |
| ११ | कुस्ती | सहभाग | प्रथम | ०८ | ०७ |
| १२ | मिनीगोल्फ | | | ०४ | ०४ |
| १३ | मल्लखांब | तृतीय | | ०४ | |



Created by Universal Document Converter

जळगाव विभाग अंतरमहाविदयालयीन स्पर्धेत विजयी खेळाडूंची नावे

| अ.क्र. | खेळाडूचे नाव | खेळाचे नाव | क्रमांक | आयोजक महाविद्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | वैष्णवी पाटील | कबड्डी | प्रथम | बाहेती महा.जळगाव |
| २ | रोहिणी कोळी | | | |
| ३ | विश्वेश्वरी न्हावी | | | |
| ४ | रोहिणी कोळी | | | |
| ५ | नैना बिरपण | | | |
| ६ | रितीक बारी | | | |
| ७ | रक्षीता महाजन | | | |
| ८ | ललीता महाजन | | | |
| ९ | तेजस्वीनी पाटील | | | |
| १० | राधा सुतार | | | |
| ११ | वैष्णवी सांगळे | | | |
| १२ | सारंग बिरपण | हॉकी | तृतीय | नुतन मराठा जळगाव |
| १३ | सुनील कोळी | | | |
| १४ | सागर धनगर | | | |
| १५ | प्रणय पाटील | | | |
| १६ | भुषण नैथ्येकर | | | |
| १७ | शिवाजी सोनवणे | | | |
| १८ | अभिषेक चौधरी | | | |
| १९ | लखन महाजन | | | |
| २० | अविनाश गाढे | | | |
| २१ | करण तायडे | | | |
| २२ | रितीका बारी | हॉकी | प्रथम | नुतन मराठा जळगाव |
| २३ | राधा सुतार | | | |
| २४ | वैष्णवी सांगळे | | | |
| २५ | नयना बिरपण | | | |
| २६ | वैष्णवी पाटील | | | |
| २७ | रक्षिता महाजन | | | |
| २८ | दिपाली पाटील | | | |
| २९ | रोहिणी कोळी | | | |
| ३० | तेजस्वीनी पाटील | | | |
| ३१ | पुजा लोहार | | | |
| ३२ | प्रणव विनोद पाटील | ज्युदो | प्रथम | नुतन मराठा जळगाव |
| ३३ | सुनिल कोळी | | द्वितीय | |
| ३४ | भुषण नैथ्येकर | | प्रथम | |
| ३५ | शिवाजी सोनवणे | | द्वितीय | |
| ३६ | अभीषेक चौधरी | | प्रथम | |
| ३७ | सारंग बिरपण | | तृतीय | |
| ३८ | लखन महाजन | | प्रथम | |
| ३९ | करण तायडे | | द्वितीय | |
| ४० | अविनाश गाढे | | प्रथम | |
| ४१ | वैष्णवी सांगळे | | प्रथम | |
| ४२ | नयना बिरपण | | द्वितीय | |
| ४३ | रक्षिता महाजन | | प्रथम | |
| ४४ | वैष्णवी पाटील | | प्रथम | |
| ४५ | दिपाली पाटील | | प्रथम | |
| ४६ | रोहिणी कोळी | | द्वितीय | |
| ४७ | रितीका बारी | | प्रथम | |
| ४८ | राधा सुतार | | तृतीय | |
| ४९ | तेजस्वीनी पाटील | | प्रथम | |



Created by Universal Document Converter

# ॲथलेटीक्स

| अ.क्र. | खेळाडूचे नाव | खेळाचे नाव | क्रमांक | आयोजक महाविद्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | यश भोई | १०० मी | प्रथम | क.ब.चौ.उ.विद्यापीठ,जळगाव |
| २ | अदित्य महाजन | लाँग जंम्प, ट्रीपल जंम्प | प्रथम | |
| ३ | सुनिल कोळी | ४०० मी, ४×४०० रिले | प्रथम | |
| ४ | सारंग बिरपण | ४०० मी, ४×४०० रिले | प्रथम | |
| ५ | कृष्णा चव्हाण | ८०० मी, ४×४०० रिले | प्रथम | |
| ६ | पुर्वेश महाजन | २१ की. मी. रन | व्दितीय | |
| ७ | अभिषेक बिरपन | २१ की. मी. रन | तृतीय | |
| ८ | अमीन तडवी | १० की. मी. रन | तृतीय | |
| ९ | शिवाजी सोनवणे | २१ की. मी. चालने | प्रथम | |
| १० | सागर धनगर | २१ की. मी. चालने | व्दितीय | |
| ११ | प्रणव पाटील | गोळा फेक | तृतीय | |
| १२ | अभिषेक चौधरी | उंच उडी | प्रथम | |
| १३ | आतीष कोळी | भाला फेक | तृतीय | |
| १४ | भुषण नेहतेकर | पोल पल्ट उंच उडी | प्रथम | |
| १५ | लखन महाजन | हॅमर थ्रो, ४×४०० रिले | प्रथम | |
| १६ | महिमा पाटील | ४०० मी, ४×४०० रिले | प्रथम | |
| १७ | वैष्णवी पाटील | भाला फेक ४×४०० रिले | प्रथम | |
| १८ | नयना बिरपण | ४०० मी, ४×४०० रिले | प्रथम | |
| १९ | पुजा लोहार | उंच उडी ४×४०० रिले | प्रथम | |
| २० | ललिता महाजन | भाला फेक, गोळा फेक | तृतीय | |
| २१ | रोहिणी कोळी | गोळा फेक ४×४०० रिले | प्रथम | |
| २२ | वैष्णवी सांगळे | ५ की. मी. चालने | व्दितीय | |
| २३ | राधा सुतार | ५ की. मी. चालने | तृतीय | |
| २४ | दिपाली पाटील | ४×१०० रिले | व्दितीय | |

| अ.क्र. | खेळाडूचे नाव | खेळाचे नाव | क्रमांक | आयोजक महाविद्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | उदय महाजन | वेटलीफटींग | व्दितीय | धनाजी नाना चौधरी महा. फैजपुर |
| २ | गोविंदा महाजन | | प्रथम | |
| ३ | अभिषेक महाजन | | प्रथम | |
| ४ | भुपेंद्र मिसर | | व्दितीय | |
| ५ | किरण मराठे | | प्रथम | |
| ६ | सनी पीडीयार | | व्दितीय | |
| ७ | विष्णु भोई | | व्दितीय | |
| ८ | प्रणव पाटील | | व्दितीय | |
| ९ | लखन महाजन | | व्दितीय | |
| १० | अविनाश गाढे | | व्दितीय | |
| १ | भुषण नेहतेकर | शरीरसोष्ठव | व्दितीय | धनाजी नाना चौधरी महा. फैजपुर |
| २ | करण तायडे | | तृतीय | |
| ३ | प्रणव पाटील | | व्दितीय | |
| १ | नयना बिरपण | तायकांदो | प्रथम | श्री. व्ही. एस. नाईक महा. रावेर |
| २ | विश्वशवरी न्हावी | | व्दितीय | |
| ३ | दिपाली पाटील | | व्दितीय | |
| ४ | वैष्णवी सांगळे | | व्दितीय | |
| ५ | चैताली पाटील | | व्दितीय | |



Created by Universal Document Converter

| अ.क्र. | खेळाडूचे नाव | खेळाचे नाव | क्रमांक | आयोजक महाविद्यालय |
|---|---|---|---|---|
| ६ | पुजा पाटील | | प्रथम | |
| ७ | राधा सुतार | | व्दितीय | |
| ८ | महिमा पाटील | तायकांदो | प्रथम | श्री. व्ही. एस. नाईक महा. रावेर |
| ९ | निशा अवधुत | | प्रथम | |
| १० | रोहिणी कोळी | | व्दितीय | |
| ११ | वेष्णवी पाटील | | तृतीय | |
| १२ | प्रतिक्षा पाटील | | व्दितीय | |
| १३ | निलेश पाटील | | प्रथम | |
| १४ | यश शिंदे | | व्दितीय | |
| १५ | प्रणव भोई | | प्रथम | |
| १६ | लखन महाजन | | प्रथम | |
| १७ | कन्हैया भारते | | व्दितीय | |
| १ | अमीन तडवी | क्रॉसकंट्री | चौथा | कला वाणिज्य विज्ञान महा. यावल |
| २ | पुर्वेश महाजन | | सहावा | |
| १ | वैष्णवी पाटील | रग्बी फुटबॉल | प्रथम | श्री. व्ही. एस. नाईक महा. रावेर |
| २ | रोहिणी कोळी | | | |
| ३ | विश्वेशवरी न्हावी | | | |
| ४ | पुजा लोहार | | | |
| ५ | नयना बिरपण | | | |
| ६ | चैताली महाजन | | | |
| ७ | राधा सुतार | | | |
| ८ | दिपाली पाटील | | | |
| ९ | रीतीका बारी | | | |
| १ | अंकीत पवार | पुरूष रग्बी | व्दितीय | श्री. व्ही. एस. नाईक महा. रावेर |
| २ | लखन महाजन | | | |
| ३ | भुषण नेहतेकर | | | |
| ४ | सागर धनगर | | | |
| ५ | शिवाजी सोनवणे | | | |
| ६ | सारंग बिरपण | | | |
| ७ | अभिषेक चौधरी | | | |
| ८ | यश भोई | | | |
| ९ | पुर्वेश महाजन | | | |
| १० | आतिश कोळी | | | |

# आंतर विभागीय स्पर्धेत विजय खेळाडू

| अ.क्र. | खेळाडूचे नाव | खेळाचे नाव | क्रमांक | आयोजक महाविद्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | वैष्णवी पाटील | कबड्डी | प्रथम | क. ब. चौ. उ. म.विदयापीठ |
| २ | पुजा लोहार | | प्रथम | |
| ३ | नैना बिरपण | | प्रथम | |
| ४ | रक्षिता महाजन | | प्रथम | |
| ५ | रोहिणी कोळी | | प्रथम | |
| १ | लखन महाजन | हॉकी | प्रथम | एस. एस. बी. टी. महा. बांभोरी |
| २ | राधा सुतार | | व्दितीय | |
| ३ | दिपाली पाटील | | व्दितीय | |



Created by Universal Document Converter

| अ.क्र. | खेळाडूचे नाव | खेळाचे नाव | क्रमांक | आयोजक महाविद्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | प्रणव पाटील | ज्युदो | व्दितीय | दहीवेल महा. दहीवेल. |
| २ | भुषण नेहतेकर | | व्दितीय | |
| ३ | अभिषेक चौधरी | | तृतीय | |
| ४ | लखन महाजन | | व्दितीय | |
| ५ | अविनाश गाढे | | व्दितीय | |
| ६ | वैष्णवी पाटील | | व्दितीय | |
| ७ | नयना बिरपण | | तृतीय | |
| ८ | वैष्णवी सांगळे | | व्दितीय | |
| ९ | रीतीका बारी | | व्दितीय | |
| १ | किरण तायडे | कुस्ती | व्दितीय | दहीवेल महा. दहीवेल. |
| २ | वैष्णवी सांगळे | | प्रथम | |
| ३ | प्रणव पाटील | | तृतीय | |
| ४ | सागर पाटील | | तृतीय | |
| ५ | वैष्णवी पाटील | | व्दितीय | |
| ६ | नयना बिरपण | | तृतीय | |
| ७ | लखन महाजन | | तृतीय | |
| ८ | रोहिणी कोळी | | तृतीय | |
| ९ | रीतीका बारी | | तृतीय | |
| १० | रोहिणी कोळी | | व्दितीय | |
| १ | आदित्य महाजन | ॲथलीटीक्स लॉग जम्प,ट्रिपल जम्प. | प्रथम | क. ब. चौ. उ. म.विदयापीठ |
| २ | सुनील कोळी | ४×४०० | प्रथम | |
| ३ | सारंग बिरपण | ४x४०० | प्रथम | |
| ४ | कृष्णा चव्हाण | ४x४०० | प्रथम | |
| ५ | वैष्णवी पाटील | शॉट फुट | प्रथम | |
| ६ | यश भोई | १०० मि | तृतीय | |
| ७ | अभिषेक चौधरी | उंच उडी | तृतीय | |
| ८ | वैष्णवी पाटील | ४x४०० रिले | प्रथम | |
| ९ | पुजा लोहार | ४x४०० रिले | प्रथम | |
| १० | महीमा पाटील | ४x४०० रिले | प्रथम | |
| ११ | नयना बिरपण | ४x४०० रिले | प्रथम | |
| १ | गोविंदा महाजन | वेटलीफटींग | प्रथम | डी. एन. कॉलेज. फैजपुर. |
| २ | उदय महाजन | | प्रथम | |
| ३ | किरण मराठे | | प्रथम | |
| ४ | अभिषेक महाजन | | प्रथम | |
| ५ | विष्णु भोई | | प्रथम | |
| ६ | सनी पीडीयार | | प्रथम | |
| ७ | भुपेद्र मिसर | | प्रथम | |
| ८ | प्रणव पाटील | | व्दितीय | |
| ९ | लखन महाजन | | व्दितीय | |
| १० | वैष्णवी पाटील | | व्दितीय | |
| ११ | रीतीका बारी | | व्दितीय | |
| १२ | वैष्णवी सांगळे | | व्दितीय | |
| १३ | राधा सुतार | | व्दितीय | |
| १४ | नयना बिरपण | | व्दितीय | |



Created by Universal Document Converter

| अ.क्र. | खेळाडूचे नाव | खेळाडूचे नाव | क्रमांक | आयोजक महाविद्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | प्रणय पाटील | शरीरसोष्ठव | व्दितीय | डी. एन. कॉलेज. फैजपुर. |
| १ | नयना बिरपण | तायकांदो | प्रथम | जे. टी. पी. कॉलेज नंदुरबार |
| २ | महीमा पाटील | | प्रथम | |
| ३ | निशा अवधुत | | प्रथम | |
| ४ | प्रणव भोई | | प्रथम | |
| ५ | यश शिंदे | | प्रथम | |
| ६ | गोविंदा चरण | | प्रथम | |
| ७ | निलेश पाटील | | प्रथम | |
| ८ | वैष्णवी सांगळे | | व्दितीय | |
| ९ | विश्वशवरी न्हावी | | व्दितीय | |
| १० | कन्हैया भारते | | व्दितीय | |
| १ | वैष्णवी पाटील | रग्बी | प्रथम | जे.टी.पी. कॉलेज नंदुरबार |
| २ | रोहीणी कोळी | | प्रथम | |
| ३ | पुजा लोहार | | प्रथम | |
| ४ | विश्वशवरी न्हावी | | प्रथम | |
| ५ | नयना बिरपण | | प्रथम | |
| ६ | चैताली महाजन | | प्रथम | |
| ७ | सुनील कोळी | | व्दितीय | |
| ८ | भुषण नेहतेकर | | व्दितीय | |
| ९ | सारंग बिरपण | | व्दितीय | |
| १० | यश भोई | | व्दितीय | |

## अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये सहभागी खेळाडु

| अ.क्र. | खेळाडूचे नाव | खेळाचे नाव | ठिकाण | पारितोषिक |
|---|---|---|---|---|
| ०१ | महाजन गोविंदा सुनिल | भारोत्तोलन | चंदीगड | रजत |
| ०२ | महाजन उदय अनिल | | | रजत |
| ०३ | मिसर भुपेंद्रा सुनिल | | | सहभाग |
| ०४ | महाजन अभिषेक गणेश | | | कांस्य |
| ०५ | भोई विष्णु कैलास | | | सहभाग |
| ०६ | किरण रविंद्रभाई मराठे | | | चौथा |
| ०७ | पिडीयार सनी धमेंद्र | | | सहभाग |
| ०८ | न्हावी विश्वेश्वरी मुकुंदा | रग्बी | मुंबई | कांस्य |
| ०९ | बिरपन नयना दिपक | | | |
| १० | पाटील वैष्णवी विनोद | | | |
| ११ | कोळी रोहीणी नारायण | | | |
| १२ | पुजा राजेश लोहार | | | |
| १३ | भुषण सुनिल नैय्येकर | रग्बी | मुंबई | सहभाग |
| १४ | पाटील महिमा रामदास | तायक्कांदो | कुरूक्षेत्र | आठवा क्रमांक |
| १५ | अवधुत निशा प्रमोद | | | सहभाग |
| १६ | बिरपन नयना दिपक | | | सहभाग |
| १७ | भोई प्रणव अशोक | तायक्कांदो | बँगलोर | आठवा |
| १८ | शिंदे यश देवलाल | | | सहभाग |
| १९ | चारण गोविंदा आनंदा | | | आठवा |
| २० | पाटील निलेश प्रभाकर | | | आठवा |
| २१ | कोळी सुनिल निलकंठ | मैदानी | मँगलोर | सहभाग |
| २२ | महाजन आदित्य मोहनदास | | | सहभाग |



Created by Universal Document Converter

| अ.क्र. | खेळाडूचे नाव | खेळाचे नाव | ठिकाण | पारितोषिक |
|---|---|---|---|---|
| २३ | बिरपन सारंग रूपा | | | सहभाग |
| २४ | कुष्णा रमेश चव्हाण | | | सहभाग |
| २५ | पाटील वैष्णवी विनोद | मैदानी | भूवनेश्वर | बवीसावा क्रमांक |
| २६ | सांगळे वैष्णवी नितिन | कुश्ती | भिवाणी | आठवा क्रमांक |
| २७ | पुजा राजेश लोहार | कबड्डी | अमरावती | सहभाग |
| २८ | पाटील वैष्णवी विनोद | | | |

## अखिल भारतीय विद्यापीठस्तरीय खेलो इंडिया स्पर्धा

| अ.क्र. | खेळाडूचे नाव | खेळाचे नाव | ठिकाण | पारितोषिक |
|---|---|---|---|---|
| ०१ | महाजन गोविंदा सुनिल | भारोत्तोलन | जैन विद्यापीठ, बँगलोर | सुवर्ण |
| ०२ | महाजन उदय अनिल | | | रजत |
| ०३ | महाजन अभिषेक गणेश | | | सहभाग |
| ०४ | किरण रविंद्रभाई मराठे | | | रजत |

स्पर्धा आयोजन –

१.आंतर महाविद्यालयीन तायक्वांदो स्पर्धेचे आयोजन.
२.आंतर महाविद्यालयीन रग्बी स्पर्धेचे आयोजन.
३.जिल्हास्तरीय रग्बी विविध गटाच्या स्पर्धेचे आयोजन
४.राज्यस्तरीय तायक्वांदो निवड चाचणी तसेच जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धा.
५.जिल्हास्तरीय रग्बी सराव शिबिराचे आयोजन.
६.विविध स्पर्धांचे मैदान व साहित्य उपलब्ध करून दिले.
७.पोलीस, आर्मी, सी. आर. पी. एफ., एस. आर. पी. एफ. इत्यादी तसेच विविध खेळांचे मोफत मार्गदर्शन व सरावासाठी मैदान व जिमचे व साहित्य उपलब्ध करून दिले.

प्रा. उमेश नारायण पाटील
क्रीडा संचालक



Created by Universal Document Converter

**श्री व्ही. एस. नाईक कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,रावेर**

# विद्यार्थी विकास विभाग २०२१-२२

या वर्षात विविध उपक्रम साजरे रावेर येथील श्री.व्ही.एस.नाईक कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, रावेर, जी-जळगांव आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांच्या विद्यार्थी विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने व्यक्तिमत्व विकास व्याख्यान मालेचा (एकुण १० व्याख्याने) समारोप करण्यात आला..!

या योजने अंतर्गत १.व्यक्तीमत्व विकास- डॉ. धर्मेंद्र वर्मा शासकीय महाविद्यालय बुऱ्हाणपूर मध्यप्रदेश २.सोशल मीडिया-श्री.प्रशांत पाटील ( शाखा मॅनेजर- बँक ऑफ महाराष्ट्र, रावेर ) ३.राष्ट्रीय एकात्मता- प्रा.विवेक महाजन ( धनाजी नाना महाविद्यालय,फैजपूर ) ४.जातीय सलोखा- प्रा. मनोहर तायडे ( व्ही.एस. नाईक महाविद्यालय,रावेर ) ५.बेटी बचाओ बेटी पढाओ-प्रा.क्रांती नाईक सरदार जी. जी.ज्युनियर हायस्कूल, रावेर) ६.रोजगाराच्या संधी-श्री दिपरत्न तायडे ( उद्योजक,भुसावळ ) ७.स्पर्धा परीक्षा-- श्री.वैभव देशमुख ( अकॅडमी, रावेर ) ८. लिंग समभाव -- प्रा. वंदना पाटील ९.)ताण तणाव -- डॉ. प्रमोद चौधरी ( शासकीय महाविद्यालय बुऱ्हाणपूर मध्यप्रदेश )१०).सूत्र संचालन,भाषण कौशल्य- डॉ.ताराचंद सावसाखळे ( धनाजी नाना महाविद्यालय फैजपूर ) अश्या विविध विद्यापीठाने ठरवून दिलेल्या विषयांवर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता आयोजन करण्यात आले व यांसाठी विविध विषय तज्ञांना आमंत्रित करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयाच्या वतीने प्रयत्न करण्यात आला. हा उपक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ.पी.व्ही. दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. उपक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य- डॉ.व्ही. बी. सूर्यवंशी, समन्वयक डॉ.एस. आर.चौधरी,विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.संदीप धापसे,साह्ययक विद्यार्थी विकास अधिकारी-प्रा.सत्यशील धनले डॉ.जी.आर. ढेंबरे, डॉ. बी.जी.मुख्यदल, प्रा. उमेश पाटील प्रा.मनोहर तायडे, डॉ.संतोष गव्हाड, प्रा.चतुर गाढे,कार्यलयीन अधीक्षक श्री.युवराज बिरपन, ईश्वर बारी, सुनील मेढे, संतोष महाजन, निवृत्ती कोळी, सुनील मेढे, प्रीतम मेढे, सतीश वाघ, महेंद्र महाजन, प्रकाश महाजन, आशिष घुगे,रवींद्र पाटील आदींचे सहकार्य लाभले. या उपक्रमात महाविद्यालयातील सर्व शाखेचे विद्यार्थ्यांनी मोठया प्रमाणात सहभाग घेतला. श्री. व्ही. एस. नाईक महाविद्यालयात रॅगिंग प्रतिबंध समुपदेशन कार्यशाळा संपन्न.

रावेर- येथील श्री. व्ही. एस नाईक कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दिनांक १५ मार्च २०२२ रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव व महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ.पी.व्ही.दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली एकदिवसीय रॅगिंग प्रतिबंध कार्यशाळा आयोजीत करण्यात आली होती.या कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे नॅक समन्वक डॉ एस. आर. चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळेस उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ.चौधरी म्हणाले की, रॅगिंग करणे हा गुन्हा असून महाविद्यालयात रॅगिंग मुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी नेहमीच अग्रेसर असते असे स्पष्ट केले. या कार्यशाळेचे प्रास्तविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. संदीप धापसे यांनी केले या वेळी त्यांनी या कार्यशाळा आयोजनमागची भूमिका उद्देश आणि विद्यार्थ्यांच्या दृष्टीने रॅगिंग समुपदेशनचे महत्व स्पष्ट केले. या कार्यशाळेत रॅगिंग या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी रावेर वकील संघाचे सदस्य ॲड. जितेंद्र दांडगे,तसेच ॲड.एस. डी. कोचुरे यांची प्रमुख उपस्थिती होती, विद्यार्थ्यांना रॅगिंग प्रतिबंध अधिनियम, तसेच रॅगिंग संदर्भात महाविद्यालया करीता मार्गदर्शक तत्वे या विषयावर सविस्तर असे मार्गदर्शन मान्यवरांनी केले. या वेळी विचारमंचवर प्रा.चतुर गाढे, प्रा.मनोहर तायडे, प्रा.जोशी प्रा.सागर महाजन आदी उपस्थित होते. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्रा.संदीप धापसे,प्रा.डॉ गणपत ढेंबरे, प्रा.सत्यशील धनले, डॉ.बी.जी.मुख्यदल, डॉ.संतोष गव्हाड, प्रा.एम.एस.पाटील प्रा.देविदास महाजन, श्री. युवराज बिरपन, श्री. संतोष महाजन, श्री. ईश्वर बारी यांनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेत मोठ्या संख्येने महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. श्री. व्ही. एस नाईक महाविद्यालयात '' युवतीसभा अंतर्गत स्वयंसिद्धा कराटे शिबिर'' संपन्न.

रावेर- येथील श्री.व्ही. एस.नाईक कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभाग च्या वतीने युवतीसभा अंतर्गत महाविद्यालयीन युवती करिता ८ दिवसीय स्वयंसिद्धा कराटे प्रशिक्षण मोठ्या उत्साहात संपन्न झाले. दिनांक ४ मार्च २०२२ ते १२ मार्च २०२२ या काळात महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.संदीप धापसे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू होते. या कराटे प्रशिक्षण कार्यशाळेत श्री जयेश बाविस्कर , कु. महिमा चौधरी यांनी मुलींना शास्त्रशुद्ध पद्धतीने योग्य प्रशिक्षण दिले.या प्रशिक्षण शिबिराचा समारोप दिनांक १२ मार्च २०२२ रोजी झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. पी. व्ही. दलाल हे होते या वेळी मुलींना मार्गदर्शन करतांना प्राचार्य दलाल यांनी कराटे प्रशिक्षण मधुन सन्मानाने जीवन जगण्यासाठी आत्मविश्वास निर्माण होतो असे स्पष्ट केले.तर या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती कबचौउमवी जळगांव सिनेट सदस्य डॉ.अनिल पाटील यांची होती.या कार्यक्रमात कु.रोशनी गाढे व कु. सोनल महाजन या विद्यार्थ्यांनिनी आपले मनोगत मांडले. तर सूत्रसंचालन आणि आभार डॉ.जी.आर.ढेंबरे यांनी केले. हे शिबीर यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.संदीप धापसे, सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.सत्यशील धनले, डॉ. जी.आर. ढेंबरे, डॉ. बी.जी.मुख्यदल, प्रा.चतुर गाढे,प्रा.मनोहर तायडे, क्रीडा संचालक प्रा.उमेश पाटील ,कार्यालयीन अधीक्षक श्री.युवराज बिरपन, श्री. ईश्वर बारी यांनी परिश्रम घेतले.''महिला संस्कारातून चांगल्या समाजाची निर्मिती होते'' तहसीलदार उषाराणी देवगुणे.

रावेर- रावेर येथील श्री. व्ही.एस. नाईक कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दि ८ मार्च २०२२ रोजी महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभागातर्फे तसेच यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून रावेर तालुकाच्या तहसीलदार श्रीमती उषाराणी देवगुणे या होत्या यावेळी उपस्थित महाविद्यालयीन युवती आणि महिला यांना मार्गदर्शन करताना महिला सक्षमीकरण ही काळाची गरज असून मुलींनी चांगल्या प्रकारचे शिक्षण घेतले पाहिजे ,महिला दिनाच्या निमित्ताने युवतींनी संकल्प केला पाहिजे, जीवनात उद्दिष्ट निश्चित करून त्याकरिता प्रयत्न केले पाहिजे. चांगल्या समाजाची निर्मिती महिला च्या संस्कारातून होत असतेआणि हे संस्कार रुजविण्यासाठी शिक्षक महत्वाची भूमिका निभावतात असे स्पष्ट केले,.या कार्यक्रमात मार्गदर्शक म्हणून प्रा.क्रांती नाईक ,प्रा.वंदना पाटील



Created by Universal Document Converter

पी.व्ही. दलाल हे होते तर विचारमंचवर प्रमुख उपस्थिती उपप्राचार्य डॉ. व्ही.बी.सुर्यवंशी समन्वक, डॉ.एस. आर.चौधरी,कबचौउमवी सिनेट सदस्य डॉ.अनिल पाटील हे होते.या कार्यक्रमात प्रा.सी.पी.गाढे यांनी भारतातील विविध क्षेत्रातील यशस्वी महिलाच्या कार्यकर्तृत्वाचा लेखाजोखा मांडला.कार्यक्रमाचे प्रास्तविक महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.संदीप धापसे यांनी केले,तर सूत्रसंचालन डॉ.जी.आर.ढेंबरे आणि उपस्थितांचे आभार प्रा.सत्यशील धनले यांनी केले. या कार्यक्रमाला मोठया प्रमाणात महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि मोठया संख्येने महाविद्यालयीन विद्यार्थिनी उपस्थित होत्या.युवतीने आत्मनिर्भर होणे काळाची गरज- दिपाली कोतवाल (गटविकास अधिकारी पंचायत समिती,रावेर) यांचे प्रतिपादन

रावेर- श्री. व्ही. एस. नाईक कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,रावेर जी-जळगाव येथे दिनांक २८/०३/२०२२ रोजी विद्यार्थी विकास विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांचे संयुक्त विद्यमाने युवती सभा अंतर्गत एक दिवसीय व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेचे उद्घाटन रावेर पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी सौ. दीपाली कोतवाल यांच्या हस्ते करण्यात आले होते.यावेळी त्यांनी हे भाष्य केले. या वेळी विचारमंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. व्ही. दलाल, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. संदीप धापसे, कबचौउमवी सिनेट सदस्य डॉ. अनिल पाटील, नॅक समन्वक डॉ. एस. आर. चौधरी हे उपस्थित होते.

आपल्या अध्यक्षीय मनोगत मध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.व्ही.दलाल यांनी विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी या एक दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले असुन. युवतींचे व्यक्तिमत्व सर्वगुणसंपन्न असेल तर कुटुंब व समाजाची प्रगती होते पर्यायाने देशाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते . शैक्षणिक गुणवत्तेचे बरोबर प्रभावी व्यक्तिमत्व असणं ही काळाची गरज आहे. असे प्रतिपादन केले.

या कार्यशाळेचे पहिले पुष्प कार्यशाळेचे उद्घाटक व मार्गदर्शक गटविकास अधिकारी सौ.दीपाली कोतवाल यांनी ''व्यक्तिमत्व विकास व नेतृत्व गुण'' या विषयावर गुंफले यावेळी त्यांनी विद्यार्थिनींना - ''युवतींनी प्रथम स्वतःचे आत्मपरीक्षण करून स्वतःला महत्त्व द्यायला हवे. आपल्या बौद्धिक विकासासाठी वाचन मनन चिंतन करायला हवे . नेतृत्व गुण हा प्रत्येक युवती मध्ये असतो पण तो तिने ओळखायला हवा. समाजाच्या कुटुंबाच्या विकासाबरोबर स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास करायला हवा . समाजाच्या कुटुंबाच्या विकासाबरोबर स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास करायला हवा. आधुनिक युगातील अनेक दाखले देत युवतींनी व्यक्तिमत्व विकासाबरोबर नेतृत्वगुण कसे विकसित करू शकतात'' याविषयी मार्गदर्शन केले.

द्वितीय पुष्प डॉ. सविता वाघमारे ( धनाजी नाना महाविद्यालय,फैजपूर) यांनी. ''व्यक्तिमत्व विकासात वेळेचे महत्त्व'' या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. या वेळी मार्गदर्शन करताना डॉ वाघमारे यांनी वेळ ही जीवन शिस्त निर्माण करण्याचे कार्य करते आणि त्यामुळेच प्रत्येक व्यक्तींनी वेळचे महत्व ओळखून वेळेचा सदुपयोग करुन घेतला पाहिजे असे स्पष्ट केले .

दुपारच्या सत्रात ''मानसिक आरोग्य व व्यक्तिमत्व विकास'' या विषयावर प्रा. डॉ . विनोद रामटेक( सरदार वल्लभभाई पटेल महाविद्यालय,ऐनपुर ) यांनी मार्गदर्शन केले .

चौथे पुष्प गुंफताना डॉ.गणपतराव ढेंबरे यांनी ''साहित्य आणि व्यक्तिमत्व विकास '' या विषयावर मार्गदर्शन केले.

मुलींना समाजात जीवन जगत असताना अनेक मर्यादांचा सामना करावा लागतो तिच्यातील पराधीनता जाऊन आत्मनिर्भरता निर्माण व्हावी यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात येते असे प्रास्ताविकातून महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. संदिप धापसे यांनी सांगितले.

कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी प्रा. मनोहर तायडे यांनी विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असे स्पष्ट केले.चार सत्रात चाललेल्या कार्यशाळेत वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या मान्यवरांनी आपल्या अनमोल विचारांनी विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्व विकासाचा आत्मविश्वासाचा सेतू निर्माण होईल असे आशावाद मांडला.

यावेळी महाविद्यालयातील ६० विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला. या व्याख्यानमालेचे सूत्रसंचालन व आभार कु. सोनल पाटील आणि कु.रोशनी गाढे यांनी केले. ही कार्यशाळा मोठ्या उत्साहात पार पडली त्या करिता सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

तसेच या शैक्षणिक वर्ष या काळात आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना ९६००० हजार रुपये कबचौउमवी ,जळगांव तर्फे ९६००० मंजूर करून धनादेश च्या मार्फत वाटप करणात आले.

**प्रा.संदीप धापसे**
**विद्यार्थी विकास अधिकारी**



Created by Universal Document Converter

# DEPARTMENT OF LIBRARY (2021-2022)

**Library Membership:**

The library is providing membership to its entire faculty members and Students. College Library provided Books faculties' services to its members including Teaching, CHB teachers' members during the 2021-2022.

**Library Collection**

For this year 95 books of Rs.16494 (Accession No.20293 to 20387) purchased for the students in College Library.

**PROGRAMME ORGANIZED BY LIBRARY DEPARTMENT:**

**1. WORKSHOP ON "MANAVI JEEVAN AANI GRANTH"**

Dated 16 October 2021 in collaboration of Marathi and Library Department organized one day National workshop. More than 300 faculties, researchers and students registered for this workshop. In this workshop 229 teachers and students are participated through online mode. Mostly Participants are from Madhya Predesh,Telangana, Gujarat and Maharashtra states. The Coordinator of the workshop was Dr. Dhembre G. R. and The convenor of the workshop was Dr. Mukhyadal B. G.

**2. PADMASHRI DR. S. R. RANGANATHAN PUNYATITHI:**

Shri V. S. Naik College Library organized "Padmashri Dr. S. R. Ranganathan Punyatithi" on 27 September 2021 at Reading Hall of Shri V. S. Naik College Library Raver, with the presence of our college Teaching Faculties Dr. A. N. Sonar tribute to Dr. S. R. Ranganathan on this occasion.

**3. SHAHEED DIWAS**

On the occasion of "Shaheed Diwas" dated 23 rd March 2022, Shri V. S. Naik College Library organized Programme in honours the valour and commitment of those who sacrificed their lives for the country. On this day, freedom fighters Bhagat Singh, Shivaram Rajguru and Sukhdev Thapar were hanged to death by the British rulers of India in 1931, on this occasion Vice- Principal Dr. V. B. Suryawanshi explain the importance of day, Prof. C. P. Gadhe and many students and non-teaching presence for this programme.

**4. WORLD BOOK DAY CELEBRATION**

